# श्रीसाई लीला.

## ( मासिक )

वर्ष १ लें.    चैत्र शके १८४५    अंक १ ला.

## मंगलाचरण

साईरहम नजर करना ॥ बच्चोंका पालन करना ॥ साई ॥

जाना तुमने जगत पसारा ॥ सबही झूट जमाना ॥ १ ॥ साई ॥

मै अंधा हूं बंदा आपका ॥ मुझसे प्रभू दिखलाना ॥ २ ॥ साई ॥

दास गनू कहे अबक्या बोलू ॥ थक गई मेरी रसना ॥ ३ ॥ साई ॥

पद.

रहम नजर करो अब मेरे साई ॥

तुम बीन नही मुझे मा बापभाई ॥ रहम ॥

खाली जमाख मैंने गमाया ।

साथी आखरका किया न कोई ॥ रहम ॥ १ ॥

मै अंधाहूं बंदा तुमारा ।

मैना जानू ॥ अल्लाइलाही ॥ रहम ॥ २ ॥

अपने मसीदका झाडू गनू है ।

मालिक हमारा । तुम बाबा साई ॥ रहम ॥ ३ ॥

# श्रीसाई लीला.

## ( मासिक )

वर्ष १ लें. | चैत्र शके १८४५. | अंक १ ला.

## मंगलाचरण

पद.

साईरहम नजर करना ॥ बच्चोंका पालन करना ॥ साई ॥
जाना तुमने जगत् पसारा ॥ सबही झूट जमाना ॥ १ ॥ साई ॥
मै अंधा हूं बंदा आपका ॥ मुझसे प्रभू दिखलाना ॥ २ ॥ साई ॥
दास गनू कहे अबक्या बोलूं ॥ थक गई मेरी रसना ॥ ३ ॥ साई ॥

पद.

रहम नजर करो अब मेरे साई ॥
तुम बीन नही मुझे मा बापभाई ॥ रहम ॥
खाली जमाख मैने गमाया ।
साथी आखरका । किया न कोई ॥ रहम ॥ १ ॥
मै अंधाहूं बंदा तुमारा ।
मैना जानूं ॥ अल्लाईलाही ॥ रहम ॥ २ ॥
अपने मसीदका झाडू गनू है ।
मालिक हमारा । तुम बाबा साई ॥ रहम ॥ ३ ॥

# मासिकाचा उद्देश.

या मासिक पुस्तकाचा उद्देश त्याच्या नांवावरून व्यक्त होत आहे. शिर्डीचे श्रीसाई महाराजांचे भक्त असंख्य असून ठिकठिकाणीं पसरले आहेत. त्यांना निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या तऱ्हेचे अनुभव महाराजांनी दिले आहेत. इतकेंच नव्हे तर महाराजांनीं आपल्या देहावसनानंतर सुद्धां अनुभव देण्याचें चालू ठेविलें आहे. किंबहुना ज्यांना महाराजांच्या देहाचें प्रत्यक्ष दर्शन घडलें नाहीं, त्यांना सुद्धां अनुभव येत आहेत. थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे महाराजांचे अनुभव अश्रुत पूर्व अतर्क्य आणि अनेक आहेत व त्यांच्या अष्टकांतील खालील श्लोकाची सत्यता सर्वांना पटवीत चालले आहेत.

" अनेकाश्रुतातर्क्यलीलाविलासैः ॥
समाविष्कृतेशा न भास्वत् प्रभावं ॥
अहं भावहीनं प्रसन्नात्मभावं ॥
नमामीश्वरं सद्गुरुं साईनाथं " ॥ १ ॥

महाराजांच्या सर्व लीलांचा एके ठिकाणीं संग्रह होणें शक्य नाहीं, पण शक्य असेल तेवढा त्यांच्या लीलांचा व त्यांच्या अमूल्य बोधवचनांचा संग्रह करावा या हेतूनें हें मासिक पुस्तक काढलें आहे. भावार्थ रामायणांत, श्रीरामचंद्राला पार्वतीनें " तूं सर्वज्ञ असतांना भ्रांतपणाचें अवलंबन करून तृणपाषाणांनां आलिंगन कां देतोस " असा प्रश्न केला असतां श्रीरामचंद्रानीं जे शब्द उच्चारले आहेत तेच महाराजांना लागू आहेत. श्रीरामचंद्र म्हणाले,

" भक्त उद्धारावया कारणें । रडणें पडणें अडखळणें ।
पर्वतो पर्वतीं धांवणें । आणि आलिंगणें वृक्षांसीं ॥
उमे जाण तूं निश्चित । माझें पाऊल न पडे व्यर्थ ।
जाणे सदाशिव समर्थ । तुझा भावार्थ तो नाहीं ॥ "

हे शब्द सर्वस्वी महाराजांस लागू आहेत. त्यांचा एकूण एक शब्द व एकूण एक लीला केवळ भक्तांच्या उद्धारासाठीं होती व त्यांचें एक पाऊल सुद्धां व्यर्थ पडत नव्हतें म्हणून त्या लीलांचा व शब्दांचा संग्रह भक्तांनाच नव्हें तर सर्व जनतेला हितकारी होईल अशी आमची खात्री आहे

असा संग्रह करण्याचा थोडासा प्रयत्न झाला आहे व तो या मासिकांत "महाराजांचें अनुभव" व "श्री साईसच्चरित" या मथळ्याखालीं येईल. यापैकीं "श्री साईसच्चरित" पद्यात्मक म्हणजे ओंवीबद्ध रचलें गेलें आहे व त्याची म्हणजे श्री साईसच्चरिताची सुरवात महाराज देहधारी असतांना त्यांची आज्ञा घेऊन झाली होती. 'महाराजांचें अनुभव' या मथाळ्याखालीं निरनिराळ्या भक्तांकडून जे अनुभव लिहून येतील त्यांचा संग्रह करण्याचें योजिलें आहे. असे बरेचसे अनुभव आमच्या संग्रहास आज आहेत, ते या मथाळ्याखाली छापले जातील; त्यांत कांहीं चुका असल्यास त्या त्या भक्तांकडून दुरुस्ती लिहून आल्यास आम्ही आनंदानें प्रसिद्ध करूं. तसेंच महाराजांचे भक्तांकडून जे जे अनुभव लिहून येतील त्यालाही सवडीप्रमाणें शक्य तितलें स्थळ या मासिकांत देऊं. भक्तांचे अनुभव छापण्यासाठींच हें मासिक असल्यामुळें जे अनुभव लिहून येतील तिकडे पूर्ण लक्ष दिलें जाईल हें सांगणें नकोच.

समर्थांनीं कोणांस कांहीं गुप्त रितीनें सांगितलें असेल तर तें या ग्रंथांत परिस्फुट होण्याचा संभवच नाहीं, पण त्यांनीं उघडे दरबारांत सर्वांसमक्ष कोणा एकास उद्देशून जरी कांहीं सांगितलें असलें, तरी तें सर्वांच्या हिताचें असल्यामुळें तें सर्वांची सामाईक कमाई आहे असें सर्व सांईभक्त समजत असले पाहिजेत. अशी समजूत आहे आणि म्हणूनच त्यांनीं आपले अनुभव लिहून पाठवावे अशीं आमची प्रत्येक भक्तास आग्रहाची विनंती आहे.

शिर्डीचे श्रीसाईबाबाचे भक्त असंख्य आहेत पण आजमितीला आमचे यादीवर श्रीसमर्थांचे सुमारें ९०० भक्तांची नोंद आहे. आम्हांस हा वेळपर्यंत अज्ञात असे आणखीं किती तरी साई भक्त सर्व हिंदुस्थानभर जागजागीं पसरलेले आहेत. त्यांची माहिती आम्हांस जसजसी मिळत जाईल तसतसी त्यांचींही नांवें या यादीवर चढविण्याचा क्रम सुरू राहील. महाराजांच्या भक्तांनीं आपलीं नांवें व पत्ते आम्हांस लिहून कळविल्यास आमच्यावर त्यांचे उपकार होतील.

सारांश, ही सरस्वतीची सेवा आणि ती परम दयाळू श्री साईमाऊलीचे इच्छेनें आणि आशिर्वादानें घडत आहे. अर्थात त्या माऊलीची आपल्या भक्तांना वेळोवेळीं आठवण होत रहावी हेंच या सेवेचें ध्येय आहे.

# महाराजांचे अनुभव.

श्री साईभक्ति परायण कृष्णाजी काशिनाथ जोशी उर्फ भाऊ महाराज यांजकडून:—

॥ श्रीगुरु साईनाथ प्रसन्न ॥

( स्वानभव )

[ श्री साईनाथ लीला ]

( नमन मालाष्टक )

॥ प्रथम नमन माझें, सद्गुरू साईनाथा ॥
॥ हरनि दुरित माझें, मागतों हेंचि आतां ॥
॥ अशिव कलि मला तो, गांजितो नित्य नाथा ॥
॥ तुजविण नच त्राता, दीन या कृष्ण नाथा ॥ १ ॥

॥ गळा रुंड माळा, करीं वाम झोळी ॥
॥ मला वाटतें कीं, असे चंद्र मौळी ॥
॥ नका अंत पाहूं, तुम्ही साइनाथा ॥
॥ दावी मुमूक्षु पथ हा, मज कृष्ण नाथा ॥ २ ॥

॥ हें चालिलें वय वृथा, भुललों प्रपंचीं ॥
॥ तींही करोनि स्थिरता न घडे मनाचीं ॥
॥ दुःखार्णवांत बुडतों, मज तारि आतां ॥
॥ नमस्कार माझा, सद्गुरु साइनाथा ॥ ३ ॥

पुढें चालू.

# SCHEME FOR THE MANAGEMENT OF THE SHIRDI SANSTHAN OF SHRI SAI BABA.

1. All the Sansthan property both moveable and immoveable shall vest in the following five trustees for life :—

1. Mr. Moreshwer Vishvanath Pradhan, B. A. LL. B., Member Bombay Legislative Council.
2. Mr. Lakshman Ganesh Mahajani of Messrs. Shoorji Vallabhdas and Co., Merchants Bombay,
3. Prof. Ganesh Govind Narke. Professor of Chemistry and Geology, College of Science, Poona;
4. Ramchandra Atmaram Turkhud, Manager and Secretary, Khatau Makanji Mills, Bombay.
5. Mr. Tatya Ganapati Patil Kote, Land-holder, of Shirdi.

Any vacancy in the trustees shall be filled up by the rest of them as early as possible from among the Bhaktas of Shri Sai Baba subject to confirmation by the District Judge.

2. The management of the Sansthan and its Property both moveable and immoveable shall vest in a Committee called The Shirdi Sansthan Committee, of which the trustees shall be ex-officio members.

3. The Shirdi Sansthan Committee shall consist of 15 members in all, including the trustees and a Chairman, a Treasurer, a Secretary, a Joint Treasurer and a Joint Secretary.

Their names are as follows:—

COMMITTEE.

5. Trustees as in rule 1 above.

CHAIRMAN.

6. Ganesh Dattatraya Sahasrabudhe alias Das Ganu Religious Preceptor and Hardas.

TREASURER.

7. Mr. Govind Raghunath Dabholkar. Retired Mamlatdar and Resident Magistrate (First Class) Bandra.

JOINT TREASURER.

8. Mr. Yeshwant Janardan Galwankar, B. A., Judicial Department, Secretariat, Bombay

SECRETARY.

9. Mr. Hari Sitaram Dikshit, Retired Solicitor and Vakil High Court.

JOINT SECRETARY.

10. Ramchandra Dada Kote Patil, Land holder of Shirdi.

MEMBERS.

11. Mr. Krishnarao Narayan Parulkar Honorary Magistrate, Harda, C. P.

12. Mr. Ganesh Damodar Kelkar, Retired Government servant now residing at Shirdi.

13. Mr. Amaidas B. Mehta, Proprietor, British Photo Enlarging Company, Kalbadevi, Bombay.

14. Mr. Madhavrao Balwant Deshpande, landholder, Shirdi. and

15. Mr. Raghuvir Bhaskar Purandare, clerk, Loco Department G. I P. Ry. Bombay.

4. The above persons ( except the trustees who shall hold office for life ) shall hold office for a period of three years after which all the office holders except trustees shall be elected by the Bhakta Mandal which shall be constituted with all convenient despatch in manner hereinafter mentioned

5. The Bhakta Mandal shall consist of such devotees of Shri Sai Baba's Shrine as apply to be enrolled as members of the Bhakta Mandal and agree to contribute to the expenses of the Sansthan a sum not less than Rs 5., per year. The Shirdi Sansthan Committee however shall have power for special reasons to be recorded in wrting to enlist any devotee of the said shrine as an honorary member of the Bhakta Mandal without requiring him to pay the aforesaid annual contribution or to make an application as aforesaid.

6. The quorum for meetings of the Bhakta Mandal shall be ten members and for that of the Shirdi Sansthan Committee shall be five members.

7. Casual vacancies arising in the Shirdi Sansthan Committee ( hereinafter for brevity's sake called the Committee ) by death, resignation or otherwise shall be filled up by the Committee.

8. It shall be the duty of the Committee to arrange,

( a ) for the management of the Sansthan in accordance with the existing practice but subject to such directions as may from time to time be given by the Bhakta Mandal ( hereinafter for brevity's sake called 'Mandal' ).

( b ) for the custody of all cash, documents, papers and other property moveable and immoveable of the Sansthan and for the collection of donations, subscriptions, grants etc., to the Sansthan and for the recovery of the outstandings, rents, profits or other income of the Sansthan and for the payment of all dues, salaries, debts and other reasonable expenses connected with the Sansthan.

( c ) for the keeping of true and proper accounts of all things and moneys received and disbursed for or on account of the Sansthan and for the auditing of the same as also for the preparation of the annual balance sheet of the Sansthan and submitting such balance sheet to the Mandal at its annual meeting and a copy of such balance sheet to the District Court of Ahmednagar.

( d ) For the holding of the fairs and festivals connected with the Sansthan and for the due entertainment of Puraniks, Kathekaris and Bhajankaris, Singers and mendicants visiting the shrine.

( e ) for the investment of the surplus funds of the Sansthan or land or such other securities as are mentioned in section 20 of the Indian Trust Act.

( f ) for the maintenance in a state of repair of the moveable aud immoveable property of the Sansthan.

9. The Committee shall not have power to alienate, mortgage or charge any immoveable property or jewellery of the Sansthan without the sanction of the District Court of Ahmednagar. It shall however have power to dispose of any other moveable property of the Sansthan or to destroy such articles as may have become useless and unsaleable. It shall have also power to let any immoveable property of the Sansthan at such rental and on such terms as the Committee may think fit but not for a period exceeding three years.

10. The Committee shall as soon as practicable draw up rules not inconsistent with the provisions of this scheme for the following purposes.

( a ) formation of the Bhakta Mandal.

( b ) holding meetings of the Bhakta Mandal and of the Committee.

( c ) for the internal working of the Committee and for the appointment of a local Sub-committee.

( d ) generally for the management of the affairs of the Sansthan.

11. The Committee shall have liberty to apply to the District Court for directions whenever it may become necessary or advisable to do so.

---

# आतांपर्यंत छापून आलेल्या महाराजांच्या लीला.

महाराजांच्या लीलांचें कांहीं वर्णन श्रीमती सावित्रीबाई तेंडुलकर यांनीं प्रसिद्ध केलेल्या **भजनमालेच्या** प्रस्तावनेंत आलें आहे. त्या भजनमालेंतील पद्यें महाराजांचे प्रेरणेनें व प्रसादानें कांहीं सावित्रीबाईंनीं लिहिलीं आहेत व कांहीं त्यांचे पती रा. रा. रघुनाथराव तेंडुलकर यांनीं लिहिलीं आहेत. त्या प्रस्तावनेंत वर्णिलेल्या लीला येथें जशाचा तशाच उतरून घेत आहें. त्या येणेंप्रमाणें:—

महाराज पहिल्यानदा नित्य गांवांतील वाण्याकडून तेल मागून आणीत, आणि तें पणत्यांत घालून काकडे पेटवून मशिदींत रात्रभर जाळीत असत. वाणी शेवटीं कंटाळले, आणि एक दिवस महाराज तेल मागावयास गेले असता तेल नाहीं असें म्हणाले.

महाराज तसेच मशिदींत परतले. तेलाच्या टमरेलांत सांजवात लावण्यापुरतेंच तेल राहिलें होतें. त्यांत महाराजांनीं पाणी घातलें व तें तेलमिश्रित पाणी पिऊन नंतर निव्वळ पाणी घेउन तें पणत्यांत ओतलें. त्यांत काकडे घातले आणि आगकाडी ओढून काकड्याला लाविली तों ते सर्व काकडे पेटले, आणि नुसत्या पाण्याचे दिवे रात्रभर जळत राहिले.

[ पुढें चालू. ]

# अनुक्रमणिका.


श्री साईबाबा शिर्डी संस्थानचे व्यवस्थेची स्कीम. — १

२ महाराजांचे अनुभव.

श्री साईनाथ बाबा आर्यासप्तक. — ५

रा. रा. विष्णु विनायक साठे यांनीं केलेल्या कविता, — ६

श्रीमती हिराबाई गायकवाड यांनीं केलेलीं सुरस पदें. — ७

सौमित्र विरचित श्री साईनाथ स्तोत्रम्. — ९

३ स्फुट प्रकरण.

श्री साई महाराजांची दुसरी पुण्यतिथी
रोजीं श्री समाधी समोर म्हणण्यांत आलेलीं पदें — ११

४ दास गणूकृत गुरुपाठाचे अभंगांतील उतारा. — १३

५ आतां पर्यंत छापून आलेल्या महाराजांच्या लीला. — १५

६ श्री साईसच्चरित. — ३३–४८


---


वार्षिक वर्गणी तीन रुपये. ट. हा. सह तीन रुपये सहा आणे. फुटकळ अंकास पांच आणे.


## पुस्तकाची पोंच व अभिप्राय.

"कैवल्य वैभव" या नांवाचे पद्यसंग्रहाचें पुस्तक त्याचे संग्राहक प्रकाशक रा. रा. रघुनाथ हणमंत कोटणीस, वकील, कुरुंदवाड यांजकडून आमचेकडे अभिप्रायार्थ आलें आहे. चिमडसंप्रदायाची पंचपदी हा या पद्यसंग्रहाचा मूळ उद्देश आहे. यांत त्या संप्रदायाचा नित्य नियम भजनविधि देऊन नंतर संप्रदायांतील प्रसिद्ध पुरुष श्री रेवणसिद्ध महाराज यांचें एक कानडी पद व नारायणराव भाऊसाहेब महाराज निंबरगीकर व रामचंद्रराव महाराज यरगट्टीकर यांच्या पदांचा संग्रह केला आहे. त्यापैकीं नारायणराव भाऊसाहेब महाराजांचीं पदें बहुतेक कानडींत आहेत. रामचंद्रराव महाराजांचीं पदें फार प्रेमळ आहेत. यानंतर महाराष्ट्रांतील प्रसिद्ध संत मुकुंदराज महाराज, ज्ञानेश्वर महाराज, मुक्ताबाई, एकनाथ महाराज, तुकाराम महाराज यांच्या व तसेंच कबीर महाराज, गोरखनाथ इत्यादि संतांच्या पद्यांतील निवडक वेंचे काढून ते निरनिराळ्या विषयानुसार ग्रथित केले आहेत. हा पद्य संग्रह प्रेमळ वाचकांस आनंद देईल यांत शंका नाहीं. पुस्तकाची किंमत १ रु. ठेविली आहे. पुस्तकें स्यानेनर कैवल्यवैभव आफिस हणमंतराव कोटनीस वकील सांगली यांचे येथें मिळतील.

# श्रीसाई लीला.

## ( मासिक )

वर्ष १ लें. वैशाख शके १८४५. अंक २ रा.

## श्री साईबाबा शिर्डी संस्थानचे व्यवस्थेची स्कीम.

( अहमदनगर डिस्ट्रिक्ट कोर्टाकडून मंजूर झालेली )

१ संस्थानची सर्व स्थावर जंगम मिळकत खालील पांच ट्रस्टी यांचे हयातीपावेतों त्यांचे ताब्यांत राहील.

### ते पांच ट्रस्टी.

( १ ) मि० मोरेश्वर विश्वनाथ प्रधान बी० ए० एलएल बी० बॉंबे लेजीस्लेटिव्ह कौन्सीलचे मेंबर.

( २ ) मि० लक्ष्मण गणेश महाजनी मेसर्स शुरजी वल्लभदास आणि कंपनी व्यापारी मुंबई.

( ३ ) प्रोफेसर गणेश गोविंद नरके रसायन आणि भूगर्भ शास्त्राचे प्रोफेसर सायनस कॉलेज. पुणें.

( ४ ) मि० रामचंद्र आत्माराम तरखड म्यानेजर आणि सेक्रेटरी खटाव मकनजी मिल्स मुंबई.

( ५ ) तात्या गणपती पाटील कोते ल्यांड लॉर्ड शिर्डी.

या ट्रस्टींची एकादी जागा रिकामी झाल्यास त्याचे जागीं श्री साईबाबा यांचे भक्तांपैकीं एकादा इसम हल्लींच्या ट्रस्टींनी होतां होईल तितके लवकर मेहरबान डि० जज्ज साहेब यांचे मंजुरीनें नेमावा.

२ ह्या संस्थानची व त्याचे स्थावर जंगम मिळकतीची व्यवस्था शिर्डी संस्थान कमेटीकडे असावी. व ट्रस्टी हे या कमेटीचे एक्स ऑफि-शिओ सभासद होतील.

२ शिर्डी संस्थान कमेटीमध्यें एकूण १५ पंधरा सभासदांचा समावेश असावा:-त्यांमध्यें ट्रस्टी;चेअरमन, ( १ ) खजीनदार ( १ ) सेक्रेटरी, ( १ ) मदतनीस खजीनदार आणि एक मदतनीस सेक्रेटरी, इतके असावेत. यांची नांवें येणेंप्रमाणें.

## कमेटी चेअरमन

ह. भ. प. गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे ऊर्फ दासगणू.

## खजीनदार.

मि० गोविंद रघुनाथ दाभोळकर
रिटायर्ड मामलेदार आणि रेसिडेंट फ० क्लास माजिस्ट्रेट बांद्रा.

## मदत खजीनदार.

मि० यशवंत जनार्दन गाळवणकर बी. ए.
न्यायखातें सेक्रेटारीयेट मुंबई.

## सेक्रेटरी.

मि० हरी सिताराम दीक्षित
रिटायर्ड सॉलीसिटर आणि हायकोर्ट वकील.

## मदत सेक्रेटरी.

रामचंद्र दादा कोते पाटील शिर्डी येथील जमिनदार.

## सभासद.

मि० कृष्णराव नारायण परूळकर. आनररी म्या. हर्डा सी. पी.

मि० गणेश दामोदर केळकर
रिटायर्ड सरकारी नोकर; हल्ली राहणार शिर्डी.

मि० अमीईदास बी० मेहता
प्रोप्रायटर ब्रिटिश फोटो एनलार्जींग कंपनी काळबादेवी मुंबई.

मि० माधवराव बळवंत देशपांडे जमीनदार राहणार शिर्डी.

---

१ हे इसम हाली मयत असून यांचे जागीं रा. रा. सखाराम बळवंत धुमाळ वकील नाशिक यांना नेमण्यांत आलें आहे.

भगवद्भक्तिपरायण श्री० उद्धवेशबुवा डहाणूकर यांचे आर्यासप्तक:-- यांतील प्रत्येक आर्येच्या आद्याक्षरांनीं 'श्रीसाईनाथ बाबा' हें गोड नाव साधलें आहे:--

# ॥ श्री साईनाथबाबा ॥

## आर्यासप्तक

श्री गुरुराया ताता, सांभाळी शामदास[1] हा तनय ॥
त्वत्पदिं ठेवुनि माथा, प्रार्थितसें प्राप्त हो मला विनय ॥ १ ॥
सांडून लोभमोहा, लावियलें सत्पथास या जन जे ॥
बाळा, गोविंद, हरी, बापू, श्रीकाशिनाथ तुजशि भजे ॥ २ ॥
ईशा तव लीलेला, वर्णाया भक्तिपंथ गणु लागे ॥
नच पूर्तता तयाला वर्णन करण्यास तोहि बा भागे ॥ ३ ॥
नाना मार्गें जातां, दावियलें रूप विविध जातीचें ॥
पटलें ज्यांना नच त्या, बोधियलें सत्स्वरूप मग साचें ॥ ४ ॥
थट्टेनें, सत्यानें नाम तुझें नित्य घेति जे वदनीं ॥ ५ ॥
बाळकरामा धामा, हिंडविलें सत्य-'देव, बघण्याला ॥
फिरफिरुनि श्रांत झाला, आला परतून शिर्डि ग्रामाला ॥ ७ ॥
बाऱ्या अगाध लीला, वर्णायाउद्धवेश[12], या थकला ॥
तन, मन, तुझेंचि धन हें, सर्व परीनें तुझ्या चऱ्हा विकला ॥ ८ ॥
ऋषिसंख्या-या-आर्या[13] आर्यांचे चरण-कमलिं अर्पितसे ॥
अ~~स्थानं असो हा~~ यति,-मात्रा, वृत्त बोध मजशि नसे ॥ ९ ॥
श्रीसाईनाथ चरणीं, अल्पहि करणी करीतसे हजर ॥
सर्वज्ञ दोष-त्यागुनि, बुध-जनि थावीच इजकडे नजर ॥ १० ॥

---

१ हे बुवा इ. स. १९०६ सालीं शिर्डीस गेल्यावेळीं श्रीसद्गुरूनीं त्यांना शामदास म्हणून हाक मारली व पुढेंही याच नांवानें ते त्यांस संबोधीत. २ कै. रा. रा. रा. बाळा साहेब भाटे व बाळा साहेब देव मामलेदार हल्लीं वस्ती ठाणें. ३ अण्णासाहेब दाभोळकर. ४ काकासाहेब दीक्षित. ५ कै. श्री. बापुसाहेब बुटी. ६ श्री. उपासनी महाराज. ७ श्री दास गणू महाराज. ८ नानासाहेब निमोणकर नानासाहेब डेंगळे नानासाहेब चांदोरकर, नानाबुवा. ९ कै. रा. रा. रा. बाळकराम. १० शिर्डी. ११ बडे बाबा किंवा फकीर बाबा. १२ समकालें कवीचें नांव. १३ ऋषि=सात; संख्या ... श्रीसाईनाथ बाबाही अक्षरेंही ७.

रा. रा. विनायक विष्णु साठे यांच्या खालील कविता श्रीसाई स्वरूप वर्णन पर असून उत्तम आहेत हें जाणून त्यांस या मासिकांत स्थळ देण्यांत येत आहे.

( शालिनी )

आहे योगी शीरडी ग्रामवासी ।
साईबाबा ज्ञानवैराग्य राशी ॥
साक्षित्वानें लक्षितांना निवृत्ति ।
आनंदानें आदरी जो प्रवृत्ति ॥ १ ॥

( उपेन्द्रवज्रा )

असो प्रवृत्ती अथवा निवृत्ती ।
उदास राहे धरि मौनवृत्ति ॥
समान पाहे उभयांस योगी ।
निजात्मतेचा परिमोद भोगी ॥ २ ॥

( इन्द्रवज्रा )

भेदीं असावें अथवा अभेदीं ।
तो नित्य बोधा कधिंही न भेदी ॥
विश्वांत जो एकच तत्व पाहे ।
त्याचा समाधी सहजीच आहे ॥ ३ ॥
लीला जयाच्या उपदेश देती ।
धीमंत भावें स्वमनांत घेती ।
वाणीस कोणी म्हणती अभद्र ।
सूज्ञांस देते परि पूर्ण भद्र ॥ ४ ॥

( उपेन्द्रवज्रा )

उदास चित्तें व्यवहार सर्व ।
करोनि खंडी कळतांच, गर्व ॥
असे उदारा अति तीव्रबुद्धी ।
उदी जयाची करि देहशुद्धि ॥ ५ ॥
सूज्ञांस लाभे स्थिरता मनाची ।
भीती न त्यांची लवही जनाची ॥
ज्याचे मनीं भाव जसा असेल ।
साईमध्यें तोच तया दिसेल ॥ ६ ॥

मि० रघुवीर भास्कर पुरंदरे कारकून लोको डिपार्टमेंट जी०आय० पी० रेल्वे कंपनी मुंबई.

४ हे ट्रस्टी कायमचे काम करणारे राहतील या ट्रस्टीखेरीज वरील मंडळीनीं ३ वर्षेपर्यंत कामें करावीत. त्यानंतर ट्रस्टीखेरीजकरून बाकीचे सर्व अधिकारी भक्तमंडळीनीं यापुढें निर्दिष्ट केलेल्या पद्धतीनें होतां होईल तितके लवकर भक्तमंडळ तयार करून त्यांतून निवडून घ्यावेत.

५ जे लोक भक्तमंडळाचे सभासद होण्याबद्दल अर्ज करतील व संस्थानचे खर्चाकरितां निदान वर्षाला पांच रुपये वर्गणी देण्यास कबूल होतील अशाच लोकांचा श्रीसाईबाबांचें देवळाचे भक्तमंडळांत समावेश होईल. कमेटीनें कांहीं विशेष लेखी कारणें नमूद केल्यास एकाद्याकडून वरीलप्रमाणें वर्गणी न घेतां अगर वर लिहिल्याप्रमाणें त्याचा अर्ज नसतां त्याजला सदरचे भक्तमंडळांपैकीं एक ऑनररी सभासद नेमण्याचा अधिकार आहे.

६ भक्तमंडळांच्या सभेंत कमींतकमी १० जणांची संख्या असावी, आणि शिर्डी संस्थान कमेटीचें सभेंत ५ जणांची संख्या असावी:—

७ शिर्डी संस्थानचे कमेटींत (जिला यापुढें थोडक्यांत म्हणजे कमेटी असें म्हटलें आहे. ) मृत्युमुळें राजीनाम्यामुळें अगर अन्य कारणामुळें रिकामी जागा झाल्यास तो कमेटीनें भरावी.

८ जिला यापुढें मंडळ म्हटलें आहे. त्या कमेटीची मुख्य कामें खालीलप्रमाणें आहेत.

( A ) भक्तमंडळाच्या वेळोवेळीच्या सूचनेप्रमाणें हल्लीं चालू असल्याप्रमाणें संस्थानची व्यवस्था ठेवणें.

( B ) संस्थानची सर्व स्थावर व जंगम ( रोकड दस्तऐवज वगैरे ) सुरक्षीत ठेवणें. देणग्या वर्गणी गोळा करणें. भाडें व देणें घेणें, व इतर उत्पन्नाची वसुली करणें व संस्थाचे लोकांचा पगार देणें. व इतर खर्च करणें.

( C ) संस्थानांत आलेल्या सर्व वस्तू व रकमेसंबंधीं योग्य व खरा जमाखर्चाचा हिशेब ठेवणें, व हिशेब तपासणी करणें. वार्षिक जमाखर्चाचा

तक्ता तयार करणें व तो भक्त मंडळापुढें वार्षीक सभेचेवेळीं ठेवून त्याची नक्कल मे० डि० जज्यसाहेब नगर यांजकडेस पाठविणें.

( D ) संस्थानसंबंधी यात्रा व उत्सव भरविणें, पुराणीक, हरिदास, भजनी लोक, गायन करणारे, व भिक्षुक, यांची योग्य संभावना करणें.

( E ) संस्थानची शिल्लक जमिनी अगर इंडियन ट्रस्ट ॲक्ट क० २० अन्वये ज्या ठेवी असतील त्या योग्य तऱ्हेनें व्याजीं लावणें.

( F ) संस्थानची स्थावर जंगम मिळकत नीट आहे तशी ठेवणें.

९. कमेटीला डी॥०जज्ज साहेब बहादूर यांचे परवानगी शिवाय संस्थेची जवाहिराची अगर स्थावर मिळकतीची गैर विल्हेवाट करण्यास गहाण ठेवण्यास अगर स्थावर बोजा उत्पन्न करण्यास अधिकार नाहीं. तथापी संस्थेची एकादी जंगम मिळकत विकण्यास अगर ज्या जिनसा निरुपयोगी अगर विकतां येत नाहींत अशा असतील त्यांचा नाश करण्याचा अधिकार कमेटीस आहे. संस्थेची स्थावर मिळकत भाडयानें देण्यास ३ वर्षांपेक्षां ज्यास्त नाहीं,अशा मुदतीनें व योग्य त्या भाडयाबद्दल करारानें देण्यास अधिकार कमेटीस आहे.

१० कमेटीनें खालील बाबतींत स्कीमला धरून नवीन नियम होता होईल तितके लवकर करावे.

( अ ) भक्तमंडळ स्थापन करण्याकरितां.

( ब ) भक्त मंडळांची सभा भरविण्याकरितां आणि कमेटीची सभा भरविण्याकरितां.

( क ) कमेटीचे अंतर्व्यवस्थेचे बाबींत व लोकल सब् कमेटी स्थापन करण्यास.

( ड ) संस्थेची सर्व कामाची व्यवस्था करण्याकरितां.

११ कमेटीस जरूर लागल्यास आणि इष्ट दिसल्यास कोर्टाकडून सल्ला विचारणें झाल्यास त्या कोर्टाकडे अर्ज करण्यास मोकळीक कमेटीस आहे.

ाऊसाहेब दीक्षित सकाळीं शिर्डीहून मुंबईस येण्याकरितां निघाल्यानंतर ;बापूसाहेब जोग,बाळासाहेब भाटे आणि मी,इतकी पांढरपेशांतील मंडळी ोती. भाऊसाहेब गेल्यानंतर थोडक्याच वेळांत मध्यभागचे कमिशनर ार्टिस साहेब, त्यांची पत्नि, नगर जिल्ह्याचे कलेक्टर मॅकनील साहेब ाणि कर्टिस साहेबाचे नेटिव्ह असिस्टंट रावबहादुर रामचंद्र नारायण र्फ भाऊसाहेब जोगळेकर अशी बडी अधिकारी मंडळी शिर्डीच्या अगदीं ाजीक येत आहे तोंच मशीदींत बाबांनीं आपली कफनी वर काढून (कफनीच्या आंत कौपीन नेहमीं असे ) ते म्हणाले कीं " * * हमारेकू ेखनेकू आया है. पर हम तो नंगा फकीर है " तेथें असलेल्या सेवेकरी ंडळीस बाबांच्या ह्या म्हणण्याचा अर्थ मुळींच समजला नाहीं, कारण मशीदीच्या समोर नवीन असें कोणींहि मनुष्य दिसत नव्हतें; परंतु दोन तीन मिनिटांत मशीदीवरून सदर अधिकारीवर्ग चावडीकडे जातांना दिसला, तेव्हां त्यांच्या बोलण्याचा खुलासा झाला.पुढें ती मंडळी चावडींत ...रून बसल्यावर शोधाअंतीं बाळासाहेब भाटे ह्यांच्याशिवाय आपल्या ...चयाचें तेथें कोणीच नाहीं असें भाऊसाहेब जोगळेकर ह्यांना समज- ...वरून त्यांनीं आपला एक पट्टेवाला बाळासाहेबांस बोलावण्यासाठीं ...ठविला. बाळासाहेबांच्या मनांत जावयाचें आलें नाहीं. म्हणून त्यांनीं ...वाल्यास तसाच निरोप सांगितला, तेव्हां मी 'भाऊसाहेबांनाच प्रथम ...थें बोलावून आणितों, आणि मग आपण त्यांच्याबरोबर चावडींत जाऊं' असें मी त्यांना सांगितल्यावर त्यांनी माझें म्हणणें कबूल केलें; व माझ्या निरोपाप्रमाणें भाऊसाहेब बाळासाहेबांच्या घरीं आल्यावर आम्ही त्यांच्या बरोबर चावडींत गेलों. नंतर " आपला प्रातर्विधि सबर आटोपा " असा बाबांना निरोप सांगण्याविषयीं भाऊसाहेबांनीं मला सुचविलें, तेव्हां असला " अव्यापारेषुव्यापार " येथें कोणीहि करणार नाहीं. असें मी त्यांना सकारण सांगून त्यांची समजूत घातली. हा प्रकार कर्टिस साहेबांना कदाचित विलक्षण वाटेल अशा समजुतीनें भाऊसाहेबांनीं त्यांची व माझी बालपणापासून विशेष मैत्री असल्याची हकीकत त्या साहेबांना कळविली. नंतर सर्वजण निमूटपणें बाबा मशीदींतून भिक्षेलाठीं बाहेर पडण्याची वाट पहात बसले.बऱ्याच वेळानें बाबा मशीदींतून बाहेर पडून

[illegible] आहेत. असे पाहातांच मिसेस कर्टिस ह्या चावडीपुढील रस्त्यांत जाऊन बाबांना त्यांनी आपल्या पद्धतीप्रमाणें प्रणाम केला व मला आपल्यापाशीं चार शब्द बोलावयाचे आहेत असें म्हणाल्या. तेव्हां त्यांना " आधा घंटा ठैर जाव, " असें बाबांनीं सांगितलें। नंतर बाबा [illegible] परत चावडीनजीक आल्यावरोबर मिसेस कर्टिस ह्यांनीं पुनः खालीं रस्त्यांत जाऊन बाबांना पूर्वीप्रमाणें प्रणाम करून [illegible] मानस कळविला, तेव्हां " एक घंटा ठैर जाव " असें बाबा ह्मणाले, आणि मशीदींत गेले. पुढें कर्टीस साहेबांना परत जाण्याची घाई असल्यामुळें थोडयाच वेळांत ती सर्व अधिकारी मंडळी मुकाटयानें गेली.

---

एकाद्या जीवास दर्शनाचा लाभ द्यावयाचा असल्यास श्रीसाई महाराज तो योग कसा अचुक आणीत व त्याजला आपलेपाशीं कसा ओढून घेत याचें उदाहरण पहावयाचें असल्यास तें सोलापुरचे रा. रा. वासुदेव सदाशीव जोशी यांचें खालील पत्रांत, या साईलीलेच्या वाचकांस [illegible] यास सांपडेल.

श्री सद्गुरुप्रसन्न ॥

( सत्यनारायणकंपनी सोलापूर कंपनी. स्थापन शके १८२३ मित्ती चैत्र शु॥ मॅनेजर वासुदेव सदाशीव जोशी. )

भक्तिपरायण रा. रा गोविंद धोंडो पानसरे यांनीं सिद्ध पुरुष श्री " साईनाथ उर्फ साई बाबा " यांचे दर्शनाचा योग कसा आला, व त्यांचे बद्दल अनुभवसिद्ध मत काय आहे, असा प्रश्न केल्यावरून, सदरहू सिद्ध पुरुषांची, पूर्व वृत्ती स्मरण करण्याचा अलभ्य योग त्यांनीं आणिला परंतु या त्यांचे आभार मानून. श्री नारायण कृपेनें व श्रीसद्गुरूच्या प्रसादानें [illegible] केलेली हकीकत सादर करतों. तिचा सानंद स्वीकार करून तींत योग्यतेप्रमाणें दुरुस्ती करून आपल्या श्री साईलीलेंत तिला जागा द्याल अशी [illegible] करतों.

ण कंपनी

या देहाची थोडक्यांत ओळख करावयाची म्हणजे या जीवाला [illegible] कर्मानुसार वयाचे सोळावे वर्षापासून " यदृष्टं तन्नष्टम् " या [illegible]

जागृती होऊन केवळ देह प्राक्तन भोगण्याकरतांच गृहस्थाश्रमांत दाखल व्हावें अशा भावनेंत आज वयाच्या सुमारें सदतीस वर्षांचा काळ गेला. या गेलेल्या काळांत अनेक साधुसंत व सत्पुरुषांच्या गांठी पडल्या परंतु भूतलावर असलेल्या बद्ध, मुमुक्षू साधक व सिद्ध: अशा चार प्रकारांत सिद्धावस्थेंत पोंचलेल्या पुरुषांमध्यें सिद्ध पुरुष श्री "साईबाबा" हेच प्रथम गांठ पडलेलें असें मोठया आनंदानें म्हणत आहे. असो.

भेटीचा योग:-मुमुक्षवस्थेंत पडलेले पेन्शनर मामलेदार घोडनदी येथील श्री० रा. रा. चिदंबर केशव उर्फ अण्णासाहेब गाडगीळ यांनीं श्री क्षेत्र गाणगापूर येथें अन्नछत्र घातल्यामुळें सोलापूर पेठेशीं संबंध पडून व्यवहारदृष्टया त्यांची गांठ पडली. नंतर समसमान संयोग झाल्यावर परमानंद प्राप्त होतो त्याप्रमाणें होऊन सदर गृहस्थांनीं शके १८३५ सालीं आज्ञा केली कीं, "मी शिर्डी मुक्कामीं आहें; येथें नामसप्ताह सुरू आहे तरी दर्शनाकरतां यावें, येण्याजाण्यास रुपये दहा खर्च लागेल, चिंता नाहीं. श्रीनारायण आपणास कोठेंही देईल; परंतु ही वेळ वाया जाऊं देऊं नये" याप्रमाणें विनंतीपत्र वाचून जो आनंद झाला तो लिहिणें शक्य नाहीं. नंतर व्यवहार पद्धतीप्रमाणें सहचारी जीवांची परवानगी घेऊन जरी द्रव्याची अडचण होती, तरी पण हा देह जाण्यास तयार होऊन सदर सिद्धांचे कृपेनेंच शिर्डी येथें रा. रा. गाडगीळ हे त्यांचे परम स्नेही रावबहादूर तात्यासाहेब साठे यांचे वाडयांत होते त्यांनीं येथें आला. नंतर स्नान संध्यादि कर्मविधि सारून सदर गाडगीळ यांचे बरोबर श्रीचे दर्शनास पूजा सामानासह तयार झाला. बाबा मशजींत ल्यादाखो तेथें पूजा वगैरे आटोपून नवें धाड पाहून देहाची साफल्यता यांनीं एकटें वाटलें. नंतर सायंकाळीं याच ठिकाणीं आर्ती वगैरे करून रा. बा. तात्यासाहेबांचे वाडयांत अजमासें ४०x५० इंच साईचा फोटो असेल, नक्की गाडगीळ यांना. परंतु मोठा फोटो सदर श्री बाबा यांचा सदर वाडयांत बाबांचीच ठेवलेला असोन त्याची पण दोन सांज पूजा आर्ती करण्याचा अर्पिनण ? असें वाटतें. कारण सकाळीं ११।१२ चे सुमारास उतरल्यामुळें कुठिता सायंकाळचा प्रोग्राम दृश्यमान झाला. त्या वेळीं कोणत्याही स्थान ... करण्याची या देहास संवय असल्यामुळें आर्ती सुरू झाल्यापासून

ती तपेपर्यंत श्री बाबांचे मुखकमलावर दृष्टी एकाग्र झाली. त्यावेळीं मुख-कमल न दिसतां वस्त्राच्छादित असलेले शिरोभागाचे ठिकाणीं नारसिंह स्वरूप दिसूं लागलें. त्याच नादांत हा जीव रंजित होऊन भान न राहिल्यामुळें आर्ती समाप्त झाली तरी जागृती नाहीं. सदर गाडगीळ यांनीं हालवून सांगितलें जोशीबुवा आर्ती झाली चला; म्हटल्यावर देहभानावर येऊन चाललों. परंतु एकाग्र दृष्टी झालेली छाया अदृष्ट होईना व पुनः पुनः मन हें काय आहे हें जाणण्याविषयीं आतूर झालें. याप्रमाणें सांज सकाळ तीन दिवस अनुभव झाल्यावर सदरचे रा. रा. गाडगीळ अण्णासाहेब यांना विचारलें ते म्हणाले ' बाबा अशाच गंमती करतात त्या उगाच पहाव्या म्हणजे झालें ' या जीवाची पूर्वापार जगांत निरपेक्षबुद्धी व निर्व्याज प्रेम ठेवून प्रत्येक चलाचल वस्तूमात्रांत जग निर्माणकर्त्या आदिनारायणाचें वास्तव्य कसें आहे, व सव्यापसव्य अंतर्बाह्य दृश्यादृश्य राहून कसे कसे पार्ट करून आपल्या करमणूकी करून घेत आहे, हें पाहण्यांत हा जीव निरंतर गुंतून गेल्यामुळें याचें नांव अपेक्षा या दोनही शब्दास कायमचाच फांटा मिळाला आहे. नंतर राहिलेलें कर्तव्य देह प्राक्तन यांची वाट पाहून आलेले सुखदुःखाचे विवेचन न करतां श्रीनारायणचरणीं सर्व कृत्यें व त्यांची फलश्रुती अर्पण करून मनास मुक्त ठेवावयाचें असा कार्यक्रम असोन त्याच्या दृढाभ्यासानें हा देह परमेश्वर स्वरूपी जगाचा आमरणपर्यंत कायमचा दास झाला यांतच या जीवास आनंद वाटतो, नव्हे परमानंदांत मग्न आहे. परंतु सर्व [illegible] तेथें दास [illegible] ही गोष्ट असल्यामुळें या जीवानें रा.ब. साठे यांचेकडे [illegible] यांचेबरो-मागितली असतां 'बाबांची परवानगी घेतल्याशिवाय जाणें होईल' म्हणाले व दुसरे सेवेकरी म्हणाले 'अहो बाबांकडे कांहीं मागा,' या जीवाची दर्शनाशिवाय कांहींच इच्छा नसल्यामुळें मला कांहीं मागावें नाहीं, फक्त दर्शनाची फार दिवसांची असलेली इच्छा परिपूर्ण झाल्यामुळें परमानंद झाला व देहाचें साफल्य झालें म्हणालों. तरी विशेष आग्रहावरून या जीवानें त्यांनाच प्रार्थना करण्यास म्हटलें कीं, श्रीसत्यनारायणाचे दुकानावर या जिवाचा उदरनिर्वाह चालला आहे तोच [illegible] आशिर्वाद मागा म्हटल्यावरून त्यांनीं सर्व मंडळीसमक्ष

दोनच्या सुमारास या जीवाची मागणी रा. रा. गाडगीळ यांचे पाव्हणे या नात्यानें श्री बाबांचे पुढें मांडली. नंतर कंपनी नांव न काढतां फक्त मंडळाची उपलब्धि करून सदर सेवेकरी गृहस्थांनी प्रार्थना केली असतां श्रीबाबा म्हणाले, 'यांना [illegible] चटणी भाकरीस कांहीं कमी केलें आहे काय' त्यांनीं विचारा व 'त्यांची इच्छा नसतां तुम्हीं बळजबरी कां' करतां असे म्हणतांच मंडळी आश्चर्यचकीत झाली.

नंतर या देहास जाण्याची परवानगी मागण्यांत आली, त्यावेळीं म्हणाले अशा प्रकारच्या निरपेक्ष जीवांना येण्याच्या व जाण्याच्या परवानगीची जरूरी नाहीं. मनांत येईल त्या वेळीं यावें व वाटेल त्या वेळीं जावें. सदर वेळीं गुरुवार तेथें पडला त्यावेळीं दोन प्रहरीं रा. रा. गाडगीळ म्हणाले, 'जोशीबुवा येथला प्रसाद कांहीं बरोबर न्यावा' म्हणून पुजारी भागा यांचेकडे प्रसाद मागण्यास गेलो. त्यावेळीं प्रत्येकास एक बर्फीचा तुकडा याप्रमाणें तीन इसमांस तीन तुकडे या देहाचे हातीं पडले. मुक्कामच जागीं गाडगीळ अण्णासाहेब वगैरे मंडळीसमोर तुकड्यासह गेल्यावर तेच म्हणाले 'एवढा प्रसाद पुरणार नाहीं आणखी आठ आणे घेऊन जा व बर्फी घेऊन या शिरडींतील तत्र प्रसाद बाबांचा आहे म्हणून' निघालों असतां वाटेंतच एक इसम बर्फीचें ताट भरून श्रीबाबांनीं गाडगीळ यांचे पाहुण्यास नेऊन देण्यास सांगितलेला याची गांठ पडून त्यांनीं पाठविलें व हा देह परत फिरला. सदर गाडगीळ व हा देह यांना आश्चर्य वाटून इकडील वृत्तांत अल्पावधींत त्यांना कसा कळला व तात्काळ [illegible] नेमकेंच कशी केली याबद्दल आनंदाश्रु निघाल्यावाचून राहिले नाहींत. नंतर बाजाराचा दिवस असल्यामुळें ओल्या भुईमुगशेंगा थोड्या नमुन्याच्या दाखल पासरी सुमार आलेल्या मंडळीनें चट्ट केल्यामुळें रा.रा. गाडगीळ यांनीं एक रुपया देऊन आणखी शेंगा आणण्यास मनुष्य पाठविला त्याला रा. रा. तात्यासाहेब यांनीं अटक करून विचारलें कीं, कोठें जातोस त्यानें 'शेंगा गाडगीळांचे पाहुण्यास आणण्यास चाललों' म्हणतांच ते म्हणाले कीं, श्री बाबांची आज्ञा झाली आहे कीं प्रथम आलेल्या दोन पोती शेंगा पैकीं सुमारे अर्धमण म्हणजे दोन टोपल्या शेंगा गाडगीळ व त्यांचे पाहुणे यांना खाण्याकरितां द्या. नंतर ते नेण्यास मागतील तितक्या देऊन बाकीच्या इतर गोरगरीबांस वाटून टाका असे म्हटल्यावरून तोच मनुष्य शेंगा व रुपायासह परत

आला. हें पाहून मंडळींस आनंदाचा उमाळा आला व श्री बाबा बसून काय काय खेळ करतात व त्यांचे सर्वांतरयामीं कसें वास्तव्य आहे याचें चांगलेंच दिग्दर्शन होऊन सर्व मंडळींचे नेत्रांत आनंदाश्रू आल्याविना राहिले नाहींत. या स्मरणानें व त्यांचा फोटो या जीवाचें नित्य गीता पाठाचे प्रथम पृष्टांत ठेवल्यामुळें नित्य दर्शनाचा योग घडतो हें या जीवाचे परमभाग्य समाजावयाचें अशाथाटांत व आनंदांत हा देह परत सोलापुरीं आल्यावर परमभक्त व श्रद्धाभिलाषी जीव व्ही. एस्. फोटोग्राफर फारच भाविक व विश्वासू इतका कीं त्यांचे देहाचें या प्रेमांत अखेर देहावसान झालें परंतु प्रेम व श्रद्धा सुटली नाहीं.अशा भाविक जीवास या देहानें श्री बाबांचे दर्शनास जाण्यास सल्ला दिली व मागील खर्चाची रुपये दहाची भिक्षा दिली व सांगितलें कीं रुपये दहा गेले तर जाऊंदे परंतु एकवार दर्शन करून ये व जमल्यास फोटोचें कार्य करून ये म्हणतांच तावडतोब जाण्याची तयारी करून सदर भाविक जीव तेथें या देहाचे पत्रासह दाखल झाला. नंतर तेथील रा. बा. साठे व गाडगीळ या मंडळींनीं या इसमाची उत्तम व्यवस्थाकरून श्री बाबांचें दर्शन करविलें. नंतर त्यांचा जुलमानें चुकवून घेतलेला पूर्वीचा फोटोग्राफ होताच परंतु या इसमाचें दर्शन झाल्यावर श्री बाबा आपण होऊनच म्हणाले "अरे तुला सत्यनारायण कंपनीचे जोशी बुवांनीं फोटो घेण्यास पाठविलें आहेना मग बसलास कां तुला कसला पाहिजे तसा फोटो घे" म्हणून श्रीबाबांनीं संतोषानें व आनंदानें बसल्याचा व ऊभ्याचा असे फोटो काढू दिलल्या बद्दल सर्व मंडळीस मोठें नवल वाटलें फोटो काढून झाल्यावर चार दिवस त्याला ठेवून घेऊन श्रीबाबांनीं उपदेश केला कीं तूं फोटोची किंमत वाजवीपेक्षा जास्त घेऊं नको; बाकी तूं सत्यनारायण कंपनीच्या जोशी बुवांचा पट्टशिष्य आहेस ते तुला किंमत कधींही घेऊं देणार नाहींत व त्यांचेच आशिर्वादानें तुझें कल्याण होणार आहे, म्हणून तेथें निघालेल्या दक्षिणाभिक्षा संस्थेमध्यें सदर फोटोग्राफरचे नांव रजिस्टर करून त्याला कांहीं फोटोची आर्डर पण देण्यांत आली. व जाण्यायेण्याचे खर्चासुद्धां रक्कम देऊन श्री बाबांचेच परवानगीनें फोटोग्राफरची रवानगी करण्यांत आली. त्याप्रमाणें त्या संस्थेस फोटो रवाना योग्य दरानें करण्यांत आले.

श्रीकृष्णार्पणमस्तु.

# श्रीसाई लीला.

( मासिक )

वर्ष १ लें. ज्येष्ठ शके १८४५. अंक ३ रा.

## महाराजांचे अनुभव

रा. रा. नीलकंठ रामचंद्र सहस्त्रबुद्धे यांनीं श्रीसमर्थ साई बाबांचे बाबतींत आपल्यास आलेल्या अनुभवांचें ता. १८-२-२० रोजीं एक पत्र लिहिलेलें आहे त्यांतील बराचसा भाग फारच वाचनार्ह वाटल्यावरून खालीं देण्यांत येत आहे तो येणेंप्रमाणें:—

( १ ) सन १९१० सालीं डिसेंबर महिन्याचे प्रारंभीं मीं वांद्रें येथें एका बंधूंच्या घरीं रात्रीं "पंचदशी" वाचीत असतां सुमारें ११ वाजतां मित्र भाऊसाहेब दीक्षित आणि नानासाहेब चांदोरकर हे मुंबईहून पारलें येथें जात असतां तेथें अकस्मित आले; व थोडेंसें बोलणें होऊन नंतर "तुम्ही शिरडीस केव्हां जाणार" असा प्रश्न नानासाहेबांनीं मला विचारला. त्यास "केव्हां तरी जाईन" असा मी जबाब दिला. ह्यापूर्वी ह्या दोन्ही मित्रांनीं शिरडीस श्रीच्या दर्शनार्थ जाण्याविषयीं मला आग्रह-पूर्वक बरेच वेळ सांगितलें होतें, असें असतां माझा तेथें जाण्याचा बेत ठरलेला नाहीं, हें पाहून मला तावडतोब दुसरे दिवशींच ( रविवारीं ) निघण्याविषयीं त्यांनीं आग्रह केला; आणि सोमवारीं पेन्शन घेऊन जाईन असें मीं त्यांना सांगितलें; तेव्हां माझ्या जाण्याविषयीं त्या दोघांची व विशेषतः नानासाहेबांची आतुरता इतकी विलक्षण होती कीं, त्यांचा व माझा परिचय विशेष दृढ नसतांहि त्यांनीं खर्चाकरितां मला दहा रुपये देऊन तुमचें "पेन्शन आणविण्याची तजवीज अण्णासाहेब दाभोळकर करतील" असें मला सांगितलें. हा प्रकार थोडासा शिष्टसांप्रदायाविरुद्ध

होता; तथापि त्यांच्या सद्हेतूकडे लक्ष देऊन मला त्यांचें म्हणणें कबूल करावें लागलें. तथापि मला शिरडीस बरेच दिवस राहण्याची इच्छा झाल्यास दहा रुपये कसे पुरतील हा प्रश्न मी उपस्थित करतांच, मला लागतील तितके पैसे बिनहिशोबी देण्याबद्दल भाऊसाहेबांनीं आपल्या शिर्डी येथील खजीनदाराच्या नांवें मला एक पत्र दिलें. जाण्याचा माझा बेत नसतांहि मी निरुत्तर होऊन मुकाट्यानें त्या मित्रांचें म्हणणें मान्य केलें, आणि दुसरे दिवशीं सायंकाळीं शिर्डीच्या मार्गास लागलों. मुंबईहून मनमाडास जाणाऱ्या मेल गाडींत बसतों तोंच माझ्या डब्यांत "एम्. ए". ची परिक्षा झालेले व "एल्एल्. बी" च्या परिक्षेस लवकरच बसणारे कोपरगांवचे एक तरुण गृहस्थ होते. त्यांच्याशी माझें बोलणें सुरू झालें, तेव्हां "शिर्डीच्या साईबाबांची आपणास कांहीं माहिती आहे काय?" असा मी त्यांना प्रश्न केल्यावरून "तो वेडा पीर मला चांगला माहीत आहे" असा त्यांनीं मला जबाब दिला. तो ऐकून शिर्डी येथील खुळ्यांच्या बाजाराविषयींची माझी पूर्व कल्पना दृढ झाली. वाटेंत कोपरगांव येथें ह्या नूतन मित्रांच्या घरीं सोमवारीं सकाळीं चहा वगैरे होऊन ९।१० वाजण्याचे सुमारास मी शिर्डीस पोहोंचलों. टांगेवाल्यानें मला रावबहादूर साठे ह्यांच्या वाड्यांत नेलें; आणि तेथें मी भाऊसाहेबांच्या खजीनदारांचा (म[illegible]राव देशपांडे यांचा) शोध करणार, इतक्यांत तेथें एका उघड्या दालनांत बैठकीवर बसलेले माझे जुने मित्र श्रीयुत लक्ष्मण कृष्णाजी ऊर्फ तात्यासाहेब नूलकर यांच्याकडे माझी नजर जाऊन मी त्यांच्या नांवानें त्यांना हाक मारून नमस्कार केला. तेव्हां मध्यंतरीं अनेक वर्षें गेल्यामुळें त्यांनीं प्रथमतः मला न ओळखल्याकारणानें आमचें थोडेसें विनोदपर भाषण झाल्यावर मी आपलें नांव त्यांना सां[illegible]तांच त्यांनीं मला मोठ्या प्रेमानें दृढालिंगन देऊन माझें पुढचें सर्व काम करण्याचा त्यांनाच हक्क असल्यामुळें त्यांनीं मला तेथें बसवून घेतलें. नंतर माधवराव देशपांडे यांना त्यांनीं बोलावून आणून माझी सर्व हकीकत त्यांना निवेदन केली. पुढें श्रींच्या आरतीची वेळ होण्यापूर्वींच आम्हीं स्नानें आटोपून घेतलीं. व तात्यासाहेबांनी मला आपल्याबरोबर आरतीसाठीं मशीदींत नेलें. श्रींच्या चरणांवर तात्यासाहेबांनीं

तक ठेवून ते शेजारीं उभे राहिल्यावर मी केवळ शिष्टसंप्रदायानुसार यांचें अनुकरण केलें, तों लागलीच " तात्याबाला नमस्कार करावा, बापूसाहेबाला नमस्कार करावा, त्यांत आपल्याला कांहीं कमीपणा नाहीं" असे शब्द श्रींच्या मुखांतून निघाले. हा प्रकार वारकरी मंडळींत सार्वत्रिक दृष्टीस पडतो. बापूसाहेब जोग ह्यांचा व माझा तात्यासाहेबांनीं पूर्वीच परिचय करून दिला होता, तेव्हां श्रींच्या उक्तीप्रमाणें पुनः फक्त शिष्टसंप्रदायार्थ मीं त्या दोघांना नमस्कार करून उभा राहिलों, तों लागलीच " तात्याबाची सेवा करीत जा " असे शब्द मला उद्देशून श्रींच्या मुखांतून निघाले; आणि हेच सेवेसंबंधीं शब्द पुनः दुसरे दिवशीं व फिरून तिसरे दिवशीं असे त्रिवार दुपारच्या आरतीच्या वेळीं मला उद्देशून श्रींनीं उच्चारिले. हुबळी येथील श्री सिद्धारूढ स्वामी, एलिचपूर येथील श्री शंकर भट्टजी, पलूस येथील धोंडीबाबा, व सुमारें वीस बावीस वर्षांपूर्वी पुणें येथील सोमेश्वराचे देवालयांत कांहीं दिवस असलेलें एक खरे परमहंस, इत्यादि पुरुषश्रेष्ठांच्या दर्शनानें वेदान्तपर ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें सत्पुरुष जगांत आहेत, अशी कल्पना पूर्वीच दृढ झाली होती, तरी श्रींच्या अधिकाराबद्दल मन साशंकित असल्याकारणानें प्रथमदिवसापासूनच श्रींच्या आज्ञेनुसार मला कांहींतरी सेवा सांगण्याविषयीं, केवळ विनोदानें, मीं तात्यासाहेबांना बराच आग्रह करीत असें; आणि सरतेशेवटीं "तुमच्या धनींच्या मला फार दुःख होतें, येवढ्याकरितां रुपी ती आतां पुरी करा " असें त्यांनीं मला स्पष्ट सांगितलें तोंपर्यंत कित्येक दिवस माझा तो क्रम सुरू होताच.

त्यानंतर एकदां " आपल्या बोलण्याचा प्रायः कांहीं एक अर्थबोध होत नसून, ही आपली वेडी भक्तमंडळी त्याचा उगीच कुट्यासारखा ख करीत बसतात, तसें मीं कांहीं करणार नाहीं, मला कांहीं सांगावयाचें असेल तर तें आपण मला अगदी स्पष्ट सांगावें" अशी बाबांना मी विनंति केली; तेव्हां " ठीक आहे" येवढेंच ते म्हणाले; आणि नंतर थोड्याच दिवसांत "आमचा अनुभव बैलावरचा ( Indirect ) नाहीं; ज्याला तो पटला असेल त्यानें जावें नमेल त्यानें तो घेऊन जावें " मला ते आपुल्या नेहमीच्या लाक्षणिक ( Parabolical ) भाषणांत

मध्येंच बोलून गेले, हे शब्द फक्त माझ्यासाठींच होते, हें माझ्या लक्षांत आलें; आणि "ठीक आहे, आतां माझी खात्री होईपर्यंत मी येथून जाणार नाहीं" असें मी त्यांना ताबडतोब बजावून सांगितलें, तेव्हांही ते फक्त "ठीक आहे" येवढेंच बोलले. माझ्या परत जाण्याची गोष्ट बाबांपाशीं माधवराव देशपांडे नेहमीं दोन चार दिवसांनीं काढीत असत, अशा वेळीं एकदां "आपल्याला त्याचें काम आहे, त्याला मशीदीपाशीं असाच कुत्र्यासारखा पडून राहूं दे" असें ते म्हणाले; आणि दुसऱ्या एका वेळीं "तो माझाच आहे, त्याचें काम मलाच केलें पाहिजे, माझ्याशिवाय त्याला कोण आहे?" असें मला अभिवचन मिळालें. इतके दिवसपर्यंत तात्यासाहेबांची प्रकृति उत्तम होती; परंतु नंतर थोडक्याच दिवसांत ती फारच बिघडली, तेव्हां ते बरे होईतोंपर्यंत तेथून परत न जाण्याचा मी निश्चय केला; आणि सरतेशेवटीं मार्च महिन्यांत त्यांचा तेथेंच अंत झाला. ह्या त्यांच्या रुग्णावस्थेंत श्रींच्या मुखांतून माझ्या पहिल्या तीन दिवसांत निघालेल्या उक्तीची तथ्यता तेथील सर्व लोकांस आणि विशेषतः तात्यासाहेबांस इतकी बेमालुम पटली कीं, एके दिवशीं "नीलकंठराव! बाबांनीं केवळ माझे हाल होऊं नयेत, येवढ्याच करितां तुम्हांला येथें आणिलें, असाच त्यांच्या प्रथम दिवसाच्या आज्ञेचा स्पष्ट अर्थ नव्हे काय?" असा त्यांनीं डोळ्यांत अश्रू आणून मला प्रश्न केला. आणि अखेरीस [illegible] करून आपल्या दोन्ही चिरंजिवांना "आतां दृष्टी पुढें ऐसाचि तूं राहे" हा अभंग म्हणावयास सांगून, त्यांचें भजन चाललें असतां श्रींचें पादोदक मी त्यांना दिल्यानंतर आपली दृष्टि स्पष्ट अढळ ठेवून त्यांनीं प्रातःकाळीं देहत्याग केला. हा प्रकार घडण्याचे पूर्वीं आदले दिवशीं सुमारें २-२ वाजतां (त्यांची प्रकृति विशेष बिघडावयास लागण्याचे अगोदर) "माझें म्हणणें ऐकून तात्याबा येथें राहिला आणि त्यानें आपल्या देहाचें सार्थक केलें," असें श्रीबाबा माधवराव देशपांडे यांनां म्हणाले होते; परंतु त्यावेळीं तात्यासाहेबांचा अंत इतका जवळ आला आहे, अशी नुसती कल्पना देखील, "एल्. एम्. ॲण्ड् एस." ची परिक्षा पास होऊन जळगांव येथें स्वतंत्र हॉस्पिटल् चालवीत असलेल्या यांच्या थोरल्या चिरंजीवांनाही आली नाहीं.

तात्यासाहेबांचा अंतकाळचा प्रकार पाहून " असा मृत्यु येणें हें महा पुण्याचें फल आहे" असे उद्गार तेथील सर्व भक्तमंडळींच्या तोंडून निघाले; कारण सर्वांना त्या वेळीं साहजिकच "अंतकालेच मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् । यःप्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥ " ह्या भगवदुक्तीचें स्मरण झालें. हा बाबांचा प्रसाद.

( २ ) रात्रीं स्वप्नें न पडतां अलीकडे ३५।३६ वर्षांत एक आठवडाहि गेलेला मला स्मरत नाहीं; परंतु शिरडीस असतांना महिनेच्या महिने माझे तसे गेले, ह्याचें कारण बाबांच्या कृपेशिवाय दुसरें कांहीं असावें, अशी माझी कल्पनाहि होत नाहीं; कारण शिरडीस माझी प्रकृति जितकी चांगली होती, तितकी किंवा त्याहूनहि अधीक चांगली अनेकदां इतरत्रही असे; परंतु स्वप्नें हीं नेहमीं पडावयाचींच.

( ३ ) एकदां दुपारच्या आरतीच्या वेळीं एका गृहस्थानें आणलेल्या मिठाईचा प्रसाद श्री मंडळीस वाटीत असतांना, आपली पाळी येते किंवा नाहीं अशी कल्पना माझ्या मनांत येतांच, " तुला कांहींच नाहीं " अशी हातानें खूण करून बाबांनीं स्मित हास्य केलें, आणि नंतर मला प्रसाद दिला.

( ४ ) दादाभट देशपांडे हें नांव माझ्या नांवाऐवजी घालून एके दिवशीं माझ्या मानी व करारी स्वभावाचें, माझ्या कुटुंबाचें आणि परिस्थितीचें बाबांनीं हुबेहूब केलेलें वर्णन ऐकून भाऊसाहेब दीक्षितांनीं " हे दादाभट देशपांडे कोण ?" असा मला प्रश्न केला; कारण त्या नांवाचा गूढार्थ माझ्याप्रमाणें त्यांनाहि पूर्णपणें समजला. इतरांना मात्र तो समजला नाहीं.

( ५ ) ऐके दिवशीं मी मशीदींत गेल्याबरोबर 'या रामय्या' असें म्हणून बाबांनीं मला वर बोलाविलें; आणि पुढें कांहीं दिवसांनीं उदी ( अंगारा ) वाटतांना माझी नमस्कार करण्याची पाळी आली. तेव्हां मी नमस्कार केल्यावर माझ्या हातांत उदी देऊन मस्तकावर हात ठेवतांना " राम रामींच्या " असें ते म्हणाले; कारण "श्रीराम सर्व कर्मणि" ( नित्य ) ह्या वाक्यावर माझी श्रद्धा होती.

(६) एकदां माझ्या मनांत एक सारखें तीन दिवस "आपणा सारिखे करिती तात्काळ" ह्या संतोक्तीचें चिंतन चाललें असतांना, मला परत जाण्याविषयीं आज्ञा केव्हां होणार, असा प्रश्न माधवराव देशपांडे ह्यांनीं बाबांस प्रश्न केला, तेव्हां "माझ्या जागेवरून मला उठवून तेथें त्याला एकदम बसावयास पाहिजे; त्याला मी काय करूं ? तें काम फार सबूरीचें आहे" असे स्पष्ट शब्द बाबांच्या तोंडांतून निघालेले ऐकून मी चकित झालों. इतर कोणासहि ह्या त्यांच्या बोलण्याचा अर्थ मुळींच समजला नाहीं.

(७) शिर्डी येथें प्रथम जातांना ज्या तरुण विद्वान् गृहस्थांचा माझा नूतन परिचय झाला होता, तेच गृहस्थ नंतर सुमारें १।२ महिन्यांनीं शिर्डीस आले त्यावेळीं बाबांच्या अधिकाराविषयींची माझी मूळची साशंकित वृत्ति सर्वस्वी नष्ट झालेली असल्यामुळें मी सहजच त्या गृहस्थांना पुन्हां पूर्वीचाच प्रश्न केला; आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, बाबांना तत्पूर्वी अनेकदां पाहून त्यांच्याविषयीं जो त्यांनीं आपला ग्रह करून घेतला होता, तो अवघ्या अर्ध्या तासांत बदलून गेल्याचें त्यांनीं स्वमुखानें कबूल केलें; परंतु ह्या त्यांच्या मानसिक स्थित्यंतराबद्दल त्यांना कोणतेंहीं कारण मला सांगतां आलें नाहीं.

(८) पहिल्या खेपेस बाबांनीं मजपाशीं प्रथमतः १२ रुपये दक्षिणा मागितली, व नंतर कांहीं दिवसांनीं पुनः ८ रुपये दक्षिणा मागून घेतली. त्यापुढें कांहीं दिवसांनीं आमचे मित्र रा. रामचंद्र आत्माराम उर्फ भाऊसाहेब मोडक यांजकडून बाबांना दक्षिणा देण्यासाठीं दीक्षितसाहेबांच्याकडे पांच रुपये मनीऑरडरनें आले, ते त्यांनीं बाबांना देण्यासाठीं मजपाशीं दिले. ही रक्कम मी बाबांकडे हजर केली, तेव्हां "हे रुपये तूंच ठेव, तुला खर्चास लागतील" असें बाबांनीं मला सांगितलें; परंतु ते ठेवून घेणें इष्ट न वाटल्यामुळें, आणि खर्चास लागणारी रक्कम मजपाशीं भरपूर असल्यामुळें, मी बाबांना तसें कळवून पुनः ते पांच रुपये परत करूं लागलों. तेव्हां "ही रक्कम तुला खर्चास लागेल असें मी तुला सांगतों आहे, सबब ती तुजपाशींच असूं दे" असें त्यांनीं

मला फिरून सांगितल्यामुळें ती मी निरुपायास्तव ठेवून घेतली. नंतर परत जाण्याची आज्ञा मिळाल्यावर मी शिरडीहून मुंबईस किंवा पुण्यास जाणार होतों; परंतु कांहीं अकल्पित कारणानें मला शिर्डीहून जळगांवास जाण्याचा प्रसंग आला. त्या वेळीं मला लागणाऱ्या रकमेंत बरोबर पांचच रुपयांची तूट आली, ती भरून काढण्यासाठीं बाबांनीं दिलेले पांच रुपये मोहोरबंद पाकिटांत घालून ते एका स्नेह्यापाशीं ठेवून त्यांच्याबदली त्यो गृहस्थापासून दुसरें पांच रुपये उसने घेऊन मी जळगावीं गेलों; आणि नंतर ते उसने घेतलेले रुपये परत करून आपलें मोहोरबंद पाकीट परत आणविलें.

त्यानंतर जेव्हां जेव्हां मी शिरडीस गेलों तेव्हां तेव्हां प्रत्येक वेळीं मजपासून बाबांनीं दक्षिणा बरोबर १५ रुपयांचीच मागितली; आणि एके प्रसंगीं मजपाशी पैसे नसल्यामुळें मी तसें सांगितलें तेव्हां काका ( भाऊसाहेब दीक्षित ) अथवा बापूसाहेब जोग यांजपासून रुपये आणून दे, असें बाबांनीं सांगितल्यावरून मी बापूसाहेबाकडे गेलों, तों ते न भेटल्यामुळें पुढें भाऊसाहेबांकडे गेलों; तेव्हां "तुमचे रुपये आम्हांला माहीत नाहींत; आम्ही पोथी काढितों, आणि त्यांत तुम्ही आपले रुपये पाहून घ्या" असें त्यांचे शब्द ऐकून मी पोथी वगैरे पाहण्याच्या भानगडींत न पडतां बाबांच्याकडे परत जाऊन त्यांना झालेली हकीकत कळविली; आणि "पंधरा रुपये" याचा अर्थ काय तो सांगण्याविषयीं त्यांना विनंति केली; परंतु "तथ्या राहूं दे, पुढें पाहूं, आपल्याला इतकी घाई नको" असें बाबांनीं सांगितल्यावरून, मी स्वस्थ बसून विचार करीत असतां माझ्या जवळ असलेल्या एका वहींत श्री नाथ भागवतांतील दोन ओव्या पूर्वी कधीतरी टिपलेल्या माझ्या अवलोकनांत येऊन, मला फार समाधान वाटलें: त्या ओव्या अशा:—

" वाचा नेमावी माझ्या नामें ॥ मन नेमावें ध्यान संभ्रमें ॥
प्राण नेमावा प्राणायामें ॥ इंद्रियें दमनें नेमावीं ॥ १ ॥

बुद्धि नेमावी आत्मविवेकें ॥ जीव नेमावा ब्रह्मसुखें ॥
उद्धवा तूं अवश्यकें ॥ हें सांगितलें कौतुकें ॥ २ ॥

ह्या दोन ओव्यांत योग-साधनें पांच आणि दशेंद्रियांचें नियमन अशीं आत्मज्ञान-प्राप्तीचीं दहा साधनें सांगितलीं आहेत; आणि बाबा महाराज प्रत्येक वारीच्या प्रसंगीं जे पंधरा रुपये मागत आहेत ते हेच, असें माझ्या मनांत कल्पना आली ती श्रद्धाजन्य होय; आणि "श्रद्धावांल्लभते ज्ञानम्" हें भगवद्वाक्य आहे. व माझी श्रद्धा अंध नव्हती.

(९) माझ्या शेवटच्या वारीच्या प्रसंगीं प्रथम दर्शनीं "तूं आलास हें चांगलें केलेंस; मी तुझी आठवण करीत होतों," असे मीं पूर्वी कधींही न ऐकिलेले शब्द बाबांच्या मुखांतून निघाले; परंतु तें शेवटचें दर्शन होतें ही कल्पना बाबांनीं देहविसर्जन केलें ही बातमी मला समजेपर्यंत माझ्या मनांत आली नाहीं! ह्या वेळेस माझा परत जाण्याचा बेत झाला, तेव्हां दोन-तीन दिवस मी भाऊसाहेबांकडून तिसऱ्या प्रहरीं निघण्याची परवानगी विचारीत होतों, कारण कोपरगांवाहून गाडी सांयकाळीं निघते अशी आम्हां सर्वांची समजूत होती. परंतु प्रत्येक दिवशीं "उद्यां सकाळीं जाऊं दे" असें बाबा सांगत असतां शेवटीं एक दिवस मी आग्रहानें तिसरे प्रहरीं निघण्याची परवानगी मिळवून कोपरगांव स्टेशनावर जातों तों गाडीची वेळ बदललयामुळें दुसरे दिवशीं प्रातःकाळपर्यंत स्टेशनावरच मुक्काम करावा लागला.

एका प्रसंगीं आमचे मित्र रा० ब० गणपतराव अंजनगांवकर हे आपल्या कांहीं स्नेह्यांबरोबर शिर्डीस गेले होते, तेव्हां त्यांना ठाणें येथील डिस्ट्रिक्ट कोर्टाचे एका ठरावावरील सरकारी अपीलासंबंधानें सरकारी वकीलाला माहिती देण्यासाठीं रविवारीं हजर व्हावयाचें असल्यामुळें त्यांनीं आदले दिवशीं परत जाण्याची परवानगी मागितली असतां "त्याला इतक्या घाईनें परत जाण्याचें मुळींच कारण नाहीं" असें बाबांनीं अनेकदां सांगितलें; परंतु ह्या त्यांच्या सांगण्यावर आम्हांसारख्या किंचित लोकांचा विश्वास बसावा कसा? सरतें शेवटीं गणपतरावांच्या अत्याग्रहाच्या विनवणीवरून "बरें, जा, मर्जी तुझी" असें बाबा म्हणाले; आणि गणपतराव ठाण्याचे कोर्टांत नेमलेल्या वेळीं हजर झाले तोंच सरकारी वकीलांनी अपील आठ दिवस निघावयाचें नाहीं, असें

॥ ॐ ॥

सौमित्रीविरचित

# श्रीसाईनाथस्तोत्रम्.

शिखरिणी वृत्त.

अगा साईनाथा, मजवरि कृपापूर्ण दिससी ।
विलोकोनी मातें पदनत, कदापी न रुससी ॥
जगत्कल्याणार्थी धरिसि अवतारा महिवरी ।
जसा गीतेमध्यें प्रकटुनि वदे यादव हरि ॥ १ ॥

श्रुतिस्मृत्यादींच्या स्वरुपि अवतारा धरुनिया ।
विवस्वच्चंद्रांला करिसि तव साक्षीस वसण्या ॥
जयाच्या पादांना नमन करितां सिद्धि मिळते ।
नमूं त्या साईंना, यदिय स्मरणें दुःख पळतें ॥ २ ॥

स्थिरैश्वर्या वाणी खचुनि भरली ज्या हृदिं मुदें ।
तयाला पाहोनी द्विपलि लपलों गर्व-कुमुदें ॥
असा बोधात्मा तो श्रुतिस्मृति ज्यामाजि दिसतो ।
नमूं त्या साईंना, गुरुगुरु जया सब म्हणतो ॥ ३ ॥

करी साक्षात्कारें विमलतर ब्रह्मांड भरतें ।
चिदाभासें द्यावी कणकणिंहि प्रत्यक्षपण जें ॥
पहा जो यच्चावत् चर अचर सृष्टींत विलसे ।
नमूं त्या साईंना, सुधि वदति ज्याला नर असे ॥ ४ ॥

जसा जीवात्मा जो जाणिते ब्रह्मात्मक असा ।
जयाला राहे जो सतत धरुनी [illegible] ॥

तयाला संबोधी अखिल जन नारायण असें ।
नमूं त्या साई, जो उघडचि नराकारण वसे ॥ ५ ॥
जयाच्या कार्यी हें जनति परमात्मा स्फुट रहे ।
वरी अंगीं सारी पृथकपण श्रेष्ठत्व वरवें ॥
सदा भासे सच्चित्सुखस्वरूप साकारचि कसा ।
नमूं त्या साई, जो परम करुणात्मा शिव तसा ॥ ६ ॥
अशा त्या आत्म्याच्या त्रिगुणयुत निर्दिष्ट उपरी ।
यथार्थ ज्ञानातें करुनि मन संतुष्टचि करी ॥
जयाला माहात्मा स्वकिय हृदया जाणुनि धरी ।
नमूं त्या साईना, सुखकर जयाचीच नगरी ॥ ७ ॥
जगत्राता ऐसा परमकरुणायुक्त सजला ।
समात्म्याचे ठायीं स्फुरण करण्या स्पष्ट नटला ॥
म्हणूनी मद्वाणी तदिय भजनीं पूर्ण भरली ।
नमूं त्या साईना, कृति यदिय साह्येंच तरली ॥ ८ ॥
विधी जो विष्णू जो शिव त्रिगुणरूपात्मक असा ।
बिडौजस वायू कीं शशिरविबृहद्भानुहविसा ॥
समात्मा सर्वात्मा स्थिरचर यदाकार सगळें ।
नमूं त्या साईना; हृदयज अहंभाव वितळे ॥ ९ ॥
खरा ज्ञानानंदीं वसुनि वसुधा सर्व बघतो ।
भजे जो जैसा त्या समचि भवना साच करितो ॥
अहा मोक्षार्थातें पदरिं पडण्या सिद्ध बनुनी ।
नमूं त्या साईना, अढळ मन रूपांत भरूनी ॥ १० ॥
जलासंगें अभ्रांस सुवचनातें जगतिं या ।
ग्रथीं रत्नांची ही निपजचि अशा जाण हृदया ॥
नका मोहा पावूं उपळज मणीतें बघुनिया ।
नमूं त्या साईना, सुखद परमानंद बनुंया ॥ ११ ॥

---

वरील स्तोत्र इ. स. १९१७ मध्यें रा. रा. नानासाहेब खाजगीवाले यांनी छापून प्रसिद्ध केलें होतें.

ते चोर ह्मणजे यमदूत. महाराजांनीं वजावल्यानंतर थोड्याक वेळानें आपपाला जुलाब, उलट्या होऊं लागल्या, आणि त्यांतच त्याचा देहांत झाला. तो अत्यवस्थ असतांना त्याची बायको महाराजांकडे जाऊन रडूं लागली. महाराजांनीं तिला कांहीं बोध केला, आणि तिचें सांत्वन केलें. दुसऱ्या दिवशीं आणखी गांवांत दोनतीन लोक लागले, तेव्हां गांवकरी मंडळी महाराजांकडे गेली, आणि आम्हांला सांभाळा, अशी प्रार्थना करूं लागली. महाराज ह्मणाले “एकंदर सात माणसे जातील, आणि मग महामारी रहाणार नाही.” त्याप्रमाणें फक्त सातच माणसें मेलीं, आणि नंतर गावांतील पटकी नाहींशी झाली

५. शिरडीस कोंड्या सुतार नांवाचा एक महाराजांचा भक्त होता. त्याला एके दिवशीं दोनप्रहरीं महाराज ह्मणाले “ खळवाडीस आग लागली आहे, तर तूं तिकडे जा.” दिवस उन्हाळ्याचे होते, आणि वेळ भर दोनप्रहरची. तरी पण कोंड्या धांवत खळवाडीकडे गेला, आणि पहातो तों तेथें आगबीग कांहीं नाहीं. मग लगेच परतून तो महाराजांकडे आला आणि ह्मणूं लागला “तेथें आगबीग कांहीं नाहीं. मला भर दोनप्रहरीं उन्हांतून कां फेरा दिलात ?”

तेव्हां महाराज ह्मणाले “मागें वळून पहा.”

मागें वळून पहातो तों खळवाडींतली एक गवतांची गंज खरोखरच पेटलेली असून तिच्यांतून निघणारा धूर कोंड्याला दिसला. तितक्यांत जोराचा वाराही सुटला आणि गांवांत सगळी एकच गडबड उडाली. आतां सगळ्या गंजी जळल्याशिवाय रहावयाच्या नाहींत; आणि सर्वांचें अतिशय नुकसान होईल, असें गांवकरी लोकांस वाटूं लागलें. ते सर्व घाबरले आणि महाराजांना शरण गेले. महाराज अति दयाळू. ते तावडतोब त्यांच्याबरोबर खळवाडीकडे गेले, आणि जळत असलेल्या गंजीच्या सभोंवती त्यांनीं पाण्याची धार फिरविली. नंतर गांवकऱ्यास ह्मटलें “ ही एवढीच गंज जळेल. बाकीच्या गंजीला धक्का लागणार नाहीं.” आणि तसेंच झाले.

७. नानासाहेब वेरे नांवाचे गृहस्थ शेतकी खात्यांत इन्स्पेक्टर होते. ते महाराजांचे भक्त होते. ते एकदां महाराजांच्या दर्शनाला गेले असतां महाराज त्यांना ह्मणाले “ तुम्ही आतांच येथून निघून स्टेशनवर जा

थोडाही उशीर करूं नका. आणि तडक स्टेशनावर ( कोपरगांव स्टेशनावर ) जा."

त्याप्रमाणे बेरे तावडतोब निघाले. त्यांनीं टांगा भरधांव हांकला, त्यांच्या टांग्याच्या मागोमाग दुसरा टांगा येत होता, त्यांत जे गृहस्थ बसले होते ते बेऱ्यांना म्हणाले "अजून गाडीला बराच वेळ आहे, इतकी घाई कां करतां? आपण सावकाश जाऊं." बेऱ्यांनीं त्यांचें म्हणणें मान्य केलें नाहीं आणि ते तडक स्टेशनावर गेले. नंतर कांहीं वेळानें बातमी आली, कीं, बेऱ्यांच्या मागून जो टांगा सावकाश येत होता तो चोरांनीं गांठला, त्यांत होतें तें सर्व लुटलें, आणि त्यांत बसलेल्या मंडळीस मारहाणही केली. ही बातमी समजली, तेव्हां महाराजांच्या आज्ञेचें बेऱ्यांना कौतुक वाटलें आणि महाराजांनींच आपल्याला आज वांचविलें, असें ते म्हणूं लागले.

वरील हकीकतीवरून महाराजांच्या लोकोत्तरपणाबद्दल अनुमान होतें, आणि प्रत्यक्ष दर्शनानें व सहवासानें तें अनुमान दृढ होऊन महाराज खरे खरे सद्गुरू आहेत ही खात्री पटते, आणि त्यांना सर्वस्वी शरण जाणें हाच खरा तरणोपायाचा मार्ग, असा मनाचा निश्चय होऊन आपल्या ग्रंथांतून संतांचीं आणि सद्गुरूंचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं सर्व महाराजांच्या आंगीं वसत आहेत. हीही खात्री होते.

महाराजांच्या गुणांचें किंवा त्यांच्या लीलांचें यथार्थ वर्णन करणें अशक्य आहे; तरी पण थोडें दिग्दर्शन तरी व्हावें असें वाटतें. हें करावयाचा उत्तम मार्ग. म्हणजे मला किंवा माझ्या माहितींत दुसऱ्यांना आलेल्या असंख्य अनुभवांपैकीं कांहीं गोष्टी येथें नमूद करणें; असें वाटल्यावरून तसें करीत आहें.

मेघा नांवाचा गुजराथी ब्राह्मण महाराजांचा परम भक्त होता. तो एके दिवशीं महाराजांच्या तसबिरीजवळ भिंतीवर शेंदराचा त्रिशूळ काढीत होता. तें पाहून मीं त्याला विचारलें "हें कां काढवितोस?"

मेघा म्हणाला "आज पहाटेस मी जागा झालों. बिछान्यावरच पडलों होतों, इतक्यांत महाराजांचा आवाज कानीं पडला असा भास झाला, आणि जे शब्द मीं ऐकिले ते असे 'मेघा, त्रिशूळ काढ!' त्या वेळेस पाहिलें, तों बाबा ( महाराजांस बहुतेक मंडळी 'बाबा' म्हणतात ) जवळ नाहींत, आणि आमच्या वाड्याचीं दोन्हीकडील दारें बंद होतीं.

आवाज मात्र बाबांचा, आणि अंथरुणावर कांहीं अक्षता पडलेल्या. मी लगेच उठलों, आणि मशिदींत बाबांच्याकडे जाऊन विचारलें 'बाबा त्रिशूळ काढावयाचा का?' बाबा म्हणाले 'होय.' म्हणून हा त्रिशूळ काढवीत आहे."

हें बोलणें झाल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं सुमारें दहा वाजतां मेघा श्रीकडे गेला असतां बाबांनीं त्याला एक शिवलिंग दिलें; तें त्याच वेळेला कोणी बाबांच्या हातांत आणून दिलें होतें; श्री त्यास म्हणाले "मेघा, हें घेऊन जा, आणि याची पूजा करीत जा."

मेघा तें शिवलिंग घेऊन वाड्यांत आला आणि त्यानें तें मला दाखविलें आणि म्हटलें "हें पहा मला बाबांनीं पूजा करण्यास शिवलिंग दिलें!" त्या वेळची त्याची मुद्रा अति आनंदाची होती. त्या आनंदाचें विशेष महत्व कळण्यासाठीं त्याचा थोडा पूर्वेतिहास सांगणें जरूर आहे.

हा मेघा रावबहादुर हरि विनायक साठे यांच्याजवळ,ते खेडा जिल्ह्यांत डेप्युटी कलेक्टर असतांना नोकर होता. त्याला गायत्री मंत्रही येत नव्हता. तो त्याला रावबहादुर साठयांनींच शिकविला. पुढें कांहीं दिवसांनीं त्याला एका शिवालयांत पूजा करण्यासाठीं साठयांनीं ठेवला. त्यानंतर साठे श्रीकडे गेले, आणि त्यांची श्रद्धा श्रीचे चरणीं बसली, व त्यांनीं शिर्डीस एक वाडाही महाराजांच्या दर्शनास येणाऱ्या मंडळीच्या सोयीसाठीं बांधला. साठयांना अशी इच्छा झाली, कीं, मेघाला शिर्डीस महाराजांचे सेवेसाठीं ठेवावा, व त्याप्रमाणें त्यास त्यांनीं सांगितलें; तें ऐकून मेघा खिन्न झाला.महाराज मुसलमान आहेत हें त्यानें ऐकिलें होतें, आणि शंकराची पूजा सोडून मुसलमानाची सेवा करण्यास धनी मालक आपल्यास पाठवीत आहेत, हेंच त्याच्या खिन्नतेचें कारण होतें. साठयांनीं त्याची समजूत केली, आणि महाराजांच्या खऱ्या स्वरूपाची थोडीशी ओळख करून दिली. त्यानें त्याची खिन्नता पुष्कळ कमी झाली, तरी पण पार गेली नाहीं. मग तो शिर्डीस गेला. त्यानें मशिदीच्या कंपा-उंडांत पाय ठेवितांच महाराज उठले, आणि हातांत धोंडा घेऊन म्हणाले "वर येऊं नकोस. खबरदार येशील तर, मुसलमानाकडे [illegible]"

महाराजांचा राग नखर असून फक्त [illegible] त्यालाच समजला. मेघा कांहीं दिवस शिर्डीस राहिला आणि [illegible]

गांवीं गेला, पण तेथें त्याला महाराजांचा इतका ध्यास लागला, कीं, तो पुनः लवकरच शिर्डीस गेला, आणि तेथेंच राहिला. तो बाबांस शंकरच मानीत असे. आणि नित्य 'शंकर शंकर' असेंच म्हणत असे, आणि बाबांचा उल्लेख करावयाचा तर शंकर याच नांवानें करीत असे. पुढे बाबांची एक मोठी तसबीर साठयांच्या वाड्यांत आणून ठेविली. तेव्हांपासून त्या तसबिरीची शंकर मानूनच तो पूजा करीत असे. त्या-नंतर सुमारें एक वर्षानें वर लिहिलेला प्रकार घडून आला. शिवलिंग महाराजांच्या हातांत येण्याच्या आदले दिवशीं मेघाला त्रिशूळ काढण्याची आज्ञा झाली. आणि तीही महाराज प्रत्यक्ष जवळ हजर नसतां; पण आवाज मात्र त्यांचा. या चमत्कारांचें कौतुक वाटतेंच; पण यांत दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी ही कीं, मेघाची जी उपासना होती तीच महाराजांनीं त्याला कायम करून दिली. महाराजांच्या आरतींत म्हटल्या-प्रमाणें "**जया मनीं जैसा भाव। तया तैसा अनुभव। दाविसी दयाघना ऐसी। तुझी ही माव॥** हा प्रकार नेहमीं अनुभवास येतो.

माझे एक स्नेही हायकोर्टांत वकील आहेत. ते महाराजांच्या दर्शनास प्रथम गेले असतां एके दिवशीं असा योग आला कीं, फक्त महाराज आणि ते असे दोघेच होते. त्या वेळीं महाराजांनीं त्यांस म्हटलें " काय म्हणावें ? श्रीराम जयराम, जयजयराम !" नंतर एकदोन मिनिटांनीं महा-राजांनीं पुन: तेच शब्द उच्चारले, तेव्हां त्या गृहस्थाला एकदम आठ-वण झाली, कीं, हा तर आपल्या गुरूनें आपल्याला मंत्र दिला तो. नंतर पुन: एकदोन मिनिटांनीं महाराजांनीं तोच उच्चार केला. तेव्हां त्या गृहस्थाची खात्री झाली, कीं, आपल्या गुरूनें आपल्याला जो मंत्र दिला होता, तोच जपण्यास आपल्याला महाराज सांगत आहेत.

एकदां ठाणें जिल्ह्यांतला एक गृहस्थ महाराजांच्या दर्शनास गेला असतां महाराजांनीं त्याला सांगितलें " मारुतीची पूजा करीत जा." महाराजांनीं अशी आज्ञा कां केली, हें त्याला कळेना. मग तो वाड्यांत गेल्यानंतर मंडळीनें त्याला विचारलें " तुम्ही मारुतीची पूजा करीत असतां काय ?"

तो म्हणाला " होय, माझ्या घराजवळ पंचमुखी मारुतीचें देऊळ आहे. तेथें पूजा केल्याशिवाय मी अन्न ग्रहण करीत नसतों."

अर्थात् त्याची चालत आलेली उपासना महाराजांनीं दृढ केली. महाराजांचा स्वतंत्र पंथ अथवा संप्रदाय असा नाहीं. ज्याची जी उपासना असेल ती दृढ करावयाची. महाराजांकडे सर्व धर्मांचे, सर्व पंथांचे लोक जात असत;पण कोणालाही पूर्वीची उपासना सोडून दुसऱ्या उपासनेला महाराजांनीं लावल्याचें उदाहरण आढळून येत नाहीं. मात्र कोणत्याही राजमार्गानें माणूस जात असतां जर तो त्या आपल्या मार्गापासून ढळला, तर पुनः त्याला त्याच्याच मूळ मार्गावर आणून त्याला पुढची वाट दाखवून द्यावयाची, असाच महाराजांचा क्रम आहे. महाराजांकडे योगाभ्यासी जातात, कर्माभ्यासी जातात; ज्ञानाभ्यासीही जातात, आणि सर्वांना महाराजांकडून आपापल्या अभ्यासांत उत्तम मदत होते, असा प्रत्येकाचा अनुभव आहे.

एकदां माझे एक स्नेही महाराजांच्या दर्शनाला गेले असतां पहिल्याच भेटीस महाराज त्यांना-" या रामदास," असें म्हणाले. पुढें त्या स्नेह्याला मीं विचारलें " महाराजांनीं तुम्हाला अशा तऱ्हेनें कां हाक मारिली ? "

त्यांना पहिल्यांदा कांहीं कारण सुचेना. मग थोडया वेळानें एकाएकीं त्यांना कारण सुचलें. ते म्हणाले " अलीकडे दोन वर्षांपासून मी मनांतल्या मनांत रामनामाचा जप करीत असतों; पण ही गोष्ट कोणालाच ठाऊक नाहीं. घरांतल्या मंडळीलासुद्धां ठाऊक नाहीं. " अर्थातच महाराजांनीं दिलेली संज्ञा याच गोष्टीची दर्शक होती, यांत संशय नाहीं.

१९०९च्या नाताळांत एक डॉक्टर आपल्या एका मामलेदार मित्राबरोबर शिर्डीस गेले होते. हे डॉक्टर ब्राम्हण असून स्नानसंध्याशील आणि रामोपासक असल्यामुळें शिर्डिस जाण्यास नाखुष होते. ते ह्मणाले " मुसलमानाच्या पायां पडणें मला आवडत नाहीं, आणि ह्मणून मला यावेंसें वाटत नाहीं."

त्यावर मामलेदारांनीं त्यांना सांगितलें " पायां पडण्याबद्दल तुह्माला कोणीही आग्रह करणार नाहीं, आणि बाबाही तसें करा म्हणून म्हणणार नाहींत."

अशा तऱ्हेनें समजूत घातल्यामुळें डॉक्टर शिर्डीस गेले. बाबांच्या मशिदींत जाऊन उभे राहिले, तों कोणी मुसलमान न दिसतां आपल्या पुढें श्रीरामाची मूर्ती आहे, असा त्यांना भास झाला. त्याबरोबर अर्थात् डॉक्टरांनीं साष्टांग नमस्कार घातला. मशीदीबाहेर आल्याबरोबर त्यांनीं ही

हुशारीत आपल्या मामलेदार मित्रास सांगितली. दुसरे दिवशीं डाक्टर शिरडी येथे आले. महाराजांची आपल्यावर कृपा झाल्याशिवाय जेवावय नाहीं, आणि मशिदीतही जावयाचें नाहीं, त्याप्रमाणें ते तीन दिवस ते जेवले नाहीत. शिवाय दर्शनालाही गेले नाहीत. चौथ्या दिवशीं डाक्टर [illegible] अकस्मात [illegible] दर्शनाला आले. [illegible] [illegible] डाक्टरांस फार आनंद झाला. आणि त्या आ[illegible] [illegible] ~~[illegible]~~ दर्शनाला गेले. डाक्टरांनी नमस्कार केल्याबरोबर महाराज म्हणाले " का डाक्टर, कशा[illegible] [illegible] तुला कोणी बोलाविलें होतें ? " अर्थात् डाक्टरास आपल्या निश्चयाचें ( कृपा झाल्याशिवाय दर्शनाला जावयाचें नाहीं याचें ) स्मरण झालें. व ते गिरवळून गेले. त्याच दिवशीं मध्य रात्रीच्या सुमारास डाक्टरांवर कृपा झाली. झोंपेंत असतांना परमानंदाची स्थिति प्राप्त झाली ही स्थिति पुढें पंधरावीस दिवस, डाक्टर आपल्या गांवीं परत गेल्यावर टिकली.

ज्याची जी उपासना असेल तिची त्याला खूण द्यावयाची, आणि ती दृढ करावयाची, असा जो महाराजांचा क्रम, याबद्दल आणखी पुष्कळ अनुभव सांगतां येण्यासारखे आहेत: पण विस्तारभयास्तव ते येथें न [illegible] न करितां [illegible] तऱ्हेच्या अनुभवाकडे वळतों.

एकदां माझे दोन स्नेही वाड्यांत रात्रीं इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत बसले होते. मीही त्यांच्याजवळ होतों, पण मला झोंप लागली होती. दोघे रात्रीं सुमारें एक वाजेपर्यंत बसले होते. शेवटीं त्यांचें त्यांनाच वाटले की, आपण करितों हें बरोबर नाहीं. आणि एकजण म्हणाला " चल निजूं या, लोकांच्या उखळ्यापाखाळ्या पुरे झाल्या ! "

दुसऱ्या दिवशीं सकाळीं बाबांच्या दर्शनाला वरीच मंडळी गेली, त्यां[illegible] हे गृहस्थही होते. ते पायां पडत असतांना महाराजांचे उद्गार निघाले ते असे:- " आपल्या दरबारांत सर्व तऱ्हेचे लोक येतात. चांगलेही येतात, वाईट, खट, नष्ट, दुष्ट, असेही येतात. आपण कशाला कोणाच्या उखा[illegible] पाखाळ्या काढाव्या ? "

अर्थात् माझ्या स्नेह्याला ती खूण पटली, आणि या गोष्टीपासून बोध घ्यावयाचा तो त्यांनीं घेतला.

2A

(१)

# श्रीसाई लीला.

(मासिक)

वर्ष १ लें. वैशाख शके १८४५. अंक २ रा.

## श्री साईबाबा शिर्डी संस्थानचे व्यवस्थेची स्कीम.

(अहमदनगर डिस्ट्रिक्ट कोर्टाकडून मंजूर झालेली)

१ संस्थानची सर्व स्थावर जंगम मिळकत खालील पांच ट्रस्टी यांचे हयातीपावेतों त्यांचे ताब्यांत राहील.

### ते पांच ट्रस्टी.

(१) मि० मोरेश्वर विश्वनाथ प्रधान बी० ए० एलएल बी० बाँबे लेजीस्लेटिव्ह कौन्सीलचे मेंबर.

(२) मि० लक्ष्मण गणेश महाजनी मेसर्स शूरजी वल्लभदास आणि कंपनी व्यापारी मुंबई.

(३) प्रोफेसर गणेश गोविंद नरके रसायन आणि भूगर्भ शास्त्राचे प्रोफेसर सायन्स कॉलेज. पुणे.

(४) मि० रामचंद्र आत्माराम तरखड म्यानेजर आणि सेक्रेटरी खटाव मकनजी मिल्स मुंबई.

(५) तात्या गणपती पाटील कोते ल्यांड लॉर्ड शिर्डी.

या ट्रस्टीची एकादी जागा रिकामी झाल्यास त्याचे जागीं श्री साईबाबा यांचे भक्तांपैकीं एकादा इसम हल्लींच्या ट्रस्टींनी होतां होईल तितके लवकर मेहरबान डि० जज्ज साहेब यांचे मंजुरीनें नेमावा.

२ ह्या संस्थानची व त्याचे स्थावर जंगम मिळकतीची व्यवस्था शिर्डी संस्थान कमेटीकडे असावी. व ट्रस्टी हे ह्या कमेटीचे एक्स ऑफिसिओ सभासद होतील.

२ शिर्डी संस्थान कमेटीमध्यें एकूण १५ पंधरा सभासदांचा समावेश असावा:-त्यांमध्यें ट्रस्टी,चेअरमन, ( १ ) खजीनदार ( १ ) सेक्रेटरी, ( १ ) मदतनीस खजीनदार आणि एक मदतनीस सेक्रेटरी, इतके असावेत. यांची नांवें येणेंप्रमाणें.

### कमेटी चेअरमन

ह. भ. प. गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे ऊर्फ दासगणू

### खजीनदार.

मि० गोविंद रघुनाथ दाभोळकर

रिटायर्ड मामलेदार आणि रेसिडेंट फ० क्लास माजिस्ट्रेट बांद्रा.

### मदत खजीनदार.

मि० यशवंत जनार्दन गाळवणकर बी. ए.

न्यायखातें सेक्रेटारीयेट मुंबई.

### सेक्रेटरी.

मि० हरी सिताराम दीक्षित

रिटायर्ड सॉलीसिटर आणि हायकोर्ट वकील.

### मदत सेक्रेटरी.

रामचंद्र दादा कोते पाटील शिर्डी येथील जमिनदार.

### सभासद.

मि० कृष्णराव नारायण पारूळकर. आनररी म्या. हर्डा सी. पी.

मि० गणेश दामोदर केळकर

रिटायर्ड सरकारी नोकर; हल्ली राहणार शिर्डी.

मि० अमीईदास बी० मेहता

प्रोप्रायटर ब्रिटिश फोटो एनलार्जींग कंपनी काळबादेवी मुंबई.

मि० माधवराव बळवंत देशपांडे जमीनदार राहणार शिर्डी.

---

१ हे इसम हल्लीं मयत असून यांचे जागीं रा. रा. सखाराम बळवंत धुमाळ वकील नाशिक यांना नेमण्यांत आलें आहे.

मि० रघुवीर भास्कर पुरंदरे कारकून लोको डिपार्टमेंट जी०आय० पी० रेल्वे कंपनी मुंबई.

४ हे ट्रस्टी कायमचे काम करणारे राहतील या ट्रस्टीखेरीज वरील मंडळींनीं ३ वर्षेपर्यंत कामें करावीत. त्यानंतर ट्रस्टीखेरीजकरून बाकीचे सर्व अधिकारी भक्तमंडळीनीं यापुढें निर्दिष्ट केलेल्या पद्धतीनें होता होईल तितके लवकर भक्तमंडळ तयार करून त्यांतून निवडून घ्यावेत.

५ जे लोक भक्तमंडळांचे सभासद होण्याबद्दल अर्ज करतील व संस्थानचे खर्चाकरितां निदान वर्षाला पांच रुपये वर्गणी देण्यास कबूल होतील अशाच लोकांचा श्रीसाईबाबांचे देवळाचे भक्तमंडळांत समावेश होईल. कमेटीनें कांहीं विशेष लेखी कारणें नमूद केल्यास एकाद्याकडून वरीलप्रमाणें वर्गणी न घेतां अगर वर लिहिल्याप्रमाणें त्याचा अर्ज नसतां त्याजला सदरचे भक्तमंडळांपैकीं एक ऑनररी सभासद नेमण्याचा अधिकार आहे.

६ भक्तमंडळांच्या सभेंत कमींतकमीं १० जणांची संख्या असावी, आणि शिर्डी संस्थान कमेटीचे सभेंत ५ जणांची संख्या असावी:—

७ शिर्डी संस्थानचे कमेटींत (जिला यापुढें थोडक्यांत म्हणजे कमेटी असें म्हटलें आहे.) मृत्युमुळें राजीनाम्यामुळें अगर अन्य कारणामुळें रिकामी जागा झाल्यास ती कमेटीनें भरावी.

८ जिला यापुढें मंडळ म्हटलें आहे. त्या कमेटीची मुख्य कामें खालीलप्रमाणें आहेत.

(A) भक्तमंडळाच्या वेळोवेळीच्या सूचनेप्रमाणें हल्लीं चालू असल्याप्रमाणें संस्थानची व्यवस्था ठेवणें.

(B) संस्थानची सर्व स्थावर व जंगम ( रोकड दस्तऐवज वगैरे ) सुरक्षीत ठेवणें. देणग्या वर्गणी गोळा करणें. भाडें व देणें घेणें, व इतर उत्पन्नाची वसुली करणें व संस्थानचे लोकांचा पगार देणें. व इतर खर्च करणें.

(C) संस्थानांत आलेल्या सर्व वस्तू व रकमासंबंधीं योग्य व खरा जमाखर्चाचा हिशेब ठेवणें, व हिशेब तपासणी करणें. वार्षिक जमाखर्चाचा

तक्ता तयार करणें व तो भक्त मंडळापुढें वार्षीक सभेचेवेळीं ठेवून त्याची नक्कल मे० डि० जज्यसाहेब नगर यांजकडेस पाठविणें.

(D) संस्थानसंबंधी यात्रा व उत्सव भरविणें, पुराणीक, हरिदास, भजनी लोक, गायन करणारे, व भिक्षुक, यांची योग्य संभावना करणें.

(E) संस्थानची शिल्लक जमिनी अगर इंडियन ट्रस्ट ॲक्ट क० २० अन्वयें ज्या ठेवी असतील त्या योग्य तऱ्हेनें व्याजीं लावणें.

(F) संस्थानची स्थावर जंगम मिळकत नीट आहे तशी ठेवणें.

९ कमेटीला डी॥०जज्ज साहेब बहादूर यांचे परवानगी शिवाय संस्थेची जवाहिराची अगर स्थावर मिळकतीची गैर विल्हेवाट करण्यास गहाण ठेवण्यास अगर त्यावर बोजा उत्पन्न करण्यास अधिकार नाहीं. तथापी संस्थेची एकादी जंगम मिळकत विकण्यास अगर ज्या जिनसा निरुपयोगी अगर विकतां येत नाहींत अशा असतील त्यांचा नाश करण्याचा अधिकार कमेटीस आहे. संस्थेची स्थावर मिळकत भाड्यानें देण्यास ३ वर्षांपेक्षां ज्यास्त नाहीं, अशा मुदतीनें व योग्य त्या भाड्याबद्दल करारानें देण्यास अधिकार कमेटीस आहे.

१० कमेटीनें खालील बाबतींत स्कीमला धरून नवीन नियम होता होईल तितके लवकर करावे.

(अ) भक्तमंडळ स्थापन करण्याकरितां.

(ब) भक्त मंडळांची सभा भरविण्याकरितां आणि कमेटीची सभा भरविण्याकरितां.

(क) कमेटीचें अंतर्व्यवस्थेचे बाबींत व लोकल सब् कमेटी स्थापन करण्यास.

(ड) संस्थेची सर्व कामाची व्यवस्था करण्याकरितां.

११ कमेटीस जरूर लागल्यास आणि इष्ट दिसल्यास कोर्टाकडून सल्ला विचारणें झाल्यास त्या कोर्टाकडे अर्ज करण्यास मोकळीक कमेटीस आहे.

भगवद्भक्तिपरायण श्री० उद्धवेशबुवा डहाणूकर यांचे आर्यासप्तक:-- यांतील प्रत्येक आर्येच्या आद्याक्षरांनीं 'श्रीसाईनाथ बाबा' हें गोड नाव साधलें आहे:--

## ॥ श्री साईनाथबाबा ॥

### आर्यासप्तक

श्री गुरुराया ताता, सांभाळी शामदास हा तनय ॥
त्वत्पदिं ठेवुनि माथा, प्रार्थितसे प्राप्त हो मला विनय ॥ १ ॥
सांडून लोभमोहा, लावियलें सत्पथास या जन जे ॥
बाळा, गोविंद, हरी, बापू, श्रीकाशिनाथ तुजशि भजे ॥ २ ॥
ईशा तव लीलेला, वर्णाया भक्तिपंथ गणू लागे ॥
नच पूर्तता तयाला वर्णन करण्यास तोहि या भागे ॥ ३ ॥
नाना मार्गें जातां, दावियलें रूप विविध जातीचें ॥
पटलें ज्यांना नच त्या, बोधियलें सत्स्वरूप मग साचें ॥ ४ ॥
थट्टेनें, सत्यानें नाम तुझें नित्य घेति जे वदनीं ॥ ५ ॥
बालकरामा धामा, हिंडविलें सत्य-देव, बघण्याला ॥
फिरफिरुनि श्रांत झाला, आला परतून शिर्डि ग्रामाला ॥ ७ ॥
बा-बा[11] अगाध लीला, वर्णायाउ ध्वेश[12] या थकला ॥
तन, मन, तुझेंचि धन हें, सर्व परीनें तुलाच हा विकला ॥ ८ ॥
ऋषिसंख्या-या-आर्या[13] आर्यांचे चरण-कमलिं अर्पितसे ॥
अल्पारंभ असे हा, यति, मात्रा, वृत्त बोध मजशि नसे ॥ ९ ॥
श्रीसाईनाथ चरणीं, अल्पहि करणी करीतसे हजर ॥
सर्वत्र दोष-त्यागुनि, बुध-जनिं धावीच इजकडे नजर ॥ १० ॥

---

१ हेदुवा इ. स. १९०६ सालीं शिर्डीस गेल्यावेळी श्रीसद्गुरूनीं त्यांना शामदास म्हणून हाक मारली व पुढेंही याच नांवानें ते त्यांस संबोधीत. २ कै. वा. रा. रा. बाळा साहेब भाटे व बाळा साहेब देव मामलेदार हल्लीं वस्ती ठाणें. ३ अण्णासाहेब दाभोळकर. ४ काकासाहेब दीक्षित. ५ कै. श्री. बापुसाहेब बुटी. ६ श्री. उपासनी महाराज. ७ श्री दास गणू महाराज. ८ नानासाहेब निमोणकर नानासाहेब डेंगळे नानासाहेब चांदोरकर, नानाबुवा. ९ कै. वा. रा. रा. बालकराम. १० शिर्डी. ११ बुढे बाबा किंवा फकीर बाबा. १२ सप्तकाचें कर्त्याचें नांव. १३ ऋषींची संख्या ७ आणि श्रीसाईनाथ बाबाही अक्षरेंही ७

रा. रा. विनायक विष्णु साठे यांच्या खालील कविता श्री साई स्वरूप वर्णनपर असून उत्तेजनार्ह आहेत हें जाणून त्यांस या मासिकांत स्थळ देण्यांत येत आहे.

( शालिनी )

आहे योगी शिरडी ग्रामवासी ।
साईबाबा ज्ञानवैराग्य राशी ॥
साक्षित्वानें लक्षितांनां निवृत्ति ।
आनंदानें आदरी जो प्रवृत्ति ॥ १ ॥

( उपेन्द्रवज्रा )

असो प्रवृत्ती अथवा निवृत्ती ।
उदास राहे; धरि मौनवृत्ति ॥
समान पाहे उभयांस योगी ।
निजात्मतेचा परिमोद भोगी ॥ २ ॥

( इन्द्रवज्रा )

भेदीं असावें अथवा अभेदीं ।
तो नित्य योधा कधिही न भेदी ॥
विश्वांत जो एकच तत्व पाहे ।
त्याचा समाधी सहजांचि आहे ॥ ३ ॥

लीला जयाच्या उपदेश देती ।
धीमंत भावें स्वमनांत घेती ॥
वाणीस कोणी म्हणती अभद्र ।
सूज्ञांस देते परि पूर्ण भद्र ॥ ४ ॥

( उपेन्द्रवज्रा )

उदास चित्तें व्यवहार सर्व ।
करोनि खंडी कळतांच, गर्व ॥
असे उदारा अति तीव्रबुद्धी ।
उदी जयाची करि देहशुद्धि ॥ ५ ॥

सूज्ञांस लाभे स्थिरता मनाची ।
भीती न साची लवही जनाची ॥
ज्याचे मनीं भाव जसा असेल ।
साईमध्ये तोच तया दिसेल ॥ ६ ॥

साई न दुःखा अथवा सुखाला ।
देई, न आदर्श जसा मुखाला ॥
सौंदर्य किंवा अतिहीन मुद्रा ।
चंद्रोदयें ये भरती समुद्रा ॥ ७ ॥

(वसंततिलका)

वाणींतुनी स्रवतसे सहजीं प्रबोध ।
लागे विचार करितां हृदयांत शोध ॥
मी कोण! हें जग कसें उदयास येतें !
राहे कुठें स्थिर! कसें विलयास जातें ॥ ८ ॥
होसी सुकाव्यरसदायक साईराया ।
नाहीं कधींच शिवली तुज मोहमाया ॥
पीयूष-सागर असे उघडा जनांला ।
अत्यल्पबिंदु न मिळे कुटिला मनाला ॥ ९ ॥

(मन्दाक्रांता)

जेथें तेथें दिससि मजला सद्गुरो सिद्धसाई ।
नाहीं नाहीं तुजविण दुजी दृश्य भावास आई ।
अंबे घेई पदरिं तव हा बाळ लावी स्तनाला ॥
स्वानंदाचें मधुर पय दे, शांतवी ताप-जाला ॥ १० ॥

---

इ० स० १९२१ च्या पौर्णिमेच्या दिवशीं समाधी समोर म्हटल्या गेलेल्या श्री साई-चरणांकित श्रीमती हिराबाई गायकवाड यांची सुरस पद्यें.

"पद." (दाखवी तव दिव्यपाय या. चालीवर).

साई साई योगीराज । धांव पाव मातें ॥ धृ ॥ ० ॥
रंकहीन दासी तुझी । ध्याई त्वत्पदातें ॥ १ ॥
अंत किती पाहासी बा । वारी आपदातें ॥
अजामील पिंगलेसी । तारियेलें नाथें ॥ २ ॥
भंगवेन काय अहा । मदिय अघ नगातें ॥
देव गुरु साई दत्त । देई दर्शनातें ॥ ३ ॥
स्फूर्ती आणि प्रेम देई । तव कीर्तनातें ॥
साई सुता आर्जविही । त्यजुनी जनातें ॥ ४ ॥

अभंग.

परब्रह्म रूपी पिता रामचंद्र । लक्ष्मी मम माता वंदूनियां ॥
तैसा श्री सद्गुरू साई योगीराज । वंदूं परात्पर प्रेमभावें ॥
आतां गुरुराया परिसा विज्ञापना । देईं दानदीना उदारत्वें ॥
वैराग्यतें भक्ति आणि ज्ञान युक्त । देईं कृपावंत होऊनीयां ॥
आणीक नलगे तुझियावांचून । पतित मी हीन हेंची मागें ॥
ध्रुवा अढळपद दिसतसे लोकां । सदेही तो तूका स्वीकारीला ॥
मज अनाथाचा स्वीकार करीतां । लाजसी कां चित्ता साईनाथा ॥
समर्थाच्या दासीं कोणी कडे जावें । कोणासीं विनवावें साईताता ॥
नाहीं तुजवीण मज कोणवाली । ब्रीद तें सांभाळी गुरूराया ॥
वेद शास्त्रें सर्व तूज वाखाणीती । कनवाळू माऊली तूंची एक ॥
तूंची एक माझा जिवाचा निवास । नाहीं वसवस संसाराची ॥
दीनदासी हीरा तुझीच आश्रीत । दिसेल उचीत तेंची करी ॥
पवित्र तो दीन गुरुपौर्णिमेचा । तळमळ जीवा बहू झाली ॥
अमूर्त ते मूर्त दिसेल नयनीं । म्हणुनियां केली कालावीसी ॥
परंतु समर्थें आणिला नाहीं योग । दुर्धर तो भोग ज्वर आला ॥
अनंताचे हेत अनंतची जाणे । इतर ते नेणे लीला त्यांची ॥

पद- ( मूर्तिमंत भीति उभी या. चालीवर )

संत साई नाममुखीं, प्रेमभरें गात्सा ॥ उत्कंठित व्हा तुम्हीं । मग उशीर कायसा ॥ नाम तें करील चित्त । शुद्ध जेवि आरसा ॥ कृपासिंधु दीन बंधु तुजदिसेल राजसा ॥ रोमगुढी उभारती । हर्षमान कृपणसा ॥ १ ॥ संतसाई ॥

ब्रम्हानंदीं चित्त हारपे । प्रपंच होय असारसा ॥ त्याचा सोर्चीं -श्रोत्र वदन । ऐकवील श्रुतिरसा ॥ कर्मातीत व्हाल क्षणीं । मुक्तभाव नाहीसा ॥ सद्गुरुचि ऐसी कृपा । ध्याता ध्येय समरसा ॥ मूढ हिरा नामरूप । मिथ्या भास मृगांबुसा ॥ संतसाई ॥

॥ ॐ ॥

सौमित्रविरचित

# श्रीसाईनाथस्तोत्रम्.

शिखरिणी वृत्त.

अगा साईनाथा, मजवरि कृपापूर्ण दिससी ।
विलोकोनी मातें पदनत, कदापी न रुससी ॥
जगत्कल्याणार्थी धरिसि अवतारा महिवरी ।
जसा गीतेमध्यें प्रकटुनि नटे यादव हरि ॥ १ ॥

श्रुतिस्मृत्यादींच्या स्वरुपि अवतारा धरुनिया ।
विवस्वच्चंद्रांला करिसि तव साक्षीस बसण्या ॥
जयाच्या पादांना नमन करितां सिध्दि मिळते ।
नमू त्या साईनां, यदिय स्मरणें दुःख पळतें ॥ २ ॥

स्थिरैश्वर्या वाणी खचुनि भरली ज्या हृदिं मुदें ।
तयाला पाहोनी दिपलि लपलीं गर्व–कुमुदें ॥
असा बोधात्मा तो श्रुतिस्मृति जयामाजि दिसती ।
नमू त्या साईनां, गुरुगुरु जया सर्व म्हणती ॥ ३ ॥

करी साक्षात्कारें विमलतर ब्रम्हांड भरलें ।
चिदाभासें दावी कणकणिंहि प्रत्यक्षपण तें ॥
पहा जो वच्यावत् चर अचर सृष्टींत विलसे ।
नमू त्या साईनां, सुधि वदति ज्यांना नर असें ॥ ४ ॥

अहा जीवात्मा तो कथिति नरसंज्ञात्मक असा ।
जयाला राहे तो सतत धरुनी आश्रयि तसा ॥

तयाला संबोधी अखिल जन नारायण असें ।
नमूं त्या साई, जो उघडचि नराकारण वसे ॥ ५ ॥
जयाच्या कार्यीं तें जननि परमात्मा स्फुट रवें ।
धरी अंगीं भारी पृथकपण श्रेष्ठत्व बरवें ॥
सदा भासे सच्चिन्मुदस्वरूप साकारचि कसा ।
नमूं त्या साई, जो परम करुणात्मा शिव तसा ॥ ६ ॥
अशा त्या आत्म्याच्या त्रिगुणयुत निर्दिष्ट उपरी ।
यथार्थ ज्ञानातें करुनि मन संतुष्टचि करी ॥
जयाला मादात्मा-स्वकिय-हृदया जाणुनि धरी ।
नमूं त्या साईनां, सुखकर जयाचीच नगरी ॥ ७ ॥
जगत्राता ऐसा परमकरुणायुक्त सजला ।
ममात्म्याचे ठायीं स्फुरण करण्या स्पष्ट नटला ॥
म्हणूनी मद्वाणी तदिय भजनीं पूर्ण भरली ।
नमूं त्या साईनां, कृति यदिय साह्येंच तरली ॥ ८ ॥
विधी जो विष्णू जो शिव त्रिगुणरूपात्मक असा ।
बिडौजस वायू कीं शशिरविबृहद्भानु हविसा ॥
ममात्मा सर्वात्मा स्थिरचर यदाकार सगळें ।
नमूं त्या साईनां, हृदयज अहंभाव वितळे ॥ ९ ॥
खरा ज्ञानानंदीं वलुनि वसुधा सर्व बघतो ।
भजे जो जैसा त्या समचि भवना साच करितो ॥
महा मोक्षार्थातें पदरिं पडण्या सिद्ध बनुनी ।
नमूं त्या साईनां, अढळ मन रूपांत भरूनी ॥ १० ॥
जलासंगें अक्षासम सुवचनातें जगतिं या ।
त्रयी रत्नांची ही निपजवि अशा जाण हृदया ॥
महा मोक्षा पावूं उपलज मणीतें वधुनियां ।
नमूं त्या साईनां, सुखद परमानंद वमुंया ॥ ११ ॥

---

वरील स्तोत्र इ. स. १९१७ मध्यें रा. रा. मामासाहेब खाजगीवाले यानीं छापून प्रसिद्ध केलें होतें.

## आरती.

(चाल-आरती भुवनसुंदराची०)

वर्णितां थकलि वाणिदेवी । स्वरूपा अशा वर्णू केवी ॥ ध्रु०॥
उत्सव थोर मनीं झाला । जैसा भाव वघुनि बाला ॥
सुमाला देहवृक्ष आला । अर्पितों भक्तिच्या या फुला ॥
चाल ॥ साईनाथा;, तंव रे बोध । त्यानें शोधित केला क्रोध ॥
तैसा षड्रिपुंचाही शोध ॥ होऊनि, मनि नच येइ विरोध ॥
चाल ॥ तव ते पाय । हीच मम माय । तरुनि मज नेय ॥
म्हणूनि मी गाय । कीर्ति बरवी । सौमित्रनुती आयकावी ॥ ध्रु० ॥

---

श्रीसाईमहाराजांची दुसरी पुण्यतिथि आश्विन शुद्ध १० शके १८४२ शुक्रवार ता० २२ आक्टोबर सन १९२० रोजीं श्रीसमाधीसमोर म्हणण्यांत आलेली पद्यें:—

अभंग

नाहीं कुठें गेला, हृदयीं वसला । वाटतें मजला बाबा साई ॥ १॥
जागृत ठेवितो मज ठायीं ठायीं । अनेक उपायीं गुरु माझा ॥ २ ॥
दीनाचा दयाळु ऐसा नाहीं कोणी । तनु झिजवोनी गुरु झाला ॥ ३ ॥
आतां नाहीं भय उरले या जीवा । दासीचा विसावा सद्गुरु तो ॥ ४ ॥

२.

सत्य सद्धर्माचें लक्षण सांगतो । शब्द ऐकवितो सिद्धांचें ते ॥ १ ॥
मनाचा निग्रह पर-उपकार । निर्मळ अंतर असों द्यावें ॥ २ ॥
शास्त्रज्ञानविद्या अभ्यासें साधावी । संगति धरावी सज्जनाची ॥ ३ ॥
इंद्रियनिग्रह धर्मक्षमाशांति । जेणें आत्मोन्नति घडतसे ॥ ४ ॥
दास म्हणे येणें जन्माचें सार्थक । करूंया भाविक तुम्ही आम्ही ॥ ५ ॥

आर्या

जो नर मानवदेहीं स्मरण करी नित्य गुरुपदाब्जाचें ।
दैव सहाय तयाला, पुण्य खरें तें अनंत जन्मींचें ॥ १ ॥
सद्गुरुसद्बोधाचें चिंतन मनिं जो पुनःपुन्हा करितो ।
त्यातें भवतरणाला साधन गुरु तो स्वयेंचि दाखवितो ॥ २ ॥

ध्यान भजन पूजन हीं सर्वांचि कीं श्रेष्ठ साधनें पाहीं ।
यांतुनि अवलंबावा मार्ग कवण हें अम्हीं कळत नाहीं ॥ ३ ॥
म्हणुनी मार्गनिदर्शक सद्गुरुचरणीं त्वरें शरण जावें ।
गुरुनें जो दाखविला त्या मार्गा अनुसरून चालावें ॥ ४ ॥

श्लोक ( शा. वि. )

संसारीं दृढ निश्चया न ढळुं दे त्याचीच खाली खरी ।
सप्रेमें भजतां विवेक पदरीं बांधील तो श्रीहरी ॥
सन्मार्गी वळवो कुमार्ग टळवो साई स्वताच्या करीं ।
नाथाचीच कृपा निरंतर असो तुम्हां सुभक्तांवरी ॥ १ ॥

श्रीसाईबाबा महाराजकी जय

* दास दासी.

॥ श्रीसद्गुरु साईनाथार्पणमस्तु ॥

* कळविण्यास वाइट वाटतें कीं, यांपैकीं दास म्हणजे रा. रा. रघुनाथराव विठ्ठल तेंडुलकर यांस इ० स० १९२२ सालीं देवाज्ञा झाली.

यांच्या भक्तिपरिप्लुत व गोड वाणीचा अनुभव घेऊं इच्छिणाऱ्यांसाठीं आपली आठवण म्हणून त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें गाइलेली शेकडो मधूर पदें आपल्या भजन मालेंत ठेवून ते गेले आहेत "मरावें परी कीर्तिरूपें उरावें"

रामदास



# ॥ दासगणूकृत गुरुपाठाचे अभंगांतील उतारा.

जयाचीं तीं रूपें सगुण निर्गुण ॥ ऐसा नारायण वंदूं आधीं ॥
सगूण सेवितां निर्गूण ये हातीं ॥ निर्गुणाची प्राप्ती आरंभीं ना ॥
आधिं मूल काढी क, ख, बाराखडी ॥ मग शब्द जोडी झाल्या ज्ञान ॥
गणू म्हणे तैसी सगुणोपासना ॥ बाराखडी जाणा अध्यात्माची ॥ १ ॥

ती ही बाराखडी शिकवी जो गुरू ॥ भवाब्धीचें तारूं तोच जाणा ॥
गुरुसेवा हीच प्रथम पायरी ॥ असे टिकण्या भारी अवघड ॥
सद्गुरूरायाची कृपा संपादीतां ॥ सेवेची पूर्तता सहज होई ॥
गणु ह्मणे केल्या प्रसन्न सविता ॥ प्रभेची न्यूनता केंवि पडे ॥ २ ॥

सद्गुरूची सेवा बहूतांनीं केली ॥ ऐसी साक्ष दिधली पुराणांनीं ॥
पूर्णब्रह्म-राम जानकीचा कान्त ॥ झाला शरणागत वसिष्ठांसी ॥
निष्ठावंत भाव हाच देतो फळ ॥ अभक्तिचा मळ निमालीया ॥
चहाड दुतोंडया ऐसा नारद-मुनी ॥ परि झाला तरणी प्रल्हादातें ॥
गोपिचंदें गुरू लिदीसी गाढीला ॥ पुढें तोचि झाला वंद्य त्यातें ॥
गणु म्हणे सोनें चढे मोला अंगें ॥ कसोटीच्या संगें जगामाजीं ॥ ३ ॥

क्षमा, शांती, दया असे जया ठायीं ॥ तैसें ज्ञान पाही संपूर्ण तें ॥
जयाचिये शिरीं ईश्वराचा हात ॥ तोच सद्गुरू नाथ करावा हो ॥
बाहेरील सोंगा भुलुं नका कदा ॥ पतंगातें दगा दीपापाशीं ॥
गणु ह्मणे हंस पाण्यातें टाकूनी ॥ घेतसे शोधोनी जैसें दूध ॥ ४ ॥

हिरे आणि गारा एक्याच खाणींत ॥ तैसे बद्ध मुक्त जगामाजीं ॥
पारखी तो येतां हिरा घे वेंचोनि ॥ कुक्कूट पायांनीं कालवी तो ॥

मुमुक्षु पारखी चार्वाक कोंवडा ॥ कुक्कुटा उकिरडा गोड वाटे ॥
गणु ह्मणे जो कां असे भाग्यवंत ॥ तयाचाच हेत गुरुपायीं ॥ ५ ॥

क्षमा शांतीयुक्त भवाब्धीचें जहाज ॥ ऐसा सद्‌गुरुराज शिर्डीमाजीं ॥
नामाभिधा ज्याची शोभे बाबासाई ॥ अनाथांची माई तीच जाणा ॥
अनाथ सनाथ हा भेद जेथें ॥ सूर्य प्रकाशातें निवड कैंची ॥
माझा गुरुराज जान्हवीचें जळ ॥ गणु अर्पी भाळ तयापायीं ॥ ६ ॥

---

अंगकांठी उंच केलीसे धारण ॥ कळवावया खूण भक्तजनां ॥
उच्चज्ञान जें कां अध्यात्म साजीरें ॥ तेंचि सेवा सारें कल्याणार्थ ॥
परि नका सोडूं ठेंगणी लीनता ॥ न ये थोर होतां वाल्यावीण ॥
गणु ह्मणे वर्ण तांबूस सांवळा ॥ सद्‌गुरूची लीळा अगाधची ॥ ७ ॥

सद्‌गुरूरायानें जला तेल केलें ॥ दीप ऊजळीले लक्षावधी ॥
ठेउनियां दीप उशा पायथ्यांसीं ॥ पहुडे फळीसी गुरूमूर्ती ॥
त्यांच्या त्या कृतीचा हाच आहे अर्थ ॥ कदा अंधारांत निजूं नये ॥
गणु ह्मणे माया दुर्धर अंधार ॥ ज्ञानदीप थोर ह्मणुनी लावा ॥ ८ ॥

शिवविष्णू ब्रह्मरूप बाबासाई ॥ भाव दूजा कांहीं मानूं नका ॥
सद्‌गुरुरायाच्या पायाची जी धुळ ॥ तेंच गंगाजळ शुद्ध माना ॥
अमृता आगळीं मुखीचीं वचनें ॥ तींच माना मनें गीता जेवीं ॥
गणु ह्मणे बाबा वसंत सोज्वळ ॥ भक्तांनों कोकीळ [illegible] तुह्मी ॥ ९ ॥

परमार्थाची आस ज्यास मनापून ॥ त्यानें हे चरण [illegible] आधीं ॥
ऐहिक सुखासी देवोनियां फांटा ॥ भक्तीच्या वाटा धुंडाळाव्या ॥
द्वेषाचे सराटे फेकूनीयां द्यावे ॥ साईमय पाहावें जगालागीं ॥
गणु ह्मणे तरी तुह्मीं त्यांचे भक्त ॥ शोभाल जगांत सज्जनांनो ॥ १० ॥

शिर्डीक्षेत्र नोहे पचंवा बाजार ॥ तेथें दुकानदार परमार्थाचा ॥
ऐहिक सुखाची खेळणीं बाहूल्या ॥ समूळ फेंकिल्या गुरूरायें ॥
कां कीं तयामाजीं किमपि ना अर्थ ॥ फसतील व्यर्थ पोरें माझीं ॥
गणु ह्मणे पोर पचंव्यासी जातें ॥ किरकिरेंच घेतें आवडीनें ॥ ११ ॥

कर्म भक्ती ज्ञान बाजारीं या माल ॥ मनीं जो वाटेल तोचि घ्यावा ॥
तिघांची किंमत एक आहे जाणा ॥ फळहि तिघांना एकची हो ॥
भावरूपि द्रव्य पाहिजे तयासीं ॥ साईसद्‌गुरूसी दूजें न लागे ॥
गणु ह्मणे भाव नाणें जयापासीं ॥ त्यानें बाजारासी येथें जावें ॥ १२ ॥

फळ तें पाथेय घ्यावें फराळाशीं ॥ मग पंढरीसी जावें सूखें ॥
बावाजीनें कृपा तुकोबासी केली ॥ तयिच फळली पंढरी त्या ॥
थापटणें गोऱ्यानें मारूनि नाम्याला ॥ कच्चा ठरविला देवापुढें ॥
गणु ह्मणे मग खेचर माऊली ॥ नाम्यानें वंदीली कल्याणार्थ ॥ १३ ॥

---

निवृत्ती ज्ञानेश ईश्वरी अवतार ॥ परी गुरूवर गहिनी केला ॥
गुरूकृपेंवीण एकालाही जनीं ॥ विठू चक्रपाणी भेटला ना ॥
पंढरीरायाची मनि असल्या आस ॥ सद्‌गुरूची कांस दृढ धरा ॥
गणु ह्मणे तया भवाचें ना भय ॥ ज्याचे चित्तिं पाय सद्‌गुरूचे ॥ १४ ॥

शुक सनकादि नारद अंबरीष ॥ निवृत्ती ज्ञानेश नामा तुका ॥
दासतुलसी चोखा जयदेव सांवता ॥ पंत नाथ मेहेता कबीर तो ॥
बोधला पवार विसोबा खेचर ॥ गोरोबा कुंभार कूर्मदास ॥
गणु ह्मणे त्याच कोटींतला साई ॥ चला त्याच्या पायीं लीन होऊं ॥ १५ ॥

जरि त्या संतांच्या मूर्ती हो लोपल्या ॥ साईरूपें उरल्या पहावया ॥
त्रिभुवनाभाजीं जे जे कोणी संत ॥ ते ते साईनाथ मजलागीं ॥
भेदबुद्धी नुपजो माझी संताठायीं ॥ संत शेषशाई प्रत्यक्षची ॥
गणुदास आहे संतांचा अंकीत ॥ भेटो पंढरिनाथ त्याच्या कृपें ॥ १६ ॥

भक्तिरूप गंगा वाहे जया ठायीं ॥ तेथें माझा साई राहे उभा ॥
हस्त संकेतानें पालवीतो लोकां ॥ या हो फिरूं नका रानोमाळ ॥
मज ओळखावें आहें मी कोठला ॥ कशासाठीं आलों शिरडीसी ॥
पंढरी क्षेत्रींचा मीच हो वाटाड्या ॥ गणूच्या त्या उड्या साईवळें ॥ १७ ॥

मज न विचारीतां पंढरीच्या वाटे ॥ जाल तरी कांटे रुततील ॥
पंढरीची वाट मोठी अवघड ॥ मोठे मोठे पहाड मार्गामाजीं ॥ -

तयाचें तें वस्त्र आहे मजपाशीं ॥ तसा हृषीकेशी ओळखीचा ॥
गणु म्हणे जन्मोजन्मीं नाहीं तूटी ॥ साईच्या जगजेठीं हृदयांत ॥ १८ ॥

म्हणून ही संधी दवडुं नका कोणी ॥ पडाल मागूनी पस्ताव्यांत ॥
दंभाचें गांठोडें एकीकडे ठेवा ॥ विकल्प सोडावा घातक जो ॥
क्रोधाची ती होळी ज्ञानाग्नीनें करा ॥ वासनेसी मारा अभ्यासानें ॥
गणु म्हणे ऐशा व्रतासी जो पाळी ॥ तयासी सांभाळी साई माझा ॥ १९ ॥

करुं नका नाश या आयुष्याचा ॥ जन्म मानवाचा पुन्हां नाहीं ॥
प्रत्येक जन्मांत कन्या पोरें घर ॥ मैथुन आहार आणि निद्रा ॥
नरजन्म नाहीं ऐशा कृत्यासाठीं ॥ बांधा खूण गांठीं मनामाजी ॥
जोडूं जाता जोडे जन्मीं या ईश्वर ॥ नर जन्म थोर गणु म्हणे ॥ २० ॥

लोभ मोह माया टाकून अवध्यांची ॥ धरा सद्गुरुचीं पाऊलें ती ॥
गुरुपायामाजीं अहे सर्व कांहीं ॥ गुरुवीण नाहीं सार्थकता ॥
गुरू कामधेनू गुरू कल्पलता ॥ चिंतेसी वारीता चिंतामणी ॥
गुरू भक्ती ठायीं जो कां एकनिष्ठ ॥ त्रिलोकीं तो श्रेष्ठ गणू म्हणे ॥२१॥

भाव साधकांनों ठेवा साईपायीं ॥ परि विठाबाई गावि वाचे ॥
साईचें पूजन देवाचें चिंतन ॥ राखावा सन्मान भूपतीचा ॥
परमार्थांत भक्ती व्यवहारीं नीती ॥ संसारीं विरक्ती असों द्यावी ॥
गणु म्हणे तरीं होईल कल्याण ॥ साइचे वचन हेंचि बाहो ॥ २२ ॥

गुरुपाठाचे हे अभंग पंचवीस ॥ जपतां होय नाश पातकांचा ॥
साईचे पवाडे गातां मोक्ष लाधे ॥ नका गुरू देवें निरर्थक ॥
साईमहाराजांचा धरूनीयां हात ॥ तरा भवाब्धींत बुडूं नका ॥
साईच्या इच्छेनें होतें अवघें कांहीं ॥ गणुकडे नाहीं बोल त्याचा ॥२३॥

टीप १ मूळ अभंग पंचवीस आहेत पण उतारा घेतांना त्यांपैकीं फक्त बावीसच घेतले आहेत.

# आतांपर्यंत छापून आलेल्या महाराजांच्या लीला.

१. महाराज रात्रीं एका फळीवर निजत असत. ती फळी मशिदीच्या एका आढयाला फाटक्या चिंध्या बांधून टांगलेली असे. महाराजांना त्या फळीवर चढतांना किंवा उतरतांना पहाण्याची उत्कंठा पुष्कळ मंडळीला होई, आणि पुष्कळांनीं तासचे तास ते पहाण्यासाठीं वाट पहात रहावें. पण महाराजांना चढतांना किंवा उतरतांना कधीं कोणींही पाहिलें नाहीं. एक तर ते खालीं जमिनीवर दिसत, किंवा फळीवर बसलेले किंवा निजलेले दिसत. फळीच्या उशापायथ्याला पणत्या लावलेल्या असत. हा प्रकार पुष्कळ वर्षें चालला होता. नंतर एके दिवशीं महाराजांनीं ती फळी तोडून टाकिली. हा फळीचा प्रकार ज्यांनीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिला, अशी मंडळी नुसत्या शिर्डीसच नव्हे, तर बाहेरगांवींसुद्धां पुष्कळ आहेत.

२ एकदां एक कथेकरी बुवा, नानासाहेब चांदोरकर आणि आणखी दुसरे दोन गृहस्थ असे मिळून महाराजांच्या दर्शनास गेले. दर्शन झाल्यावर कथेकरीबुवांस परत जाण्याची घाई झाली. कारण दुसरे दिवशीं नगरास त्यांची कथा व्हावयाची होती. नानासाहेब चांदोरकरांनीं महाराजांस जाण्याची परवानगी विचारली तेव्हां महाराज ह्मणाले " जेऊन जा. " नानासाहेबांनीं कथेकरीबुवांस रहाण्याविषयीं विनंति केली, पण ते राहीनात, आणि ते आणि त्यांचे एक स्नेही तावडतोब संवत्सर उर्फ वारी स्टेशनावर जाण्यासाठीं निघून गेले. नानासाहेबांना त्या वेळेस महाराजांनीं ह्मटलें " पहा, कसे लोक मतलबी असतात! वेळ आली ह्मणजे साथीदाराला सोडून आपल्या मतलबाला दक्ष असतात. म्हणून आपण असा साथी करावा कीं, जो आपल्याला कल्पांतींही सोडणार नाहीं."

अर्थात् सद्गुरुरायाशिवाय असा दुसरा साथी कोण मिळणार आहे? ह्मणून साथी करावयाचें तर त्यांनाच करावें. प्रेम भूतमात्रावर असावें, पण संग सद्गुरूचाच करावा. तोच संग खरा सुखकर होतो. असो.

महाराजांच्या आज्ञेप्रमाणें नानासाहेब व त्यांचे स्नेही शिरडीसच जेवण करून महाराजांची आज्ञा घेऊन निघाले. निघतांना महाराज ह्मणाले "अजून गाडीस अवकाश आहे." ते स्टेशनावर येऊन पहातात तों

गार्डाला खरोखरच अवकाश होता, आणि कथेकरीबुवा व त्यांचे स्नेही दुर्मुखलेलीं तोंडें करून गाडीची वाट पहात बसले होते. नानासाहेबांनीं त्यांना विचारलें "तुमची गाडी चुकली कीं काय ?"

बुवा ह्मणाले "नाहीं, आज गाडीस तीन घंटे उशीर आहे. तुम्ही महाराजांचें ऐकीलेंत, फार चांगलें केलें. आह्मीं ऐकिलें नाहीं त्यामुळें उपाशीं मात्र राहिलों."

मग थोड्या वेळानें गाडी आली आणि सगळेजण तींत बसून नगरास गेले.

३. शिरडी येथें आप्पा नांवाचा एक कुळकर्णी होता. तो महाराजांचा परम भक्त होता त्याच्यावर पैसे खाण्याचा आळ गांवांतील कांहीं टवाळ मंडळींनीं आणला होता, व त्याचा त्या कामीं जबाब घेण्याकरितां प्रांताच्या साहेबानें त्याला हुकूम धाडून बोलाविलें, तेव्हां तो अतिशय घाबरला आणि जातेवेळीं महाराजांची परवानगी घेण्यास तो मशीदींत गेला. महाराजांनीं त्याला सांगितलें "प्रांताचे साहेब नेवाश्यास आहेत, तिथें जा. तेथें प्रथम श्री मोहिनीराजाला वंदन कर, आणि मग साहेबाकडे जाऊन जबाब दे."

आप्पानें त्याप्रमाणें केलें. साहेबानें त्याचा जबाब ऐकून त्याला सोडून दिलें आणि ह्मटलें, कीं "तू पैसे खाल्ले नाहींस असें खात्रीनें मला वाटतें." आप्पा अर्थातच बाहेर पडल्याबरोबर नाचूं लागला, आणि महाराजांचे गुणानुवाद गाऊं लागला. नंतर शिरडीस जाऊन सर्व हकीकत त्यानें महाराजांस कळविली. महाराजांनीं अर्थात आपल्याकडे कांहीं कर्तृत्व न घेतां "कर्ता करविता परमेश्वर आहे; तो भक्तांसाठीं अघटित गोष्टी घडवून आणतो," असें उत्तर दिलें.

४ एके दिवशीं महाराजांनीं आप्पा कुळकर्णी यांस सांगितलें, कीं "आपल्या गांवांत चोर आले आहेत; आणि त्यांची स्वारी प्रथमतः तुझ्यावर होईल; तर तू आपला बंदोबस्त कर. हे चोर मोठे विलंदर आहेत त्यांची सर्व दृष्टी ऐन मालावर असते, आणि तेवढाच ते घेऊन जातात. आप्पानें या बोलण्याचा लौकिकी अर्थ केला, आणि सरकार धाऱ्या पैसे त्यानें चावडींत ठेविले होते तेथें जागल्यास पहाऱ्यास बसवून व किकी बंदोबस्त केला. परंतु महाराजांनीं सुचविलेले चोर निराळेच हो

ते चोर ह्मणजे यमदूत. महाराजांनीं वजावल्यानंतर थोडयाच वेळानें आप्पाला जुलाब, उलटया होऊं लागल्या, आणि त्यांतच त्याचा देहांत झाला. तो अत्यवस्थ असतांना त्याची बायको महाराजांकडे जाऊन रडूं लागली. महाराजांनीं तिला कांहीं बोध केला, आणि तिचें सांत्वन केलें. दुसऱ्या दिवशीं आणखी गांवांत दोनतीन लोक लागले, तेव्हां गांवकरी मंडळी महाराजांकडे गेली, आणि आम्हांला सांभाळा; अशी प्रार्थना करूं लागली. महाराज ह्मणाले "एकंदर सात माणसें जातील, आणि मग महामारी रहाणार नाही." त्याप्रमाणें फक्त सातच माणसें मेलीं, आणि नंतर गावांतील पटकी नाहींशी झाली.

५. शिरडीस कोंडया सुतार नांवाचा एक महाराजांचा भक्त होता. त्याला एके दिवशीं दोनप्रहरीं महाराज ह्मणाले "खळवाडीस आग लागली आहे, तर तूं तिकडे जा." दिवस उन्हाळ्याचे होते, आणि वेळ भर दोनप्रहरची. तरी पण कोंडया धांवत खळवाडीकडे गेला, आणि पहातो तों तेथें आगबीग कांहीं नाहीं. मग लगेच परतून तो महाराजांकडे आला तेव्हां ह्मणूं लागला "तेथें आगबीग कांहीं नाहीं. मला भर दोनप्रहरीं उन्हांतून कां फेरी दिलात?"

तेव्हां महाराज ह्मणाले "मागें वळून पहा."

मागें वळून पहातो तों खळवाडींतली एक गवताची गंज खरोखरच पेटलेली असून तिच्यांतून निघणारा धूर कोंडयाला दिसला. तितक्यांत जोराचा वाराही सुटला आणि गांवांत सगळी एकच गडबड उडाली. आतां सगळया गंजीं जळल्याशिवाय रहावयाच्या नाहींत, आणि सर्वांचें अतिशय नुकसान होईल, असें गांवकरी लोकांस वाटूं लागलें. ते सर्व बावरले आणि महाराजांना शरण गेले. महाराज अति दयाळू. ते तावडतोव त्यांच्याबरोबर खळवाडीकडे गेले, आणि जळत असलेल्या गंजीच्या सभोंवती त्यांनीं पाण्याची धार फिरविली. नंतर गांवकऱ्यास ह्मटलें "ही एवढीच गंज जळेल. बाकीच्या गंजीला धक्का लागणार नाहीं." आणि तसेंच झालें.

७. नानासाहेब वेरे नांवाचे गृहस्थ शेतकी खात्यांत इन्स्पेक्टर होते. ते महाराजांचे भक्त होते. ते एकदां महाराजांच्या दर्शनाला गेले असतां महाराज त्यांना म्हणाले "तुम्ही आतांच येथून निघून स्टेशनवर जा

थोडाही उशीर करूं नका. आणि तडक स्टेशनावर ( कोपरगांव स्टेशनावर ) जा."

त्याप्रमाणें बेरे तावडतोब निघाले. त्यांनीं टांगा भरधांव हांकला. त्यांच्या टांग्याच्या मागोमाग दुसरा टांगा येत होता, त्यांत जे गृहस्थ बसले होते ते बेऱ्यांना म्हणाले "अजून गाडीला बराच वेळ आहे. इतकी घाई कां करतां? आपण सावकाश जाऊं." बेऱ्यांनीं त्यांचें म्हणणें मान्य केलें नाहीं, आणि ते तडक स्टेशनावर गेले. नंतर कांहीं वेळानें बातमी आली, कीं, बेऱ्यांच्या मागून जो टांगा सावकाश येत होता तो चोरांनीं गांठला, त्यांत होतें तें सर्व लुटलें, आणि त्यांत बसलेल्या मंडळीस मारहाणही केली. ही बातमी समजली, तेव्हां महाराजांच्या आज्ञेचें बेऱ्यांना कौतुक वाटलें आणि महाराजांनींच आपल्याला आज वांचविलें, असें ते म्हणूं लागले.

वरील हकीकतीवरून महाराजांच्या लोकोत्तरपणाबद्दल अनुमान होतें, आणि प्रत्यक्ष दर्शनानें व सहवासानें तें अनुमान दृढ होऊन महाराज खरे खरे सद्गुरू आहेत ही खात्री पटते, आणि त्यांना सर्वस्वी शरण जाणें हाच खरा तरणोपायाचा मार्ग, असा मनाचा निश्चय होऊन आपल्या ग्रंथांतून संतांचीं आणि सद्गुरूंचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं सर्व महाराजांच्या आंगीं वसत आहेत, हीही खात्री होते.

महाराजांच्या गुणांचें किंवा त्यांच्या लीलांचें यथार्थ वर्णन करणें अशक्य आहे; तरी पण थोडें दिग्दर्शन तरी व्हावें असें वाटतें. हें करावयाचा उत्तम मार्ग. म्हणजे मला किंवा माझ्या माहितींत दुसऱ्यांना आलेल्या असंख्य अनुभवांपैकीं कांहीं गोष्टी येथें नमूद करणें; असें वाटल्यावरून तसें करीत आहें.

मेघा नांवाचा गुजराथी ब्राह्मण महाराजांचा परम भक्त होता. तो एके दिवशीं महाराजांच्या तसबिरीजवळ भिंतीवर शेंदराचा त्रिशूळ काढवीत होता. तें पाहून मीं त्याला विचारलें "हें कां काढवितोस?".

मेघा म्हणाला "आज पहाटेस मी जागा झालों. बिछान्यावरच पडलों होतों, इतक्यांत महाराजांचा आवाज कानीं पडला असा भास झाला. आणि जे शब्द मीं ऐकिले ते असे 'मेघा, त्रिशूळ काढ!' त्या वेळेस पाहिलें, तों बाबा ( महाराजांस बहुतेक मंडळी 'बाबा' म्हणतात ) जवळ नाहींत, आणि आमच्या वाड्याचीं दोन्हींकडील दारें बंद होतीं.

आवाज मात्र बाबांचा, आणि अंथरुणावर कांहीं अक्षता पडलेल्या. मी लगेच उठलों, आणि मशिदींत बाबाच्याकडे जाऊन विचारलें 'बाबा त्रिशूळ काढावयाचा का?' बाबा म्हणाले 'होय.' म्हणून हा त्रिशूळ काढवीत आहे."

हें बोलणें झाल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं सुमारें दहा वाजतां मेघा श्रीकडे गेला असतां बाबांनीं त्याला एक शिवलिंग दिलें; तें त्याच वेळेला कोणी बाबांच्या हातांत आणून दिलें होते; श्री त्यास म्हणाले "मेघा, हें घेऊन जा, आणि याची पूजा करीत जा."

मेघा तें शिवलिंग घेऊन वाड्यांत आला आणि त्यानें तें मला दाखविलें आणि म्हटलें "हें पहा मला बाबांनीं पूजा करण्यास शिवलिंग दिलें!" त्या वेळची त्याची मुद्रा अति आनंदाची होती. त्या आनंदाचें विशेष महत्त्व कळण्यासाठीं त्याचा थोडा पूर्वेतिहास सांगणें जरूर आहे.

हा मेघा रावबहादुर हरि विनायक साठे यांच्याजवळ,ते खेडा जिल्ह्यांत डेप्युटी कलेक्टर असतांना नोकर होता. त्याला गायत्री मंत्रही येत नव्हता. तो त्याला रावबहादुर साठ्यांनींच शिकविला. पुढें कांहीं दिवसांनीं त्याला एका शिवालयांत पूजा करण्यासाठीं साठ्यांनीं ठेवला. त्यानंतर साठे श्रीकडे गेले, आणि त्यांची श्रद्धा श्रीचे चरणीं बसली, व त्यांनीं शिर्डीस एक वाडाही महाराजांच्या दर्शनास येणाऱ्या मंडळीच्या सोयीसाठीं बांधला. साठ्यांना अशी इच्छा झाली, कीं, मेघाला शिर्डीसच महाराजांचे सेवेसाठीं ठेवावा, व त्याप्रमाणें त्यास त्यांनीं सांगितलें. तें ऐकून मेघा खिन्न झाला.महाराज मुसलमान आहेत हें त्यानें ऐकिलें होतें, आणि शंकराची पूजा सोडून मुसलमानाची सेवा करण्यास आपले मालक आपल्यास पाठवीत आहेत, हेंच त्याच्या खिन्नतेचें कारण होतें. साठ्यांनीं त्याची समजूत केली, आणि महाराजांच्या खऱ्या स्वरूपाची थोडीशी ओळख करून दिली. त्यानें त्याची खिन्नता पुष्कळ कमी झाली, तरी पण पार गेली नाहीं. मग तो शिर्डीस गेला. त्यानें मशिदीच्या कंपाउंडांत पाय ठेवितांच महाराज उठले, आणि हातांत धोंडा घेऊन म्हणाले "वर येऊं नकोस.खबरदार येशील तर.मुसलमानाकडे कशाला आलास?"

महाराजांचा राग वरवर असून फक्त ओळख देण्यापुरताच होता, तो तेव्हांच शमला. मेघा कांहीं दिवस शिर्डीस राहिला आणि पुनः आपल्या

गांवीं गेला. पण तेथें त्याला महाराजांचा इतका ध्यास लागला, कीं, तो पुन: लवकरच शिर्डीस गेला, आणि तेथेंच राहिला. तो बाबांस शंकरच मानीत असे, आणि नित्य 'शंकर शंकर' असेंच म्हणत असे, आणि बाबांचा उल्लेख करावयाचा तर शंकर याच नांवानें करीत असे. पुढें बाबांची एक मोठी तसबीर साठयांच्या वाडयांत आणून ठेविली. तेव्हांपासून त्या तसबिरीची शंकर मानूनच तो पूजा करीत असे. त्या नंतर सुमारें एक वर्षानें वर लिहिलेला प्रकार घडून आला. शिवलिंग महाराजांच्या हातांत येण्याच्या आदले दिवशीं मेघाला त्रिशूळ काढण्याची आज्ञा झाली, आणि तीही महाराज प्रत्यक्ष जवळ दृश्य नसतां; पण आवाज मात्र त्यांचा. या चमत्कारांचें कौतुक वाटलेंच; पण यांत दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी ही कीं, मेघाची जी उपासना होती तीच महाराजांनीं त्याला कायम करून दिली. महाराजांच्या आरतींत म्हटल्याप्रमाणें "**जया मनीं जैसा भाव। तया तैसा अनुभव। दाविशी दयाघना ऐशी। तुझी ही माव॥** हा प्रकार नेहमीं अनुभवास येतो.

माझे एक स्नेही हायकोर्टांत वकील आहेत. ते महाराजांच्या दर्शनास प्रथम गेले असतां एके दिवशीं असा योग आला कीं, फक्त महाराज आणि ते असे दोघेच होते. त्या वेळीं महाराजांनीं त्यांस म्हटलें "काय म्हणावें ? श्रीराम जयराम, जयजयराम !" नंतर एकदोन मिनिटांनीं महाराजांनीं पुन: तेच शब्द उच्चारले, तेव्हां त्या गृहस्थाला एकदम आठवण झाली, कीं, हा तर आपल्या गुरूनें आपल्याला मंत्र दिला तो. नंतर पुन: एकदोन मिनिटांनीं महाराजांनीं तोच उच्चार केला. तेव्हां त्या गृहस्थाची खात्री झाली, कीं, आपल्या गुरूनें आपल्याला जो मंत्र दिला होता, तोच जपण्यास आपल्याला महाराज सांगत आहेत.

एकदां ठाणें जिल्ह्यांतला एक गृहस्थ महाराजांच्या दर्शनास गेला असतां महाराजांनीं त्याला सांगितलें "मारुतीची पूजा करीत जा." महाराजांनीं अशी आज्ञा कां केली, हें त्याला कळेना. मग तो वाडयांत गेल्यानंतर मंडळीनें त्याला विचारलें "तुम्ही मारुतीची पूजा करीत असतां काय ?"

तो म्हणाला "होय, माझ्या घराजवळ पंचमुखी मारुतीचें देऊळ आहे. तेथें पूजा केल्याशिवाय मी अन्न ग्रहण करीत नसतों."

अर्थात् त्याची चालत आलेली उपासना महाराजांनीं दृढ केली. महाराजांचा स्वतंत्र पंथ अथवा सांप्रदाय असा नाहीं. ज्याची जी उपासना असेल ती दृढ करावयाची. महाराजांकडे सर्व धर्मांचे, सर्व पंथांचे लोक जात असत;पण कोणालाही पूर्वीची उपासना सोडून दुसऱ्या उपासनेला महाराजांनीं लावल्याचें उदाहरण आढळून येत नाहीं. मात्र कोणत्याही राजमार्गानें माणूस जात असतां जर तो त्या आपल्या मार्गापासून ढळला, तर पुनः त्यालाः याच्याच मूळ मार्गावर आणून त्याला पुढची वाट दाखवून द्यावयाची, असाच महाराजांचा क्रम आहे. महाराजांकडे योगाभ्यासी जातात, कर्माभ्यासी जातात, ज्ञानाभ्यासीही जातात, आणि सर्वांना महाराजांकडून आपापल्या अभ्यासांत उत्तम मदत होते, असा प्रत्येकाचा अनुभव आहे.

एकदां माझे एक स्नेही महाराजांच्या दर्शनाला गेले असतां पहिल्याच भेटीस महाराज त्यांना " या रामदास," असें म्हणाले. पुढें त्या स्नेह्याला विचारलें "' महाराजांनीं तुम्हाला अशा तऱ्हेनें कां हाक मारिली ?' प्रथम त्यांना पहिल्यांदा कांहीं कारण सुचेना. मग थोडया वेळानें एकाएकीं त्यांना कारण सुचलें. ते म्हणाले " अलीकडे दोन वर्षांपासून मीं मनांतल्या मनांत रामनामाचा जप करीत असतों; पण ही गोष्ट कोणालाच ठाऊक नाहीं. घरांतल्या मंडळीलासुद्धां ठाऊक नाहीं." अर्थातच महाराजांनीं दिलेली संज्ञा याच गोष्टीची दर्शक होती, यांत संशय नाहीं.

१९०९च्या नाताळांत एक डॉक्टर आपल्या एका मामलेदार मित्राबरोबर शिर्डीस गेले होते. हे डॉक्टर ब्राम्हण असून स्नानसंध्याशील आणि रामोपासक असल्यामुळें शिर्डिस जाण्यास नाखुष होते. ते ह्मणाले " मुसलमानाच्या पायां पडणें मला आवडत नाहीं, आणि ह्मणून मला यावेंसें वाटत नाहीं."

त्यावर मामलेदारांनीं त्यांना सांगितलें " पायां पडण्याबद्दल तुह्माला कोणीही आग्रह करणार नाहीं, आणि बाबाही तसें करा म्हणून म्हणणार नाहींत."

अशा तऱ्हेनें समजूत घातल्यामुळें डॉक्टर शिर्डीस गेले. बाबांच्या मशिदींत जाऊन उभे राहिले, तों कोणी मुसलमान न दिसतां आपल्या पुढें श्रीरामाची मूर्ती आहे, असा त्यांना भास झाला. त्याबरोबर अर्थात् डॉक्टरांनीं साष्टांग नमस्कार घातला. मशीदीबाहेर आल्याबरोबर त्यांनीं ही

हकीकत आपल्या मामलेदार मित्रास सांगितली. दुसरे दिवशीं डॉक्टरांनीं निश्चय केला, कीं, महाराजांनीं आपल्यावर कृपा केल्याशिवाय जेवावयाचें नाहीं, आणि मशीदींतही जावयाचें नाहीं. त्याप्रमाणें ते तीन दिवस जेवलेही नाहींत, किंवा दर्शनालाही गेलें नाहींत. चौथ्या दिवशीं डॉक्टरांचे एक स्नेही खानदेशांतून अकस्मात् महाराजांच्या दर्शनाला आले. आठ नऊ वर्षांनीं गांठ पडल्यामुळें डॉक्टरांना फार आनंद झाला, आणि त्या आनंदाच्या भरांत त्यांच्याबरोबर ते महाराजांच्या दर्शनाला गेले. डॉक्टरांनी नमस्कार घातल्याबरोबर महाराज म्हणाले "का डॉक्टर, कशाला आलास ? तुला कोणी बोलाविलें होतें ?" अर्थात् डॉक्टरांस आपल्या निश्चयाचें ( कृपा झाल्याशिवाय दर्शनाला जावयाचें नाहीं याचें ) स्मरण झालें. व ते विरघळून गेले. त्याच दिवशीं मध्य रात्रींच्या सुमारास डॉक्टरांवर कृपा झाली. झोंपेंत असतांना परमानंदाची स्थिति प्राप्त झाली. ही स्थिति पुढें पंधरावीस दिवस, डॉक्टर आपल्या गांवीं परत गेल्यावरहि टिकली.

ज्याची जी उपासना असेल तिची त्याला खूण द्यावयाची, आणि ती दृढ करावयाची, असा जो महाराजांचा क्रम, याबद्दल आणखी पुष्कळ अनुभव सांगतां येण्यासारखे आहेत; पण विस्तारभयास्तव ते तेथें नमूद न करितां दुसऱ्या तऱ्हेच्या अनुभवाकडे वळतों.

एकदां माझे दोन स्नेही वाड्यांत रात्रीं इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत बसले होते. मीही त्यांच्याजवळ होतों, पण मला झोंप लागली होती. ते दोघे रात्रीं सुमारें एक वाजेपर्यंत बसले होते. शेवटीं त्यांचें त्यांनांच वाटलें कीं. आपण करितों हें बरोबर नाहीं. आणि एकजण म्हणाला "चला निजूं या, लोकांच्या उखाळ्यापाखाळ्या पुरे झाल्या !"

दुसऱ्या दिवशीं सकाळीं बाबांच्या दर्शनाला वरीच मंडळी गेली, त्यांत हे गृहस्थही होते. ते पायां पडत असतांना महाराजांचे उद्गार निघाले, ते असेः- "आपल्या दरबारास सर्व तऱ्हेचे लोक येतात. चांगलेही येतात वाईट, खट, नष्ट, दुष्ट, असेही येतात. आपण कशाला कोणाच्या उखाळ्यापाखाळ्या काढाव्या ?"

अर्थात् माझ्या स्नेह्याला ती खूण पटली, आणि या गोष्टीपासून धडा घ्यावयाचा तो त्यांनीं घेतला.

# श्रीसाई लीला.

(मासिक)

वर्ष १ लें. * ज्येष्ठ शाके १८४५. अंक ४ था.


१२२

## महाराजांचे अनुभव.

रा. रा. वामन चिंतामण मुके वकील पिंपळगांवबसवंत जिल्हा नाशिक यांचे श्री साईबाबांबद्दलचे अनुभवांबद्दल ता० ११।७।१९२१ ते पंचवटीहून आलेल्या पत्रांतील कांहीं अनुभवांचा उतारा:—

"माझे मोक्ष गुरू श्रीसमर्थ रघुनाथमहाराज उर्फ काका पुराणिक धोपेश्वर (राजापूर जि॥ रत्नागिरी) यां॰ मला उपदेश झाल्यावर समर्थांचे कृपें[illegible]झें मन परमेश्वर भक्तीकडे वळलें. दिवसाचा थोडा काळ मी गुरूभक्तींत घालवूं लागलों. माझे गुरूचे कृपेनें मला ज्ञानेश्वरी ऐकावी अशी इच्छा झाली. एका ज्ञानेश्वर भक्ताची भेट गुरूंनीं करून दिली. ज्ञानेश्वर महाराजांनीं आपले गुरू श्रीनिवृत्तिनाथ यांचे बद्दल आपलें निस्सीम प्रेम ज्ञानेश्वरींत वारंवार व्यक्त केलें आहे. याची ज्ञानेश्वरीचे भक्तांस माहिती आहे. गीतेच्या १३वे अध्यायांत "आचार्योपासना" या विषयावर ज्ञानेश्वरमहाराज यांनीं गुरूकृपेशिवाय ज्ञानप्राप्ति नाहीं असें सांगितलें आहे. माझे सद्गुरू समाधिस्थ झाल्यामुळें मला गुरूभक्ती घडली नाहीं ही गोष्ट माझें मनास डांचूं लागली. इतक्यांत माझे सद्गुरू काकामहाराज यांनीं मला शिरडीस जाऊन श्रीसमर्थ साईबाबांचें दर्शन घेण्याची प्रेरणा केली. समर्थांचें प्रेरणेप्रमाणें मी शिरडीस गेलों. साईबाबांनीं मला त्यांचे दर्शन होताच माझें मन गुरूभक्तींत तल्लीन केलें. बाबांनीं माझे प्रेम पाहून व मजवर प्रसन्न होऊन मी घेतलेल्या त्यांच्या सगुणोपासनेच्या बुकाला व त्यांचे फोटोला हस्तस्पर्श केला.

* मागील अंक अर्धांक ज्येष्ठाचा समजावा.

मी पिंपळगांव बसवंत तालुके निफाड येथील रहाणार असून त्यागांवी मी वकिलीचा धंदा करितों. सुमारें सहा वर्षांपूर्वी आमचेगांवीं प्लेग झाल्यामुळें मी आमचे गांवचे माझे मालकीचे शेतांत प्लेगचे वेळीं राहण्यासाठीं एक लहान बंगला बांधला आहे. त्या बंगल्यांत आमचे कुटुंबांतील सर्व मंडळींसह रहात होतों. बंगल्यांत रहात असतां माझा नित्यक्रम साईंची सकाळीं व संध्याकाळीं प्रार्थना करण्याचा असे. एके दिवशीं मध्यरात्र झाल्यावर चोरांनीं माझे बंगल्याचे उत्तरबाजूची भिंत फोडली. ज्या ठिकाणीं भिंत फोडली त्या ठिकाणापासून समर्थांचा फोटो एक वितीचे अंतरावर ठेविला होता. चार चोरांपैकीं एक चोर फोडलेल्या भिंतीचे भोकांतून आंत शिरला व त्यानें ज्या पलंगावर मी निजलों होतों त्या खालीं ठेविलेली लहान पेटी लांबविली व ती भोकाचे वाटे भोकाजवळ उभे राहिलेल्या साथीदारांचे स्वाधीन केली. त्या पेटींत दोनशें रुपयांच्या नोटा व रुपया रु. व कांहीं आणे होते व माझे रिणकोकडून लिहून घेतलेल्या सुमारें चार हजार रुपये [illegible] चिठ्या) होत्या. ही पेटी बाहेर दिल्यावर आंत आलेल्या चोरानें साईबाबांचे फोटो... समोर एक ट्रंक एका बाकावर ठेविली होती. त्या ट्रंकमध्यें सोन्याचे दागिने किंमत सुमारें रुपये ३५०० व चांदीचीं भांडीं किंमत सुमारें ५०० रुपये व दस्तऐवज किंमत सुमारें रुपये १०००० चे होते. चोरानें ट्रंकला हात घातल्याबरोबर ट्रंकच्या शेजारीं आमची मेहुणी निजली होती ती जागी होऊन " चोर चोर " म्हणून भीतीनें ओरडली. तिचा ध्वनी मी गाढ झोंपेंत असल्यामुळें मला ऐकूं आला नाहीं. इतक्यांत बाबा माझे स्वप्नांत येऊन " तुझी ट्रंक गेली जागा हो " असें मला सांगितलें. मी एकदम उठून जागा झालों व बाबांचे प्रेरणेनें पलंगावरून गडबडीनें उडी मारून हातांत काठी घेऊन मोठ्या आवेशानें " मारो इसकू " असा ध्वनी केल्याबरोबर चोर भोकावाटे बाहेर पळून गेला. या गडबडीनें बंगल्याचे रक्षणासाठीं ठेविलेला जागल्या व कुत्री, [illegible] व गडी जागे झाले व त्यांनीं मोठी ओरडा आरड केल्यामुळें सर्व चोर पळून गेले. [illegible]

[illegible]

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ॥
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

या श्लोकाची आठवण झाली व समर्थांचा उतराई होऊन त्यांस साष्टांगनमस्कार घातला. इतका वेळ पर्यंत आम्हांस पेटी गेल्याची माहिती झाली नाहीं. माझे मनुष्यास पाठवून पोलिसस्टेशन अमलदार यांस आमचे बंगल्यावर घर फोडीचे चोरीचा प्रयत्न झाल्याची खबर दिली. पोलीस आल्यावर ते लेखी फिर्याद मागूं लागले. लेखी फिर्याद लिहिण्यासाठीं पेटी पाहूं लागलों तों पेटी चोरांनीं नेली असें कळलें तथापि या नुकसानी बद्दल माझे मनास यत्किंचित्‌ही धक्का पोंचला नाहीं. पोलीस लेखी फिर्याद लिहून घेऊन गेल्यावर सूर्योदय झाला. इतक्यांत आमचे मळ्यांतला शेतकरी आमचे बंगल्यापासून एक फरलांगाचे अंतरावर वर लिहिलेला चोरीचा माल पेटी शेतांत पडलेली आहे असें सांगत आला. मी लगेच त्याठिकाणीं जाऊन पेटी पाहिली. पेटींत असलेल्या *जिनसपैकीं रुपये २०० च्या नोटा व कांहीं खुर्दा वगैरे रुपये राख याशिवाय एकही जिन्नस चोरांनीं हलविली नाहीं. पेटी आपोआप उघडल्यामुळें पेटी तशी-च्यातशीच न फुटतां मिळाली.

* जिनसापैकीं

दुसरे दिवशीं पहाटेस दुसरा चमत्कार घडला. तो असा कीं मला स्वप्न पडून स्वप्नांत मला बाबांनीं दर्शन दिलें. स्वप्नांत मी बाबांचे पायांची सेवा करीत आहें. त्यांचे शेजारीं त्यांचा सच्छिष्य अबदुल हा त्यांचे जवळ आहे व दुसरा ज्यांस मी पूर्वी कधींही माझे सर्व आयुष्यांत पाहिला नव्हता असा गौरवर्णाचा तेजस्वी फकीर दृष्टीस पडला. या स्वप्ना-मुळें मला शिर्डीस जाऊन बाबांचें दर्शन घेण्याची इच्छा झाली. मी शिर्डीस त्याच दिवशीं संध्याकाळचे आगगाडीनें जाण्यास निघालों तो दुसरे दिवशीं शिर्डीस जाऊन पोंचलों. इतक्यांत महाराजांची स्वारी गांवा-बाहेर शौचविधिसाठीं येतांना दृष्टीस पडतांच मी रस्त्यांतच त्यांस साष्टांग नमस्कार केला. बाबांनीं प्रेमळ अंतःकरणानें मला व माझे बरोबर असलेल्या मंडळीस गांवांत जाण्यास सांगितलें. गांवांत जाऊन बाबांचे

अत्यंत प्रेमांतील भक्त रा. हरि सिताराम दीक्षित यांचे बंगल्यावर ठेविलें. कांहीं वेळानें बाबांचें दर्शनासाठीं मशिदींत गेलों तेव्हां प्रसंगीं ज्या गौरवर्णाचे तेजस्वी फकीरास मी स्वप्नांत पाहिलें होतें तोच फकीर माझे दृष्टीस पडला. त्याचे बद्दलचा तपास करितां तो फकीर बाबांचा शिष्य अब्दूल याचा पूर्वीचा गुरु आहे असें समजलें. पिंपळगांवीं स्वप्नांत एक दिवस पूर्वी ज्या फकिरास मी बाबांचे शेजारीं पाहिलें तो फकिर त्याच स्थितींत मी जागृतावस्थेंत पाहिला हा केवढा चमत्कार !

बिऱ्हाड दर्शनाचे

तिसरा चमत्कार-यानंतर कांहीं दिवसांनीं पिंपळगांव येथें आम्ही आमचे बंगल्यावर रहात असतां कोपरगांव येथील ब्रम्हचारी बुवा माझें स्मरण करून माझे बंगल्यावर राहण्यास आले. आम्ही तीन दिवस मोठ्या प्रेमानें बाबांचें भजनपूजन केलें. ब्रह्मचारीबुवांनीं जातांना मला बाबांच्या कृपेनें तुझ्या चोरीस गेलेल्या नोटा सांपडतील असें सांगून गेले. दुसें कांहीं महिन्यांनीं आमचे बंगल्यावर ज्या चोरांनीं घर फोडून चोरी केली होती ते व चोरीचा माल विकत घेणारा एक मारवाडी हे सर्व दुसरे एका चोरींत पकडले गेले. चोरीचा माल विकत घेणारे मारवाड्याचे घरांत आमचे घरचे चोरींतील कांहीं नोटा सांपडल्या. त्या नोटा-आमचे घरचे चोरींतील आहेत असें त्या चारी चोरांनीं कबूल केल्यामुळें आमचे घरची चोरी चोरांचे कबूलीवरून आपोआप शाबीत होऊन रुपये दोनशेंच्या नोटांपैकीं पांसष्ट रुपयांच्या नोटा आमच्या ठरून त्या पोलिसांनीं आमचे घरीं पिंपळगांवीं आणून मला दिल्या.

काही

* चोरीचा

साईदास.

वामन चिंतामण मुके वकील.

पिंपळगाव बसवंत जिल्हा नाशिक

---

महाराजांचे एक पुरातन भक्त म्हाळसापती या नांवाचे होते ते नुकतेच कैलासवासी झाले. महाराज एक रात्र मशिदींत निजत व एक रात्र चावडींत निजत असा नियमक्रम असे. ज्या रात्रीं महाराज मशिदींत

निजत त्या रात्रीं म्हाळसापती महाराजांचे जवळ रात्रभर बसून असत. व रात्रभरांत कधींही आडवे होत नसत. म्हाळसापतीची सांपत्तिक स्थिति अति निकृष्ट असे. इतकें असूनही त्यांचें नैराश्य अवर्णनीय होतें. महाराजांचे कडून त्यांचें नैराश्य स्थितीचे उत्तेजनपर असेंच वर्तन असे. एकदां म्हणजे इ. स. १९१७ मध्यें त्यांची गरीबी मनांत आणून हंसराज नामक दादरास राहाणाऱ्या एका व्यापाऱ्यानें त्यांना दहा रुपये देऊं केले; ते त्यांनीं घेतले नाहींत. हंसराज शेटजीनीं मग ती रक्कम रा. रा. बापुसाहेब जोग यांचे मार्फत म्हाळसापतीकडे पाठविली तरीही त्यांनीं ती घेतली नाहीं मग ती रक्कम रा. रा. हरी सिताराम दीक्षित यांजकडे आणिली आणि महाराजांचे समोर म्हाळसापतीस द्यावी असें सुचविलें. त्याप्रमाणें म्हाळसापती महाराजांची पूजा करीत असतां रा. रा. दीक्षित ह ती रक्कम त्यांना देऊं लागले ते ती घेईनात. दीक्षित महाराजांना म्हणाले "आपण त्यांना घेण्यास सांगा किंवा आपण घेऊन त्यांना द्या." महाराज म्हणाले "सध्यां तुझ्याजवळ राहूं दे ?" म्हाळसापती पूजा आटोपून निघून गेल्यावर कांहीं वेळानें महाराजांनीं दीक्षितास विचारलें "किती रुपये आहेत ?" ते म्हणाले "दहा." महाराजांनीं ते रुपये आपल्या गादीवर ठेवण्यास सांगितले व नानासाहेब निमोणकरांचे हातानें ती रक्कम इतर लोकांना वाटवून दिली. अर्थातच त्या रकमेपैकीं कांहींही भाग म्हाळसापतीकडे गेला नाहीं

रा. रा. चिदंबर केशव गाडगीळ या नांवाचे महाराजांचे एक भक्त होते. ते सरकारी नोकरीवर होते. कांहीं दिवस नगरास कलेक्टरचे चिटणीस होते. पुढें सिन्नरास मामलेदार होते. त्यांना वेळोवेळीं दर्शनाचा लाभ घडत असे. सिन्नराहून त्यांची बदली कोठें लांब झाली व ताबडतोब जाऊन रुजू होण्याचा हुकूम मिळाला. महाराजांचे दर्शनास जाण्याला अवकाश राहिला नाहीं. ते कोपरगांवाकडूनच आगगाडीनें गेले पण दर्शनास जातां येत नाहीं; याबद्दल त्यांना फार हुरहूर लागली. पुढें गाडी चालली असतां एकाएकीं खिडकी वाटे एक कागदाची पुडी त्यांचे अंगा-

वर येऊन पडली उघडून पहातात तों त्यांत उदी सारखी पूड दिसली. त्यांनीं ती जतन करून ठेवली. पुन्हां दर्शनास जाण्याचा योग आला तेव्हां महाराज आपण होऊन त्यांना म्हणाले " तूं आला नाहींस म्हणून मी तुला उदी पाठविली ती पोहचलीना ? " गाडगीळांना हें शब्द ऐकून गहिंवर आला. पुढें ती उदी त्यांनीं एका ताइतांत घालून ठेवली व ती शेवटपर्यंत त्यांचेजवळ होती.

---

रा. रा. लक्ष्मण कृष्ण उर्फ तात्यासाहेब नूलकर हें महाराजांचे भक्त होते ते पंढरपुरास मुन्सफ होते. तेथें त्यांच्या डोळ्याला कांहीं विकार झाला. कोणतीही वस्तु पाहिली कीं, तिच्यावर दुसरी तशीच वस्तु दिसावयाची. अक्षरेंही अशींच दुहेरी दिसावयाचीं. मग त्यांनीं रजा घेतली व बंधू जळगांवास डाक्टरी करीत होते तेथें गेले. तेथें गेल्यानंतर दोनचार दिवसांनींच गुरुपौर्णिमा होती. पौर्णिमेच्या आदले दिवशीं भावाच्या विचारानें तात्यासाहेब पौर्णिमेसाठीं शिर्डीस आले दोन दिवस राहून परत जाण्याच्या बेतानें ते आले होते म्हणून कपडे सामान औषधें, वगैरे कांहीं बरोबर आणलें नव्हतें. आले त्या दिवशीं बहुतेक दिवसभर डोळे बांधूनच पडले होते दुसरे दिवशीं महाराज माधवरावांना ह्मणाले " शामा माझा आज डोळा फार दुखत आहे. " तेव्हांपासूनच रा. तात्या साहेबांचें डोळे हळु हळु सुधरूं लागले; व कांहीं दिवसांनीं औषध पाण्याशिवाय साफ बरे झाले.

---

तात्यासाहेब नूलकरांना शिर्डीस थोडे दिवस राहिल्यावर असें वाटूं लागलें कीं, आतां येथेंच राहावें व आपला शेवट महाराजांचे पायांपाशींच व्हावा व अखेरीस झालेंही तसेंच. त्यांना मधुमेहाचा विकार पुष्कळ वर्षें [illegible] त्यांची एक दोन गळवें झालीं व तीं कापलीं. पुढें आणखी [illegible] लागलीं व त्या दुखण्यांतच त्यांचा अंत झाला. तो सुमारें [illegible] आला. त्यांच्या एका [illegible] त्यांनीं आपल्या

दोघांही मुलांना भजन करावयास सांगितलें. मग " आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहे ॥ जो मी तुज पाहें नारायणा ॥ " हा अभंग म्हणावयास सांगितला, नंतर एका मुलानें तोंड आकरावयास सांगून त्यांत उदी घातली व दुसऱ्या मुलानें महाराजांचें तीर्थ घातलें. तात्यासाहेबांनीं विचारलें " हें काय आहे ? " मुलांनीं म्हटलें " उदी व तीर्थ आहे " एवढें झाल्याबरोबर एकदम प्राणोत्क्रमण झालें. जवळ कुटुंबांतील सर्व माणसें होतीं पण तात्यासाहेबांचे चेहऱ्यावर यत्किंचित्‌हि खिन्नता नव्हती.

---

वांद्याचे एक गृहस्थ सन १९१० मध्यें आपल्या एका मित्राबरोबर शिर्डीस गेले होते. त्या मित्रानेंच त्यांचें येता जाताचें भाडें दिलें. त्या गृहस्थानें आपल्याबरोबर तीन कोरे रुपये नेले होते पण महाराजांना कांहीं दक्षिणा द्यावयाची नाहीं, असा त्यांचा संकल्प होता. महाराजांनीं त्यांच्या जवळ मुळींच दक्षिणा मागितली नाहीं. परत येतांना ते गृहस्थ आपल्या स्नेह्याला सांगूं लागले " मी शिर्डीस तीन कोरे रुपये घेऊन गेलों होतों ते मी तसेंच परत घेऊन जात आहें. " वांद्यास पोहचण्याचे आदले रात्रीं त्या गृहस्थाचे कुटुंबास स्वप्न पडलें कीं, आपल्या नवऱ्याची पैशाची पिशवी व एक भरलेली आगडबी ( आगपेटी ) व एक रिकामी आगडबी शेतखान्यांत पडली आहे आणि पैशाचे पिशवींत तीन कोरे रुपये आहेत. स्वप्न इतकें स्पष्ट पडलें कीं, बाई जागी झाल्याबरोबर शेतखान्यांत जाऊन खरोखरच रुपये पडले आहेत कीं काय ? हें पाहूं लागली. अर्थात रुपये तेथे नव्हते पण ते गृहस्थ परत आल्यावर त्यांनीं हें स्वप्न सांगितलें व ते आपल्या खिशांत पाहूं लागले तों त्या खिशांत दोन आगडब्या एक भरलेली व एक रिकामी; व पैशाची पिशवी व तींत तीन कोरे रुपये एवढें सामान दिसलें. अर्थातच त्या स्वप्नापासून बोध घ्यावयाचा तो त्यांनीं घेतला व त्यांना उपरती होऊन त्यांनीं ते तीन कोरे रुपये व दर रुपया मागें चार आणे दंड असे पावणेचार रुपये महाराजांस दक्षिणा म्हणून पाठविले. पुढें ते गृहस्थ सहकुटुंब व माता पितरांना घेऊन एक महिना शिर्डीस जाऊन राहिले होते.

---

एकदां एक योगाभ्यासी गृहस्थ आपल्या कांहीं शंका विचारण्यासाठीं नानासाहेब चांदोरकरांचे बरोबर महाराजाकडे गेले होते. त्यावेळीं महाराज जेवावयास बसले होते. जेवण म्हणजे भाकर व कांदा. महाराजांचे हातांत कांदा पाहिल्याबरोबर त्या गृहस्थाचे मनांत विकल्प उत्पन्न झाला. तो मनांत म्हणूं लागला हे कांदा खातात तर हे कसले योगी व आपल्याला यांचेपासून काय मदत मिळणार? हें त्यांचे मनांत आल्याबरोबर महाराज म्हणाले "नाना! कांदा खाऊन पचविण्याची ज्याची शक्ति असेल त्यानें तो खुशाल खावा." हें महाराजांचे अंतर्साक्षित्व पाहून तो गृहस्थ मनांत चरकला व मनांतले मनांत शरण गेला, मग महाराजांनीं त्याच्या सर्व शंकांचें समाधान केलें व तो प्रसन्न होऊन गेला.

---

## रा. रा. वामनराव प्राणगोविंद पटेल. बी. ए. एल्. एल्. बी. यांचे श्रीसाईबाबाबद्दल अनुभव.

॥ ॐ साईनाथायनमः ॥

पूज्य प्रिय—

त्हारां स्मरणो आशरे दश वर्षनां जुनां छे पण हजी ताजां छे.

माथे मादरपाटा ककडी वींटाळेली ने शरीरपर पण एज स्वदेशी वस्त्रनी कफनीवाळी त्हारी आकृति त्हारी कृपाथी स्मरणमात्र थी खडी थाय छे–थयां करे छे ने त्हारां अणुरेणु पिंडब्रह्मांड सर्व स्थळे व्यापी रहेलां स्वरुपनी याद आपे छे. ते त्हारा स्वरुपमां म्हने कायममाटे लीन थइ जवादे ए प्रार्थना.

ज्यारे पाश्चात्यन्याय अने तत्वज्ञानना प्रभावे इश्वरना अस्तित्व ने स्वरुप विषे संशय वा जिज्ञासा उत्पन्न थयेली हती, ज्यारे जगत्नुं बंधारण न्यायपर रचायुं छे, के आकस्मिकज छे, ए प्रश्न म्हारी समक्ष उभो रहेलो हतो, त्यारे म्हारा स्व. पिताना कहेवाथी हुं त्हारे दर्शने प्रथम आव्यो, त्यारबाद केटलीकवार आव्यो गयो. एक वखत त्हारी इच्छा थी हुं अगीआर महिना शिर्डी रह्यो. त्यारपछी एक वर्ष जेटलुं टुंक समयमां ते उपरना

केटलाक प्रश्नोनुं वेदोपनिषदानुसार निराकरण कर्युं ने बाकीना बधा प्रश्नोनुं संपूर्ण तेबीज रीते निराकरण ऑक्टोबर १९१६ मां करी आप्युं.

आर्टीकल्ड क्लार्कनी परिक्षामां बेसवामाटे कंई पण लांबा वखतनी गेरहाजरी शिवाय सॉलीसटरने त्यां एल. एल. बी. ओने बे वर्षनी टर्म राखवानी होय छे. तेर महिना भर्या बाद ज्यारे गरमीनी रजामां हुं त्हारी पासे आव्यो त्यारे त्हें म्हने लागलागट अगीआर महिना राख्यो. शिर्डीथी पाछा फर्या बाद केटलोक समय वीत्यापछी पाछो टर्म राखवानो म्हारो विचार थवाथी त्हारी संमति ते माटे लई जूनी पेढीना सॉलीसीटरोने मळ्यो. त्यांना मुख्य सॉलीसीटर रा. ज. ज. वीमादलाले कह्यु " हवे तमोने राखी शकाय नहीं राखीए तोये फरी तमारे टर्म भरवी पडशे एटलेके फरी बे वर्ष भरवां जोयशे. पण जो तमो कोर्टनी परवानगी बाकीना महिनाभरी टर्म पूरी करवा माटे मेळवो तो म्हने कंइ वांधो नथी छतां हुं तो धारुंछुंके कोर्ट जो एम करवा रजा आपशे तो ते तम्हारे माटे नवोज कायदो वडशे. आटला दिवसमां कदी एवो केस बन्यो नथी." आ उपरथी वडा न्यायाधीशने ए बाबतमां अरजी करी ने त्हारी कृपाथी तेमणे बाकीनी ११ महिनानी टर्म भरवाथी राखवी जोयती टर्म भरेली गणाशे एवो चुकादो आप्यो.

अतिशय क्षुधाथी एक दिवस व्याकुळ थयेल होवाथी तुं उभो हतो ते रस्तेथी नहीं पण बीजेज रस्तेथी हुं वीशीमा जतो हतो. त्यारे त्हें थांटो कहाडी त्हारी मेळेज कह्युंके " जायछे पण हेरान थशे" म्हारे माटे ते त्हें नहि कह्युं होय धारी म्हें वीशी मांजइ नास्तो कीधो. बीजे एक दिवसे पण क्षुधा लागवथी आवी रीते संताइनें जतो हतो त्यारे त्हें आबीज रीते आघेथी कहेलुं पण ते वखतनी क्षुधानी तीव्रताथी म्हें त्हारा कहेवानो अनादर कीधो हतो; बेऊ वखते बीजेज दीवसे पेटमां सखत दुखावो थइ केटलीकवार शौचे जवुं पडयुं हतुं. त्हारां वचननो अनादर करनारने पण त्हें कृपा देखाडीज हती. पहेली वखते तो कलाकमांज सारुं थइ गयेलुं. ने बीजीवार ज्यारे आखो दिवस हेरान होवाथी जरा हुं गभरायो हतो त्यारे

त्हें रा. बापुसाहेब जोगने आपेलो मीठाई प्रसाद म्हने मळयो तेथी पेटमां दुखतुं बंध थई गयुं ने प्रकृति स्वस्थ थई गई

अगीआर महिना रह्यो ते दरम्यान हुं केटलोक वखत हाथे रांधतो हतो पण पछी म्हने कंटाळो आववाथी म्हें एक दिवस त्हमारमांज कोइने कह्यांशिवाय म्हारा मन साथे निश्चय करेलो के आजे कांई रांधवुंज नहीं पण फकत ~~कांचुं कोरुं खाई मुकवुं~~. ते दिवसें हुं त्हारी पासे एकलो हतो त्यारे तें फकत एटलुंज कह्युं के " बहु शोखीन थइ गयो " आ उपरथी म्हारो ठराव अयोग्य हतो एम म्हने जणायुं.

त्हारे माटे बपोरनी भिक्षा मांगवानुं त्हें म्हने मान आप्युं हतुं ते दरम्यान एक दिवस भिक्षा लेवा जतां हाथनी अनामिका आंगळी दिवाल साथ घसावाथी छोलाइ स्हेज लोही नीकळेलुं. हुं ज्यारे भिक्षा लेई मस्जीदमां पाछो आव्यो त्यारे त्हें त्हारी अनामिका उंची करी म्हने देखडावी एम सूचव्युंके त्हारी आंगळीना दरदनी म्हने खबर छे.

त्हारा कहेवाथी हुं त्हारा एक भक्तने त्यां केटलोक वखत जमतो हतो. केटलाक दिवसबाद म्हने त्यां जमवुं पडतुं ते ठीक न होतुं लागतुं पण त्हें कहेलुं तेथी हुं त्यांज जम्यां करतो. आ वात म्हें कोइने कही न्होती. छतां एक दिवस त्हें त्हारी मेळेज हुं उभो हतो ने कह्युं " अडचण शुं काम भोगववी, <u>वीशी वाळा</u> साथे गोठवण करी ले."

एक वखत म्हारो विचार त्हारां दर्शन लेई, बुलेवार मनमाडथई टाप्टीव्हॅली रेलवेमां बारडोली थइ मोता मारा स्व पिता जे ते वखते मांदा हता तेमनी खबरलेवा खास जवानो हतो. शियाळानो दिवस होवा थी त्यां रात्र थाय ते प्हेलां पहोंचवाने तेमज म्हें बारडोली स्टेशने गाडी बराबेली न होवाथी, बारडोली स्टेशनपर म्हारे स्हवारनी ट्रेनमांज उतरवानी जरुर हती. त्यां स्हवारे पहोंचाडे एवी ट्रेनमांटे म्हारी समजप्रमाणे म्हारे शिरडीथी बपोरेज नीकळवुं पडतुं हतुं तेथी लागलागट त्हें लेंडीनाम बपोरे त्हने जवा माटे पूछ्युं त्यारे त्हें जवा ना पाडी. आथी शिरडीनां [illegible] एक गृहस्थ [illegible]

विषे स्हेज जोयुं तो समजायुं के स्हवारनी ट्रेनमां जवानी जरुर छे. ते प्रमाणे बीजे दीवसे जवा परवानगी मांगतां तें तरत आपेली.

१९११ मां ज्यारे हुं प्रथम त्हारे दर्शने आव्यो त्यारे म्हें त्हारी नानकडी छबीने लोकेटमाटे बे छबी खरीदेली. बधा भक्तो जेम छबीओ त्हारा हाथमां आप्यां बाद घेर लई जता तेमज म्हारी पण ईच्छा ते त्हारा हाथमां आप्यां बादज घेर लई जवानी हती, पण ते शरमने लीधे बनी शक्युं न होतुं ते म्हारा मनमां म्हने लागतुं हतुं. छतां बहु दीवस थई गयेला होवाथी म्हें शिरडीथी घेर पाछा फरवानो निश्चय कीधो ने त्हने पूछ्युं " बिराडी जाऊं काय ? " त्यारे त्हें " हा " कही खुशीथी उदी आणी ने कह्युं जा. तेथी गाडी करी हुं नीकळयो. गाडीवान एक छोकरोज हतो. कोपरगांव आवतां ते छोकरो कहे " अहीं जामफळ बहु सारां मळेछे ते थोडां घेर लेइ जाव; हुं उतरीने वाडीमांथी त्हमने लावी आपुं म्हें एने कह्युं " हवे शो उपयोग ? पण जो तुं हुं आपुं ते जामफळ लेइ जई " बाबा " ने प्होंचाडे तो लइ आव " एणे हा पाडी तेथी म्हें एने जामफळ लेवा मोकलयो ने ए गया बाद हुं गाडीमांथी लघुशंका माटे नीचे उतर्यो ते कार्यथी निवृत्त थइ छोकरानी वाट जोतो आम तेम गाडीपासे फरवा लाग्यो. फरवाथी बूटनो जे अवाज थयो तेथी गाडीना बळदो भडकी सामान साथे गाडी लेइ पाछा शिरडी तरफ दोडया. में ने बीजा एक जणे ते बळदोने ऊभा राखी पाछा फेरववा व्यर्थ प्रयत्न कर्यो पण ते कंइ झलाया नहीं. तेथी जे जग्याथी बळदो नाठेला ते जग्या ए पाछो आवी हुं उभो. घणो वखत हुं थोभ्यो पण छोकरो पाछो आव्यो नहीं तेथी हुं कोपरगांव स्टेशन तरफ पगे चाल्यो. थोडे गयो एटले ते छोकरो पोलीसने लेइ आवतो मळयो. पोलीस ने बनेली बाबतनो खुलासो करी छोकरा साथे गाडीनी शोधमां हुं शिरडी तरफ पाछो फर्यो. तो सावळी वीर आगळ गाडी एमना एम रहेलां सामान साथे त्यांना चोकीदारे उभी कीवेली जोई. पछी शिर्डी पाछो फर्यो ने बे त्रण दिवस वधु रह्यो ते दरम्यान मुंबाईना एक जाणीता वकीलनी ओळखाण थइ ने तेमणे पोताने माटे त्हारी छबी लीधेली ते त्हारा हाथमां आपी त्यारबाद तेनी साथे म्हें

पण जे छबिओ अगाउ हुं म्हारा हाथमां आपी शक्यो न हतो ते आपी पाछी लीधी ने पछी म्हारी रजा लेइ पाछो फर्यो त्यारे रस्तामां कांइ विघ्न नडयुं नहीं.

एक स्हवारे पेटमां दूखतुं हतुं. आवखते म्हेज कंइ थायके दवा खावानी म्हने टेव पडेली तेथी पेटमां दुखवा मांडयुं के तरतज पेनकीलरनी बाटलीनी घरमां शोध करी पण ते हतुं नहि तेथी दीलगीर थइ हुं बेठो हतो. एटलामां म्हारी उदीनी बाटलीपर नजर गइ तेमांथी थोडी उदी लेइ फाकी तो ते उदीनो स्वाद पेनकीलरना जेवोज लाग्यो ने पेटमां दुखतुं बंध थई गयुं. जे बाटलीमां म्हें भरेली ते तदन साफ कीधेली सॅनेटोजननी बाटली हती एटले एमां पेनकीलरनो स्वाद संभवेज क्यांथी?

१९१६ ना ऑक्टोबर मासमां ज्यारे हुं रात्रिए गमे त्यां जइ रस्ता-पर के निर्जन जग्यामां सूइ रहेतो त्यारे मायाळु पितापेठे तुं म्हारी शोध माटे माणसो मोकलतो.

हे पूज्यप्रिय आवीरीते तुं खरेखर म्हारां मात, पिता, बंधु, मित्र, गुरु प्रसंगोपात बन्यो पिता तरीके तें म्हने लाडनुं "बाबु" नाम पण केट-लोक वखत आप्युं पण आ बधा लाडना प्रतीकारमां जे काया वाचा मनथी म्हारी जातनुं अर्पण थवुं जोइए ते म्हाराथी बनी न शक्युं—म्हें म्हारां लाडका बाबा नामने लजाव्युं तुंतो "अजन्माद्यमेकं परब्रह्म साक्षात्" तेथी तने मायाना विशेषणो न शोभे—वळी तुं तो मा बाप गुरु मित्र बंधु वखतोवखत बन्यो त्यारे तुंने एक एवुं शुं नाम आपवुं ते न समजायाथी शरुआतमां "पूज्य प्रिय!" कही संबोध्योछे आटली सलगी जे म्हने कांइ-पण पूर्णपणे अर्पण करी शक्यो नथी तेने न घटे छतां म्हारो हंमेशनो "स्वभक्तेच्छया मानुषं दर्शयन्तं" नो कृपाळु क्षमाशील स्वभाव याद आवतां आ धृष्टता कीधी छे—तेने माटे क्षमा.

ले:-लाडका नामने अयोग्य पण लाडकुं नाम राखवामां मान समजनार म्हारां बाळ "बाबु" ना शिरसाष्टांग नमस्कार

श्रीसद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना

[illegible] पुस्तक [illegible] [illegible] यांनी [illegible]
[illegible] [illegible] [illegible] [illegible]
[illegible] आहे

श्रीसाई [illegible] महाराजांच्या [illegible] आरतीचे [illegible]
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] [illegible] [illegible] आहे.
[illegible] [illegible]

[illegible] [illegible] दीक्षित

[illegible] [illegible] [illegible]

रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोळकर [illegible]

[illegible] [illegible]

[illegible] श्री शिर्डी संस्थान कमिटी

[illegible] [illegible] ता. [illegible] जि. अहमदनगर

# आतांपर्यन्त छापून आलेल्या महाराजांच्या लीला.

महाराजांच्या उदी ( अंगारा ) संबंधानें हजारों लोकांनां अनुभव आले आहेत. तेच नुसते एके ठिकाणीं गोळा केले तरी एक प्रचंड ग्रंथ होईल. तें काम महाराजांना कोणाकडून करवून घ्यावयाचें असेल, तर तें करवून घेतीलच; पण तूर्त या प्रस्तावनेंत त्यांपैकीं थोडेसे अनुभव केवळ दिग्दर्शनार्थ नमूद करीत आहें.

माझे एक पारशी स्नेही एके ठिकाणीं स्टेशनमस्तर होते. त्यांना एक विकार होता, व त्यासाठीं त्यांनीं मुंबईच्या चांगल्याचांगल्या डॉक्टरांचीं औषधें घेतलीं होतीं; पण विकार गेला नाहीं. एक दिवस त्यांनीं मजकडून महाराजांची उदी घेतली व तिचें तीन दिवस सेवन केलें. चवथे दिवशीं त्यांचा विकार साफ नाहींसा झाला.

एका पारशी गृहस्थाच्या तान्या मुलीला आंकडी येत असे. प्रत्येक तासातासाला तिला तें वारें येई, आणि ती अत्यवस्थ होत असे. त्या गृहस्थाला त्याच्या एका स्नेह्यानें मजकडे पाठविलें व मीं त्याला उदी दिली. ती तो घेऊन गेला आणि दुसऱ्या दिवशीं त्यानें मला येऊन सांगितलें, कीं, उदी दिल्यानंतर आंकडी दर तासाला न येतां सात तासांनीं आली व तिच्यापासून फारच कमी त्रास झाला. व तो आणखीं उदी घेऊन गेला.

हर्द्याजवळ एका खेड्यांत एक म्हातारा गृहस्थ मुतखड्याच्या विकारानें अतिशय त्रस्त झाला होता. पुष्कळ लोकांनीं त्याला शस्त्रक्रिया करवून खडा काढवावा असें सांगितलें, पण त्याची हिंमत होईना. शेवटीं तो मरणोन्मुख झाला. तितक्यांत माझे एक गुरुबंधु जे त्या गांवचे इनामदार आहेत ते त्या गांवांत जाऊन पोहोंचले. त्यांच्या येण्याची खबर त्या म्हाताऱ्याच्या मुलास लागतांच तो त्यांच्याकडे गेला व त्यांजपाशीं महाराजांची त्यानें उदी मागितली. ती उदी त्यानें पाण्यांत घालून आपल्या बापाला पाजली आणि त्यानंतर पांच मिनिटांच्या आंत खडा आपोआप

लच्चीच्या द्वारें सटकन् बाहेर पडला. अर्थातच म्हातारा हुषार झाला आणि त्याची प्रकृती सुधारली.

मुंबईचा एक कायस्थ प्रभु गृहस्थ कांहीं महिने शिर्डीस राहिला होता. त्याची बायको गरोदर होती, तीहि त्याच्याबरोबर होती. एके दिवशीं रात्रीं दहा वाजण्याच्या सुमारास तिला प्रसूतिवेदना सुरू झाल्या. गांव लहान असल्यामुळें तेथें डॉक्टर किंवा वाकबगार सुईण मिळणें शक्य नव्हतें. शेजारच्या दोन बाया गेल्या व त्यांनीं पाहिलें तों पोर आडवें आलेंसें दिसे, आणि गर्भाची हालचाल कांहींच दिसेना, व बाईचा जीव कासावीस होऊं लागला. शेजारणी बायाही घाबरल्या. मग त्यांपैकीं एकीनें थोडी उदी पाण्यांत घालून त्या गरोदर बाईला पाजली, आणि बाबांचा धांवा केला. पांच मिनिटांच्या आंत पोर बाहेर पडलें. तें अगदीं हिरवेंनिळें झालेलें होतें. त्यावरून गर्भांतच त्याचा प्राणांत होऊन कांहीं वेळ झाला असावा, असें दिसलें. पोर बाहेर पडल्यानें बाईचा जीव वांचला. हें बाळंतपण बाईला फारच कठीण जाईल, आणि बाईच्या जिवावर बेतेल, असें पुष्कळांनीं पूर्वीं भाकित केलें होतें, आणि म्हणून ती बाई आणि तिचा नवरा शिर्डीस जाऊन राहिलीं होतीं.

वांद्र्यास एक गृहस्थ आहेत त्यांनां रात्रीं त्रास होत असे. त्यांना झोंप लागली कीं भयंकर स्वप्न पडावें, आणि त्यांनीं दचकून जागें व्हावें. हा प्रकार सतत कांहीं महिने चालू होता. एके दिवशीं त्या गृहस्थानें आपली हकीगत त्याच घराचे मालक जे माडीवर रहातात त्यांनां सांगितली, व याला कांहीं उपाय सांगा असें म्हणाले. घराचे मालक बाबांचे पूर्ण भक्त असल्यामुळें त्यांनीं त्यांना थोडी उदी एका कागदाच्या पुडींत बांधून दिली, आणि ही निजतांना उशाखालीं ठेवा,असें सांगितलें. त्यांनीं त्याप्रमाणें केलें व त्या रात्रीं त्यांना स्वस्थ झोंप लागली. ती पुडी आतां ते नेहमीं उशाशीं ठेवितात, आणि आतां झोंपेसंबंधानें त्यांची तक्रार कांहीं राहिली नाहीं.

ठाण्यास एक गृहस्थ आहेत, त्यांनां एकदां पटकीचा आजार झाला. आणि तो नुसत्या उदीनें-कोणाचें कांहीं औषध न घेतां बरा झाला, असें त्यांनींच मला सांगितलें.

# श्रीसाई लीला.

## ( मासिक )

वर्ष १ लें. आषाढ शके १८४५. अंक ५ वा.

## महाराजांचे अनुभव.

श्री सद्गुरु साईनाथ सगुणोपासनेंतील बहुतेक पद्यांचे कर्ते वे० कृष्ण
शास्त्री भीष्म यांनीं ता० ११।७।२१ रोजीं पाठविलेल्या पत्र नं० १०१
यांतील कांहीं उतारेः—साईनाथांचे गुरूपुजेची पत्रिका त्यांच्या सद्भक्ता-
कडून आली ती पोंहचली. पण मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें कीं, अशा
पसंगीं दासाला सद्गुरूंचे चरणकमलाचा लाभ होत नाहीं. कारण येथें
मी तयार केलेल्या यथार्थ रामायणाचें पुराण आषाढ शु ॥ १२ पासून
सुरू करण्याचा ठराव येथील लोकांचे आग्रहावरून केला. हें यथार्थ रामा-
यण सद्गुरू साईनाथांच्या आज्ञेनेंच तयार केलें गेलें म्हणून मी सुरू
ठेवणारे पुराणही महाराजांची सेवाच आहे असें मानितों तरी महाराजांचे
समाधीजवळ अल्पशी भेट म्हणून एक रुपया पाठविला आहे, तो सद्भ-
क्तांनीं त्यांच्या सत्कार्यास लावावा. आतां महाराजांविषयींचा आपला
अनुभव काय आहे तो कळविण्याविषयीं आज्ञा आहे करितां त्या संबं-
धानें दोन शब्द लिहितों.

महाराजासंबंधानें मला जो अनुभव आला तो माझ्याबरोबर असणा-
ऱ्यांना सर्वांना माहित आहेच. म्हणून माझ्या लिहिण्यांत कांहीं विशेष
आहे असें समजूं नये. मी जें लिहिणार तें पूर्वींच भक्त मंडळीस कळलें
असेल व तें प्रथित केलें असेल तर माझा लेख दाखल दप्तर करावा आणि

अनुभव येऊन तो प्रसिद्ध केला नसेल तर मी लिहिलेल्या लेखास साक्ष घेऊन जी त्याची वासलात लावावयाची असेल ती लावावी.

साईनाथ महाराज हे अतींद्रिय होते. ह्या ठिकाणीं होते असा भूतकाळीं प्रयोग केल्यानें महाराजांच्या त्रिकालाबाधित वास्तव्यास बाध येतो पण हा प्रयोग फक्त नश्वर देहासंबंधानें समजावा.कारण साईनाथ अजरामर असून ते सांप्रत कायम आहेत व हमेशाही आहेत असें माझें मन सांगतें. व वारंवार दर्शन देऊन या देहाकडून कार्य करून घेतात तेव्हां हें माझें म्हणणें खोटें होणें शक्य नाहीं. आम्ही सर्व मंडळीं साईनाथांचे सन्निध असून सायंकाळची शेजारती केली. दुसरे दिवशीं महाराजांचे दर्शनास गेलों असतां ते म्हणाले " काल मी फिरावयास गेलों होतों." हें आह्मांस खरें वाटेना पण थोडके वेळानें एका गांवच्या मनुष्यानें सांगितलें ( हा गांव शिर्डीचे दक्षिणेस जवळच आहे ) कीं ' काल सायंकाळचें वेळेस महाराज आमचे गांवीं होते' हें समजल्यावर महाराजांचे म्हणण्याचा अर्थ बरोबर लागला. एक देह राहून दुसरा देह धारण करण्याची शक्ति अतींद्रियता प्राप्त करून घेतल्याशिवाय येत नाहीं.

एके दिवशीं बळवंतराव खापर्डे व त्यांचे घरची सर्व मंडळी निद्रिस्त झाल्यावर साईमहाराज बळवंतरावचे स्वप्नांत येऊन त्यांचे घरीं भोजन केलें व झोपाळयावर बसून विडा घेतला आणि निघून गेले. इतक्यांत बळवंतराव जागे झाले व प्रात:काळीं मला तें स्वप्न सांगितलें, तेव्हां मी त्यांना म्हणालों तुम्ही हें स्वप्न कोणाजवळ न सांगता साईमहाराजांजवळ जा. जर हें स्वप्न महाराजांनीं दिलें असेल तर महाराज कांहीं ना कांहीं तरी बोलतील, व एरव्हीप्रमाणें हें स्वप्न असेल तर कांहींच बोलणार नाहीत. असें त्यांनीं सांगितल्यावर ते साईमहाराजांकडे गेले. चमत्कार हा झाला कीं, तेथें जाण्याबरोबर' काल आम्हांस जेऊं घातलें पण दक्षिणा नाहीं दिली' असें ते बळवंतरावाला म्हणाले. हे शब्द ऐकून बळवंतराव सर्द झाले व दक्षिणा किती द्यावी असा उलट महाराजांस प्रश्न केला, तेव्हां २५ पंचवीस रुपये दक्षिणा आण असें ते म्हणाले. हें सर्व अतींद्रिय शक्तीचे खेळ आहेत. कांहीं मंडळीस ह्या गोष्टी खोट्या वाटतात

पण श्रीमंत यशवंत व्यंकटेश कोल्हटकर बी. ए. एल्. एल्. बी हे आपल्या श्रीमद्भागवतार्थ दर्शन नामक पुस्तकांत आत्मा अमर असून त्याला अनेक चमत्कार करितां येतात, हें सप्रमाण सांगतात. मग महाराजांचे जागृतावस्थेंत व स्वप्नावस्थेंत देह धारण करून दर्शन देणें कोणतें अशक्य आहे! ' जागतरामा सोवत रामा सपनोमे देखो रामही रामा ' या एकनाथस्वामीच्या म्हणण्याप्रमाणें साईनाथ वाटेल तेव्हां दर्शन देतात, याप्रमाण ' अथ एयष संप्रसादोऽस्माच्छरीरात्समुत्थाय परंज्योति रूपसंपद्य स्वेन रूपेणाभिनिष्पद्यत ' ( छांदोग्योपनिषत् अष्टमोध्याये खंड ३ मंत्र ४) ( आत्मवेत्त्यांचा ) हा प्रसन्न रूप आत्मा ( केव्हांही ) या शरीराच्या बाहेर येऊन अत्यंत श्रेष्ठ अशा ज्योतीला प्राप्त होत्साता स्वतःच्या रूपाशीं युक्त होतो ( तरी केव्हां केव्हां त्याला पूर्वीचें शरीर अचेतन पाडण्याची अवश्यकता वाटत नाहीं. ) महाराज कामक्रोधादिक वृत्तीला वश न होतां स्वस्वरूपीं रममाण होऊन सदा शांत वृत्तीनें रहात.

शयनागारांतून मशीदींत येतेवेळीं हातीं दंडा घेऊन लाखो शिव्या देत असत अशा वेळीं त्यांचे समोर जाण्याची छाती होत नसे. पण चमत्कार हा कीं, मोठ्यानें शिव्या देण्याच्या आवेशांतच प्रतिक्षणीं ' अल्ला तेरा अच्छा करेगा' ही अत्यंत व हळू पण स्पष्ट वाणी ऐकूं येत असे. कोणता सामान्य पुरुष रागाच्या तडाक्यांत शांत वृत्तीनें आशिर्वाद देता? म्हणून मी म्हणतों कीं महाराजांचें रागावणें हा निवळ देखावा होता पण अंतःकरण अत्यंत दयार्द्र व शांत होतें.

—" भक्तांचीं सांकडीं स्वयें सोसी देव । त्यां पाशीं केशव सर्वकाळ ॥" ( गाथा तुकाराम ४२७४ ).एके दिवशीं आम्हीं सर्व मंडळी महाराजांपाशीं बसलों व आर्तीची वेळ झाली. त्यावेळेस मामूलीप्रमाणें *बापूसाहेबांनीं आरती लाविली पण काय झालें नकळे महाराजांचे शरीरांत एकदम नरसिंहावताराचा संचार झाला. आरती व आलेले नैवेद्य सर्व फेकून दिले. दंडा मारून सर्वांस मशीदींतून काढून दिलें. व आसन सोडून खालचे पडवींत येऊन बसले. अशा वेळेस आरतीबीरती सर्व कांहीं राहिले. तीन वाजले भक्तजन भुकेनें व्याकूळ होऊं लागले. कोणी नुसत्या सिंहा-

*बापूसाहेब जोग.

सनासच आरती करा असें म्हणूं लागलें. पण दादासाहेब खापडर्यांनीं तसें करूं नये आरती महाराजांसच करावी. पण ती बापूसाहेबानीं न करितां या वाघ्याचे हातानें करावी, ( तेथें एक म्हणाला वाघ्या होता ) असें सांगितलें. तेव्हां त्याचे हातीं आरती दिली. पण तितक्यांतच महाराज आपण होऊन सिंहासनावर बसले व मग रीतीप्रमाणें आरती झाली. पण महाराजांचे संतापाचें कारण समजेना.

दुसरे दिवशीं कोपरगांवांवरून एक वकील आले ते म्हणाले "महाराजांचे भक्तावर एक फौजदारी मुकदमा होता. कोर्टानें त्याला शिक्षा दिली. तितक्यांत मी तेथें गेलों. केस पाहून मुकदमा घेतला व अपील दाखल केलें. चमत्कार हा झाला कीं, कोर्टानें आरोपीची चालचलण मला विचारली व मी प्रतीवादी निर्दोष आहे अशी खात्री दिली. त्याबरोबर आरोपीस सोडून दिलें. हें असें अकस्मात कसें झालें याचें आश्चर्य वाटून महाराजांचे दर्शनाकरितां आलों कारण त्या भक्तानें मला महाराजांची कीर्ती सांगितली. व "महाराजांचेंच कृपेनें मी दोषमुक्त झालों असें तो म्हणाला होता."

" प्रगट गुह्य बोले ॥ विश्व ब्रह्मचि ठेलें " ॥ असें ज्ञानेश्वर महाराजांचे आरतींत आहे. असेंच वर्तन महाराजांचें होतें.

महाराजांचे नित्य बैठकीस एक फाटकें तरट होतें. पण त्यावर महाराजांची अतिप्रीति. एक दिवस महाराज दिशेला गेले असतां ती तरटी फेकून देऊन त्या जागीं रेशमी गादी एका भक्तानें घातली. महाराज प्रातर्विधी आटोपून आसनावर येण्याबरोबर त्यांनां फाटकी तरटी न दिसतां नवी गादी दिसली त्याबरोबर जो त्यांनीं संताप केला त्यासरसी धुनी व गादी फेकफाक करून शिव्यांचा वर्षाव सुरू केला. पण ती फाटकी तरटी देण्याबरोबर ते शांत झाले. एके दिवशीं मला लोकांनीं ती तरटी फेकून दुसरी एक टाकण्यास सांगितलें पण मी तसें न करितां आरतीची वेळ झाल्यावर सर्व उभे राहिले त्या वेळेस तरटी काढण्याविषयीं खुणेनें महाराजांस प्रश्न केला व महाराजांनीं खुणेनेंच संमति दिली. ती पडते फळाची आज्ञा मिळाल्याबरोबर दादासाहेबांस सांगितलें. त्यांनीं लागलेंच

एक पोतें विकत घेतलें तें मी महाराजांचे बसण्याचें जागीं घालून फाटकी तरटी फेंकून दिली. आरती झाल्यावर महाराज शांततेनें बसले. भक्तजन सेवा करून राहिले. इतक्यांत त्यांनीं आपली चिलीम मला दिली व पांच लाडू मागितले व ते देण्याचे मी कबूल केलें. नंतर सर्वांबरोबर मी घरीं गेलों. पण लाडवांची मला चिंता लागली कीं, मी ह्या परस्थळीं लाडू कसे करणार? केले तरी दुसऱ्याचे मदतीनें. ते महाराज ओळखतील. शिवाय पांचच लाडू कां मागितलें? नुसते लाडूच कां मागितले नाहीं? असा मनाशीं विचार करीत दिवस घालविला. रात्रीं त्याच चिंतनांत झोंप लागली. पण लवकरच ती उघडली व एक श्लोक करण्याची स्फूर्ति झाली. व लागलाच श्लोक तयार झाला. सकाळीं त्याचे पुढचा श्लोक करीत बसलों. तों, रा. दीक्षीत[1] हे महाराजांकडे जात होते त्यांनीं माझी कविता पाहिली व दर्शनास गेले. कांहीं वेळांनीं स्नान करून मीही दर्शनास गेलों. पण जाण्याबरोबर महाराजांनीं लाडू मागितले. मीं कांहीं बोललों नाहीं. तरी दीक्षीत म्हणाले लाडू तयार होऊन राहिले. असें म्हटल्याबरोबर महाराज स्वस्थ बसलें. दुसरे दिवशी पांच श्लोक तयार करून कागद महाराजांचे स्वाधीन केला. (पांचाचे वर श्लोक करण्यास डोकें बरेंच चालविलें पण कांहीं सुचेना तेव्हा पांचच श्लोक कायम केले). त्यांनीं तो पाहून मला वाचावयास आज्ञा केली. ते श्लोक वाचीत असतां महाराजांनीं मस्तकावर हात ठेविला. त्या वेळेस जी मनाची स्थिति झाली ती अवर्णनीय होती. त्यानंतर प्रत्येक कविता तयार करावी व त्यांनां दाखवावी व त्यांचे आज्ञेनें वाचून दाखवावी असा क्रम सुरू ठेवून 'साईनाथ सगुणोपासना' नावाचें पुस्तक करून त्यांचे चरणीं अर्पण केलें व त्या पुस्तकाचें उत्पन्न गोरक्षणास दिलें. तीं पुस्तकें तेथें असतीलच.

'धिरो न शोचति' (कठोपनिषत्) आत्मज्ञानी धैर्यवान हे कधीं शोक करीत नाहीत आणि कदाचित् त्यांची वृत्ति शोकपर झाली तर सद्वृत्तीवर आणण्यास दुसऱ्याचे उपदेशाची अवश्यकता नाहीं; ते स्वतःच शोकवृत्तीचा त्याग करितात.

१ रा. रा. हरी सिताराम २ शिर्डीस

मेघा गुजराथी महाराजांचा प्रेमळ शिष्य होता. त्यानें महाराजांची अत्यंत कष्टानें सेवा केली. (आपले मालकाचे आज्ञेनें) पण सेवा करीत असतां त्याला दुर्बुद्धी झाली कीं, या मुसलमानाला मी स्नानास पाणी कां घालावें? असा विचार करून तो सेवा टाकून देशांत गेला तेथें विमार पडला. विमारींतून दुरुस्त होऊन शंकराचे दर्शनास गेला तों त्याला शंकराचे जागीं शंकराची पिंडी न दिसतां साईमहाराज दिसले. तेव्हां तो पुनः शिर्डीस आला. त्याच्या देहांतील किल्मिष नाहींसें व्हावें म्हणून त्याला गायत्री पुरश्चरण करण्यास सांगितलें. तें त्यानें केलें व त्याची सांगता महाराजांनीं चांगली केली. तो शिष्य मरण पावला तेव्हां महाराज स्वतः आले व त्याचे सर्वांगावरून हात फिरविला आणि पांच मिनिटें पुष्कळ रडले. पण 'लगेच आतां किती रडसील' असा आपणच आपल्यास उपदेश करून अर्थात 'धीरो न शोचति' या कठोपनिषदाचे तत्वाप्रमाणें शांत वृत्ती ठेवून त्याची सत्क्रिया करण्यास आज्ञा दिली.

'यमात्मानमन्विष्य सर्वांश्च लोकानाप्नोति' छां. उ. अ. ८ खं० ७ मं. २

ज्या आत्म्याचा शोध केला असतां त्रैलोक्य प्राप्त होतें (अर्थात त्रैलोक्याचें ज्ञान होतें त्या आत्म्याला जाणावें). साई महाराजांनीं या श्रुतिवचनाप्रमाणें आत्म्याचे पूर्ण ज्ञान करून घेतलें होतें. म्हणून त्यांना भूत भविष्य वर्तमान सर्वकाळाचें ज्ञान होतें. सारांश ते सर्वज्ञ होते.

साईमहाराजांस लिहितां वाचतां येत नव्हतें अशी सर्वांची समजूत आहे, व ती खरी असली तरी वरील श्रुतिवाक्याप्रमाणें ते सर्वज्ञ असल्यामुळें लेखन वाचन जाणणाऱ्यांचें कार्य ते करीत असत.

रा. दीक्षित यांची मुलगी मरण पावली तेव्हां त्यांना अत्यंत शोक झाला याच सुमारास त्यांनीं बोलाविलेल्या भावार्थ रामायणाची व्ही.पी. येऊन पोचली. ती घेतल्यावर रामायण वाचावयाचें पण गुरूचे आज्ञेशिवाय वाचावयाचें नाहीं असा त्यांचा क्रम असे त्या प्रमाणें महाराजांना तो ग्रंथ त्यांनीं दाखविला. महाराजांनीं पुस्तक उघडून तें उलटें धरिलें व त्याचीं वरींच पानें चाळलीं. शेवटीं किष्किंधा कांडांतील वालीचा वध झाल्यानंतर तारा शोक करीत असतां रामानें उपदेश केला तें प्रकरण

काढून दीक्षितांना दिलें व हें वाच म्हणून सांगितलें. शोकाचा परिहार होण्याला तो उपदेश उत्तम आहे पण ज्याला वाचतां येत नाहीं तो नेमकें तेंच प्रकरण कसें काढील? ह्यावरून ज्याला आत्मज्ञान होतें त्याला सर्व समजतें हें श्रुतीचें वाक्य खरें आहे. व त्याप्रमाणें त्यांचें ज्ञान होतें.

साईदासानुदास.

**कृष्ण जोगेश्वर भीष्म.**

**रा. रा. हरी सिताराम दीक्षित यांनीं लिहून ठेवलेले अनुभवः—**

(१)

महाराज निरनिराळ्या रूपानें आपल्या भक्तांकडे जात. व नंतर त्याची खूणही देत असत. एकदा नानासाहेब चांदोरकरांनीं महाराजांसाठीं नैवेद्याचें ताट आणलें व महाराजांना पुरणाच्या पोळ्या आवडतात असा त्यांचा समज असल्यामुळें मुद्दाम पुरणाच्या पोळ्या तयार करवून नैवेद्यांत नेल्या होत्या. नानासाहेब ताट घेऊन गेले तेव्हां महाराज नुकतेच जेऊन बसले होते. नाना साहेबांनीं महाराजांना जेवण्याबद्दल प्रार्थना केली तेव्हां ते म्हणाले मी आतांच जेवलों. तूं ताट ठेऊन आपल्या बिऱ्हाडी जेवावयाला जा. आज्ञा झाल्यामुळें नानासाहेब गेले पण जातांना माधवराव देशपांड्यांना सांगून गेले "तुम्ही येथेंच थांबा आणि महाराजांनी या ताटांतलें कांहीं खाल्लें कीं मला येऊन सांगा म्हणजे मी जेवायला बसेन." त्याप्रमाणें माधवराव महाराजांचे जवळ बसले आणि नानासाहेब घरीं त्यांची वाट पहात बसले. थोडा वेळ गेल्यावर महाराजांनीं माधवरावांना विचारलें "नाना जेवला का?" ते म्हणाले "नाहीं. आपण या ताटांतलें कांहीं खाल्लें म्हणजे ते जेवायला बसणार आहेत". त्यावर महाराज हांसून म्हणाले "अरे ताट वाढीत असतानांच माशीच्या रूपानें जाऊन त्याचा नैवेद्य खाल्ला" त्याला म्हणावें तूं आतां जेवायला बैस. अशीत हें नानासाहेबांना माधवरावांकडून कळल्याबरोबर ते आनंदानें जेवायला बसले.

तसेंच एकदा नानासाहेबानां महाराजानीं सांगितलें "अरे कोणी आपल्या दारीं मागावयाला आलें तर त्याला आपल्या शक्तिप्रमाणें द्यावें. आपल्याजवळ द्यावयाला नसलें तर निदान त्याच्याशीं गोड शब्द तरी बोलावें" हा बोध झाल्यानंतर लवकरच नानासाहेब आपल्या गांवीं गेले. दोन चार दिवस झाल्यानंतर एक म्हातारी भिक्षा मागावयास त्यांच्या दारीं आली तिला "भिक्षा नाहीं" असें नोकरानें सांगितलें. ती जरा लोचटपणा करूं लागली. त्याबरोबर स्वतः नानासाहेबांनीं तिला दरडावली. त्यानंतर नानासाहेब जेव्हां पुन: महाराजांकडे आले तेव्हां महाराजांनीं विचारलें "नाना मीं तुला मागच्या खेपेस सांगितलें कीं कोणी आपल्याकडे मागावयला आलें तर त्याच्याशीं गोड बोलावें तें विसरलास ना ? मी म्हातारीच्या रूपानें तुझ्याकडे आलो होतों तर मला शिव्याच मिळाल्या' नानासाहेब अर्थात् खजील झाले.

एकदां म्हाळसापतीकडे एक कुत्री गेली. ती ओंगळ दिसत असून तिच्या मुखांतून लाळ गळत होती. म्हाळसापतीनें तिला एक टोला मारला व ती ओरडत ओरडत निघून गेली. पुढें म्हाळसापती दर्शनास गेले तेव्हां महाराज म्हणाले "आम्ही मोठया आशेनें भक्ताकडे (म्हाळसापतीला बहुतेक लोक "भक्त" म्हणतात ) गेलों तों आम्हाला टोलेंच खावे लागले."

या व अशा लीलांचा हेतु भक्तांना शिक्षण देण्याचाच असतो. महाराज नेहमी म्हणत "अरे कोणालाही हाड हाड झिड झिड करूं नये. आपल्याकडे कुत्रा, मांजर कोणीही येतें तें कांहीं तरी संबंधामुळेंच येतें. आपण कोणाचाही कंटाळा करूं नये." महाराज नुसता तोंडानेंच बोध करून राहात नसत. तो बोध निरनिराळे प्रकारांनीं ठसवीत असत. एकदा महाराजांनी असा बोध केला आणि दोन तासांनीं आम्ही मंडळी वाडयांत जेवायला बसलों असतां पायऱ्यांपाशीं एक कुत्रें आलें. आम्ही त्याला हांकलें तेव्हां तें कुत्रें समोरच्या विऱ्हाडकऱ्यांच्या पायऱ्यापाशीं गेलें, तेथें त्याला मार बसला व तें मोठयानें ओरडत बाहेर गेलें. त्याचें ओरडणें ऐकल्याबरोबर महाराजांस सकाळच्या शब्दांची आठवण आली आणि असें वाटलें कीं, आपण कुत्र्याला हाकललें तसें न करितां भाकरीचा तुकडा

घेऊन लांब फेकला असता ह्मणजे कुत्रें गेले असतें आणि त्याला मार बसला नसता. त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं दास गणूचें कीर्तन झालें व त्यांत श्रीविठोबांनीं कुत्र्याचें रूप घेऊन नामदेवाकडे जाऊन भाकर नेली असता नामदेव तुपाची वाटी घेऊन "देवा कोरडी भाकर खाऊं नका हें तिच्या बरोबर तूप घ्या" असें ह्मणत ह्मणत धांवले तो कथाभाग कीर्तनांत निघाला आणि त्याच दिवशीं संध्याकाळीं मारुतीचे देवळांत रा. माधवराव आडकर भक्तिलीलामृत वाचित असत त्यांतही तोच भाग निघाला. अशा तऱ्हनें महाराजांनीं सकाळीं केलेला बोध त्यांनीच दृढ करून दिला.

कित्येक वेळीं भक्तांचें कोड पुरविण्यासाठीं व त्यांना समाधान देण्यासाठीं त्यांचेकडे निरनिराळें रूपानें महाराज जात.

(२)

मला महाजांचे प्रथम दर्शन घडलें तेव्हां माझे मित्र रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोळकर यानाहीं दर्शन घडावें अशी मला इच्छा झाली म्हणून मी त्यांना शिर्डीहून पत्र लिहिलें व महाराजांचें दर्शन त्यांनीं अवश्य घ्यावें असा त्यांना आग्रह केला. त्यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांची माझी भेट झाली. तेव्हां ते म्हणाले "मी दर्शनास अवश्य जाईन, पण गुरूचा उपयोग काय तें कांहीं मला कळत नाहीं. मला वाटतें सगळें आपलें आपल्यालाच केलें पाहिजे." त्यानंतर ईस्टरचे सुटींत त्यांनीं दर्शनास जाण्याचा विचार केला. ते ज्या दिवशीं निघणार होते त्याच दिवशीं त्यांना खबर लागली कीं, त्यांच्या एका स्नेह्याचा एकुलता एक मुलगा वारला व त्यावेळेस त्या स्नेह्याचे गुरु तेथेंच होते. हें ऐकल्याबरोबर दाभोळकरांनीं शिर्डीचा बेत रहित केला. तितक्यांतच दुसऱ्या एका स्नेह्याची गांठ पडून शिर्डीस जाण्याचा बेत कायम झाला व ते त्याप्रमाणें निघाले. ही मेल दादरास उभी राहते असा त्यांचा समज असल्यामुळें ते दादरास जाण्यासाठीं निघाले तोंच बांद्राचे स्टेशनावर त्यांना एक मुसलमान गृहस्थ भेटला व त्यानें मेल दादरास उभी राहत नाहीं, तुम्ही बोरीबंदरास जा असें सांगितलें. त्याप्रमाणें ते बोरीबंदरास गेले व दुसरे दिवशीं

सकाळीं शिर्डीस येऊन पोहोचले.महाराजांचे दर्शनास जावयास अवकाश होता म्हणून ते एका गृहस्थाबरोबर बोलत राहिले. त्यावेळेस ' गुरूचा उपयोग काय' याच विषयावर बोलणें चाललें होतें.पुढें आम्ही सर्व मंडळी महाराजांकडे गेलों. तेथें बसल्याबरोबर महाराजांनीं दाभोळकराकडे तोंड करून मला विचारलें 'हा हेमाडपंत काय म्हणत होता?' मी म्हटलें "बाबा आपल्याला सर्व ठाऊकच आहे" पुढें दुसरे दिवशीं मला जाण्याची परवानगी मागावयाची होती म्हणून मी म्हटलें "बाबा आज निघावयाचें का?" महाराज म्हणाले "होय" त्यावर एकानें विचारलें "बाबा कोठें जावयाचें?" महाराज म्हणाले "असे वरतीं".तेव्हां त्यानें फिरून विचारलें "बाबा, वाट कशी आहे?"-त्यावर महाराज म्हणाले " वाटा पुष्कळ आहेत.ठिकठिकाणांहून जातात. आपल्या येथून ही एक वाट जाते. वाट तर बिकट आहे. वाटेंत वाघ आहेत, रीस आहेत" तेव्हां मी विचारलें "पण बाबा वाटाड्या बरोबर असला तर?" त्यावर महाराज म्हणाले "वाटाड्याबरोबर असला म्हणजे कांहीं पंचाइत नाहीं. मग वाघ बाजूला होऊन जातात, रीस बाजूला होऊन जातात. नाहीं तर एक मोठी खाई आहे तींत पडण्याची भीति असते" अर्थात् हें संभाषण झालें याचा परिणाम दाभोळकरांचे मनावर बराच झाला व आपल्या प्रश्नाचें उत्तर मिळालें असें त्यांना वाटूं लागलें. त्यानंतर महाराजांनीं त्यांना वेळोवेळीं निरनिराळे अनुभव दिले व आतां ते महाराजांचे पूर्ण भक्त बनले आहेत.

(२)

एकदां महाराजांचें जेवण चाललें असतां एक कुत्रें येऊन त्यानें ताकाचें टमरेलांत तोंड घातलें. त्याबरोबर फकिरबाबा जे तेथें जवळच बसले होते त्यांनी तें ताक फेकून देण्याविषयीं एका मुलाला सांगितलें व तो तें फेकणार इतक्यांत महाराजांनीं " काय आहे ?" म्हणून विचारलें तेव्हां फकीरबाबांनीं हकीगत सांगितली. त्यावर महाराज म्हणाले " बापू, तें ताक तर चांगलें आहे. तें घरीं घेऊन जा व तिसरे प्रहरीं त्याची कढी करून आण; ती आपण खाऊं" अर्थात फकीरबाबांनीं तें घरीं नेलें व कढी करून आणिली व ती महाराजांनीं खाल्ली.

(४)

बापूजीशास्त्री गुळवी १९१८ चे फेब्रुवारी महिन्यांत महाराजांचे दर्शनास आले होते. त्यांनीं गंगा आणिली होती तिचा अभिषेक महाराजांना यथाविधी करण्यांत आला. त्यानंतर शास्त्रीबुवांनीं श्रीरामदासनवमीसाठीं सज्जनगडास जाण्याची परवानगी मागितली. महाराजांनीं परवानगी दिली व म्हणाले "तेथेंही आपणच आहोंत व येथेंही आपणच आहोंत." शास्त्रीबुवा सज्जनगडास गेले तेथें दासनवमीचे दिवशीं पाहाटेस पांच वाजतां महाराजांनीं शास्त्रीबुवांस प्रत्यक्ष दर्शन दिलें इतकेंच नव्हे तर शास्त्रीबुवांनीं महाराजांचे थोडा वेळ पाय चुरले व मग महाराज अदृश्य झाले.

(५)

रावबहाद्दुर साठयांचा वाडा बांधावयाची सुरुवात केली तेव्हां निंबाचें झाड पुढें बांधकामाला नडेल असें समजून मंडळींनीं महाराजांस तें झाड तोडण्याविषयीं परवानगी मागितली. महाराज म्हणाले 'आपण कशाला झाड तोडावें'. पुढें काम बरेंच झाल्यानंतर त्या झाडाचा थोडासा भाग नडूं लागला तेव्हां महाराजांना फिरून विचारलें. तेव्हां महाराज म्हणाले ' आडवें आलें कीं कापून काढलें पाहिजे. जेवढा भाग नडत असेल तेवढा कापून टाका. '

(६)

महाराजांचे एका भक्ताला कर्ज बरेंच झालें होतें. एका सावकारानें त्याचेवर हुकुमनामा मिळविला. त्याचे जवळ त्यावेळेला पैशाची सोय नव्हती तरी पण मिळकत होती. सावकार कांहीं केल्या थांबेना. इतक्यांत सर्व भक्त मंडळीच्या मनांत त्या भक्ताचे येथें असलेल्या महाराजांचें तसबिरीपुढें नाम सप्ताह करण्याचे आलें. त्या भक्तानेंही तें मोठया आनंदानें कबूल केलें. सावकाराला वाटलें ही संधी बरी आहे. त्यानें तावडतोब जप्तीचें वारंट काढवून तो बेलिफला घेऊन त्यांचे घरीं गेला. नाम सप्ताह सुरु होता. कर्जदार भक्त सावकाराजवळ गेले व म्हणाले "बरें आहे. आपल्याला वाटेल तें सामान घेऊन जा. आम्हाला प्रयोजनाला महाराजांनीं

आमची जागा मोकळी करून दिली असें समजून जें होतें तें त्यांच्याच इच्छेनें होतें " इतकें म्हटल्यावर सावकाराला महाराजांनीं इतकी उपरती करून दिली कीं त्यानें तात्बडतोब जप्तीचे वारंट रद्द करवून घेतलें व पुन्हां कधीं काढलें नाहीं.

(७)

हरिद्वारचे बुवा रोज सकाळचे बैठकीचे वेळेस महाराजांचे समोर खांबाजवळ बसत असत. एकदा त्यांना येण्याला उशीर झाला व एक मुलगी त्यांच्या नेहमीच्या जागेवर जाऊन बसली. ते आले तेव्हांही ती उठली नाहीं. मग त्यांनीं तिला उठावयास सांगितलें व ती उठली व ते तेथें बसले. महाराजांनीं त्यांना पांच मिनिटें बसूं दिलें व म्हणाले खालीं सभामंडपांत जाऊन बसा. त्या प्रमाणें ते गेले. कांहीं वेळानें ते पुन: वर आले व आपल्या जागेवर बसूं लागले. महाराजांनीं त्यांना पुन: खालीं जाण्यास सांगितलें तेव्हां अर्थात त्यांना पटलें कीं मुलीला उठविल्याबद्दल हा आपल्याला धडा मिळत आहे.

(८)

मी एकदां नवरात्राच्या आरंभीं नागपुराहून निघून शिर्डीस गेलों. दसरा तेथेंच झाला. मंडळींनीं आपापल्यापरी महाराजांना फळफळावळ मेवा मिठाई वगैरे दिली. माझ्याजवळ फळें नव्हतीं. माझी पूजा नेहमी-प्रमाणें साधी होती. कांहीं फळें असतीं तर बरें झालें असतें असें वाटलें. थोड्या वेळानें महाराजांनीं द्राक्षें वाटलीं. मलाही कांहीं दिलीं. महाराजांनीं सगळीं वाटून टाकिलीं. आपल्यासाठीं एकही ठेवलें नाहीं. हें पाहून आप-ल्याला दिलेल्या द्राक्षापैकीं कांहीं आपण महाराजांना द्यावीं असें माझ्या मनांत आलें व त्याप्रमाणें मी केलेंही. महाराजांनीं मी दिलेली द्राक्षें घेतलीं व खाल्लीं अर्थात् माझ्या दसऱ्याच्या पूजेबद्दलची माझी खिन्नता जाऊन मला आनंद झाला.

(९)

माझे एक मित्र एके दिवशीं बांद्रास महाराजांचे तसबिरीची पूजा करीत होते. महाराजांना वाहण्यासाठीं फुलें ठेविलीं होतीं त्यांत एक मोठे

बटमोगऱ्याचें अति उत्तम फूल होतें. तें महाराजांना वाहावें असें त्यांचे मनांत आलें पण फूल मोठें असल्यामुळें गंधानें चिकटविण्यासारखें नव्हतें. मग त्यांना आठवण झाली कीं महाराज फूल नेहमीं नाकाला लावतात. त्याप्रमाणें त्यांनीं फूल तसविरीत नाकाजवळ नेलें. अर्थात् नाकाजवळ नेऊन लगेच खालीं ठेऊन द्यावयाचें असा त्यांचा विचार होता पण तें फूल नाकाला लावतांच तें चिकटलें. त्यांनीं तें तसेंच तेथें राहूं दिलें व तें संध्याकाळपर्यंत तसेंच राहिलें.

(१०)

शिर्डीस बाबु खिर्वंडीकर नांवाचा ब्राह्मण होता. त्याची मुलगी शांति नांवाची तीन वर्षांचे वयाची असतां साठ्यांच्या वाड्यांच्या पिछाडीस असलेल्या विहिरींत पडली व कांहीं वेळ तेथें राहिली. मग तिला काढली व पाहिलें तों तिला कांहींहीं लागलें नव्हते. ती म्हणूं लागली मला साई-बाबांनीं वरचे वर झेलून ठेविली होती. ती स्वतःला बाबांची बहिण म्हणवित व महाराजांचे तिच्यावर प्रेम असें.

(११)

रा. रा. चिदंबर केशव गाडगीळ या नांवाचे महाराजांचे एक भक्त होते. ते सरकारी नोकरीवर होते. कांहीं दिवस नगरास कलेक्टराचे चिट-णीस होते. पुढें शिरूरास मामलेदार होते. त्यांना वेळोवेळीं दर्शनाचा लाभ घडत असे. शिरूराहून त्यांची बदली कोठें लांब झाली व तावडतोब जाऊन रुजु होण्याचा हुकूम मिळाला. महाराजांचे दर्शनास जाण्याचा अवकाश राहिला नाहीं. ते कोपरगांवाकडूनच आगगाडीनें गेले पण दर्शनास जातां येत नाहीं याबद्दल त्यांना फार हुर हुर लागली. पुढें गाडी चालली असतां एकाएकीं खिडकीवाटें एक कागदाची पुडी त्यांचे अंगावर येऊन पडली. उघडून पाहतात तो त्यांत उदीसारखी पूड दिसली. त्यांनीं ती जतन करून ठेविली. पुन्हा दर्शनास जाण्याचा योग आला तेव्हां महाराज त्यांना आपण होऊन म्हणाले " तूं आला नाहींस म्हणून मी तुला उदी पाठविली ती पोहोचलीना ? " गाडगीळांना हे शब्द ऐकून गहिंवर आला. पुढें ती उदी त्यांनीं एका ताइतांत घालून ठेविली. व ती शेवट पर्यंत त्यांचे जवळ होती.

(१२)

मला कांहीं कामा करितां इंदुरला जावयाचें होतें. अर्थात मनमाड वरून जावयाचें असल्या कारणानें श्री सद्गुरु साईबाबाचें दर्शन घेऊन पुढें जाण्याचा माझा विचार ठरला. माझ्या स्नेही मंडळींनी मला शिर्डीस जाऊं नका असें बजावलें. ते म्हणाले बाबा तुम्हाला वेळेवर जाण्याची परवानगी देणार नाहींत. मी त्यांना म्हटलें इंदुरास जाण्याला अद्यापी दोन दिवसांची अवधी आहे व तितक्यांत शिर्डीस महाराजांचे दर्शन घेऊन पुढें जावें असें माझ्या मनानें घेतलें आहे. माझा संकल्प ठरल्याप्रमाणें मी शिर्डीस गेलों. श्री सद्गुरु साईबाबांचे दर्शनासाठीं मशिदींत गेल्याबरोबर तूं केव्हां जाणार म्हणून मला विचारलें. आपण आज जाण्याची आज्ञा द्याल तर मी आज जातों असें मी समर्थांना म्हटलें, परंतु मला दोन दिवस रहाण्याला सवड आहे; असें ही मी श्री सद्गुरु साईबाबांनां सांगितलें. हें सांगितल्यावर बाबांनीं "दोन दिवस राहून जा" असें म्हटलें. श्रीच्या आज्ञेप्रमाणें मी दोन दिवस राहून पुढें इंदुरास गेलों. अर्थात् माझ्या मित्रांची भीती निरर्थक ठरली.

(१३)

सखाराम हरी उर्फ बापुसाहेब यांच्या मातुश्री वारल्या तेव्हां त्यांचे उत्तर कार्यासाठीं नाशकास जाण्याचें त्यांनीं ठरविलें व जाण्याची परवानगी महाराजांजवळ मागितली. महाराजांनीं परवानगी देण्याचें एकेक दिवस लांबणीवर टाकलें. बापुसाहेबांनीं महाराजांस सांगितलें माझ्या शाखेचा ~~ब्राह्मण येथें नाहीं व मला~~ आज नाशकास गेलेंच पाहिजे. महाराज म्हणाले दोन प्रहरीं पाहूं. हें बोलणें झाल्यावर एक घटका गेली नाहीं तोंच एक चांगला विद्वान वैदिक ब्राह्मण जोगांच्या शाखेचाच येथें आला. अर्थात मग नाशकास जाण्याचें कारण उरलें नाहीं व सर्व उत्तरकार्य येथेंच झालें. शेवटच्या दिवशीं जोगांनीं परवानगी मागितली त्यावेळीं मी जवळ होतों व मी म्हटलें "बाबा, चला आपण बापुसाहेब व मी असे अवघे निघूं, वाटेंत बापुसाहेबांनां नाशकास सोडूं व मग मुंबईस जाऊं त्यावर महाराज म्हणाले "मी कधीं कुणाला सोडणारा माणुस नाहीं."

15

(92)

...सत. हा
...राजानीं ती
...त्या डोळ्यांनीं
...बाहेरगांवींसुद्धां

...बुवा, नानासाहेब चांदोरकर आणि आणखी ...स्थ असे मिळून महाराजांच्या दर्शनास गेले. दर्शन झाल्या- कथेकरीबुवांस परत जाण्याची घाई झाली. कारण दुसरे दिवशीं ...रास त्यांची कथा व्हावयाची होती. नानासाहेब चांदोरकरांनीं महारा- ...त जाण्याची परवानगी विचारली तेव्हां महाराज ह्मणाले "जेऊन ..." नानासाहेबांनीं कथेकरीबुवांस रहाण्याविषयीं विनंति केली, पण ...ते राहीनात, आणि ते आणि त्यांचे एक स्नेही तावडतोब संवत्सर ऊर्फ ...वारी स्टेशनावर जाण्यासाठीं निघून गेले. नानासाहेबांना त्या वेळेस ...राजांनीं ह्मटलें "पहा, कसे लोक मतलबी असतात! वेळ आली ह्मणजे साथीदाराला सोडून आपल्या मतलबाला दक्ष असतात. म्हणून आपण असा साथी करावा कीं, जो आपल्याला कल्पांतींही सोडणार नाहीं."

अर्थात् सद्गुरुरायाशिवाय असा दुसरा साथी कोण मिळणार आहे? ह्मणून साथी करावयाचें तर त्यांनाच करावें. प्रेम भूतमात्रावर असावें, पण संग सद्गुरूचाच करावा. तोच संग खरा सुखकर होतो असो.

महाराजांच्या आज्ञेप्रमाणें नानासाहेब व त्यांचे स्नेही शिरडीसच जेवण करून महाराजांची आज्ञा घेऊन निघाले. निघतांना महाराज ह्मणाले "...गाडीस अवकाश आहे." ते स्टेशनावर येऊन पहातात तों

गेला.

३. हि

परम भक्त हा

द्धाळ संबंधीं

प्रांताच्या साहेबा

घाबरला आणि जातेवेळीं महारा

गेला. महाराजांनीं त्याला सांगितलें "प्रांताचे सा
तेथें जा. तेथें प्रथम श्री मोहिनीराजांला वंदन कर, आणि मग साहेबा
जाऊन जबाब दे."

आप्पानें त्याप्रमाणें केलें. साहेबानें त्याचा जबाब ऐकून त्याल
दिलें आणि ह्मटलें, कीं "तूं पैसे खाल्ले नाहींस असें खात्रीनें मला

आप्पा अर्थातच बाहेर पडल्याबरोबर नाचूं लागला, आणि मह
जांचे गुणानुवाद गाऊं लागला. नंतर शिरडीस जाऊन सर्व हकीक
त्यानें महाराजांस कळविली. महाराजांनीं अर्थात आपल्याकडे काह
कर्तृत्व न घेतां "कर्ता करविता परमेश्वर आहे; तो भक्तासाठीं करा
गोष्टी घडवून आणतो," असें उत्तर दिलें.

४ एके दिवशीं महाराजांनीं आप्पा कुळकर्णी यांस सांगितलें, कीं
"आपल्या गांवांत चोर आले आहेत; आणि त्यांची स्वारी प्रथमतः तुझ्या
घर होईल; तर तूं आपला बंदोबस्त कर. हे चोर मोठे बिलंदर आहेत
त्यांची सर्व दृष्टी ऐन मालावर असते, आणि तेवढाच ते घेऊन जातात.
आप्पानें या बोलण्याचा लौकिकी अर्थ केला, आणि सरकार धाऱ्या
पैसे त्यानें चावडींत ठेविले होते तेथें जागल्यांस पहाऱ्यास बसवून लौ
किकी बंदोबस्त केला. परंतु महाराजांनीं सुचविलेले चोर निराळे

# आतांपर्यन्त छापून आलेल्या महाराजांच्या लीळा.

एका मुलीला अर्धांगवायूचा झटका आला होता, तोही उदीनेंच बरा झाला. शेंकडोंशें लोकांचे निरनिराळे रोग नुसत्या महाराजांच्या उदीनें बरे झाल्याचीं उदाहरणें आहेत. तीं सर्व येथें देणें शक्य नाहीं; पण माझ्या एका बंगाली मित्राकडून आलेल्या पत्रांतील लहानसा उतारा देऊन हें प्रकरण पुरें करितोः—

" I am glad to inform you, that, the **Vibhuti** you so kindly gave me, while I was in Bombay, has worked wonders. I have tried it in cases of Rheumatism, Dropsy, Diabetes and Angina Pectoris. In one and all cases it has given immediate relief. If you can kindly spare some more quantity of it, I shall be very much obliged. I have a large number of coolies and staff at my disposal and I wish to use it in difficult cases.

भाषांतरः-"मी मुंबईस असतांना आपण मला जी विभूती दिली तिनें चमत्कार केले आहेत, हे कळविण्यास मला आनंद वाटतो. ती मीं संधिवात, जलोदर, मधुमेह व हृदयाचा विकार असलेल्या माणसांस देऊन पाहिली,आणि एकूणएक विकारांत तिच्यापासून ताबडतोब आराम वाटला. आपण आणखी थोडी पाठवूं शकाल, तर मजवर फार उपकार होतील. माझ्या कामावर मजूर आणि कारकून वगैरे मिळून फार मंडळी आहेत, आणि कठीण दुखण्यामध्यें तिचा उपयोग करावा, अशी इच्छा आहे."

महाराजांकडे तऱ्हेतऱ्हेचे लोक तऱ्हेतऱ्हेचीं गाऱ्हाणीं आणि तऱ्हेतऱ्हेच्या मागण्या घेऊन जातात, आणि महाराजांनीं आशिर्वाद दिला म्हणजे त्यांचीं गाऱ्हाणीं दूर होतात, आणि इतर कामना असतील त्या

सफल होतात. रोग तर बरे होतातच, पण भूतबाधेच्या संबंधानेंही लोकांनां हटकून अनुभव येतात.

मोगलाईंत परभणी येथें एक गृहस्थ आहेत. त्यांच्या येथें बरेच चमत्कारिक प्रकार होत असत. नवा कपडा आणून खुंटीवर ठेवला, की, आपोआप जळावयाला लागावयाचा. मुलांसाठीं अन्न झांकून ठेविलेलें असेल तें नाहींसें व्हावयाचें, किंवा कधींकधीं त्यांत किडे पडावयाचे त्या गृहस्थानें बिऱ्हाड बदललें तरी तोच प्रकार चालू होता. मग त्यानें दुसऱ्या गांवीं बदली करून घेतली, तरी कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें तो गृहस्थ महाराजांच्या दर्शनास आला. महाराजांनीं त्याला आशिर्वाद दिला, आणि त्या दिवसापासून सर्व प्रकार बंद झाला, असें त्यानेंच लिहून पाठविलें.

एका पारशी व्यापाऱ्याचा मुलगा एकाएकीं नाहींसा झाला, बापानें पुष्कळ शोध केला, व त्या कामांत चारपांच हजार रुपयेही खर्च केले. शेवटीं मी शिर्डींत असतां महाराजांच्या चरणीं हकीगत निवेदन करून ते उत्तर देतील तें कळवावें, अशा अर्थाचें त्यानें मला पत्र लिहिलें.

महाराजांनां हकीगत सांगतांच "मुलगा दक्षिणेकडे गेला आहे, खुशाल आहे. आणि आपण होऊन येईल," असें म्हणाले. त्याप्रमाणे तो मुलगा लवकरच परत आला, आणि मीं महाराजांनां विचारलें त्या वेळेस तो मद्रासेस होता, व खुशाल होता, असें त्या पारशी गृहस्थानें मला सांगितलें.

एका पारशी गृहस्थाचा मुलगा वेडा झाल्यामुळें पुण्याच्या इस्पितळांत ठेविला होता. त्या मुलाची स्थिति बापाला पाहवेना, इतकी वाईट होती व तिच्यांतून मुक्त होण्याची कांहीं आशा दिसेना. मुलाचा बाप महाराजांच्या दर्शनास गेला आणि महाराजांनीं तुझा मुलगा बरा होईल असा आशीर्वाद त्यास दिला, व मुलाला घरीं घेऊन येण्याविषयीं सांगितलें, इस्पितळांतली मंडळी त्याला सोडतील कीं नाहीं, ही त्या गृहस्थाच्या मनांत शंका उत्पन्न झाली; पण घरीं येऊन पहातों तों त्यांच्याकडून पत्र आलें, कीं, मुलगा येथें रहात नाहीं. त्याचें वजन कम

(१४)

एकदां माझे एक स्नेही महाराजांचे दर्शनास आले व तेथें बसल्यावर महाराजांचे पाय दाबूं लागले. पाय दाबतां दाबतां महाराज एकदम त्यांना म्हणाले " पाय दाबूं नकोस सरकून बैस " त्याप्रमाणें ते गृहस्थ मागें सरकले. थोड्या वेळानें त्यांचे डोळे भरून आलेले दिसले. त्यावर थोडा वेळ गेला व मग ते पुन: पाय दाबूं लागले. त्या वेळीं महाराज कांहीं बोलले नाहींत. नंतर ते स्नेही वाड्यांत आले तेव्हां सांगूं लागले कीं, पहिल्यांदा पाय दाबीत असतां एक अमंगळ विचार माझे मनांत आला व तत्क्षणींच महाराजांनीं मला सरकून बसावयास सांगितलें. मग मला त्याबद्दल पश्चात्ताप झाला व मनांतल्या मनांत महाराजांची क्षमा मागितली.व त्यानंतर पुन्हां पाय दाबूं लागलों तों महाराजांनीं कांहीं मनाई केली नाहीं.अशाच तऱ्हेचे अनुभव महाराजांचे भक्तांना नित्य येत. अर्थात् महाराजांची शिक्षण पद्धति अवर्णनीय होती.

(१५)

॥ श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न ॥

एकदां मी सकाळीं नित्याप्रमाणें महाराजांचे दर्शनास गेलों तेव्हां महाराज धुनीपाशीं उभे होते. मी जाऊन पायां पडतांक्षणींच महाराज म्हणाले "अरे काळजी तुला कसली. सगळी काळजी मला आहे" मी पुन्हां नमस्कार करून म्हटलें "खरेंच सगळी काळजी आपल्यालाच आहे." महाराजांना आमच्याबद्दल आमच्यापेक्षां कितीतरी पटीनें जास्त काळजी आहे याचे नित्य अनुभव येत असल्यामुळें महाराजांचें बोलणें अक्षरश: पटलें. तरीपण हे शब्द आज महाराजांनीं कां उच्चारिले या बद्दल खुलासा होईना. तो खुलासा मी मुंबईस गेल्यावर झाला. त्या दिवशीं महाराजांनीं हे शब्द उच्चारिले त्याच दिवशीं माझी मुलगी पार्ल्यास माझ्या घरीं दिवाणखान्यांत खेळत असतां कोपऱ्यांत असलेल्या कपाटावर चढूं लागली तोंच तें कपाट तिच्या अंगावर आलें. ती खालीं पडली व कपाट तिच्यावर पडलें. कपाटावर कांचेचीं व मातूचीं खेळणीं होतीं पण

सर्वस्वी काळजी वाहणाऱ्या मालकाची असी काही कृपा की ती सर्व खेळणी जणूकाय रचलेले बाजूला ठेविल्यासारखी, आणि मुलीला यत्किंचितही इजा झाली नाही. नाही म्हणावयाला तिची एक बांगडी पिचली व तिचा हात त्यामुळे थोडासा खरचटला.

असेच एकदा तीच मुलगी रात्री शौचकूपात गेली तो तेथे एक मोठा साप होता. मुलीचे वय तेव्हां पांच वर्षांचे होते. साप तिने पहाण्याचे पूर्वी तिच्या बरोबरच्या गड्यांत पाहिला व त्याने तिला तावडतोब उचलून बाहेर नेले.

(२९)

डहाणूचे बुवासाहेब काही मंडळी घेऊन एकदा द्वारकेस यात्रेला गेले होते. मुंबईहूनच आगबोटीने गेले. सर्व मंडळीची तिकिटे बुवांचे जवळ होती. तिकिटांचे दोन भाग असतात. एक बोटीच्या तिकिटाचा व दुसरा मचव्याचे तिकिटाचा. बुवांनी मचव्याची तिकिटे वेगळी फाडून एका पिशवीत ठेविली व बोटीची तिकिटे आपल्या पैशाच्या पाकिटात ठेविली. आगबोटीवर असतांना ते पैशाचे पाकीट त्यांना काही कारणास्तव बाहेर काढावे लागले त्यावेळी ते कठड्यापाशी उभे होते. पाकीट काढतां काढतां ते समुद्रात पडले. अर्थात बोटीची सर्व तिकिटे व बुवांचे पैसे, सर्व समुद्रार्पण झाले. बोटीतून उतरतांना तिकिटे द्यावी लागतात. बुवांनी तिकिट कलेक्टरास वरील मजकूर सांगितला व तिकिटे घेतली होती, या गोष्टीच्या प्रत्ययासाठी मचव्याची तिकिटे दाखविली. तितक्याने तिकिट कलेक्टरची समजूत झाली व त्याने कोणत्याही तऱ्हेने अडविले नाही. द्वारकेस उतरल्यावर गोमती स्नान केले, देवाच्या चरणास स्पर्श केला, पूजेला काही लागतो, बुवाजवळ अर्थात पैसे उरले नव्हते. व महाराजांवर अढळ श्रद्धा असल्यामुळे 'तुजवाचुनि इतरांते दीन मुख पसरोनि काय मागावे' या प्रतीतिप्रमाणे कोणाजवळ न मागतां शिर्डीस महाराजांस पत्र लिहिले. ज्या दिवशी द्वारकेस बुवांनी पत्र लिहून टाकिले त्याच रात्री महाराज डहाणूच्या एका धनिक भक्ताच्या स्वप्नात गेले व त्याला पाकीट समुद्रात पडल्याची हकीगत सां[illegible] तावडतोब पैसे पाठविण्यास

आज्ञा केली. त्या भक्तानें दुसरेच दिवशीं इन्सुअर करून पन्नास रुपये बुवांस पाठविले व स्वप्नाचा मजकूर लिहिला.

( १७ )

शंकरराव क्षीरसागर मामलतदार हे एकदां महाराजांचे दर्शनास आले असतां महाराजांनीं दक्षिणा मागितली. त्यांनीं खिशांत असलेले सर्व पैसे महाराजांचे हातांत दिले. वाडयांत आल्यावर त्यांना कोणी विचारिलें कीं 'तुम्हांला परत जाण्यास पैसे कोठें आहेत, शंकरराव म्हणाले बाबा देतील. त्याच दिवशीं संध्याकाळीं राहत्याचे पोष्टमास्तर आपल्या एका पाहुण्याला घेऊन तेथें आले. त्या पाहुण्याला शंकररावांनीं वीस रुपये कांहीं वर्षांपूर्वीं उसनें दिले होते, तें त्यानें त्या दिवशीं न मागतां शंकररावांना परत दिले.अर्थात शंकररावांची सर्व वेगमी तेवढयानें झाली.

( १८ )

महाराजांनीं देह मंगळवार ता. १५ अक्टोबर १९१८ रोजीं तिसरे प्रहरीं ठेविला. त्याच दिवशीं रात्रीं ते येथील लक्ष्मण भटाच्या स्वप्नांत गेले आणि म्हणाले बापुसाहेब जोग माझी काकडआरती करावयाला येणार नाहीं, कारण त्याला वाटलें कीं मी मेलों. मी जिवंतच आहें. तूं येऊन माझी काकडआरती कर. स्वप्नांत आज्ञा झाल्याप्रमाणें पहांटेस लक्ष्मणभट मशिदींत गेले कारण बाबांचा देह ते दिवशीं मशिदींतच ठेविलेला होता. व त्यानें जाऊन तेथें आरती केली. त्यावेळीं बाबांचा हात हालत होता असा कित्येकांना भास झाला. दोनप्रहरीं आरती नित्याप्रमाणें मशिदींत झाली व संध्याकाळीं म्हणजे ता.१६ रोजीं बाबांचा देह बापूसाहेब बुट्टींचे वाडयांत आणून ठेविला आणि तेथें त्या रात्रीं शेजारती झाली आणि तेथें नित्याप्रमाणें काकडआरती, दोन प्रहरची आरती, संध्याकाळची आरती व शेजारती हा क्रम सुरु झाला तो अद्याप चालला आहे.

( १९ )

महाराज समाधिस्त झाल्यावर दोन तीन दिवसांनीं मांत्रिकराव गोरक्ष-राव प्रधानांच्या मेहुणीचे स्वप्नांत गेले व म्हणाले, तुझ्या ट्रंकांमध्यें पिवळा

पितांबर आहे तो माझ्या समाधीवर घालण्यासाठीं पाठवून दे. त्या बाईनें तो पितांबर पुष्कळ वर्षांपूर्वी दाजूस ठेवून दिला होता व तिला त्याचें स्मरणही नव्हतें. सकाळीं उठल्यावर बाईनें आपलें स्वप्न मोरेश्वररावास सांगितलें व तावडतोब ट्रंकामधून पितांबर काढून शिर्डीस पाठविण्यासाठीं त्यांचें स्वाधीन केला. तो हल्ली येथें आहे व मधून मधून महाराजांचे समाधीवर घातला जातो.

(२०)

एके दिवशीं पहाटेस लक्ष्मणराव उर्फ काका महाजनी यांचे स्वप्नांत महाराज गेले व म्हणाले " निजलास काय. उठ माझा आज तिसावा दिवस आहे तो कर " महाजनी जागे झाले व त्यांना वाटलें कीं, तिसावा दिवस तर केव्हांच होऊन गेला असेल, तरीं पण त्यांनी दिवस मोजले व त्यांना असें आढळून आलें कीं तोच तिसावा दिवस आहे. त्यांनी ब्राह्मणाला बोलावून महाराजांच्या पादुकांना अभिषेक करविला आणि कांहीं भक्तमंडळीस जेवावयास बोलावून महाराजांची प्रथम मासिक पुण्यतिथि साजरी केली. त्यानंतर प्रत्येक मासिक पुण्यतिथि मुंबईस साजरी करण्यांत आली.

(२१)

## श्रीसाईबाबांच्या कांहीं लीलाबद्दल.

रा. रा. गणेश गोविंद नरके यांचे रा. रा. हरी सीताराम दिक्षित यांस आलेल्या ता० ४।३।१९१८ चे पत्रांतील उतारा:—

परवाचे दिवशीं ( ता. २ मार्च १९१८ ) नाथषष्ठी ( श्री एकनाथ महाराजांची पुण्यतिथी ) झाली. दुपारीं बहुतेक मंडळींना बाबांनीं आजीबाईच्या पुराणास पाठविलें, तेथें बाईनीं रसाळ वाणीनें नाथांचें चरित्र सांगितलें तिकडे न्याहारीनंतर बाबांनीं कांहीं गोष्टी सांगितल्या त्यांत नामदेव व कबीर यांचा उल्लेख होता सायंकाळीं भाकरीचे वेळीं बाबा शामाशीं भांडले; भाकरीचें ताट फेंकून दिलें व सावण्या भरविणें, फळें वांटणें वगैरे होण्यापूर्वीच समर्थांनीं नारसिंव्हाचा अवतार घेतला. बाब्या-

पु० फकीरबाबा, डॉक्टर वगैरे मंडळी स्वरूप पहावयास देवळांत गेली होती; दादाला म्हणाले " ह्याला (तात्याला) हाकून दे नाहींतर मीच खालीं जातो " आवेशांतच चौरंगाजवळ जाऊन तात्याला मारावयाला दोन धोंडे घेतले व बरेच संतापले तात्या खालीं आला; परंतु त्यानें " फळें खाऊं घातल्याशिवाय चावडींत जाऊं देणार नाहीं. " असा हट्ट घेतला. संध्याकाळीं ८-४५ ला घंटा झाली व सर्व मंडळी जमली, भजन सुरू झालें पण तात्या रुसला. बाबांनीं दादाकडून तात्याला बोलावूं पाठविलें. पण तात्या हट्ट सोडीना व बाबा फळें खाण्याचें कबूल करीनात. ९-३० झाले, १०-३० झाले, मंडप स्त्री पुरुषांनीं गच्च भरला, पालखी तयार करून ठेवली. घोडा फाटकाजवळ उभा राहिला व भजनाचा कडाका उडून राहिला. बाबा गादीजवळून उठून चौरंगाजवळ आले व नंतर खांबाजवळ जाऊन बसले. बाबा शांत होते व कांहींच बोलत नव्हते. जिल्हे पैठणांत पालखी निघेपर्यंत बाबा उशीर करणार असें जो तो बोलूं लागला व जणूं काय पैठणांतच आहोंत असें समजून मंडळी कडाक्यानेंच नाचून भजन करूं लागली. ११ वाजले व दादांनीं वरीं जाण्याची परवानगी मागितली. बाबा म्हणाले "कुठे जातोस बैस" ह्यानंतर बाबा, बिमारींत एकदा दरबार केला होता तसाच करितात कीं, काय असें वाटूं लागलें. फरक हा कीं, त्या दिवशीं अतिशय शांतता होती व ह्या दिवशीं मंडपांत भजनाचा कडाका उडून जिकडे तिकडे आनंदी आनंद होऊन राहिला होता. दोन्हीही चावडीचे दिवस होते. शेवटीं तात्यांनीं आपला हट्ट सोडला. तात्यांनीं हट्ट सोडल्यावर बाबा हट्ट धरून बसले " नाहीं जायचें " असें म्हणत, दादाला म्हणाले " बरं बा फार रात्र झाली जा आतां" भजनाला व भट्टे लोकांना शिव्या देऊन भजन बंद करविलें. म्हाळसापतीला म्हणाले "चल आपण तक्यांत जाऊं " तात्या वर गेला त्याला सर्व मंडळीस हांकून देण्यास सांगितलें. कांहीं वेळानें तात्यालाही जावयास सांगितलें. सर्व मंडळी घरोघर गेली. बापूसाहेबही गेले, समर्थ ( आम्ही मी, खडके वगैरे मशीदींतच होतों ) गादीवर बसून पुन्हां संतापले, व शिव्या देऊं लागले बहुतेकांचा उच्चार झाला त्यांत आपलेंही नांव होतें. शेवटीं दोन प्रहर रात्रींस ( बाराचे सुमारास ) " चला " असें म्हणाले वाईबाईनें घंटा पुन्हां

वाजविली. तात्या व बापूसाहेब आले व वाहवाटीप्रमाणें चावडी फार आनंदानें झाली. नाथ षष्टीचीच ही लीला होय, असें सर्वांना वाटत होतें. दुसरे दिवशीं सकाळीं बैठकीचे वेळीं ह्याच्याच गोष्टी होत्या. त्या वेळीं गोष्टी बऱ्याच लांबल्या. उठावयास १०-३० वाजले. भिंतीजवळ तात्या आला तात्या म्हणाला " काय बाबा आम्हाला नीट सांगितलं असतं कीं, दोन प्रहर रात्रींपर्यंत भजन करा म्हणजे जाऊं, तर कां आम्हीं ऐकलं नसतं. " " लई खेलाडू." बाबा म्हणाले " तुम्हीच. तुम्ही अन् बापुसाहेब हरदम खेले आहांत " लेंडीवरून परत जातांना लोकांना बाबा विचारीत होते " काल कां उशीर झाला होता ? " असो इथें फार आनंद आहे.

## ( २२ )

रा. रा. मोरेश्वरराव प्रधानांचा मोठा मुलगा एकदां बराच आजारी होता. त्या वेळीं त्यांच्या एथें एक तेलंगी शास्त्रीबुवा राहत असत. ते शास्त्रीबुवा श्री दत्तउपासक होते. त्यांना मोरेश्वरराव श्री साई महाराजांचे भजनीं लागले हें पसंत नव्हतें. ते म्हणाले तुम्ही बाबांना सोडा व श्री दत्ताला शरण जा म्हणजे तुमचा मुलगा बरा होईल. प्रधान म्हणाले बाबा हे दत्तच आहेत. शास्त्रीबुवा म्हणाले जर हा मुलगा पांच मिनिटांत दूध पिऊं लागेल तर बाबा दत्त आहेत असें मी मानीन. व उद्यां पासून मुलाला आराम वाटूं लागून लौकरच बरा होईल तर मी बाबांचे दर्शनास जाईन व सवाशें रुपये दक्षिणा देईन त्याप्रमाणें पांच मिनिटांतच मुलगा दूध पिऊं लागला व दुसरे दिवसापासून त्याला आराम पडूं लागला. मुलगा साफ बरा झाल्यावर शास्त्रीबुवा शिर्डीस महाराजांचे दर्शनास गेले सवाशें रुपये दक्षिणा दिली. नंतर तिसरे प्रहरीं महाराजांनीं पांच रुपये दक्षिणा मागितली तेव्हां माधवराव देशपांडे महाराजांस म्हणाले "सकाळीं यांनीं सवाशें रुपये दिले आतां आणखी पांच रुपये कशाला ?" महाराज म्हणाले "सवाशें रुपये दिले ते त्यानें आपल्या दत्ताला दिले. ते मला कोठें दिले !" शास्त्रीबुवांनीं मागितल्याप्रमाणें पांच रुपये दिले.

मनास आल्यास श्रीसाईबाबा आपल्या सभोंवार बसलेल्या भक्तवृन्दास मोठ्या आनंदानें अनेक गोष्टी सांगत त्यांतील कांहीं खालीं दिल्या आहेत.

त्या पर्णेप्रमाणें.

(२३)

एका माळ्याकुणब्याचा मुलगा होता. तो वाड्यांत आला. तथेंच तो वाढला. बारा वर्षें राहिल्यानंतर रडूं लागला. घरीं आईबापाकडे जाण्यासाठीं रडूं लागला. त्याला बादशहानें सांगितलें. आपल्या आवारांत पुष्कळ वाडे आहेत. त्यांतल्याच एखाद्या वाड्यांत रहा असें त्याला सांगितलें. वाडा त्याला दिला. तो पुनः रडूं लागला. मग बादशहानें आपल्या मुलीशीं त्याचें लग्न लावून दिलें या मुलीला पोर झालें नाहीं, म्हणून त्यानें माळ्याकुणब्याची मुलगी तिच्याशींही लग्न लावलें. तरी फिरून रडूं लागला. बादशहानें पुष्कळ समजाविलें तरी तो गेला. मग बादशहानें त्याला कांहीं द्रव्य दिलें कारण बादशाह मोठाच माणूस होता. त्याचें नांव राहिलें आहे.

तात्पर्य-बादशहा इतका जीव देत होता. वाडा दिला. आपली मुलगी दिली तरी आईबापाकडे जाण्याची म्हणजे संसारांत पडण्याची ओढ गेली नाहीं. बादशाहा मोठा माणूस होता म्हणून त्याला कांहीं द्रव्य दिलें. पण जर बादशहाचें ऐकलें असतें आणि राहिला असता तर राज्य मिळालें असतें.

(२४)

चार भाऊ होते. त्यापैकीं दोघे एका गांवाला गेले. ते माळी कुणबी होते तेथें एक जाणती मुलगी होती. ती कबिराची होती. तेथें त्यांनीं कांहीं सणगें घेतलीं. नंतर त्या मुलीला खुणावलें. ती गेली. तिला घेऊन ते आपल्या गांवीं गेले. मी लहान होतो. मीही संगें गेलों. गांवीं गेल्यावर लोकांनीं चौकशी केली व भय वाटलें. मग ते दोघे त्या मुलीला घेऊन एका डोंगरांत गेले. मीही मागोमाग गेलों. त्या मुलीला दोन बच्चे झाले पुढें तिच्या आईबापाला शोध लागला. कांहीं मंडळी म्हणाली पोरीला

घेऊन चला व या लोकांना मारून टाका. आईबाप म्हणाले पोरीला बच्चे झालें आहेत. आतां राहूं द्या.

( २५ )

एक वाणी होता. त्यानें तुपाचीं तीन भांडीं भरलीं. माझा म्हतारा जवळ होता तो म्हणाला माझ्यापुढें भांडी ठेवशील तर मी सगळें तूप एकदा खाईन. तितक्यांत वाण्याचा भाऊ त्याला जेवावयास बोलावयाला आला वाण्यानें तुपाची भांडी आंत दुकानांत ठेऊन कुलुप लावलें. माझ्या म्हाताऱ्याला वाणी म्हणाला मी जेऊन आलों म्हणजे तुम्हाला फुटाणे देईन. मी म्हाताऱ्याजवळच होतों. दुसरी दोन पोरें होतीं त्यांनी मागची भिंत पडकी होती. तिला एक लाथ मारली तों भिंत पडली व सगळें मोकाट झालें. मग त्या दोन पोरांनीं दोन भांड्यांतलें तूप पार केलें म्हाताऱ्यानें मला इशारा केला मग मी तिसऱ्या भांड्यांतलें तूप पार केलें. दुकानदार परत आला त्याला मी तुपाचें सांगितलें. दुकानदार पाहतो तों कांही सोनें वगैरेही नाहीसें झालें. मग आम्हाला सगळ्यांना चावडीवर नेलें. खरा चोर सांपडला आम्हाला सोडून दिलें. मग आम्हांला हगवण उगली तों सगळें तूपच हगूं लागलों मग माझ्या म्हाताऱ्यानें मला नीट केलें. त्या वाण्यानें पुढें मला दोन वर्षें जेऊं घातलें.

## श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न.

शाके १८४५ व इसवी सन १९२३ च्या रामनवमीच्या उत्सवा-बद्दल दास गणू महाराज यांनीं श्री चरणीं सादर केलेलें पत्रः—

श्री सच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचुडामणी भक्तकाम कल्पद्रुम श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांच्या पवित्र चरणारविंदीं श्रीराम नव-मीच्या जमाखर्चाची व उत्सवाची हकीगत सादर करितों तीः—

(१) या उत्सवास अष्टमीपासून आरंभ होऊन द्वादशीस काला केला. उत्सवाची समाप्ती झाली. कांहीं पुर्तता होणें राहिली होती ती पोर्णिमेस केली. असा एकंदर ६ दिवस उत्सव झाला.

(२) या उत्सवास पाहुणे मंडळी आली तीः—

श्रीमंत आण्णासाहेब बोराळकर, रावसाहेब माझोडकर, श्रीमंत आप्पासाहेब नार्नाळकर, जनार्दन अण्णा, गोविंद व्यंकटी महाजन, बाबा रामचंद्र पत्तेवार व त्यांचे गुमास्ते मंडळी, नागोबा, पापा लाला, नारायण, व्यंकोबा, बाबा श्रीमंत सरकार वुळे साहेब मंडळीसह व राणी साहेबांसह, नानासाहेब पाडकीकर, जिवन लाल गंगाराम शेटजी, भगवा-नराव मानरमकर, रामचंद्रराव वकील-वरुडकर, दादासाहेब वरुडकर, अशी मंडळी समक्ष हजर राहिली.

(३) अडचणीमुळें समक्ष न येतां ~~आज्ञामुळें त्यांनी~~ उत्सवांत भाग घेतला ती मंडळी-धोंडोपंत वकील, बळवंतराव खेडकर, शंकरराव-मुळावेकर,

(४) आतां उत्सवास मुंबईकडील मंडळी आली तीः—

रावसाहेब दाभोळकर, काकासाहेब दीक्षित, रावसाहेब तर्खड, पुर्णचंद्रभय्या, बुटी, आपल्या मंडळीसह पुरंदरे, पुण्याचे दुकानदार रा. शिंदे, माळी, आंधेरीकर बँडर, मास्तर, सुंदरराव नवलकर-

(५) आतां उत्सवास सहानुभूती दर्शविलेली मंडळी. बाळासाहेब रेगे, नारायण जनार्दन तेंडुलकर, काकासाहेब महाजनी, जनाबाई

कोठारे, मनमोहन रंगनाथ जयकर, वसंतराव, काका पाटील, श्रीकृष्ण पुरषोत्तम. भवानराव बनसोडे.

( ६ ) आतां ह्या उत्सवास खर्च झाला त्याचा तपशील:—

| जमा | | रु. खर्च | रु. |
|---|---|---|---|
| ७२-०-० | आपला चरणरज | २१० | रामचंद्र आनंदरुप मारवाडी |
| | दासगणू २५ रु. रोख | | साखर कणिक रवा तांदुळ डाळ |
| | जरीचा रुमाल २७ रु. | | वगैरे सामान पावती वरहु० |
| | ४ उपरणीं २० रु. | ४०-०-० | पंढरपुरकर आचारी |
| ७५-०-० | राजेसाहेब माझोडकर | ११५-०-० | दारुवाला शेखअहमद |
| ५०-०-० | गोविंद व्यंकटी महाजन. | | आकोलकर पावती वरहु० |
| ५०-०-० | ाझा रामचंद्र पत्तेवार | २२-०-० | कासम फकिर वाजेवाला |
| १५-०-० | धोंड. वकील. | ११-०-० | विठोबा सुतार सर्पणा ब० |
| १-०-० | शंकरराव मुळावेकर. | ५-४-६ | तेली तुकाराम |
| १-०-० | बळवंतराव खेडकर- | १०-०-० | यमाजी जगताप दूधाबद्दल |
| ५-०-० | आंधेरीकर वैडंर. | ६-०-० | भाजी |
| ५-०-० | आंधेरीकर मास्तर. | १०-०-० | रामनवमीच्या |
| १०-०-० | बापुभय्या कोठारी. | | अभिषेकाची दक्षिणा |
| ५१-०- | बुळेसाहेब | ५-०-० | आंधळे आणि पांगळे |
| ५-०-० | सुंदरराव नवलकर | | यांचीदक्षिणा. |
| ५-०-० | काकासाहेब दिक्षितांची बहीण | २७-१४-० | श्रीचा समाधी खर्च |
| | | | पावती वरहु० |
| १५-०-० | चौबळ | ५-०-० | भोजन दक्षिणा खर्च |
| ५-०-० | सीताबाई रामचंद्र सामंत. | १-८-० | म्हाळसाकांताचा फराळ |
| १-०-० | यशवंतराव अर्नाळेकर | ५-०-० | नाना चोपदार उपरणे पान |
| १०-०-० | बाबा सामंत. | ५-०-० | बाळा शिंपी ,, ,, [ १ रु.५ |
| ५-०-० | चितू शेट | ७-०-० | लक्ष्मण भट उपरणें पान १ |
| | | | रु. ७ |
| १००-०० | पापालाल. | ३७-०-० | बाबा धर्माधिकारी रामा- |

३०-०-० नागोबा वंजारी यणाचे पारायणाची
१ तुपाचा डबा रु.३० पा.द.रु.१० जरीचा रुमाल रु. २७
३०-०-० व्यंकोबा वंजारी तुपाचा डबा.
४०-०-० लक्ष्मीबाई जोगळेकर २-०-० आच्याऱ्याला बैलगाडी भाड
तांदुळाचें पीठें २-०-० विडयांची पानें.
९-०-० दादा साहेब वरुडकर. ८-८-० घासलेट डबे २
उपरणे जोडी १ची किंमत. २-१२-० चिमण्या. ४
९-०-० रामराव वरूडकर ,, १-८-० घरे सारविण्यास
५-०-० गांधी १ गुळाची ढेप मोलकरीण व गडी यांची मजुरी.
८-०-० नारायण वंजारी उपरणे जोडी १
४-८-० बाबारंगारी पत्रावळी
१॥ हजार द. ३ रु. प्रमाणें १-०-० भांडी घासणारीण कोळीण
५-०-० पापालालची सासू. २-०-० कुंभार आनाजी घागरी
४-४-० दत्तोपंत इंगोलीकर. रांजण माखे परळ मिळून
५०-०-० हनुमंत जयंतीप्रीत्यर्थ. ६-०-० नानु चहावाले संगमनेर-
उपरणे जोडया ५ एकंदर किं ५० कर उपरण्याचे पान १
६-०-० सुरुदिन घोडेवाला
६७५-१२-० एकूण जमा. उपरण्याचे पान १
९७-१०-० खूट आली ती ६-०-० अवदुल उपरण्याचें
भरण्याकरितां पान १
७७३-६-० ५-०-० मार्तंड भगत ,,
४-८-० रंग्यागुरव ,,
४-८-० मुरल्या ,,
६-०-० बाळा गुरव ,,
४-०-० महादु फसले ,,
४-८-० सुरदास ,,
४-८-० रंगतपीते ३ " पाने ३
१-८-० आनंदामास्तर " पान १
१०-८-० [illegible]

१-०-० हनुमंत जयंति प्रीत्यर्थ अभिषेक खर्च.
१५-०-० आच्यान्याला जरीचा रुमाल बांधला
१-०-० हरभरे वगैरे यांची डाळ नारळ शेंदूर
५०-०-० महार मांग भिल्ल चांभार यांना भोजन
७७३-६-० एकूण खर्च.

एणेंप्रमाणें खर्च झाला आहे. यांत पेटीची जमा हगाम्याचा खर्च व तमाशाचा खर्च दाखविला नाहीं. तो तात्या पाटलास माहित आहे.

(७) आतां आपल्या या उत्सवांत ज्यांनीं यथाशक्ति मदत केली. त्यांना आपल्या कडोन इहपर लोकाचा उत्तम आशीर्वाद असावा व त्यांचे आपण रक्षण करावें. मोगलाईंत नांदेड, मुखेड,उमरी, कुंठूर, कळ-ताजुरी, वोपाळे, रामेश्वर, सांगवी, सातेगांव, नायगांव, कोकलेगांव नार्नाळी, अशा गांवीं तुमची मंडळीं आहेत. त्यांचे आपण रक्षण करावें. आपलीं आम्हीं पिलें आहोंत. आपल्या सुखदपंखांखालीं आमचे सर्वदा रक्षण व्हावें. झालेला खर्च चरणीं सादर केला आहे. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना; न्यूनाधिकाची क्षमा करावी.

आपला चरणरज,

दासगणू

ह. भ. परायण दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवन मंजिरी

श्रीगणेशायनमः । हे सर्वाधारामयूरेश्वरा । सर्वसाक्षी गौरी कुमरा ॥
हे अचिंत्या लंबोदरा । पाहिमां श्री गणपते ॥ १ ॥
तूं सकल गणांचा आदि ईश । म्हणून म्हणती गणेश ॥
तूं संमत सर्व शास्त्रांस । मंगलरूपा भालचंद्रा ॥ २ ॥
हे शारदे वाग्विलासिनी । तूं शब्द सृष्टी स्वामिनी ॥
तुझें अस्तित्व म्हणूनी । व्यवहार चालती जगताचे ॥ ३ ॥
तूं ग्रंथकाराची देवता । तूं भूषण देशाचें सर्वथा ॥
तुझी अवघ्यांत अगाध सत्ता । नमो तुजसीं जगदंबे ॥ ४ ॥
हे पूर्णब्रह्म संतप्रिया । हे सगुणरूपा पंढरीराया ॥
कृपार्णवा परम सदया । पांडुरंगा नरहरे ॥ ५ ॥
तूं अवघ्यांचा सूत्रधार । तुझी व्याप्ती जगभर ॥
अवघीं शास्त्रें विचार । करिती तुझ्या स्वरूपाचा ॥ ६ ॥
पुस्तकज्ञानी जे जे कोणी । त्यां तूं न गवससी चक्रपाणी ॥
त्या अवघ्या मूर्खांनीं । शब्दवाद करावा ॥ ७ ॥
तुला जाणती एक संत । बाकीचे होती कुंठित ॥
तुला माझा दंडवत । आदरें हा अष्टांगीं ॥ ८ ॥
हे पंचवक्त्रा शंकरा । हे नररुंड मालाधरा ॥
हे नीलकंठादिगंबरा । ॐमकाररूपा पशुपते ॥ ९ ॥
तुझें नाम ज्याचे ओठीं । त्याचें दैन्य जाय उठाउठी ॥
ऐसा आहे धूर्जटी । महिमा तुझ्या नांवाचा ॥ १० ॥
तुझ्या चरणा वंदून । मी हें स्तोत्र करितों लेखन ॥
यास करावें साह्य पूर्ण । तूं सर्वदा नीलकंठा ॥ ११ ॥

आतां वंदूं अत्रीसुता ॥ इंदिराकुलदैवता ॥
श्री तुकारामादि सकल संतां । तेवी अवघ्या भाविकांसीं ॥ १२ ॥
जयजयाजी साईनाथा । पतीत पावना कृपावंता ॥
तुझ्या पदीं ठेवितों माथा । आतां अभय असूं दे ॥ १३ ॥
तूं पूर्ण ब्रह्म सौख्य धामा । तूंच विष्णू नरोत्तमा ॥
अर्धांगी ती ज्याची उमा । तो कामारी तूंच कीं ॥ १४ ॥
तूं नरदेह धारी परमेश्वर । तूं ज्ञान नभींचा दिनकर ॥
तूं दयेचा सागर । भवरोगां तूं औषधी ॥ १५ ॥
तूं हीनदीनां चिंतामणी । तूं तव भक्तां स्वर्धुनी ॥
तूं बुडतियांनां भव्य तरणी । तूं भीतासी आश्रय ॥ १६ ॥
जगाचें आद्य कारण । जें कां विमल चैतन्य ॥
ते तुम्हींच अहा दयाघन । विश्व हा विलास तुमचाची ॥ १७ ॥
आपण जन्मरहीत । मृत्युही ना आपणाप्रत ॥
तेंच अखेर कळून येत । पूर्ण विचारें शोधितां ॥ १८ ॥
जन्म आणि मरण । हीं दोन्हीही अज्ञानजन्य ॥
आपण दोहोंपासून । अलिप्त मुळींच महाराजा ॥ १९ ॥
पाणी झऱ्यांत प्रगटलें । म्हणून कां तेथ उपजलें ॥
तें पूर्वींच होतें पूर्ण भरलें । आलें मात्र आंतुनी ॥ २० ॥
खाचेंत आलें जीवन । म्हणून लाधलें अभिधान ॥
झरा ऐसें तिज लागून । जलाभावीं खाचची ॥ २१ ॥
लागला आणि आटला । हें मुळीं न ठावें जला ॥
कांकीं जल खाचेला । देत नव्हतें महत्व मुळीं ॥ २२ ॥
खाचेसीं मात्र अभिमान । जीवनाचा परिपूर्ण ॥
म्हणून तें आटतां दारुण । दैन्यावस्था ये तिशीं ॥ २३ ॥

नरदेहही खांच खरी । शुद्ध चैतन्य विमलवारी ॥
खांचा अनंत होती जरी । परी न पालट तोयाचा ॥ २४ ॥
म्हणून अजन्मा आपणां । मी म्हणतसें दयाघना ॥
अज्ञान नगाच्या कंदना करण्या व्हावें वज्र तुम्ही ॥ २५ ॥
ऐशा खांचा आजवर । बहूत झाल्या भूमीवर ॥
हल्लीं असून होणार । पुढेंही कालावस्थेनें ॥ २६ ॥
त्या प्रत्येक खांचेमत । निराळें नांवरूप मिळत ॥
जेणें करून जगतांत । ओळख त्यांची पटतसे ॥ २७ ॥
आतां चैतान्यमत । मी तूं म्हणणें हें ना उचित ॥
कांकीं न जेथें संभवे द्वैत । तेंच चैतन्य निश्चयें ॥ २८ ॥
आणि व्याप्ती चैतन्याची । अवघ्या जगाठाईं साची ॥
मग मी तूं या भावनेची । संगत कैशी लागते ॥ २९ ॥
जल मेघगर्भींचें । एकपणें एकसाचें ॥
अवतरणें भूवरी होतां त्याचें । भेद होती अनेक ॥ ३० ॥
जें गोदेच्या पात्रांत । तें गोदा म्हणून वाहिलें जात ॥
जें पडे कूपांत । तैसी न त्याची योग्यता ॥ ३१ ॥
संत रूप गोदावरी । तेथील तुम्हीं अहा वारी ॥
आम्हीं थिल्लर कूप सरोवरीं । म्हणून भेद तुम्हां आम्हां ॥ ३२ ॥
आम्हां व्हावया कृतार्थ । आलें पाहिजे तुम्हांमत ॥
शरण सर्वदा जोडून हात । कां कीं पवित्रता तुम्हां ठाईं ॥ ३३ ॥
पात्रामुळें पवित्रता । आली गोदा जलासी सर्वथा ॥
नुसत्या जलांत पाहतां । तें एकपणें एकची ॥ ३४ ॥
पात्र गोदावरीचें । जे कां ठरलें पवित्र साचें ॥
तें ठरण्यातट भूमीचे । गुणदोष झाले साह्य पहा ॥ ३५ ॥

मेघगर्भीच्या उदकाला । जो भूमी भाग न वदलवी भला ॥
त्याच भूमीच्या भागाला । गोदा म्हणाले शास्त्रवेत्ते ॥ ३६ ॥
इतरत्र जें जल पडलें । त्यानें पात्रगुणा स्वीकारलें ॥
रोगी कडूखारट झालें । मूळचें गोड असूनी ॥ ३७ ॥
तैसें मुख्वरा आहे येथ । षड्रिपूची न घाण जेथ ॥
त्या पवित्र पिंडाप्रत । संत अभिधान शोभतसे ॥ ३८ ॥
म्हणून संत ती गोदावरी । मी म्हणतों साजिरी ॥
अवघ्या जीवात आहे खरी । आपुली श्रेष्ठ योग्यता ॥ ३९ ॥
जगदारंभापासून । गोदा आहेच निर्माण ॥
तोयही भरलें परिपूर्ण । तुटी न झाली आजवरी ॥ ४० ॥
पहा जेव्हां रावणारी । येता झाला गोदातिरीं ॥
त्या वेळचें तेथील वारी । टिके कोठून आजवरी ॥ ४१ ॥
पात्रमात्र तेंच उरलें । जल सागर मिळाले ॥
पावित्र्य कायम राहिले । जल पात्राचें आजवरी ॥ ४२ ॥
प्रत्येक संवत्सरीं । जुनें जाऊनी नवें वारी ॥
येत पात्राभीतरी । तोच न्याय तुम्हां ठाया ॥ ४३ ॥
शतक तेंच संवत्सर ॥ त्या शतकांतील साधूवर ॥
हेंच जल साचार ॥ नाना विभूती ह्या लाटा ॥ ४४ ॥
या संतरूप गोदेसीं । प्रथम संवत्सरासीं ॥
पूर आला निश्चयेसीं । सनत्सनक सनंदनाचा ॥ ४५ ॥
मागून नारद तुंबर । ध्रुव प्रल्हाद बलि नृपवर ॥
शबरी अंगद वायूकुमर । विदूर गोपगोपिका ॥ ४६ ॥
ऐसे बहूत आजवरी । प्रत्येक शतकामाझारीं ॥
पूर आले वरच्यावरी । ते वर्णण्या अशक्य मी ॥ ४७ ॥

या सांप्रतच्या शतकांत । संतरूप गोदेप्रत
आपण पूर आलांत । साइनाथा निश्चयें ४८ ॥
म्हणून तुमच्या दिव्य चरणा । मी करितों वंदना ॥
महाराज माझ्या दुर्गुणा । पाहूं नका किमपीही ॥ ४९॥
मी हीन दीन अज्ञानी । पातक्यांचा शिखामणी ॥
युक्त अवघ्यां कुलक्षणांनीं । परि अव्हेर करूं नका ॥ ५० ॥
लोहा अंगींचें दोष । मना न आणी परीस॥
गांविच्या लेंड्या ओहोळास । गोदा न लावी परतवूनि ॥ ५१ ॥
माझ्यामधील अवघी घाण । आपल्या कृपाकटाक्षें करून ॥
करा करा वेगें हरण । हीच विनंती दासाची ॥ ५२ ॥
परिसाचा संग होऊन । लोहाचें तें लोहपण ॥
जरी न होय गुरुवरा हरण । तरी हीनत्व परिसाशीं ॥ ५३ ॥
मला पापी ठेवूं नका । आपणा हीनत्व घेऊं नका ॥
आपण परीस मी लोह देखा । माझी चाड आपणांते ॥ ५४ ॥
बालक अपराध सदैव करितें । परी न माता रागावते ॥
हें आणून ध्यानातें कृपा प्रसाद करावा ॥ ५५ ॥
हे साईनाथा सद्गुरु । तूंच माझा कल्पतरू ॥
भवाब्धीचें भव्य तारूं । तूंच असती निश्चयें ॥ ५६ ॥
तूं कामधेनु चिंतामणी । तूं ज्ञान नभींचा वासरमणी ॥
तूं सद्गुणाची भव्य खाणी । अथवा सोपान स्वर्गींचा ॥ ५७ ॥
हे पुण्यवंता परम पावना । हे शांत मूर्ते आनंदघना ॥
हे चित्स्वरूपा परिपूर्णा । हे भेदरहित ज्ञान सिंधो ॥ ५८ ॥
हे विज्ञान मूर्ति नरोत्तमा । हे क्षमाशांतीच्या निवासधामा ॥
हे भक्त जनाच्या विश्रामा । प्रसीद प्रसीद मजप्रती ॥ ५९ ॥

तूंच सद्गुरू मच्छिंद्र । तूंच महात्मा जालंदर ॥
तूं निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर । कबीर शेखानाथ तूं ॥ ६० ॥
तूंच बोधला सांवता । तूं रामदास तत्वता ॥
तूंच तुकाराम साईनाथा । तूंच सखा माणिक प्रभू ॥ ६१ ॥
या अपुल्या अवताराची ॥ परी आहे अगम्य साची ॥
ओळख आपुल्या जातीची ॥ होऊं न देतां कवणातें ॥ ६२ ॥
कोणी आपणा म्हणती यवन । कोणी म्हणती ब्राह्मण ॥
ऐसी कृष्णासमान । लीला अगाग मांडिली ॥ ६३ ॥
श्री कृष्णास पाहून । नाना प्रकारें वदले जन ॥
कोणी म्हणाले यदुभूषण । कोणी म्हणाले गुराखी ॥ ६४ ॥
यशोदा म्हणे सुकुमार बाळ । कंस म्हणे हा महाकाळ ॥
उद्धव म्हणे प्रेमळ । अर्जुन म्हणे ज्ञानजेठी ॥ ६५ ॥
तैसे गुरुवरा आपणासीं । जें ज्याच्या मानसीं ॥
योग्य वाटेल निश्चयेसीं । तें तें तुम्हां तो म्हणतसे ॥ ६६ ॥
मशीद आपुलें वसतिस्थान । विंधावांचून आहेत कर्ण ॥
फात्याच्या तऱ्हा पाहून । यवन म्हणणें भाग तुम्हां ॥ ६७ ॥
तैसी अग्नीची उपासना । पाहूनि आपुली दयाघना ॥
निश्चय होत आमुच्या मना । कीं आपण हिंदू म्हणूनी ॥ ६८ ॥
परी हे भेद व्यवहारीक । यातें चाहतील तार्किक ॥
परी जिज्ञासू भाविक । त्यां न वाटे महत्व यांचें ॥ ६९ ॥
आपुली आहे ब्रह्मस्थिती । जात गोत ना आपणाप्रती ॥
आपण अवघ्यांचे गुरुमूर्ती । अहां आद्यकारण ॥ ७० ॥
यवन हिंदूंचें विपट आलें । म्हणून तदैक्य करण्या भलें ॥
मशीदअग्नीला स्वीकारिलें । लीला भक्तांस दावावया ॥ ७१ ॥

आपण जातगोतातीत । सद्वस्तु जी का सत ॥
तीच तुम्ही साक्षात । तर्कातीत सांचकीं ॥ ७२ ॥
तर्क वितर्कांचें घोडें । चालेल किती आपणांपुढें ॥
तेथें माझें बापुडें । शब्द टिकतील कोठुनी ॥ ७३ ॥
परी पाहुनी तुम्हाला । मौन नये धरितां मला ॥
कां कीं शब्द हेंच स्तुतीला । साहित्य आहेत व्यवहारीं ॥ ७४
म्हणून शब्दें करून । जें जें होईल वर्णन ॥
तें तें सर्वदा करीन । आपुल्या कृपाप्रसादें ॥ ७५ ॥
संताची योग्यता भली ॥ देवाहून आगळी ॥
अजादुजास नाहीं मुळीं । स्थान जवळ साधुंच्या ॥ ७६ ॥
हिरण्यकश्यपू रावणाला । देवद्वेषें मृत्यु आला ॥
तैसा एकही नाहीं घडला । प्रकार संतद्वेस्तानें ॥ ७७ ॥
गोपीचंदें उकीरडयासी । गाढिलें जालंदरासी ॥
परी त्या महात्म्यासी । नाहीं वाटला विषाद ॥ ७८ ॥
उलट राजाचा उद्धार केला । चिरंजीव करूनी सोडिला ॥
ऐशा संताच्या योग्यतेला । वर्णन करावें कोठवरीं ॥ ७९ ॥
संत सूर्य नारायण । कृपा त्यांची प्रकाशपूर्ण
संत सुखद रोहिणी रमण । कौमुदी ती तत्कृपा ॥ ८० ॥
संत कस्तुरी सोज्वळ । कृपा त्यांची परिमळ ॥
संत इक्षू रसाळ । रस नव्हाळी तत्कृपा ॥ ८१ ॥
संत सुष्टदुष्टांप्रती। समसमान निश्चिती ॥
उलट पाप्यावरी प्रीती । अलोट त्यांची वसतसे ॥ ८२ ॥
गोदावरी जलांत । मळकट तेंच धुवाया येत ॥
निर्मळ तें संदुकांत । राहे लांब गोदे पूनी ॥ ८३ ॥ पासूनी

जे संदुकीमध्ये वसलें । तेंही वस्त्र एकदां आलें ॥
होते ध्यावयालागीं भलें । गोदावरीचें पात्रांत ॥ ८४ ॥
येथें संदूक वैकुंठ । गोदा तुम्हीं निष्ठावाट ॥
जीवात्मे हेच पट । षड्विकार मळ त्यांचा ॥ ८५ ॥
तुमच्या पदाचें दर्शन । हेंच आहे गोदा स्नान ॥
अवघ्या मळातें घालवून । पावन करणें समर्था ॥ ८६ ॥
आम्हीं जन हें संसारीं । मळंत आहों वरच्यावरी ॥
म्हणून आम्हींच अधिकारी । संतदर्शन घेण्यास्तव ॥ ८७ ॥
गौतमी माजी विपूल नीर आणि धुणें मळकट घांटावर ॥
तसेंच पडल्या साचार । त्याचें हीनत्व गोदेसी ॥ ८८ ॥
तुम्ही सघन शीततरूवर । आम्हीं पांथस्थ लाचार ॥
तापत्रयाचा हा प्रखर । तापलासे चंडांशु ॥ ८९ ॥
त्याच्या तापापासून सदया । करा रक्षण गुरुराया ॥
सत्कृपेची सीतळ छाया । आहे आपुली लोकोत्तर ॥ ९० ॥
वृक्षाखालीं बैसून । जरी लागतें वरून ऊन ॥
तरी त्या तरूलागून । छाया तरू कोण म्हणे ॥ ९१ ॥
तुमच्या कृपेवीण पाही । जगांत बरें होणें नाहीं
अर्जुनाला शेषशाई । सखा लाधला धर्मास्तव ॥ ९२ ॥
सुग्रीव कृपेनें विभीषणा । लाधलासे रामराणा ॥
संतामुळेंच मोठेपणा । लाधला श्रीहरीसी ॥ ९३ ॥
ज्याचें वर्णन वेदासी । न होय ऐशा ब्रम्हासीं ॥
सगूण करून भूमीसी । नाचविलें संतांनीच ॥ ९४ ॥
दामाजीनें बनविला महार । वैकुंठपती रुक्मीणीवर ॥
चोखोबानें ओढण्या ढोरें । राबविलें त्या जगदात्मया ॥ ९५ ॥

संतमहात्व जाणून । पाणी वाहीं जगज्जीवन ॥
संत खरेंच यजमान । सच्चिदानंद प्रभूचें ॥ ९६ ॥
फार बोलणें नलगें आतां । तूंच आम्हां माता पिता ॥
हे सद्गुरु साईनाथा । शिर्डि ग्रामनिवासिया ॥ ९७ ॥
बाबा तुमच्या लीलेचा । कोणा न लागे पाउसाचा ॥
तेथें माझी आर्षवाचा । टिकेल सांगा कोठून ॥ ९८ ॥
जड जीवांच्या उद्धारार्थ । आपण आलांत शिर्डीत ॥
पाणी ओतून पणत्यांत । दिवे तुम्हीं जाळिलें ॥ ९९ ॥
सवाहात लाकडाची । फळी मंचक करून साची ॥
आपुल्या योगसामर्थ्याची । शक्ति दाविली भक्तजना ॥ १०० ॥
वांझपणा कैकांचा । तुम्ही केलांत हरण साचा ॥
कित्येकांच्या रोगांचा । बीं मोड केलांत उदीनें ॥ १०१ ॥
वारण्या ऐहिक संकटे । तुम्हां न कांही अशक्य वाटे ॥
पिपीलिकेचें कोठून मोठें । ओझें मानी जगपती ॥ १०२ ॥
असो आतां गुरुराया । दीनावरी करा दया ॥
मी तुमच्या लागलों पाया । मागें न लोटा मजलागी ॥ १०३ ॥
तुम्ही महाराज राजेश्वर । तुम्हीं कुबेराचे कुबेर ॥
तुम्ही वैद्यांचे वैद्य निर्धार । तुम्हांविण ना श्रेष्ठ कोणी ॥ १०४ ॥
अवांतराचे पूजेस । साहित्य आहे विशेष ॥
परी पूजाया तुम्हांस । जगीं न पदार्थ राहिला ॥ १०५ ॥
पहा सूर्याचिया घरीं । सण दिपवाळी आली खरी ॥
परि ती त्यानें साजिरी । करावी कोणत्या द्रव्यें ॥ १०६ ॥
सागराची शमवावया । तहान जल ना महीठाया ॥
वन्हीलागीं शेकावया । अग्नी कोठून द्यावा तरी ॥ १०७ ॥

जे जे पदार्थ पूजेचे । ते ते तुमच्या आत्म्याचे ॥
अंश आधींच असती साचे । श्रीसमर्था गुरुराया ॥ १०८ ॥
हें तत्व दृष्टीचें बोलणें । परी न तैशी झालीं मनें ॥
बोललों अनुभवाविणें । शब्दजाल निरर्थक ॥ १०९ ॥
व्यवहारीक पूजन जरी । तुमचें करूं मी सांग तरी ॥
तें कराया नाहीं पदरीं । सामर्थ्य माझ्या गुरुराया ॥ ११० ॥
बहुतेक करून कल्पना । तुमच्या करतों पूजना ॥
तेंच पूजन दयाघना । मान्य करा या दासाचें ॥ १११ ॥
आतां प्रेमाश्रु करून । तुमचें प्रक्षालितों चरण ।
सद्भक्तीचें चंदन । उगाळून लावितों ॥ ११२ ॥
कफनी शब्दालंकाराची । घालितों ही तुम्हां साची ॥
प्रेमभाव या सुमनांची । माळा गळ्यांत घालितों ॥ ११३ ॥
धूप कुत्सितपणाचा । तुम्हांपुढें जाळितों साचा ।
जरी तो वाईट द्रव्याचा । परी ना सुटेल घाण त्यासीं ॥ ११४ ॥
सद्गुरुविण इतरत्र । जे जे धूप जाळितात ॥
त्या धूप द्रव्याचा तेथ । ऐसा प्रकार होतसे ॥ ११५ ॥
धूप द्रव्यास अग्नीचा । स्पर्श होताक्षणीं साचा ॥
सुवास सद्गुण तदंगीचा । जात त्याला सोडूनि ॥ ११६ ॥
तुमच्या पुढें उलटें होतें । घाण तेवढी अग्नींत जळतें ॥
सद्गुण उरती पाहण्यातें । अक्षयीचे जगास ॥ ११७ ॥
मनींचें जळाल्या कुत्सितपण । मलरहित होईल मन ॥
गंगेचें गेल्या गढूळपण । मग ती पवित्र सहजची ॥ ११८ ॥
दीप माया मोहाचा । पाजळितों मी हा साचा॥
तेणें वैराग्य प्रभेचा । होवो गुरुवरा लाभ मनीं ॥ ११९ ॥

शुद्ध निष्ठेचें सिंहासन । देतों बसाया कारण ॥
त्याचें करूनियां ग्रहण । भक्तिनैवेद्य स्वीकारा ॥ १२० ॥
भक्तीनैवेद्य तुम्हीं खाणें । तद्रस मला पाजणें ॥
कांकीं मी तुमचें तान्हें । पयावरी हक्क माझा ॥ १२१ ॥
मन माझें दक्षणा । ती मी अर्पितों आपणां ॥
जेणें नुरेल कर्तेपणा । कशाचाही मजकडे ॥ १२२ ॥
आतां प्रार्थना पूर्वक मात्र । घालितों मी दंडवत ॥
तें मान्य होवो आपणांप्रत । पुण्य श्लोका साईनाथा ॥ १२३ ॥

॥ प्रार्थनाष्टक ॥

॥ श्लोक ॥

शांत चित्ता महाप्रज्ञा साइनाथा दयाघना ॥
दया सिंधो सत्स्वरूपा । माया तम विनाशना ॥ १ ॥ १२४ ॥
जात गोतातिता सिद्धा । अचिंत्या करुणालया ॥
पाहि मां पाहि मां नाथा । शिर्डीग्राम निवासिया ॥ २॥ १२५ ॥
श्री ज्ञानार्का ज्ञान दात्या । सर्व मंगलकारका ॥
भक्त चित्त मराळा हे । शरणागत रक्षका ॥ ३ ॥ १२६ ॥
सृष्टिकर्ता विरिंची तूं । पाता तूं इंदिरापती ॥
जगत्रयो लया नेता । रूद्र तो तूंच निश्चिती ॥ ४ ॥ १२७ ॥
तुजवीणें रिता कोठें । ठाव नाया महीवरी ॥
सर्वज्ञ तूं साईनाथा । सर्वांच्या हृदयांतरीं ॥ ५ ॥ १२८ ॥
क्षमा सर्वापराधाची । करावी हेंच मागणें ॥
अभक्ती संशयाच्या त्या । लाटा शीघ्र निवारणें ॥ ६ ॥ १२९॥
तूं धेनू वत्स मी तान्हें । तूं इंदू चक्रवाक मी ॥
स्वर्नदी रूपत्वत्पादा । आदरें दास हा नमी ॥ ७ ॥ १३० ॥

ठेव आतां शिरीं माझ्या । कृपेचा करपंजर ॥
शोक चिंता निवारावी । गणू हा तव किंकर ॥ ८ ॥ १३१ ॥
या प्रार्थनाष्टकें करून । मी करीतों साष्टांग नमन ॥
पापताप आणि दैन्य । माझें निवारा लवलाहीं ॥ १३२ ॥
तूं गाय मी वासरूं । तूं माय मी लेकरूं ॥
माझे विषयीं नको धरूं । कठोरता मानसीं ॥ १३३ ॥
तूं मैलागिरी चंदन । मी कांटेरी झुडुप जाण ॥
तूं पवित्र गोदा जीवन । मी महापातकीं ॥ १३४ ॥
तुझें दर्शन होवोनिया । दुर्बुद्धी घाण माझे ठाया ॥
राहिल्या तैशीच गुरुराया । चंदन तुजला कोण म्हणे ॥ १३५ ॥
कस्तुरीच्या सहवासें । मृत्तिका मोल पावतसे ॥
पुष्पासंगें घडतसे । वास मस्तकीं गुरुराया ॥ १३६ ॥
थोराची ती हीच रीती । ते ज्या ज्या गोष्टी ग्रहण करिती ॥
त्या त्या वस्तूना पाववती । ते महत्पदाकारणें ॥ १३७ ॥
भस्म, कौपीन नंदीचा । शिवें केला संग्रह साचा ॥
म्हणून त्या वस्तूंचा । गौरव होत बहूंकडे ॥ १३८ ॥
गोपरंजनासाठीं । वृंदावनीं यमुना तटीं ॥
काला खेळला जगजेठीं । तोही मान्य झाला बुधां १३९ ॥
तैसा मी तो दुराचारी । परी आहें तुमच्या पदरीं ॥
म्हणून विचार अंतरीं । याचा कराहो गुरुराया ॥ १४० ॥
ऐहिक वा परमार्थिक । ज्या ज्या वस्तूंस मानील सुख ॥
माझें मन हें निःशंक । त्या त्या तुम्ही पुरविणें ॥ १४१ ॥
आपुल्या कृपेनें ऐसें करा । सदाकाळीं आसरा ॥
नीट कोण्या सागरा । सांसारिकमनाची नसे भिती ॥ १४२ ॥

सागरा गोड करण्याची । शक्ति आपणामध्यें साची ॥
म्हणून दास गणूची । याचना हीं पुरी करा ॥ १४३ ॥
कमीपणा जो जो माझा । तो तो अवघा तुझा॥
सिद्धांचा तूं आहेस राजा । कमीपणा न बरवा तुजशीं ॥ १४४ ॥
आतां कशास्तव बोलूं फार । तूंच माझा आधार ॥
शिशू मातेच्या कडेवर । असल्या निर्भय सहजची ॥ १४५ ॥
असो या स्तोत्रासीं । जे जे वाचतील प्रेमेसी॥
त्यांच्या त्यांच्या कामनेसी । तुम्हीं पुरवा महाराजा ॥ १४६ ॥
या स्तोत्रास आपुला वर । हाच असो निरंतर ॥
पठणकर्त्यांचे त्रिताप दूर । व्हावे एक संवत्सरीं ॥१४७॥
शुचिर्भूत होऊन । नित्य स्तोत्र करावें पठण ॥
शुद्धभाव ठेवून । आपुलिया मानसीं ॥ १४८ ॥
हें अशक्य असलें जरी । तरी प्रत्येक गुरुवारीं ॥
सद्गुरु मूर्ति अंतरीं । आणून पाठ करावा ॥ १४९ ॥
तेंही अशक्य असल्यास । प्रत्येक एकादशीस ॥
वांचणें या स्तोत्रास । कौतुक त्याचें पहावया ॥ १५० ॥
स्तोत्र पाठकां उत्तम गती । अंती देईल गुरुमूर्ति ॥
ऐहिक वासना सत्वर गती । त्याची पुरवून श्रोते हो ॥ १५१ ॥
या स्तोत्राच्या पारायणें । मंद बुद्धि होतील शहाणे ॥
कोणा आयुष्य असल्या उणे । तो पठणें होय शतायु ॥ १५२॥
धनहीनता असल्या पदरीं । कुबेर येऊन राबेल घरीं ॥
हें स्तोत्र वाचल्यावरी । सत्य सत्य त्रिवाचा ॥ १५३ ॥
संतति हीना संतान । होईल स्तोत्र केल्या पठण ॥
स्तोत्र पठकाचें संपूर्ण । रोग जातील दिगंतरा ॥ १५४ ॥

भय चिंता निमेल । मान मान्यता वाढेल ॥
अविनाश ब्रम्ह कळेल । नित्य स्तोत्राच्या पारायणें ॥ १५५ ॥
धरा बुध हो स्तोत्राविशीं । विश्वास आपुल्या मानसीं ॥
तर्क वितर्क कुकल्पनेशीं । जागा मुळीं देऊं नका ॥ १५६ ॥
शिर्डी क्षेत्राची वारी करा । पाय बाबांचे चित्तीं धरा ॥
जो अनाथांचा सोयरा । भक्तकामकल्पद्रुम ॥ १५७ ॥
त्याच्या प्रेरणे करून । हें स्तोत्र केलें लेखन ॥
मज पामरा हातून । ऐसी रचना होय कैसी ॥ १५८ ॥
शके अठराशें चाळीसांत । भाद्रपद शुद्ध पक्षांत ॥
तिथी गणेश चतुर्थी सत्य । सोमवारीं द्वितीय प्रहरीं ॥ १५९ ॥
श्री साईनाथ स्तवन मंजिरी । पूर्ण झाली महेश्वरीं
पुनित नर्मदेच्या तिरीं । श्री अहिल्ये सन्निध ॥ १६० ॥
महेश्वर क्षेत्र भलें । स्तोत्र तेथें पूर्ण झालें ॥
प्रत्येक शब्दासीं वदविलें । श्री साईनाचें शिरुन मनीं ॥ १६१॥
लेखक शिष्य दामोदर । यास झाला साचार
दास गणू मी किंकर । अवघ्या संत महंतांचा ॥ १६२ ॥
स्वस्ति श्री साईनाथ स्तवन मंजिरी । तारक होवो भव सागरीं ॥
हेच विनती अत्यादरीं । दास गणु श्री पांडुरंगा ॥ १६३ ॥

श्री हरिहरार्पणमस्तु । शुभं भवतु । पुंडलीकवरदहरी विठ्ठल ॥
सीताकांतस्मरण जय जय राम । पार्वतीपते हर हर
महादेव ॥ सद्गुरु साईनाथ महाराजकी जय ।

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पण मस्तु शुभं भवतु ॥

# श्रीसाई लीला.

## (मासिक)

वर्ष १ लें. | ज्येष्ठ शके १८४५. | अंक ३ रा.

## महाराजांचे अनुभव

रा. रा. नीलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे यांनीं श्रीसमर्थ साई बाबांचे बाबतींत आपल्यास आलेल्या अनुभवांचें ता. १८-२-२० रोजीं एक पत्र लिहिलें आहे त्यांतील बराचसा भाग फारच वाचनार्ह वाटल्यावरून खालीं देण्यांत येत आहे तो येणें प्रमाणें:—

(१) सन १९१० सालीं डिसेंबर महिन्याचे प्रारंभीं मीं वांद्रें येथें एका बंधूंच्या घरीं रात्रीं "पंचदशी" वाचीत असतां सुमारें ११ वाजतां मित्र भाऊसाहेब दीक्षित आणि नानासाहेब चांदोरकर हे मुंबईहून पारलें येथें जात असतां तेथें अकस्मित आले; व थोडेंसें बोलणें होऊन नंतर "तुम्ही शिरडीस केव्हां जाणार" असा प्रश्न नानासाहेबांनीं मला विचारला त्यास "केव्हां तरी जाईन" असा मी जबाब दिला. ह्यापूर्वी त्या दोन्ही मित्रांनीं शिरडीस श्रीच्या दर्शनार्थ जाण्याविषयीं मला आग्रहपूर्वक बरेच वेळ सांगितलें होतें, असें असतां माझा तेथें जाण्याचा बेत ठरलेला नाहीं, हें पाहून मला तावडतोब दुसरे दिवशींच (रविवारीं) निघण्याविषयीं त्यांनीं आग्रह केला; आणि सोमवारीं पेन्शन घेऊन जाईन असें मीं त्यांना सांगितलें; तेव्हां माझ्या जाण्याविषयीं त्या दोघांची व विशेषत: नानासाहेबांची आतुरता इतकी विलक्षण होती कीं, त्यांचा व माझा परिचय विशेष दृढ नसतांहि त्यांनी खर्चाकरितां मला दहा रुपये देऊन तुमचें "पेन्शन आणविण्याची तजवीज अण्णासाहेब दाभोळकर करतील" असें मला सांगितलें. हा प्रकार थोडासा शिष्टसांप्रदायाविरुद्ध

होता, तथापि त्यांच्या सद्हेतूकडे लक्ष देऊन मला त्यांचें म्हणणें कबूल करावें लागलें. तथापि मला शिरडीस बरेच दिवस राहण्याची इच्छा झाल्यास दहा रुपये कसे पुरतील हा प्रश्न मी उपस्थित करतांच, मला लागतील तितके पैसे बिनहिशोबी देण्याबद्दल भाऊसाहेबांनीं आपल्या शिर्डी येथील खजीनदाराच्या नांवें मला एक पत्र दिलें. जाण्याचा माझा बेत नसतांहि मी निरुत्तर होऊन मुकाट्यानें त्या मित्रांचें म्हणणें मान्य केलें, आणि दुसरे दिवशीं सांयकाळीं शिर्डीच्या मार्गास लागलों. मुंबईहून मनमाडास जाणाऱ्या मेल गाडींत बसतों तोंच माझ्या डब्यांत "एम्. ए". ची परिक्षा झालेले व "एल्एल्. बी" च्या परिक्षेस लवकरच बसणारे कोपरगांवचे एक तरुण गृहस्थ होते. त्यांच्याशीं माझें बोलणें सुरू झालें, तेव्हां "शिर्डीच्या साईबाबांची आपणांस कांहीं माहिती आहे काय?" असा मी त्यांना प्रश्न केल्यावरून "तो वेडा पीर मला चांगला माहीत आहे" असा त्यांनीं मला जबाब दिला. तो ऐकून शिर्डी येथील खुळ्यांच्या बाजाराविषयींची माझी पूर्व कल्पना दृढ झाली. वाटेंत कोपरगांव येथें ह्या नूतन मित्रांच्या घरीं सोमवारीं सकाळीं चहा वगैरे होऊन ९।१० वाजण्याचे सुमारास मी शिर्डीस पोहोंचलों. टांगेवाल्यानें मला रावबहादूर साठे ह्यांच्या वाड्यांत नेलें; आणि तेथें मी भाऊसाहेबांच्या खजीनदारांचा ( माधवराव देशपांडे यांचा ) शोध करणार, इतक्यांत तेथें एका उघड्या दालनांत बैठकीवर बसलेले माझे जुने मित्र श्रीयुत लक्ष्मण कृष्णाजी ऊर्फ तात्यासाहेब नूलकर ह्यांच्याकडे माझी नजर जाऊन मी त्यांच्या नांवानें त्यांना हाक मारून नमस्कार केला. तेव्हां मध्यंतरीं अनेक वर्षे गेल्यामुळें त्यांनीं प्रथमतः मला न ओळखल्याकारणानें आमचें थोडेसें विनोदपर भाषण झाल्यावर मी आपलें नांव त्यांना सांगतांच त्यांनीं मला मोठ्या प्रेमानें दृढालिंगन देऊन माझें पुढचें सर्व काम करण्याचा त्यांनाच हक्क असल्यामुळें त्यांनीं मला तेथें बसवून घेतलें. नंतर माधवराव देशपांडे यांना त्यांनीं बोलावून आणून माझी सर्व हकीकत त्यांना निवेदन केली. पुढें श्रींच्या आरतीची वेळ होण्यापूर्वीच आम्हीं स्नानें आटोपून घेतलीं. व तात्यासाहेबांनीं मला आपल्या बरोबर आरतीसाठीं मशीदींत नेलें. श्रींच्या चरणांवर तात्यासाहेबांनीं

मस्तक ठेवून ते शेजारीं उभे राहिल्यावर मी केवळ शिष्टसांप्रदायानुसार त्यांचें अनुकरण केलें, तों लागलीच "तात्याबाला नमस्कार करावा, बापूसाहेबाला नमस्कार करावा, त्यांत आपल्याला कांहीं कमीपणा नाहीं" असे शब्द श्रीच्या मुखांतून निघाले. हा प्रकार वारकरी मंडळींत सार्वत्रिक दृष्टीस पडतो. बापूसाहेब जोग ह्यांचा व माझा तात्यासाहेबांनीं पूर्वीच परिचय करून दिला होता, तेव्हां श्रीच्या उक्तीप्रमाणें पुन: फक्त शिष्टसांप्रदायार्थ मीं त्या दोघांना नमस्कार करून उभा राहिलों, तों लागलीच " तात्याबाची सेवा करीत जा " असे शब्द मला उद्देशून श्रीच्या मुखांतुन निघाले; आणि हेच सेवेसंबंधीं शब्द पुन: दुसरे दिवशीं व फिरून तिसरे दिवशीं असे त्रिवार दुपारच्या आरतीच्या वेळीं मला उद्देशून श्रींनीं उच्चारिले. हुबळी येथील श्री सिद्धारूढ स्वामी, एलिचपूर येथील श्री शंकर भट्टजी, पलूस येथील धोंडीबाबा, व सुमारें वीस बावीस वर्षांपूर्वी पुणें येथील सोमेश्वराचे देवालयांत कांहीं दिवस असलेले एक खरे परमहंस इत्यादि पुरुषश्रेष्ठांच्या दर्शनानें वेदान्तपर ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें सत्पुरुष जगांत आहेत, अशी कल्पना पूर्वीच दृढ झाली होती, तरी श्रीच्या अधिकाराबद्दल मन साशंकित असल्याकारणानें प्रथमदिवसापासूनच श्रीच्या आज्ञेनुसार मला कांहींतरी सेवा सांगण्याविषयीं, केवळ विनोदानें, मी तात्यासाहेबांना बराच आग्रह करीत असें; आणि सरतेशेवटीं "तुमच्या थट्टेनें मला फार दु:ख होतें, येवढ्याकरितां तरी ती आतां पुरी करा" असें त्यांनीं मला स्पष्ट सांगितलें तोंपर्यंत कित्येक दिवस माझा तो क्रम सुरू होताच.

ह्यानंतर एकदां " आपल्या बोलण्याचा प्राय: कांहीं एक अर्थबोध होत नसून, ही आपली बडी भक्तमंडळी त्याचा उगीच खुळ्यासारखा खल करीत बसतात, तसें मीं कांहीं करणार नाहीं. मला कांहीं सांगावयाचें असेल तर तें आपण मला अगदी स्पष्ट सांगावें" अशी बाबांना मी विनंति केली; तेव्हां "ठीक आहे" येवढेंच ते म्हणाले; आणि नंतर थोडक्याच दिवसांत "आमचा अनुभव वेलावरचा ( Indirect ) नाहीं; ज्याला तो पटला असेल त्यानें जावें; नसेल त्यानें तो घेऊन जावें " असें ते आपल्या नेहमीच्या लाक्षणिक ( Parabolical ) भाषणांत

मध्येंच बोलून गेले. हे शब्द फक्त माझ्यासाठींच होते, हें माझ्या लक्षांत आलें; आणि "ठीक आहे, आतां माझी खात्री होईपर्यंत मी येथून जाणार नाहीं" असें मी त्यांना ताबडतोब बजावून सांगितलें, तेव्हांही ते फक्त "ठीक आहे" येवढेंच बोलले. माझ्या परत जाण्याची गोष्ट बाबांपाशीं माधवराव देशपांडे नेहमीं दोन चार दिवसांनीं काढीत असत, अशा वेळीं एकदां "आपल्याला त्याचें काम आहे, त्याला मशीदीपाशीं असाच कुत्र्यासारखा पडून राहूं दे" असें ते म्हणाले; आणि दुसऱ्या एका वेळीं "तो माझाच आहे, त्याचें काम मलाच केलें पाहिजे; माझ्याशिवाय त्याला कोण आहे?" असें मला अभिवचन मिळालें. इतके दिवसपर्यंत तात्यासाहेबांची प्रकृति उत्तम होती; परंतु नंतर थोडक्याच दिवसांत ती फारच बिघडली, तेव्हां ते बरे होईतोंपर्यंत तेथून परत न जाण्याचा मी निश्चय केला; आणि सरतेशेवटीं मार्च महिन्यांत त्यांचा तेथेंच अंत झाला. ह्या त्यांच्या रुग्णावस्थेंत श्रींच्या मुखांतून माझ्या पहिल्या तीन दिवसांत निघालेल्या उक्तीची तथ्यता तेथील सर्व लोकांस आणि विशेषतः तात्यासाहेबांस इतकी बेमालूम पटली कीं, एके दिवशीं "नीलकंठराव! बाबांनीं केवळ माझे हाल होऊं नयेत, येवढ्याच करितां तुम्हांला येथें आणिलें, असाच त्यांच्या प्रथम दिवसाच्या आज्ञेचा स्पष्ट अर्थ नव्हे काय?" असा त्यांनीं डोळ्यांत अश्रू आणून मला प्रश्न केला. आणि अखेरीस दृष्टि एकाग्र करून आपल्या दोन्ही चिरंजिवांना "आतां दृष्टी पुढें ऐसाचि तूं राहे" हा अभंग म्हणावयास सांगून, त्यांचें भजन चाललें असतां श्रींचें पादोदक मी त्यांना दिल्यानंतर आपली दृष्टि स्पष्ट अढळ ठेवून त्यांनीं प्रातःकालीं देहत्याग केला. हा प्रकार घडण्याचे पूर्वी आदले दिवशीं सुमारें २-३ वाजतां (त्यांची प्रकृति विशेष बिघडावयास लागण्याचे अगोदर) "माझें म्हणणें ऐकून तात्याबा येथें राहिला आणि त्यानें आपल्या देहाचें सार्थक केलें," असें श्रीबाबा माधवराव देशपांडे यांना म्हणाले होते; परंतु त्यावेळीं तात्यासाहेबांचा अंत इतका जवळ आला आहे, अशी नुसती कल्पना देखील, "एल्. एम्. अॅण्ड एस्." ची परिक्षा पास होऊन जळगांव येथें स्वतंत्र हॉस्पिटल चालवीत असलेल्या यांच्या थोरल्या चिरंजीवांनाही आली नाही

तात्यासाहेबांचा अंतकाळचा प्रकार पाहून "असा मृत्यु येणें हें महा पुण्याचें फल आहे" असे उद्गार तेथील सर्व भक्तमंडळींच्या तोंडून निघाले; कारण सर्वांना त्या वेळीं साहजिकच "अंतकालेच मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्। यःप्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्॥" ह्या भगवदुक्तीचें स्मरण झालें. हा बाबांचा प्रसाद.

(२) रात्रीं स्वप्नें न पडतां अलीकडे ३५।३६ वर्षांत एक आठवडाहि गेलेला मला स्मरत नाहीं; परंतु शिरडीस असतांना महिनेच्या महिने माझे तसे गेले, ह्याचें कारण बाबांच्या कृपेशिवाय दुसरें कांहीं असावें, अशी माझी कल्पनाहि होत नाहीं; कारण शिरडीस माझी प्रकृति जितकी चांगली होती, तितकी किंवा त्याहूनहि अधीक चांगली अनेकदां इतरत्रही असे; परंतु स्वप्नें हीं नेहमीं पडावयाचींच.

(३) एकदां दुपारच्या आरतीच्या वेळीं एका गृहस्थानें आणलेल्या मिठाईचा प्रसाद श्री मंडळीस वांटीत असतांना, आपली पाळी येते किंवा नाहीं अशी कल्पना माझ्या मनांत येतांच, "तुला कांहींच नाहीं" अशी हातानें खूण करून बाबांनीं स्मित हास्य केलें, आणि नंतर मला प्रसाद दिला.

(४) दादाभट देशपांडे हें नांव माझ्या नांवाऐवजी घालून एके दिवशीं माझ्या मानी व करारी स्वभावाचें, माझ्या कुटुंबाचें आणि परिस्थितीचें बाबांनीं हुबेहुब केलेलें वर्णन ऐकून भाऊसाहेब दीक्षितांनीं "हे दादाभट देशपांडे कोण?" असा मला प्रश्न केला; कारण त्या नांवाचा गूढार्थ माझ्याप्रमाणें त्यांनाहि पूर्णपणें समजला. इतरांना मात्र तो समजला नाहीं.

(५) ऐके दिवशीं मी मशीदींत गेल्याबरोबर 'या रामय्या' असें म्हणून बाबांनीं मला वर बोलाविलें; आणि पुढें कांहीं दिवसांनीं उदी (अंगारा) वांटतांना माझी नमस्कार करण्याची पाळी आली, तेव्हां मी नमस्कार केल्यावर माझ्या हातांत उदी देऊन मस्तकावर हात ठेवतांना "रामरामीध्या" असें ते म्हणाले; कारण "श्रीरामं सर्व कर्मणि" (चिंतयेत्) ह्या वाक्यावर माझी श्रद्धा होती.

( ६ ) एकदां माझ्या मनांत एक सारखें तीन दिवस "आपणा सारिखे करिती तात्काळ" ह्या संतोक्तीचें चिंतन चाललें असतांना, मला परत जाण्याविषयीं आज्ञा केव्हां होणार, असा माधवराव देशपांडे ह्यांनीं बाबांस प्रश्न केला, तेव्हां "माझ्या जागयावरून मला उठवून तेथें त्याला एकदम बसावयास पाहिजे; त्याला मी काय करूं? तें काम फार सबूरीचें आहे" असे स्पष्ट शब्द बाबांच्या तोंडांतून निघालेले ऐकून मी चकित झालों. इतर कोणांसहि ह्या त्यांच्या बोलण्याचा अर्थ मुळींच समजला नाहीं.

( ७ ) शिर्डी येथें प्रथम जातांना ज्या तरुण विद्वान गृहस्थांचा माझा नूतन परिचय झाला होता, तेच गृहस्थ नंतर सुमारें १।२ महिन्यांनीं शिर्डीस आले त्यावेळीं बाबांच्या अधिकाराविषयींची माझी मूळची साशंकित वृत्ति सर्वस्वी नष्ट झालेली असल्यामुळें मी सहजच त्या गृहस्थांना पुन्हां पूर्वींचाच प्रश्न केला; आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, बाबांना तत्पूर्वी अनेकदां पाहून त्यांच्याविषयीं जो त्यांनीं आपला ग्रह करून घेतला होता, तो अवघ्या अर्ध्या तासांत बदलून गेल्याचें त्यांनीं स्वमुखानें कबूल केलें; परंतु ह्या " मानसिक स्थित्यंतराबद्दल त्यांना कोणतेंहीं कारण मला सांगतां आलें नाहीं.

( ८ ) पहिल्या खेपेस बाबांनीं मजपाशीं प्रथमतः १२ रुपये दक्षिणा मागितली, व नंतर कांहीं दिवसांनीं पुनः ८ रुपये दक्षिणा मागून घेतली. त्यापुढें कांहीं दिवसांनीं आमचे मित्र रा. रामचंद्र वामन ऊर्फ भाऊसाहेब मोडक यांजकडून बाबांना दक्षिणा देण्यासाठीं तात्यासाहेबांच्याकडे पांच रुपये मनीऑर्डरनें आले, ते त्यांनीं बाबांना देण्यासाठीं मजपाशीं दिले. ही रक्कम मी बाबांकडे हजर केली, तेव्हां "हे रुपये तूंच ठेव, तुला खर्चास लागतील" असें बाबांनीं मला सांगितलें; परंतु ते ठेवून घेणें इष्ट न वाटल्यामुळें, आणि खर्चास लागणारी रक्कम मजपाशीं भरपूर असल्यामुळें, मी बाबांना तसें कळवून पुनः ते पांच रुपये परत करूं लागलों. तेव्हां "ही रक्कम तुला खर्चास लागेल असें मी तुला सांगतों आहे, सबब ती तुजपाशींच असूं दे" असें त्यांनीं-

मला फिरून सांगितल्यामुळें ती मी निरुपायास्तव ठेवून घेतली. नंतर परत जाण्याची आज्ञा मिळाल्यावर मी शिरडीहून मुंबईस किंवा पुण्यास जाणार होतों; परंतु कांहीं अकल्पित कारणानें मला शिरडीहून जळगांवास जाण्याचा प्रसंग आला. त्या वेळीं मला लागणाऱ्या रकमेंत बरोबर पांचच रुपयांची तूट आली, ती भरून काढण्यासाठीं बाबांनीं दिलेले पांच रुपये मोहोरबंद पाकिटांत घालून ते एका स्नेह्यापाशीं ठेवून त्याच्याबदली त्या गृहस्थापासून दुसरे पांच रुपये उसने घेऊन मी जळगावीं गेलों; आणि नंतर ते उसने घेतलेले रुपये परत करून आपलें मोहोरबंद पाकीट परत आणविलें.

त्यानंतर जेव्हां जेव्हां मी शिरडीस गेलों तेव्हां तेव्हां प्रत्येक वेळीं मजपासून बाबांनीं दक्षिणा बरोबर १५ रुपयांचीच मागितली; आणि एके प्रसंगीं मजपाशीं पैसे नसल्यामुळें मी तसें सांगितलें तेव्हां काका ( भाऊसाहेब दीक्षित ) अथवा बापूसाहेब जोग यांजपासून रुपये आणून दे, असें बाबांनीं सांगितल्यावरून मी बापूसाहेबाकडे गेलों, तों ते न भेटल्यामुळें पुढें भाऊसाहेबांकडे गेलों; तेव्हां "तुमचे रुपये आम्हांला माहीत नाहींत; आम्हीं पोथी काढितों, आणि त्यांत तुम्हीं आपले रुपये पाहून घ्या" असें त्यांचे शब्द ऐकून मी पोथीं वगैरे पाहण्याच्या भानगडींत न पडतां बाबांच्याकडे परत जाऊन त्यांना झालेली हकीकत कळविली; आणि "पंधरा रुपये" याचा अर्थ काय तो सांगण्याविषयीं त्यांना विनंति केली; परंतु "सध्यां राहूं दे, पुढें पाहूं, आपल्याला इतकी घाई नको" असें बाबांनीं सांगितल्यावरून, मी स्वस्थ बसून विचार करीत असतां माझ्या जवळ असलेल्या एका वहींत श्री नाथ भागवतांतील दोन ओव्या पूर्वी कधींतरी टिपलेल्या माझ्या अवलोकनांत येऊन, मला फार समाधान वाटलें; त्या ओव्या अशाः—

'वाचा नेमावी माझ्या नामें ॥ मन नेमावें ध्यान संभ्रमें ॥
प्राण नेमावा प्राणायामें ॥ इंद्रियें दमनें नेमावी ॥ १ ॥

बुद्धि नेमावी आत्मविवेकें ॥ जीव नेमावा परमात्म सुखें ॥
इतुकेंनी तूं अवश्यकें ॥ होसी कौतुकें मद्रूप ॥ २ ॥

ह्या दोन ओव्यांत योग-साधनें पांच आणि दशेंद्रियांचें नियमन अशीं आत्मज्ञान-प्राप्तीची दहा साधनें सांगितली आहेत; आणि बाबा मजपाशीं प्रत्येक वारीच्या प्रसंगीं जे पंधरा रुपये मागत आहेत ते हेच, अशी माझ्या मनांत कल्पना आली ती श्रद्धाजन्य होय; आणि "श्रद्धावाँल्लभते ज्ञानम्" हें भगवद्वाक्य आहे. व माझी श्रद्धा अंध नव्हती.

(९) माझ्या शेवटच्या वारीच्या प्रसंगीं प्रथम दर्शनीं "तूं आलास हें चांगलें केलेंस; मी तुझी आठवण करीत होतों," असें मीं पूर्वीं कधींही न ऐकिलेले शब्द बाबांच्या मुखांतून निघाले; परंतु तें शेवटचें दर्शन होतें ही कल्पना बाबांनीं देहविसर्जन केलें ही बातमी मला समजेपर्यंत माझ्या मनांत आली नाहीं। ह्या खेपेस माझा परत जाण्याचा बेत झाला, तेव्हां दोन-तीन दिवस मी भाऊसाहेबांकडून तिसऱ्या प्रहरीं निघण्याची परवानगी विचारीत होतों, कारण कोपरगांवाहून गाडी सांयकाळीं निघते अशी आम्हां सर्वांची समजूत होती. परंतु प्रत्येक दिवशीं "उद्यां सकाळीं जाऊं दे" असें बाबा सांगत असतां शेवटीं एक दिवस मी आग्रहानें तिसरे प्रहरीं निघण्याची परवानगी मिळवून कोपरगाव स्टेशनावर जातों तो, गाडीची वेळ बदलल्यामुळें दुसरे दिवशीं प्रातःकाळपर्यंत स्टेशनावरच मुक्काम करावा लागला.

---

एका प्रसंगीं आमचे मित्र रा० ब० गणपतराव अंजनगांवकर हे आपल्या कांहीं स्नेह्यांबरोबर शिर्डीस गेले होते, तेव्हां त्यांना ठाणें येथील डिस्ट्रिक्ट कोर्टाचे एका ठरावावरील सरकारी अपीलासंबंधानें सरकारी वकीलाला माहिती देण्यासाठीं रविवारीं हजर व्हावयाचें असल्यामुळें त्यांनीं आदले दिवशीं परत जाण्याची परवानगी मागितली असतां "त्याला इतक्या घाईनें परत जाण्याचें मुळींच कारण नाहीं" असें बाबांनीं अनेकदां सांगितलें; परंतु ह्या त्यांच्या सांगण्यावर आम्हांसारख्या किंचिज्ञ लोकांचा विश्वास बसावा कसा? सरतें शेवटीं गणपतरावांच्या अत्याग्रहाच्या विनवणीवरून "बरें, जा, मर्जी तुझी" असें बाबा म्हणाले; आणि गणपतराव ठाण्याचे कोर्टांत नेमलेल्या वेळीं हजर झाले तोंच सरकारी वकीलांनीं अपील आठ दिवस निघावयाचें नाहीं, असें

म्हणून माहिती घेण्याचेंही आठ दिवस लांबणीवर टाकलेले पाहून त्यांना सत्पुरुषावद्दल सखेदाश्चर्य वाटलें! असले अनेक प्रसंग माझ्या अवलोकनांत आलेले आहेत.

(१०) बाबांच्या एका हाताला कांहीं जखम झालेली होती, तिच्यावर ते नेहमीं प्रातःकाळीं एक लांब फडकें इतकें घट्ट बांधून ठेवीत कीं, त्यापासून इतर कोणालाही असह्य वेदना झाल्या असत्या. ह्याशिवाय त्या जखमेस ते दुसरा कोणताहि उपाय करीत नसत, व कांहींतरी चांगला उपाय करण्याविषयीं भक्त मंडळींकडून त्यांना नेहमीं आग्रह होत असे. अशा आग्रहाच्या वेळीं एकदां ते म्हणाले कीं, " चांगल्या हजार दोन हजार गोवऱ्या आणून त्या रसरशीत पेटवाव्या आणि (आपल्या शरीरास बोट लावून) हें सारें त्यांत टाकून कशी गम्मत चालते तें आपण बाजूस स्वस्थ उभे राहून पहावें!" ह्याचें नांव खरें व्यतिरेक ज्ञान.

(११) मी वांद्र्याहून निघाल्यानंतर तेथील एका संपन्न वृद्ध गृहस्थानें एक मुलगा दत्तक घेतला होता, त्या मुलासह ते गृहस्थ, मी शिर्डीस असतांना, तेथें आले आणि दुर्दैवानें सुवृत्त मुलगा न मिळाल्याबद्दल त्यांचें माझ्याशीं बरेंच बोलणें झालें. मुंबईहून निघतांना बिछाना ओढण्यास पूर्ण सवड मिळावी म्हणून मुलगा दुसऱ्या डब्यांत बसला होता, आणि बापाबरोबर कोपरगांव स्टेशनावर न उतरतां चुकून तो एक दोन स्टेशनें पुढें जाऊन नंतर नगराहून येणाऱ्या गाडीनें परत येऊन बापाच्या मागून सुमारें दोन तासानें शिर्डीस आला व आमच्याकडे न येतां दूर दुसरीकडे जाऊन बसला. नंतर आरतीचे वेळीं दुपारीं त्या गृहस्थांना घेऊन मी मशीदींत गेल्यावर आमचे मागून तो मुलगाहि तेथें आला व पुनः दूरच उभा राहिला. अर्थात् तो मुलगा कोण व कोणाचा हें मलाहि माहित नव्हतें, परंतु सर्वांबरोबर बाबांना त्यानें नमस्कार केला तों लागलीच पुत्राच्या कर्तव्यासंबंधीं बाबांचा उपदेश सुरू झालेला ऐकून " हाच का तुमचा दत्तक मुलगा " असें मी त्या मित्रास विचारिलें आणि त्यांनीं 'होय' म्हटलें. पुढें तीन चार दिवसांत मुलाला तेथें

कंटाळा आल्यावरून त्यानें मुकाट्यानें तेथून सायंकाळीं प्रयाण करण्याचा बेत केला होता; परंतु आरतीनंतर मंडळी मशीदीतून परत जाण्यापूर्वीच " आज मला विचारल्याशिवाय येथून कोणींहि जाऊं नये " असें बाबांचें वचन ऐकून भीतीमुळें त्या मुलानें आपला पूर्वीचा बेत रहित करून ती सारी हकीकत आपल्या बापास कळविली.

संन्यासमार्गी ज्ञानी पुरुषांचा अशा अनेक प्रकारचा कर्मयोग असतो.

( १२ ) ऐके दिवशीं प्रात:कालीं सुमारें ८।९ वाजण्याचे सुमारास संध्यावंदनादि कर्म आटोपून भाऊसाहेब दीक्षित ध्यान करीत बसले असतांना त्यांना मध्येंच एकाएकीं एका विठ्ठल मूर्तीचें स्पष्ट दर्शन झालें; परंतु ती मूर्ति त्यांनीं पूर्वीं कधींही अवलोकन केली नसल्याकारणानें ती कोठली हें त्यांना कळेना; तेव्हां ज्या सद्गुरूच्या कृपेनें तें दर्शन घडलें. तेच त्या मूर्तीच्या क्षेत्राचीही माहिती करून देतील, असा भरंवसा ठेवून ते स्वस्थ राहिले. नंतर दोनप्रहरच्या आरतीच्या वेळीं बाबा भाऊसाहेबांस म्हणाले " कां काका ! आज विठोबा पाटील तुला भेटावयास आले होते ना ? " हें ऐकून भाऊसाहेबांना गहिंवर आला, आणि त्यांनीं बाबांना 'होय' म्हणून जबाब दिला; तेव्हां बाबांनीं " तो मोठा पळपुटा आहे, तो ऐके ठिकाणी राहणारा नाहीं, ह्यासाठीं त्याला एका भक्कम खुंट्याशीं पक्का बांधून ठेव " असें त्यांना बजावून सांगितलें. परंतु त्या मूर्तीच्या क्षेत्राचा उलगडा येवढ्यानें झाला नाहीं. ह्या गूढ भाषणाचा अर्थ बाबा आणि भाऊसाहेब ह्यांच्याशिवाय कोणासच न कळल्यामुळें आरतीहून परत वरीं जातांना आम्हीं भाऊसाहेबांस साहजीकच त्या भाषणाबद्दल पृच्छा केली तेव्हां त्यांनीं तो सर्व प्रकार आम्हांला साद्यंत निवेदन केला. नंतर तिसरे प्रहरीं पंढरी-क्षेत्राच्या फोटोच्या कांहीं प्रती घेऊन एक नवीन गृहस्थ तेथें आले, आणि तो फोटो पाहतांच भाऊसाहेब गहिंवरून "हीच ती मूर्ति" असें म्हणाले ! ह्यावरून श्रद्धावान् शरणागताविषयींचें बाबांचें भक्तवात्सल्य आणि त्यांचा सर्वश्रेष्ठ अधिकार अगदीं स्पष्टपणानें व्यक्त होतात.

( १३ ) शिर्डी येथें जाणाऱ्या सर्व पाहुण्यांची योग्य व्यवस्था लावण्याचें काम, माधवराव देशपांडे यांच्याकडे असे; परंतु एके दिवशीं त्यांना घेऊन

भाऊसाहेब दीक्षित सकाळीं शिर्डीहून मुंबईस येण्याकरितां निघाल्यानंतर, ते, बापूसाहेब जोग, बाळासाहेब भाटे आणि मी, इतकी पांढरपेशांतील मंडळी होती. भाऊसाहेब गेल्यानंतर थोडक्याच वेळांत मध्यभागचे कमिशनर कर्टिस साहेब, त्यांची पत्नि, नगर जिल्ह्याचे कलेक्टर मॅकनील साहेब आणि कर्टिस साहेबांचे नेटिव्ह असिस्टंट रावबहादुर रामचंद्र नारायण उर्फ भाऊसाहेब जोगळेकर अशी बडी अधिकारी मंडळी शिर्डीच्या अगदीं नजीक येत आहे तोंच मशीदींत बाबांनीं आपली कफनी वर करून (कफनीच्या आंत कौपीन नेहमीं असे) ते म्हणाले कीं "..* * हमारेकू देखनेकू आया है. पर हम तो नंगा फकीर है" तेथें असलेल्या सेवेकरी मंडळीस बाबांच्या ह्या म्हणण्याचा अर्थ मुळींच समजला नाहीं, कारण मशीदीच्या समोर नवीन असें कोणीहि मनुष्य दिसत नव्हतें; परंतु दोन तीन मिनिटांत मशीदीवरून सदर अधिकारीवर्ग चावडीकडे जातांना दिसला, तेव्हां त्यांच्या बोलण्याचा खुलासा झाला. पुढें ती मंडळी चावडींत जाऊन बसल्यावर शोधाअंतीं बाळासाहेब भाटे ह्यांच्याशिवाय आपल्या परिचयाचें तेथें कोणीच नाहीं असें भाऊसाहेब जोगळेकर ह्यांना समज-ल्यावरून त्यांनीं आपला एक पट्टेवाला बाळासाहेबांस बोलावण्यासाठीं पाठविला. बाळासाहेबांच्या मनांत जावयाचें आलें नाहीं. म्हणून त्यांनीं पट्टेवाल्यास तसाच निरोप सांगितला, तेव्हां मी 'भाऊसाहेबांनाच प्रथम येथें बोलावून आणितों, आणि मग आपण त्यांच्याबरोबर चावडींत जाऊं' असें मी ~~त्यांना सांगितल्यावर त्यांनी~~ माझें म्हणणें कबूल केलें; व माझ्या निरोपाप्रमाणें भाऊसाहेब बाळासाहेबांच्या वरीं आल्यावर आम्ही त्यांच्या बरोबर चावडींत गेलों. नंतर " आपला प्रातर्विधि सत्वर आटोपा " असा बाबांना निरोप सांगण्याविषयीं भाऊसाहेबांनीं मला सुचविलें, तेव्हां असला " अव्यापारेषुव्यापार " येथें कोणीहि करणार नाहीं, असें मी त्यांना सकारण सांगून त्यांची समजूत घातली. हा प्रकार कर्टिस साहेबांना कदाचित विलक्षण वाटेल अशा समजुतीनें भाऊसाहेबांनीं त्यांची व माझी बालपणापासून विशेष मैत्री असल्याची हकीकत त्या साहेबांना कळविली. नंतर सर्वजण निमूटपणें बाबा मशीदींतून भिक्षेसाठीं बाहेर पडण्याची वाट पहात बसले. बऱ्याच वेळानें बाबा मशीदींतून बाहेर पडून

चावडीकडे येत आहेत, असें पाहातांच मिसेस कर्टिस ह्या चावडीपुढील रस्त्यांत जाऊन बाबांना त्यांनीं आपल्या पद्धतीप्रमाणें प्रणाम केला व मला आपल्यापाशीं चार शब्द बोलावयाचे आहेत असें म्हणाल्या. तेव्हां त्यांना "बाबा घंटा ठैर जाव," असें बाबांनीं सांगितलें. नंतर बाबा भिक्षेहून परत चावडीनजीक आल्याबरोबर मिसेस कर्टिस ह्यांनीं पुनः खालीं रस्त्यांत जाऊन बाबांना पूर्वप्रमाणें प्रणाम करून आपला मानस कळविला, तेव्हां "एक घंटा ठैर जाव." असें बाबा ह्मणाले, आणि मशीदींत गेले. पुढें कर्टीस साहेबांना परत जाण्याची घाई असल्यामुळें थोड्याच वेळांत ती सर्व अधिकारी मंडळी मुकाट्यानें गेली.

---

एकाद्या जीवास दर्शनाचा लाभ द्यावयाचा असल्यास श्रीसाई महाराज तो योग कसा अचुक आणीत व त्याजला आपलेपाशीं कसा ओढून घेत यांचें उदाहरण पहावयाचें असल्यास तें सोलापुरचे रा. रा. वासुदेव सदाशीव जोशी यांचें खालील पत्रांत, या साईलीलेच्या वाचकांस पहावयास सांपडेल.

श्री सद्गुरुप्रसन्न ॥

( सत्यनारायणकंपनी सोलापूर कंपनी. स्थापन शके १८३३ मिती चैत्र शु॥ १. मॅनेजर वासुदेव सदाशीव जोशी. )

भक्तिपरायण रा. रा. गोविंद धोंडो पानसरे यांनीं सिद्ध पुरुष श्री "साईनाथ उर्फ साई बाबा" यांचे दर्शनाचा योग कसा आला, व त्यांचे बद्दल अनुभवसिद्ध मत काय आहे, असा प्रश्न केल्यावरून, सदर्हू सिद्ध पुरुषाची, पूर्व वृत्ती स्मरण करण्याचा अलभ्य योग त्यांनी आणिल्यामुळें, त्यांचे आभार मानून. श्री नारायण कृपेनें व श्रीसद्गुरूच्या प्रसादानें, घडकेलेली हकीकत सादर करतों. तिचा सानंद स्वीकार करून तींत योग्य ती दुरुस्ती करून आपल्या श्री साईलीलेंत तिला जागा द्याल अशी आशा करतों.

या देहाची थोडक्यांत ओळख करावयाची म्हणजे या जीवास पूर्ण कर्मानुसार नवाचे सोळावे वर्षापासून "यद्दृष्टं तन्नष्टम्" या वाक्याची

जागृती होऊन केवळ देह प्राक्तन भोगण्याकरतांच गृहस्थाश्रमांत दाखल व्हावें अशा भावनेंत आज वयाचा सुमारें सदतीस वर्षांचा काल गेला. या गेलेल्या कालांत अनेक साधुसंत व सत्पुरुषांच्या गांठी पडल्या परंतु भूतलावर असलेल्या बद्ध, मुमुक्षू साधक व सिद्ध; अशा चार प्रकारांत सिद्धावस्थेंत पोंचलेल्या पुरुषांमध्यें सिद्ध पुरुष श्री " साईबाबा " हेच प्रथम गांठ पडलेले असें मोठ्या आनंदानें म्हणत आहे. असो.

भेटीचा योग:–मुमुक्षवस्थेंत पडलेले पेन्शनर मामलेदार घोडनदी येथील श्री० रा. रा. चिदंबर केशव उर्फ अण्णासाहेब गाडगीळ यांनीं श्री क्षेत्र गाणगापूर येथें अन्नछत्र घातल्यामुळें सोलापूर पेठेशीं संबंध पडून व्यवहारदृष्टया त्यांची गांठ पडली. नंतर समसमान संयोग झाल्यावर परमानंद प्राप्त होतो त्याप्रमाणें होऊन सदर गृहस्थांनीं शके १८३५ सालीं आज्ञा केली कीं, " मी शिर्डी मुक्कामीं आहें; येथें नामसप्ताह सुरू आहे तरी दर्शनाकरतां यावें, येण्याजाण्यास रुपये दहा खर्च लागेल, चिंता नाहीं. श्रीनारायण आपणास कोठेंही देईल; परंतु ही वेळ वायां जाऊं देऊं नये " याप्रमाणें विनंतीपत्र वाचून जो आनंद झाला तो लिहिणें शक्य नाहीं. नंतर व्यवहार पद्धतीप्रमाणें सहचारी जीवांची परवानगी घेऊन जरी द्रव्याची अडचण होती, तरी पण हा देह जाण्यास तयार होऊन सदर सिद्धांचे कृपेनेंच शिर्डी येथें रा. रा. गाडगीळ हे त्यांचे परम स्नेही रावबहादूर तात्यासाहेब साठे यांचे वाड्यांत होते तेथें दाखल झाला. नंतर स्नान संध्यादि कर्मविधि सारून सदर गाडगीळ यांचेबरोबर श्रीचे दर्शनास पूजा सामानासह तयार झाला. बाबा मशजींत मध्यें होते तेथें पूजा वगैरे आटोपून सर्व थाट पाहून देहाची साफल्यता झाली असें वाटलें. नंतर सायंकाळीं याच ठिकाणीं आर्ती वगैरे करून रा. रा. साठे यांचें वाड्यांत अजमासें ४०×५० इंच साईचा फोटो असेल, नक्की जाणत नाहीं. परंतु मोठा फोटो सदर श्री बाबा यांचा सदर वाड्यांत ओसरीवर ठेवलेला असोन त्याची पण दोन सांज पूजा आर्ती करण्याचा क्रम होता असें वाटतें. कारण सकाळीं ११।१२ चे सुमारास उतरल्यामुळें प्रथमच सायंकाळचा प्रोग्राम दृश्यमान झाला. त्या वेळीं कोणत्याही तत्वांत एकाग्रता करण्याची या देहास संवय असल्यामुळें आर्ती सुरू झाल्यापासून

ती संपेपर्यंत श्री बाबांचे मुखकमलावर दृष्टी एकाग्र झाली. त्यावेळीं मुख-कमल न दिसतां वस्त्राच्छादित असलेले शिरोभागाचे ठिकाणीं नारसिंह स्वरूप दिसूं लागलें. त्याच नादांत हा जीवरंजित होऊन भान न राहिल्यामुळें आर्ती समाप्त झाली तरी जागृती नाहीं. सदर गाडगीळ यांनीं हालवून सांगितलें जोशीबुवा आर्ती झाली चला; म्हटल्यावर देहभानावर येऊन चाललों. परंतु एकाग्र दृष्टी झालेली छाया अदृष्ट होईना व पुनः पुनः मन हें काय आहे हें जाणण्याविषयीं आतूर झालें. याप्रमाणें सांज सकाळ तीन दिवस अनुभव झाल्यावर सदरचे रा. स. गाडगीळ अण्णासाहेब यांना विचारतां ते म्हणाले ' बाबा अशाच गंमती करतात त्या उगाच पहाव्या म्हणजे झालें ' या जीवाची पूर्वापार जगांत निरपेक्षबुद्धी व निर्व्याज प्रेम ठेवून प्रत्येक चलाचल वस्तूमात्रांत जग निर्माणकर्त्या आदिनारायणाचें वास्तव्य कसें आहे, व सव्यापसव्य अंतर्बाह्य दृश्यादृश्य राहून कसे कसे पार्ट करून आपल्या करमणूकी करून घेत आहे, हें पाहण्यांत हा जीव निरंतर गुंतून गेल्यामुळें याचें नांव अपेक्षा या दोनहीं शब्दास कायमचाच फांटा मिळाला आहे. नंतर राहिलेलें कर्तव्य देह प्राक्तन यांची वाट पाहून आलेले सुखदुःखाचे विवेचन न करतां श्रीनारायणचरणीं सर्व कृत्यें व त्यांची फलश्रुती अर्पण करून मनास मुक्त ठेवावयाचें असा कार्यक्रम असोन त्याच्या दृढाभ्यासानें हा देह परमेश्वर स्वरूपी जगाचा आमरणपर्यंत कायमचा दास झाला यांतच या जीवास आनंद वाटतो, नव्हे परमानंदांत मग्न आहे. परंतु सर्व कामिक जनाविरुद्ध ही गोष्ट असल्यामुळें या जीवानें रा.ब. साठे यांचेकडे जाण्याची परवानगी मागितली असतां 'बाबांची परवानगी घेतल्याशिवाय जाणें होणार नाहीं' म्हणाले व दुसरे सेवेकरी म्हणाले 'अहो बाबांकडे कांहीं मागा.' परंतु या जीवाची दर्शनाशिवाय कांहींच इच्छा नसल्यामुळें मला कांहीं मागावयाचे नाहीं, फक्त दर्शनाची फार दिवसांची असलेली इच्छा परिपूर्ण झाल्यामुळें परमानंद झाला व देहाचें साफल्य झालें म्हणालों.तरी विशेष आग्रहावरून या जीवानें त्यांनाच प्रार्थना करण्यास म्हटलें कीं, श्रीसत्यनारायण कंपनी दुकानावर या जिवाचा उदरनिर्वाह चालला आहे तोच बोलण्याचा आशिर्वाद मागा म्हटल्यावरून त्यांनीं सर्व मंडळीसमक्ष दोन प्रहरीं

दोनच्चे सुमारास या जीवाची मागणी रा. रा. गाडगीळ यांचे पाव्हणे या नात्यानें श्री बाबांचे पुढें मांडली. नंतर कंपनी नांव न काढतां फक्त धंद्याची उपलब्धि करून सदर सेवेकरी गृहस्थांनीं प्रार्थना केली असतां श्रीबाबा म्हणाले 'यांना नारायणांनीं चटणी भाकरीस कांहीं कमी केलें आहे काय' त्यांना विचारा व 'त्यांची इच्छा नसतां तुम्हीं बळजबरी कां' करतां असें म्हणतांच मंडळी आश्चर्यचकीत झाली.

नंतर या देहास जाण्याची परवानगी मागण्यांत आली, त्यावेळीं म्हणाले अशा प्रकारच्या निरपेक्ष जीवांना येण्याच्या व जाण्याच्या परवानगीची जरूरी नाहीं.त्यांनीं वाटेल त्या वेळीं यावें व वाटेल त्या वेळीं जावें. सदर वेळीं गुरुवार तेथें पडला त्या वेळीं दोन प्रहरीं रा. रा. गाडगीळ म्हणाले, 'जोशीबुवा येथला प्रसाद कांहीं बरोबर न्यावा' म्हणून पुजारी जोग यांचेकडे प्रसाद मागण्यास गेलों. त्यावेळीं प्रत्येकास एक बर्फीचा तुकडा याप्रमाणें तीन इसमांस तीन तुकडे या देहाचे हातीं पडले. मुक्कामाचे जागीं गाडगीळ अण्णासाहेब वगैरे मंडळीसमोर तुकडयासह आल्यावर तेच म्हणाले 'एवढा प्रसाद पुरणार नाहीं आणखीं आठ आणे घेऊन जा व बर्फी घेऊन या' शिर्डीतील सर्व प्रसाद बाबांचा आहे म्हणून निघालों असतां वाटेंतच एक इसम बर्फीचें ताट भरून श्रीबाबांनीं गाडगीळ यांचे पाहुण्यास नेऊन देण्यास सांगितलेला याची गांठ पडून त्यानीं परतविलें व हा देह परत फिरला. सदर गाडगीळ व हा देह यांना आश्चर्य वाटून इकडील वृत्तांत अल्पावधींत त्यांना कसा कळला व तावडतोब त्यानीं योजना नेमकीच कशी केली याबद्दल आनंदाश्रू निघाल्यावाचून राहिले नाहींत.नंतर बाजारचा दिवस असल्यामुळें ओल्या भुईमुगशेंगा थोडया नमुन्यादाखल पासरी सुमार आलेल्या मंडळीनें चट्ट केल्यामुळें रा.रा. गाडगीळ यांनीं एक रुपया देऊन आणखी शेंगा आणण्यास मनुष्य पाठविला त्याला रा. बा.तात्यासाहेब यांनीं अटक करून विचालें कीं, कोठें जातोस त्यानें 'शेंगा गाडगीळाचे पाहुण्यास आणण्यास चाललों' म्हणतांच ते म्हणाले कीं, श्री बाबांची आज्ञा झाली आहे कीं, प्रथम आलेल्या दोन पोती शेंगा, पैकीं सुमार अर्धमण म्हणजे दोन टोपल्या शेंगा गाडगीळ व त्याचे पाहुणे यांना खाण्याकरितां द्या नंतर ते नेण्यास मागतील तितक्या देऊन बाकीच्या इतर गोरगरिबांस वाटून टाका-असें म्हटल्यावरून तोच मनुष्य शेंगा व रुपायासह परत

आला. हें पाहून मंडळीस आनंदाचा उमाळा आला व श्री बाबा बसून काय काय खेळ करतात व त्यांचे सर्वांतरयामीं कसें वास्तव्य आहे याचें चांगलेंच दिग्दर्शन होऊन सर्व मंडळीचे नेत्रांत आनंदाश्रू आल्याविना राहिले नाहींत. या स्मरणानें व त्यांचा फोटो या जीवाचें नित्य गीता पाठाचे प्रथम पृष्ठांत ठेवल्यामुळें नित्य दर्शनाचा योग घडतो हें या जीवाचे परमभाग्य समजावयाचें अशाधाटांत व आनंदांत हा देह परत सोलापुरीं आल्यावर परमभक्त व श्रद्धाभिलाषी जीव व्ही. एस्. फोटोग्राफर फारच भावीक व विश्वासू इतका कीं त्यांचे देहाचें या प्रेमांत अखेर देहावसान झालें परंतु प्रेम व श्रद्धा सुटली नाहीं.अशा भाविक जीवास या देहानें श्री बाबांचे दर्शनास जाण्यास सल्ला दिली व मागील खर्चाची रुपये दहाची भिक्षा दिली व सांगितलें कीं रुपये दहा गेले तर जाऊंदे परंतु एकवार दर्शन करून ये व जमल्यास फोटोचें कार्य करून ये म्हणतांच तावडतोब जाण्याची तयारी करून सदर भाविक जीव तेथें या देहाचे पत्रासह दाखल झाला. नंतर तेथील रा. बा. साठे व गाडगीळ या मंडळींनीं या इसमाची उत्तम व्यवस्थाकरून श्री बाबांचें दर्शन करविलें. नंतर त्यांचा जुलमानें चुकवून घेतलेला पूर्वीचा फोटोग्राफ होताच परंतु या इसमाचें दर्शन झाल्यावर श्री बाबा आपण होऊनच म्हणाले "अरे तुला सत्यनारायण कंपनीचे जोशी बुवांनीं फोटो घेण्यास पाठविलें आहेना मग बसलास कां तुला कसला पाहिजे तसा फोटो घे" म्हणून श्रीबाबांनीं संतोषानें व आनंदानें बसल्याचा व उभ्याचा असे फोटो काढूं दिलल्या बद्दल सर्व मंडळीस मोठें नवल वाटलें फोटो काढून झाल्यावर चार दिवस त्याला ठेवून घेऊन श्रीबाबांनीं उपदेश केला कीं तूं फोटोची किंमत वाजवीपेक्षां जास्त घेऊं नको; बाकी तूं सत्यनारायण कंपनीच्या जोशी बुवांचा पट्टशिष्य आहेस ते तुला किंमत कधींही घेऊं देणार नाहींत व त्यांचेच आशिर्वादानें तुझें कल्याण होणार आहे, म्हणून तेथें निघालेल्या दक्षिणाभिक्षा संस्थेमध्यें सदर फोटोग्राफरचे नांव रजिस्टर करून त्याला कांहीं फोटोची आर्डर पण देण्यांत आली. व जाण्यायेण्याचे खर्चासुद्धां रक्कम देऊन श्री बाबांचेच परवानगीनें फोटोग्राफरची रवानगी करण्यांत आली. त्याप्रमाणें त्या संस्थेस फोटो रवाना योग्य दरानें करण्यांत आले.

श्रीकृष्णार्पणमस्तु

# स्फुट विषय.

## आतांपर्यन्त छापून आलेल्या महाराजांच्या लीला.

एकदां एक वकील शिर्डीस आले होते. ते मशिदींत गेले व बाबांच्या पायां पडले व त्यांना दक्षिणा देऊन खालीं बसले. ते बसल्याबरोबर महाराजांनीं त्याच्याकडे तोंड करून असे उद्गार काढले " काय लोक लबाड असतात, पायां पडतात, दक्षणा देतात आणि आंतून शिव्याहि देतात.

नंतर वाड्यांत गेल्यानंतर वकीलसाहेब मला सांगू लागले " महाराजांनीं मजवर ताशेरा झाडला तो अगदीं बरोबर आहे. आमच्या येथील मुन्सफसाहेब आजारीपणाची रजा घेऊन शरीरप्रकृति सुधारण्यासाठीं निघालेले येथे येऊन राहिल्यामुळें आम्ही वकिलांच्या खोलींत त्यांची बरीच थट्टा करीत होतो, आणि महाराजांची निंदाहि करीत होतो, त्याची खूण महाराजांनीं दिली. इतःपर मी असें करणार नाहीं. "

अशा तऱ्हेचे शेंकडों अनुभव नित्यशः येतात आणि त्यावरून मनांत असें वाणतें कीं, आपण कोठेंही कांहींही केलें तरी महाराजांस तें अंतर्ज्ञानानें कळतें. असेही अनुभव आले आहेत कीं, कोणासंबंधानें आपल्या मनांत नुसता वाईट विचार जरी आला आणि जरी कोणाजवळ आपण त्याचा उच्चार केला नाहीं, तरी तो महाराजांस कळतो. हे मनांत वाणलें म्हणजे साहजिकच आपल्या आचरणावर त्याचा परिणाम होतो. अर्थात् कैक जन्माचे संस्कार एकदम जात नाहींत; पण हळुहळु वृत्ति निवळूं लागते आणि कालांतरानें तरी, जन्मांतरांनीं कां होईना, वृत्ति पूर्ण निर्मळ होईल असा भरंवसा वाटतो.

महाराजांचे सर्वसाक्षीत्व बाणलें म्हणजे दुसरा फायदा होतो तो असा. मनाला अशा तऱ्हेचा धीर वाटतो. असें वाटूं लागतें कीं, आपले बाबा आपल्याला संभाळायाला नेहमीं जवळच आहेत, आणि आपल्याला भिण्याचें कांहीं कारण नाहीं. एकदां माझे एक मित्र रात्रीं बहिर्दिशेला गेले असतां त्यांना सरसर असा आवाज ऐकूं आला. अर्थात् त्यांना वाटलें, कीं, एकादा साप येत आहे. साहजिकच ते घाबरले; पण साप-

वीप कांहीं निघाला नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ते माझे मित्र बाबांचे भेटीला गेले आणि पायां पडूं लागले, तेव्हां बाबा म्हणाले " अरे, भ्यावें कां ? तूं परसाकडला गेलास तरी मी तेथें नसतों काय ? "

एकदां एक मुसलमान डॉक्टर शिर्डीस येऊन राहिला होता. तो शिर्डीस येऊन राहिल्यानंतर थोडयाच दिवसांनीं त्याच्यावर जळगांव कोर्टांत फौजदारी खटला कोणी दाखल केला, व त्याचें समन्स त्याला शिर्डीला लागलें. तारखेच्या आदल्या दिवशीं श्रींच्याजवळ जळगांवाला जाण्याची परवानगी तो मागूं लागला, तेव्हां श्री ह्मणाले " आज जाऊं नकोस, उद्यां जा. "

त्यानें सांगितलें " बाबा, आज गेलों तरच तारखेला जाऊन पोंहोचेन. उद्यां गेलों तर उशीर होईल. "

श्री ह्मणाले " कांहीं काळजी करूं नकोस. तूं आज न जातां उद्यांच जा. "

असें महाराजांचें आश्वासन मिळाल्यावर तो अर्थात् राहिला आणि दुसऱ्या दिवशीं गेला. तो परत आल्यावर सांगूं लागला, आदल्या दिवशीं खटला निघालाच नाहीं. मॅजिस्ट्रेट साहेबांनीं दुसऱ्या दिवशीं घेतला, आणि फिर्यादी व त्याचे साक्षीदार यांची उलट-तपासणी स्वतः मॅजिस्ट्रेटसाहेबांनींच करून आरोपीस म्हणजे डॉक्टराला सोडून दिलें, आणि फिर्यादीकडून त्याला नुकसान देवविलें. अर्थात् डॉक्टराला फार आनंद झाला, आणि त्यानें महाराजांकडे परत आल्यावर पेढे वाटले, आणि ते वांटीत असतां वरील हकीकत त्यानें मला सांगितली. डॉक्टर आणखी असेंहि म्हणाला, कीं, " खटला चालला असतां पहिल्यापासून अखेरपर्यंत महाराज मॅजिस्ट्रेटच्या जवळ खुर्चीवर बसले आहेत, असें मला दिसत होतें. " हा त्याचा भास असेल; पण निरनिराळ्या गांवीं व निरनिराळ्या वेळीं जागृतावस्थेंत आपणास महाराजांचें उघड दर्शन झाल्याचें पुष्कळ विश्वासपात्र लोक सांगतात. पण ही कदाचित् त्यांच्या मनाची भावना किंवा कल्पना असेल, असें ह्मणतां येण्यासारखी असल्यामुळें तशीं उदाहरणें येथें देत नाहीं.

श्री साईबाबा प्रसन्न.

विले—पारलें, येथें श्रीसाईहनुमान नांवाचें सुंदर नवीन मंदिर आहे. त्या ठिकाणीं हनुमज्जयंत्युत्सवांत रविवार ता. ४।४।२० रोजीं कीर्तनाचे आरंभीं कीर्तनकार रा. रा. कृष्णाजी वासुदेव खरे यांनी स्वरचित म्हटलेलें अष्टक.

# श्रीसाईहनुमानाष्टक.

॥ श्लोक ॥

श्रीसाई यत्प्रसादें, रमणिय अशी, मूर्ति सन्मुख ठेली ॥
वाटे पश्चीम देशीं, मठ करुनिया, देवता स्थापियेली ॥
भक्तांच्या पूरवाया, सकलहि मनिषा, वाट पाहे कृपेनें ॥
तो साईहनुमान प्रेम भरुनी, पाहूं चला दृष्टिनें ॥ १ ॥

सानंदें, वरदहस्ता करुनि जवळि जो, वाटतें बाहताहे ॥
होवोनी कर्मयोगी, निजहित सकलां, साधण्या सांगताहे ॥
कर्मीं दक्ष परी, उदास स्वमनीं, राहोनिया आचरा ॥
ध्यानीं आणोनि बोलां, निशिदिनिं अहो, त्या रामदासा स्मरा ॥२

ईशप्रेम असें जगीं भरियलें, कोंदोनि चित्शक्तिनें ॥
त्या ईशस्वरुपाविणें स्थिरचरीं, देखेचि ना दृष्टिनें ॥
पाही येथुनि तेथही वरचि तो, भासे हरी आवघा ॥
शैलाच्या शिखरीं, सखोल कुहरीं, सर्वत्र त्यातें वघा ॥३॥

हरुनि सकल तापा, सौख्य द्याया जिवांसी ॥
निकट तटिं उभा जो, पारलाग्रामवासी ॥

सुरुचिर रमणी ही, मूर्ती ती पाहण्याला ॥
निशिदिनि मन घेवो, तेथही धांवण्याला ॥४॥

नुरली भक्तिविणेंच अन्य मनिषा, हा बोध होवो मना ॥
भक्तिप्रेमविणेंहि ज्ञान नलगे, हे तो जडो भावना ॥
ज्ञानानें अभिमान नित्यचि नवा, तो आड येईल कीं ॥
भक्ति प्रेमहि एक वस्तुच असे, जी सौख्य देईल कीं ॥ ५ ॥

मार्ग आणी भ्रम न दूरचि करा, हा भक्तिचा चांगला ॥
सोपा आणि वराच मार्गहि जगीं, संतांहि जो वर्णिला ॥
हा तो देइल सौख्य मोक्ष सकलां, विश्वास याते धरा ॥
श्रीसाईहनुमान होइल कृपा, संदेह नाहीं जरा ॥ ६॥

नमन करित भावें, साईपादांबुजाला ॥
अवडि तुझि सदा दे, वासुदेवात्मजाला ॥
वदत सतत हें मी, भक्ति तूझी करावी ॥
सकल त्यजुनि भावें कास तूझी धरावी ॥ ७ ॥

( केका )

प्रसन्न वदनें पहा, प्रभु जराहि, दीनाकडे ॥
दयाब्धि तुम्हि हो असा, सतत हाचि डंका झडे ॥
असें सतत ऐकतां, दुरि कराल, या पामरा ॥
प्रभो, मग नसे मला, जगिं दुजा खरा आसरा ॥ ८ ॥

# श्रीसाई लीला.

## ( मासिक )

वर्ष १ लें. * ज्येष्ट शके १८४५. अंक ४ था.

## महाराजांचे अनुभव.

रा. रा. वामन चिंतामण मुके-वकील पिंपळगांवबसवंत जिल्हा नाशिक यांचे श्री साईबाबांबद्दलचे अनुभवांबद्दल ता० ११।७।१९२१ चे पंचवटीहून आलेल्या पत्रांतील कांहीं अनुभवांचा उतारा:—

" माझे मोक्ष गुरू श्रीसमर्थ रघुनाथमहाराज उर्फ काका पुराणिक धोपेश्वर ( राजापूर जि॥ रत्नागिरी ) यांचा मला उपदेश झाल्यावर समर्थांचे कृपेनें माझें मन परमेश्वर भक्तीकडे वळलें. दिवसाचा थोडा काळ मी गुरूभक्तींत घालवूं लागलों. माझे गुरूचे कृपेनें मला ज्ञानेश्वरी ऐकावी अशी इच्छा झाली. एका ज्ञानेश्वर-भक्ताची भेट गुरूनीं करून दिली. ज्ञानेश्वर महाराजांनीं आपले गुरू श्रीनिवृत्तिनाथ यांचे बद्दल आपलें निस्सीम प्रेम ज्ञानेश्वरींत वारंवार व्यक्त केलें आहे. याची ज्ञानेश्वरीचे भक्तांस माहिती आहे. गीतेच्या १३वे अध्यायांत " आचार्योपासना " या विषयावर ज्ञानेश्वरमहाराज यांनीं गुरूकृपेशिवाय ज्ञानप्राप्ति नाहीं असें सांगितलें आहे. माझे सद्गुरू समाधिस्थ झाल्यामुळें मला गुरूभक्ती घडली नाहीं ही गोष्ट माझें मनास डांचूं लागली. इतक्यांत माझे सद्गुरू काकामहाराज यांणीं मला शिरडीस जाऊन श्रीसमर्थ साईबाबांचें दर्शन घेण्याची प्रेरणा केली. समर्थांचें प्रेरणेप्रमाणें मी शिरडीस गेलों. साईबाबानीं मला त्यांचे दर्शन होतांच माझें मन गुरूभक्तींत तल्लीन केलें. बाबांनीं माझे प्रेम पाहून व मजवर प्रसन्न होऊन मी घेतलेल्या त्यांच्या सगुणोपासनेच्या बुकाला व त्यांचे फोटोला हस्तस्पर्श केला.

* मागील अंक अधीक ज्येष्टाचा समजावा.

मी पिंपळगांव बसवंत तालुके निफाड येथील रहाणार असून त्यागांवीं मी वकिलीचा धंदा करितों. सुमारें सहा वर्षांपूर्वी आमचेगांवीं प्लेग झाल्यामुळें मी आमचे गांवचे माझे मालकीचे शेतांत प्लेगचे वेळीं राहण्यासाठीं एक लहान बंगला बांधला आहे. त्या बंगल्यांत आमचे कुटुंबांतील सर्व मंडळीसह रहात होतों. बंगल्यांत रहात असतां माझा नित्यक्रम साईची सकाळीं व संध्याकाळीं प्रार्थना करण्याचा असे. एके दिवशीं मध्यरात्र झाल्यावर चोरांनीं माझे बंगल्याचे उत्तरबाजूची भिंत फोडली. ज्या ठिकाणीं भिंत फोडली त्या ठिकाणापासून समर्थांचा फोटो एक वितीचें अंतरावर ठेविला होता. चार चोरांपैकीं एक चोर फोडलेल्या भिंतीचे भोकांतून आंत शिरला व त्यानें ज्या पलंगावर मी निजलों होतों त्या खालीं ठेविलेली लहान पेटी लांबविली व ती भोकाचे वाटे भोकाजवळ उभे राहिलेल्या साथीदारांचे स्वाधीन केली. त्या पेटींत दोनशें रुपयांच्या नोटा व रुपया एक व कांहीं आणे होते व माझे रिणकोकडून लिहून घेतलेल्या सुमारें चार हजार रुपये पर्यंतच्या×(वचनचिठ्या) होत्या. ही पेटी बाहेर दिल्यावर आंत आलेल्या चोरानें साईबाबांचे फोटोचे समोर एक ट्रंक एका बाकावर ठेविली होती. त्या ट्रंकमध्यें सोन्यांचे दागिने क़िमत सुमारें रुपये २५०० व चांदीचीं भांडीं किंमत सुमारें ५०० रुपये व दस्तऐवज क़िमत सुमारें रुपये १०००० चे होते. चोरानें ट्रंकला हात घातल्याबरोबर ट्रंकच्या शेजारीं आमची मेहुणी निजली होती ती जागी होऊन " चोर चोर " म्हणून भीतीनें ओरडली. तिचा ध्वनी मी गाढ झोंपेंत असल्यामुळें मला ऐकूं आला नाहीं. इतक्यांत बाबा माझे स्वप्नांत येऊन " तुझी ट्रंक गेली जागा हो ". असें मला सांगितलें. मी एकदम उचकून जागा झालों व बाबांचे प्रेरणेनें पलंगावरून गडबडीनें उडी मारून हातांत काठी घेऊन मोठ्या आवेशानें " मारो इसकू " असा ध्वनी केल्याबरोबर चोर भोकावाटे बाहेर पळून गेला. या गडबडीनें बंगल्याचे रक्षणासाठीं ठेविलेला जागल्या व कुत्रा, कारकून व गडी जागे झाले व त्यांनीं मोठी ओरडा आरड केल्यामुळें सर्व चोर पळून गेले.

मला एकदम भीतींतील

---

×प्रामिसरी नोट्स्

अनन्याश्चिंतयंतो माम् ये जनाः पर्युपासते ॥

तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

या श्लोकाची आठवण झाली व समर्थांचा उतराई होऊन त्यांस साष्टांग-नमस्कार घातला. इतका वेळ पर्यंत आम्हांस पेटी गेल्याची माहिती झाली नाहीं. माझे मनुष्यास पाठवून पोलिसस्टेशन अमलदार यांस आमचे बंगल्यावर घर फोडीचे चोरीचा प्रयत्न झाल्याची खबर दिली. पोलीस आल्यावर ते लेखी फिर्याद मागूं लागले. लेखी फिर्याद लिहिण्यासाठीं पेटी पाहूं लागलों तों पेटी चोरांनीं नेली असें कळलें तथापि या नुकसानी बद्दल माझे मनास यत्किंचितही धक्का पोंचला नाहीं. पोलीस लेखी फिर्याद लिहून घेऊन गेल्यावर सूर्योदय झाला. इतक्यांत आमचे मळ्याचा शेतकरी आमचे बंगल्यापासून एक फरलांगाचे अंतरावर वर लिहिलेला चोरीचा माल पेटी शेतांत पडलेली आहे असें सांगत आला मी लगेच त्याठिकाणी जाऊन पेटी पाहिली. पेटींत असलेल्या जिनसांपैकीं रुपये २०० च्या नोटा व कांहीं खुर्दा व एक रुपया रोख याशिवाय एकही जिन्नस चोरांनीं हलविली नाहीं. पेटी आपोआप उघडल्यामुळें पेटी तशी-च्यातशीच न फुटतां मिळाली.

दुसरे दिवशीं पहाटेस दुसरा चमत्कार घडला, तो असा की मला स्वप्न पडून स्वप्नांत मला बाबांनीं दर्शन दिलें. स्वप्नांत मी बाबांचे पायांची सेवा करीत आहें. त्यांचें शेजारीं त्यांचा सच्छिष्य अबदुल हा त्यांचे जवळ आहे व दुसरा ज्यांस मी पूर्वी कधींही माझे सर्व आयुष्यांत पाहिला नव्हता असा गौरवर्णाचा तेजस्वी फकीर दृष्टीस पडला. या स्वप्ना-मुळें मला शिर्डीस जाऊन बाबांचें दर्शन घेण्याची इच्छा झाली. मी शिर्डीस त्याच दिवशीं संध्याकाळचे आगगाडीनें जाण्यास निघालों तो दुसरे दिवशीं शिर्डीस जाऊन पोंचलों. इतक्यांत समर्थांची स्वारी गांवा-बाहेर शौचविधिसाठीं येतांना दृष्टीस पडतांच मी रस्त्यांतच त्यांस साष्टांग नमस्कार केला. बाबांनीं प्रेमळ अंतःकरणानें मला व माझे बरोबर असलेल्या मंडळीस गांवांत जाण्यास सांगितलें. गांवांत जाऊन बाबांचे

अत्यंत प्रेमांतील भक्त रा. हरि सिताराम दीक्षित यांचे बंगल्यावर बिऱ्हाड ठेविलें. कांहीं वेळानें बाबांचें दर्शनासाठीं मशिदींत गेलों तेव्हां दर्शनाचे प्रसंगीं ज्या गौरवर्णाचे तेजस्वी फकीरास मी स्वप्नांत पाहिलें होतें तोच फकीर माझे दृष्टीस पडला. त्याचे बद्दलचा तपास करितां तो फकीर बाबांचा शिष्य अबदूल याचा पूर्वीचा गुरू आहे असें समजलें. पिंपळगांवीं स्वप्नांत एक दिवस पूर्वी ज्या फकिरास मी बाबांचे शेजारीं पाहिलें तो फकिर त्याच स्थितींत मी जागृतावस्थेंत पाहिला हा केवढा चमत्कार !

तिसरा चमत्कार-यानंतर कांहीं दिवसांनीं पिंपळगांव येथें आम्ही आमचे बंगल्यावर रहात असतां कोपरगांव येथील ब्रम्हचारी बुवा माझें स्मरण करून माझे बंगल्यावर राहण्यास आले. आम्ही तीन दिवस मोठ्या प्रेमानें बाबांचें भजनपूजन केलें. ब्रह्मचारीबुवांनीं जातांना मला बाबांच्या कृपेनें तुझ्या चोरीस गेलेल्या नोटा सांपडतील असें सांगून गेले. पुढें कांहीं महिन्यांनीं आमचे बंगल्यावर ज्या चोरांनीं घर फोडून चोरी केली होती ते व चोरीचा माल विकत घेणारा एक मारवाडी हे सर्व दुसरे एका चोरींत पकडले गेले.चोरीचा माल विकत घेणारे मारवाडयाचे घरांत आमचे घरचे चोरींतील कांहीं नोटा सांपडल्या. त्या नोटा-आमचे घरचे चोरींतील आहेत असें त्या चारी चोरांनीं कबूल केल्यामुळें आमचे घरची चोरी चोरांचे कबूलीवरून आपोआप शाबीत होऊन रुपये दोनशेंच्या नोटांपैकीं पांसष्ट रुपयांच्या नोटा आमच्या ठरून त्या पोलिसांनीं आमचे घरीं पिंपळगांवीं आणून मला दिल्या.

साईदास.
वामन चिंतामण मुक्के वकील.
पिंपळगाव बसवंत जिल्हा नाशिक

---

महाराजांचे एक पुरातन भक्त म्हाळसापती या नांवांचे होते ते नुकतेच कैलासवासी झाले. महाराज एक रात्र मशिदींत निजत व एक रात्र चावडींत निजत असा नित्यक्रम असे. ज्या रात्रीं महाराज मशिदींत

निजत त्या रात्रीं म्हाळसापती महाराजांचें जवळ रात्रभर बसून असत. व रात्रभरांत कधींही आडवे होत नसत. म्हाळसापतीची सांपत्तिक स्थिति अति निकृष्ट असे. इतकें असूनही त्यांचें नैराश्य अवर्णनीय होतें. महाराजांचे कडून त्यांचें नैराश्य स्थितीचे उत्तेजनपर असेंच वर्तन असे. एकदां म्हणजे इ. स. १९१७ मध्यें त्यांची गरीबी मनांत आणून हंसराज नामक दादरास राहाणाऱ्या एका व्यापाऱ्यानें त्यांना दहा रुपये देऊं केले; ते त्यांनीं घेतले नाहींत. हंसराज शेटजीनीं मग ती रक्कम रा. रा. बापुसाहेब जोग यांचे मार्फत म्हाळसापतीकडे पाठविली तरीही त्यांनीं ती घेतली नाहीं मग ती रक्कम रा. रा. हरी सितारांम दीक्षित यांजकडे आणिली आणि महाराजांचे समोर म्हाळसापतीस द्यावी असें सुचविलें. त्याप्रमाणें म्हाळसापती महाराजांची पूजा करीत असतां रा. रा. दीक्षित हे ती रक्कम त्यांना देऊं लागले ते ती घेईनात. दीक्षित महाराजांना म्हणाले "आपण त्यांना घेण्यास सांगा किंवा आपण घेऊन त्यांना द्या." महाराज म्हणाले "सध्यां तुझ्याजवळ राहूं दे!" म्हाळसापती पूजा आटोपून निघून गेल्यावर कांहीं वेळानें महाराजांनीं दीक्षितांस विचारलें "किती रुपये आहेत?" ते म्हणाले "दहा." महाराजांनीं ते रुपये आपल्या गादीवर ठेवण्यास सांगितले व नानासाहेब निमोणकरांचे हातानें ती रक्कम इतर लोकांना वाटवून दिली. अर्थातच त्या रकमेपैकीं कांहींही भाग म्हाळसापतीकडे गेला नाहीं

-रा. रा. चिदंबर केशव गाडगीळ या नांवाचे महाराजांचे एक भक्त होते. ते सरकारी नोकरीवर होते. कांहीं दिवस नगरास कलेक्टरचे चिटणीस होते. पुढें सिन्नरास मामलेदार होते. त्यांना वेळोवेळीं दर्शनाचा लाभ घडत असे. सिन्नराहून त्यांची बदली कोठें लांब झाली व तावडतोब जाऊन रुजू होण्याचा हुकूम मिळाला. महाराजांचे दर्शनास जाण्याला अवकाश राहिला नाहीं. ते कोपरगांवाकडूनच आगगाडीनें गेले पण दर्शनास जातां येत नाहीं, याबद्दल त्यांना फार हुरहूर लागली. पुढें गाडी चालली असतां एकाएकीं खिडकी वाटे एक कागदाची पुडी त्यांचे अंगा-

वर येऊन पडली उघडून पहातात तों त्यांत उदी सारखी पूड दिसली. त्यांनीं ती जतन करून ठेवली. पुन्हां दर्शनास जाण्याचा योग आला तेव्हां महाराज आपण होऊन त्यांना म्हणाले " तूं आला नाहींस म्हणून मी तुला उदी पाठविली ती पोहचलीना ? " गाडगीळांना हें शब्द ऐकून गहिंवर आला. पुढें ती उदी त्यांनीं एका ताइतांत घालून ठेवली व ती शेवटपर्यंत त्यांचेजवळ होती.

रा. रा. लक्ष्मण कृष्ण उर्फ तात्यासाहेब नूलकर हें महाराजांचे भक्त होते ते पंढरपुरास मुन्सफ होते. तेथें त्यांच्या डोळ्याला कांहीं विकार झाला. कोणतीही वस्तु पाहिली कीं, तिच्यावर दुसरी तशीच वस्तु दिसावयाची. अक्षरेंही अशींच दुहेरी दिसावयाचीं. मग त्यांनीं रजा घेतली व बंधू जळगांवास डाक्टरी करीत होते तेथें गेले. तेथें गेल्यानंतर दोनचार दिवसांनींच गुरुपौर्णिमा होती. पौर्णिमेच्या आदले दिवशीं भावाच्या विचारानें तात्यासाहेब पौर्णिमेसाठीं शिर्डीस आले दोन दिवस राहून परत जाण्याच्या बेतानें ते आले होते म्हणून कपडे सामान औषधें, वगैरे कांहीं बरोबर आणलें नव्हतें. आले त्या दिवशीं बहुतेक दिवसभर डोळे बांधूनच पडले होते दुसरे दिवशीं महाराज माधवरावांना ह्मणाले "शामा माझा आज डोळा फार दुखत आहे." तेव्हांपासूनच रा. तात्या साहेबांचें डोळे हळु हळु सुधरूं लागले; व कांहीं दिवसांनीं औषध पाण्याशिवाय साफ बरे झाले.

---

तात्यासाहेब नूलकरांना शिर्डीस थोडे दिवस राहिल्यावर असें वाटं लागलें कीं, आतां येथेंच राहावें व आपला शेवट महाराजांचे पायांपाशींच व्हावा व अखेरीस झालेंही तसेंच. त्यांना मधुमेहाचा विकार पुष्कळ वर्षे होताच, त्यांची एक दोन गळवें झालीं व तीं कापलीं. पुढें आणखी पुष्कळ गळवें झालीं. व त्या दुखण्यांतच त्यांचा अंत झाला. तो सुमारें रात्रीं दोन वाजतां झाला. त्याच्या एक तास अगोदर त्यांनीं आपल्या

दोघांही मुलांना भजन करावयास सांगितलें. मग " आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहे ॥ जो मी तुज पाहें नारायणा ॥ " हा अभंग म्हणावयास सांगितला, नंतर एका मुलानें तोंड आकरावयास सांगून त्यांत उदी घातली व दुसऱ्या मुलानें महाराजांचें तीर्थ घातलें. तात्यासाहेबांनीं विचारलें " हें काय आहे ? " मुलांनीं म्हटलें " उदी व तीर्थ आहे " एवढें झाल्याबरोबर एकदम प्राणोत्क्रमण झालें. जवळ कुटुंबांतील सर्व माणसें होतीं पण तात्यासाहेबांचे चेहऱ्यावर यत्किंचितहि खिन्नता नव्हती.

---

वांद्याचे एक गृहस्थ सन १९१० मध्यें आपल्या एका मित्राबरोबर शिर्डीस गेले होते. त्या मित्रानेंच त्यांचें येता जाताचें भाडें दिलें. त्या गृहस्थानें आपल्याबरोबर तीन कोरे रुपये नेले होते पण महाराजांना कांहीं दक्षिणा द्यावयाची नाहीं, असा त्यांचा संकल्प होता. महाराजांनीं त्यांच्या जवळ मुळींच दक्षिणा मागितली नाहीं. परत येतांना ते गृहस्थ आपल्या स्नेह्याला सांगूं लागले " मी शिर्डीस तीन कोरे रुपये घेऊन गेलों होतों ते मी तसेंच परत घेऊन जात आहें. " वांद्यास पोहचण्याचे आदले रात्रीं त्या गृहस्थाचे कुटुंबास स्वप्न पडलें कीं, आपल्या नवऱ्याची पैशाची पिशवी व एक भरलेली आगडबी ( आगपेटी ) व एक रिकामी आगडबी शेतखान्यांत पडली आहे आणि पैशाचे पिशवींत तीन कोरे रुपये आहेत. स्वप्न इतकें स्पष्ट पडलें कीं, बाई जागी झाल्याबरोबर शेतखान्यांत जाऊन खरोखरच रुपये पडले आहेत कीं काय ? हें पाहूं लागली. अर्थात रुपये तेथें नव्हते पण ते गृहस्थ परत आल्यावर त्यांनीं हें स्वप्न सांगितलें व ते आपल्या खिशांत पाहूं लागले तों त्या खिशांत दोन आगडब्या एक भरलेली व एक रिकामी; व पैशाची पिशवी व तींत तीन कोरे रुपये एवढें सामान दिसलें. अर्थातच त्या स्वप्नापासून बोध घ्यावयाचा तो त्यांनीं घेतला व त्यांना उपरती होऊन त्यांनीं ते तीन कोरे रुपये व दर रुपया मागें चार आणे दंड असे पावणेचार रुपये महाराजांस दक्षिणा म्हणून पाठविले. पुढें ते गृहस्थ सहकुटुंब व माता पितरांना घेऊन एक महिना शिर्डीस जाऊन राहिले होते.

---

एकदां एक योगाभ्यासी गृहस्थ आपल्या कांहीं शंका विचारण्यासाठीं नानासाहेब चांदोरकरांचे बरोबर महाराजांकडे गेले होते. त्यावेळीं महाराज जेवावयास बसले होते. जेवण म्हणजे भाकर व कांदा. महाराजांचे हातांत कांदा पाहिल्याबरोबर त्या गृहस्थाचे मनांत विकल्प उत्पन्न झाला. तो मनांत म्हणूं लागला हे कांदा खातात तर हे कसले योगी व आपल्याला यांचेपासून काय मदत मिळणार? हें त्यांचे मनांत आल्याबरोबर महाराज म्हणाले "नाना! कांदा खाऊन पचविण्याची ज्याची शक्ति असेल त्यानें तो खुशाल खावा." हें महाराजांचें अंतर्साक्षित्व पाहून तो गृहस्थ मनांत चरकला व मनांतले मनांत शरण गेला, मग महाराजांनीं त्याच्या सर्व शंकाचें समाधान केलें व तो प्रसन्न होऊन गेला.

---

### रा. रा. वामनराव प्राणगोविंद पटेल. बी. ए. एल्. एल्. बी. यांचे श्रीसाईबाबाबद्दल अनुभव.

॥ ॐ साईनाथायनमः ॥

पूज्य प्रिय—

त्हारां स्मरणो आशरे दश वर्षनां जुनां छे पण हजी ताजांज छे.

माथे मादरपाटी ककडी वींटाळेली ने शरीरपर पण एज स्वदेशी वस्त्रनी कफनीवाळी त्हारी आकृति त्हारी कृपाथी स्मरणमात्र थी खडी थाय छे-थयां करे छे ने त्हारां अणुरेणु पिंडब्रह्मांड सर्व स्थळे व्यापी रहेलां स्वरुपनी याद आपे छे. ते त्हारां स्वरुपमां म्हने कायममाटे लीन थइ जवादे ए प्रार्थना.

ज्यारे पाश्चात्यन्याय अने तत्त्वज्ञानना प्रभावे इश्वरना अस्तित्व ने स्वरुप विषे संशय वा जिज्ञासा उत्पन्न थयेली हती, ज्यारे जगतनुं बंधारण न्यायपर रचायुं छे, के आकस्मिकज छे, ए प्रश्न म्हारी समक्ष उभो रहेलो हतो, त्यारे म्हारा स्व. पिताना कहेवाथी हुं त्हारे दर्शने प्रथम आव्यो. त्यारबाद-केटलीकवार आव्यो गयो. एक वखत त्हारी इच्छा थी हुं अगीआर महिना शिर्डी रह्यो. त्यारपछी एक वर्ष जेवा टुंक समयमां ते उपरना

केटलाक प्रश्नोनुं वेदोपनिषदांनुसार निराकरण कर्युं ने बाकीना बधा प्रश्नोनुं संपूर्ण तेवीज रीते निराकरण ऑक्टोबर १९१६ मां करी आप्युं.

आर्टीकल्ड क्लार्कनी परिक्षामां बेसवामाटे कंई पण लांबा वखतनी गेरहाजरी शिवाय सॉलीसटरने त्यां एल. एल. बी. ओने बे वर्षनी टर्म राखवानी होय छे. तेर महिना भर्या बाद ज्यारे गरमीनी रजामां हुं त्हारी पासे आव्यो त्यारे त्हें म्हने लागलागट अगीआर महिना राख्यो. शिर्डीथी पाछां फर्यां बाद केटलोक समय बीत्यापछी पाछो टर्म राखवानो म्हारो विचार थवाथी त्हारी संमति ते माटे लई जूनी पेढीना सॉलीसीटरोने मळ्यो. त्यांना मुख्य सॉलीसीटर रा. ज. ज. बीमादलाले कह्यु "हवे तमोने राखी शकाय नहीं; राखीए तोये फरी तमारे टर्म भरवी पडशे एटलेके फरी बे वर्ष भरवां जोयशे. पण जो तमो कोर्टनी परवानगी बाकीना महिनाभरी टर्म पूरी करवा माटे मेळवो तो म्हने कंइ वांधो नथी छतां हुं तो धारुंछुंके कोर्ट जो एम करवा रजा आपशे तो ते तम्हारे माटे नवोज कायदो घडशे. आटला दिवसमां कदी एवो केस बन्यो नथी." आ उपरथी वडा न्यायाधीशने ए बाबतमां अरजी करी ने त्हारी कृपाथी तेमणे बाकीनी ११ महिनानी टर्म भरवाथी राखवो जोयती टर्म भरेली गणाशे एवो चुकादो आप्यो.

अतिशय क्षुधाथी एक दिवस व्याकुळ थयेल होवाथी तुं उभो हतो ते रस्तेथी नहीं पण बीजेज रस्तेथी हुं वीशीमा जतो हतो~~, त्यारे त्हें आंटो~~ कहाडी त्हारी मेळेज कह्युंके "जायछे पण हेरान थशे" म्हारे माटे ते त्हें नहि कह्युं होय धारी म्हें वीशी मांजइ नास्तो कीधो. बीजे एक दिवसे पण क्षुधा लागवथी आवी रीते संताइने जतो हतो त्यारे त्हें आवीज रीते आवेथी कहेलुं पण ते वखतनी क्षुधानी तीव्रताथी म्हें त्हारा कहेवानो अनादर कीधो हतो; बेऊ वखते बीजेज दीवसे पेटमां सखत दुखावो थइ केटलीकवार शौचे जवुं पडयुं हतुं. त्हारां वचननो अनादर करनारने पण त्हें कृपा देखाडीज हती. पहेली वखते तो कलाकमांज सारुं थइ गयेलुं ने बीजीवार ज्यारे आखो दिवस हेरान होवाथी जरा हुं गभरायो हतो त्यारे

र्हें रा. बापुसाहेब जोगने आपेलो मीठाई प्रसाद म्हने मळ्यो तेथी पेटमा दुखतुं बंध थई गयुं ने प्रकृति स्वस्थ थई गई

अगीआर महिना रह्यो ते दरम्यान हुं केटलोक वखत हाथे रांधतो हतो पण पछी म्हने कंटाळो आववाथी म्हें एक दिवस स्हवारमांज कोइनें कह्यांशिवाय म्हारा मन साथे निश्चय करेलो के आजे कांई रांधवुंज नहीं पण फकत काचुं कोरुं खाई मुकवुं. ते दिवसें हुं त्हारी पासे एकलो हतो त्यारे तें फकत एटलुंज कह्युं के " बहु शोखीन थइ गयो " आ उपरथी म्हारो ठराव अयोग्य हतो एम म्हने जणायुं.

त्हारे माटे बपोरनी भिक्षा मांगवानुं त्हें म्हने मान आप्युं हतुं ते दरम्यान एक दिवस भिक्षा लेवा जतां हाथनी अनाभिका आंगळी दिवाल साथ घसाववाथी छोलाइ स्हेज लोही नीकळेलुं. हुं ज्यारे भिक्षा लेइ मस्जीदमां पाछ आव्यो त्यारे त्हें त्हारी अनामिका उंची करी म्हने देखडावी एम सूच युंके त्हारी आंगळीना दरदनी म्हने खबर छे.

त्हारा कहेवाथी हुं त्हारा एक भक्तने त्यां केटलोक वखत जमतो हतो. केटलाक दिवसबाद म्हने त्यां जमवुं पडतुं तें ठीक न होतुं लागतुं पण त्हें कहेलुं तेथी हुं त्यांज जम्यां करतो.आ वात म्हें कोइने कही नहोती. छतां एक दिवस त्हें त्हारी मेळेज हुं उभो हतो ने कह्युं " अडचण शुं काम भोगववी, वीशी वाळा साथे गोठवण करी ले. "

एक वखत म्हारो बिचार त्हारां दर्शन लेई. बारोबार मन्माडथई टाप्टीवेली रेलवेमां बारडोली थइ मोता मारा स्व पिता जे ते वखते मांदा हता तेमनी खबरलेवा खास जवानो हतो. शियाळानो दिवस होवा थी त्यां रात्र थाय ते प्हेलां पहोंचवाने तेमज म्हें बारडोली स्टेशने गाडी मगावेलो न होवाथी, बारडोली स्टेशनपर म्हारे स्हवारनी ट्रेनमांज उतरवानी जरुर हती. त्यां स्हवारे पहोंचाडे एवी ट्रेनमाटे म्हारी समजप्रमाणे म्हारे शिरडीथी बपोरेज नीकळवुं पडतुं हतुं तेथी लागलागट म्हें बेदीवस बपोरे त्हने जवा माटे पूछ्युं त्यारे त्हें जवा ना पाडी, आथी विस्मीत थइ धर्मशाळामां ठरेला एक गृहस्थपासेथी रेलवे गाईड लेइ गाडीओ

विषे स्हेज जोयुं तो समजायुं के स्हवारनी ट्रेनमां जवानी जरुर छे. ते प्रमाणे बीजे दीवसे जवा परवानगी मांगतां तें तरत आपेली.

१९११ मां ज्यारे हुं प्रथम त्हारे दर्शने आव्यो त्यारे म्हें त्हारी नानकडी छबीने लॉकेटमाटे बे छबी खरीदेली. बधा भक्तो जेम छबीओ त्हारा हाथमां आप्यां बाद घेर लई जता तेमज म्हारी पण ईच्छा ते त्हारा हाथमां आप्यां बादज घेर लई जवानी हती, पण ते शरमने लीधे बनी शक्युं न होतुं ते म्हारा मनमां म्हने लागतुं हतुं. छतां बहु दीवस थइ गयेला होवाथी म्हें शिरडीथी घेर पाछा फरवानो निश्चय कीधो ने त्हने पूछ्युं " बिराडी जाऊ काय ? " त्यारे त्हें " हा " कही खुशीथी उदी आपी ने कह्युं जा. तेथी गाडी करी हुं नीकळ्यो. गाडीवान एक छोकरोज हतो. कोपरगांव आवतां ते छोकरो कहे " अहीं जामफळ बहु सारां मळेछे ते थोडां घेर लेइ जाव; हुं उतरीने वाडीमांथी त्हमने लावी आपुं म्हें एने कह्युं " हवे शो उपयोग ? पण जो तुं हुं आपुं ते जामफळ लेइ जई " बाबा " ने पहोंचाडे तो लइ आव " एणे हा पाडी तेथी म्हें एने जामफळ लेवा मोकलयो ने ए गया बाद हुं गाडीमांथी लघुशंका माटे नीचे उतर्यो ते कार्यथी निवृत्त थइ छोकरानी वाट जोतो आम तेम गाडीपासे फरवा लाग्यो. फरवाथी बूटनो जे अवाज थयो तेथी गाडीना बळदो भडकी सामान साथे गाडी लेइ पाछा शिरडी तरफ दोडया. में ने बीजा एक जणे ते बळदोने ऊभा राखी पाछा फेरववा व्यर्थ प्रयत्न कर्या पण ते कंइ झलाया नहीं. तेथी जे जग्याथी बळदो नाठेला ते जग्या ए पाछो आवी हुं उभो. घणो वखत हुं थोभ्यो पण छोकरो पाछो आव्यो नहीं तेथी हुं कोपरगांव स्टेशन तरफ पगे चाल्यो. थोडे गयो एटले ते छोकरो पोलीसने लेइ आवतो मळ्यो. पोलीस ने बनेली बाबतनो खुलासो करी छोकरा साथे गाडीनी शोधमां हुं शिरडी तरफ पाछो फर्यो. तो सावळी वीर आगळ गाडी एमनां एम रहेलां सामान साथे त्यांना चोकीदारे उभी कीधेली जोई. पछी शिर्डी पाछो फर्यो ने बे त्रण दिवस वधु रह्यो ते दरम्यान मुंबाईना एक जाणीता वकीलनी ओळखाण थइ ते तेमणे पोताने माटे त्हारी छबी लीधेली ते त्हारा हाथमां आपी त्यारबाद तेनी साथे म्हें

पण जे छविओ.. अगाउ हुं त्हारा हाथमां आपी शक्यो न हतो ते आप, पाछी लीधी ने पछी त्हारी रजा लेइ पाछो फर्यो त्यारे रस्तामां कांइ विघ्न नडयुं नहीं.

एक स्हवारे पेटमां दूखतुं हतुं. आवखते म्हेजा कांइ थायके दवा खावानी म्हने टेव पडेली तेथी पेटमां दुखवा मांडयुं के तरतज पेनकीलरनी बाटलीनी घरमां शोध करी पण ते हतुं नहि तेथी दीलगीर थइ हुं बेठो हतो. एटलामां त्हारी उदीनी बाटलीपर नजर गइतेमांथी थोडी उदी लेइ फाकी तो ते उदीनो स्वाद पेनकीलरना जेवोज लाग्यो ने पेटमां दुखतुं बंध थई गयुं. जे बाटलीमां म्हें भरेली ते तद्दन साफ कीधेली सॅनेटोजननी बाटली हती एटले एमां पेनकीलरनो स्वाद संभवेज क्यांथी ?

१९१६ ना ऑक्टोबर मासमां ज्यारे हुं रात्रिए गमे त्यां जइ रस्तापर के निर्जन ज ।ामां सूइ रहेतो त्यारे मायाळु पितापेठे तुं म्हारी शोध माटे माणसो मोकलतो.

हे पूज्यप्रिय आवीरीते तुं खरेखर म्हारां मात, पिता, बंधु, मित्र, गुरु प्रसंगोपात बन्यो पिता तरीके हें म्हने लाडनुं " बाबु " नाम पण केटलोक वखत आप्युं पण आ बधा लाडना प्रतीकारमां जे काया वाचा मनथी म्हारी जातनुं अर्पण थवुं जोइए ते म्हाराथी बनी न शक्युं–म्हें त्हारां लाडक बाबा नामने लजाव्युं तुंतो " अजन्माद्यमेकं परब्रह्म साक्षात्" तेथी तने मायाना विशेषणो न शोभे–बन्यो तुं तो मा बाप गुरु मित्र बंधु वखतोवखत बन्यो त्यारे तुंने एक एवुं शुं नाम आपवुं ते न समजायाथी शरुआतमां 'पूज्य प्रिय ' कही संबोध्योछे आटली सलगी जे त्हने कांइपण पूर्णपणे अर्पण करी शक्यो नथी तेने न घटे छतां त्हारो हंमेशनो " स्वभक्तेच्छया मानुषं दर्शयन्तं " नो कृपाळु क्षमाशील स्वभाव याद आवतां आ धृष्टता कीधी छे–तेने माटे क्षमा.

लेः-लाडका नामने अयोग्य पण लाडकु नाम राखवामां मान समजनार त्हारो बाळ " बाबु " ना शिरसाष्टांग नमस्कार

# आतांपर्यन्त छापून आलेल्या महाराजांच्या लीला.

महाराजांच्या उदी ( अंगारा ) संबंधानें हजारों लोकांना अनुभव आले आहेत. तेच नुसते एके ठिकाणीं गोळा केले तरी एक प्रचंड ग्रंथ होईल. तें काम महाराजांना कोणीकडून करवून घ्यावयाचें असेल, तर तें करवून घेतीलच; पण तूर्त या प्रस्तावनेंत त्यांपैकीं थोडेसे अनुभव केवळ दिग्दर्शनार्थ नमूद करीत आहें.

माझे एक पारशी स्नेही एके ठिकाणीं स्टेशनमस्तर होते. त्यांना एक विकार होता, व त्यासाठीं त्यांनीं मुंबईच्या चांगल्याचांगल्या डॉक्टरांचीं औषधें घेतलीं होतीं; पण विकार गेला नाहीं.एक दिवस त्यांनीं मजकडून महाराजांची उदी घेतली व तिचें तीन दिवस सेवन केलें. चवथे दिवशीं त्यांचा विकार साफ नाहींसा झाला.

एका पारशी गृहस्थाच्या तान्या मुलीला आंकडी येत असे. प्रत्येक तासातासाला तिला तें वारें येई, आणि ती अत्यवस्थ होत असे. त्या गृहस्थाला त्याच्या एका स्नेह्यानें मजकडे पाठविलें व मीं त्याला उदी दिली. ती तो घेऊन गेला आणि दुसऱ्या दिवशीं त्यानें मला येऊन सांगितलें, कीं, उदी दिल्यानंतर आंकडी दर तासाला न येतां सात तासांनीं आली व तिच्यापासून फारच कमी त्रास झाला. व तो आणखीं उदी घेऊन गेला.

हर्द्याजवळ एका खेड्यांत एक म्हातारा गृहस्थ मुतखड्याच्या विकारानें अतिशय त्रस्त झाला होता. पुष्कळ लोकांनीं त्याला शस्त्रक्रिया करवून खडा काढवावा असें सांगितलें, पण त्याची हिंमत होईना. शेवटीं तो मरणोन्मुख झाला. तितक्यांत माझे एक गुरुबंधु जे त्या गांवचे इनामदार आहेत ते त्या गांवांत जाऊन पोहोंचले. त्यांच्या येण्याची खबर त्या म्हाताऱ्याच्या मुलास लागतांच तो त्यांच्याकडे गेला व त्यांजपाशीं महाराजांची त्यानें उदी मागितली. ती उदी त्यानें पाण्यांत घालून आपल्या बापाला पाजली आणि त्यानंतर पांच मिनिटांच्या आंत खडा आपोआप

लव्वीच्या द्वारें सटकन् बाहेर पडला, अर्थातच म्हातारा हुषार झाला आणि त्याची प्रकृती सुधारली.

मुंबईचा एक कायस्थ प्रभु गृहस्थ कांहीं महिने शिर्डीस राहिला होता. त्याची बायको गरोदर होती, तीहि त्याच्यावरोबर होती एके दिवशीं रात्रीं दहा वाजण्याच्या सुमारास तिला प्रसूतिवेदना सुरू झाल्या. गांव लहान असल्यामुळें तेथें डॉक्टर किंवा वाकबगार सुईण मिळणें शक्य नव्हतें. शेजारच्या दोन वाया गेल्या व त्यांनीं पाहिलें तों पोर आडवें आलेलें होतें, आणि गर्भाची हालचाल कांहींच दिसेना, व बाईचा जीव कासावीस होऊं लागला. शेजारणी बायाही घाबरल्या. मग त्यांपैकीं एकीनें थोडी उदी पाण्यांत घालून त्या गरोदर बाईला पाजली, आणि बाबांचा धांवा केला. पांच मिनिटांच्या आंत पोर बाहेर पडलें. तें अगदीं हिरवेंनिळें झालेलें होतें. त्यावरून गर्भांतच त्याचा प्राणांत होऊन कांहीं वेळ झाला असावा, असें दिसलें. पोर बाहेर पडल्यानें बाईचा जीव वांचला. हें बाळंतपण बाईला फारच कठीण जाईल, आणि बाईच्या जिवावर बेतेल, असें पुष्कळांनीं पूर्वीं भाकित केलें होतें, आणि ह्मणून ती बाई आणि तिचा नवरा शिर्डीस जाऊन राहिलीं होतीं.

वांद्र्यास एक गृहस्थ आहेत त्यांना रात्रीं त्रास होत असे. त्यांना झोंप लागली कीं भयंकर स्वप्न पडावें, आणि त्यांनीं दचकून जागें व्हावें. हा प्रकार सतत कांहीं महिने चालू होता. एके दिवशीं त्या गृहस्थानें आपली हकीगत त्याच घराचे मालक जे माडीवर रहातात त्यांना सांगितली, व याला कांहीं उपाय सांगा असें म्हणाले. घराचे मालक बाबांचे पूर्ण भक्त असल्यामुळें त्यांनीं त्यांना थोडी उदी एका कागदाच्या पुडींत बांधून दिली, आणि ही निजतांना उशाखाली ठेवा, असें सांगितलें. त्यांनीं त्याप्रमाणें केलें व त्या रात्रीं त्यांना स्वस्थ झोंप लागली. ती पुडी आतां ते नेहमीं उशाशीं ठेवितात, आणि आतां झोंपेसंबंधानें त्यांची तक्रार कांहीं राहिली नाहीं.

[illegible] एक गृहस्थ आहेत, त्यांना एकदां पटकीचा आजार झाला, आणि तो नुसत्या उदीनें-कोणाचें कांहीं औषध न घेतां बरा झाला, असें त्यांनीच मला सांगितलें.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| महाराजांचे अनुभव— | | | |
| ,, ३८ | २१ | रमाणस | रामायण |
| ,, ४० | ८ | एयष | यएष |
| ,, ,, | ,, | परंज्योतिरूपसपद्य | परंज्योतिरूपसंपद्य |
| ,, ४४ | ७ | जोपेश्वर | जगदीश्वर |
| ,, ,, | १७ | महाराजांतर्ग | महाराजांत |
| ,, ४६ | १२-१७ | महजांचे | महाराजांचे |
| ,, ,, | १४ | गताहो | गताही |
| ,, ५१ | २५ | अवघ | अवघे |
| स्फुट विषय— | | | |
| ,, १७ | ८ | अरूपा | अरूप |
| ,, ,, | २७ | समयातीयाः | समयातीता |
| ,, ,, | १० | मक्रोचे | संकोच |
| ,, १८ | १२ | सच्चीदानंद | सच्चिदानंद |

,, १२ हे अभंग रा. रा. तिळकठ रामचंद्र नरवडे यांनी रचिलेले आहेत ते वे. शा. सं. कृ. जा. सीण यांचे नव्हेत.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| श्रीसाईसच्चरित— | | | |
| ,, ९६ | २७ | सांडे पाणी वाही | पाणी वाही |
| ,, ९८ | २५ | घडयांचा | घड्याचा |
| ,, ९९ फूट नोट "करीत" वर नसून "केली" या शब्दावर आहे. | | | |
| ,, १०२ | २२ | माशिदीत | मशिदीत |
| ,, १०३ | ,, | कोष्ट | कोष्ट |
| ,, ,, | २१ | पश्चाताप | पश्चात्ताप |

# श्रीसाई लीला.

( मासिक )

वर्ष १ लें. आषाढ शके १८४५. अंक ५ वा.


## महाराजांचे अनुभव.

श्री सद्गुरु साईनाथ सगुणोपासनेंतील बहुतेक पद्यांचे कर्ते वे० कृष्ण शास्त्री भीष्म यांनीं ता० ११।७।२१ रोजीं पाठविलेल्या पत्र नं० १०१ यांतील कांहीं उतारेः—साईनाथांचे गुरूपुजेची पत्रिका त्यांच्या सद्भक्ताकडून आली ती पोंहचली. पण मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें कीं, अशा प्रसंगीं दासाला सद्गुरूचे चरणकमलाचा लाभ होत नाहीं. कारण येथें मी तयार केलेल्या यथार्थ रामायणाचें पुराण आषाढ शु ॥ १२ पासून सुरू करण्याचा ठराव येथील लोकांचे आग्रहावरून केला. हें यथार्थ रामायण सद्गुरू साईनाथांच्या कृपेनेंच तयार केलें गेलें म्हणून मी सुरू ठेवणारे पुराणही महाराजांची सेवाच आहे असें मानितों तरी महाराजांचे समाधीजवळ अल्पशी भेट म्हणून एक रुपया पाठविला आहे, तो सद्भक्तांनीं त्यांच्या सत्कार्यास लावावा. आतां महाराजांविषयींचा आपला अनुभव काय आहे तो कळविण्याविषयीं आज्ञा आहे करितां त्या संबंधानें दोन शब्द लिहितों.

महाराजासंबंधानें मला जो अनुभव आला तो माझ्याबरोबर असणाऱ्यांना सर्वांना माहित आहेच. म्हणून माझ्या लिहिण्यांत कांहीं विशेष आहे असें समजूं नये. मी जें लिहिणार तें पूर्वींच भक्त मंडळीस कळलें असेल व तें ग्रथित केलें असेल तर माझा लेख दाखल दप्तर करावा आणि

अनुभव येऊन तो प्रसिद्ध केला नसेल तर मी लिहिलेल्या लेखास साक्षी घेऊन जी त्याची वासलात लावावयाची असेल ती लावावी.

साईनाथ महाराज हे अतींद्रिय होते. ह्या ठिकाणी होते असा भूतकाळी प्रयोग केल्यानें महाराजांच्या त्रिकालाबाधित वास्तव्यास बाध येतो पण हा प्रयोग फक्त नश्वर देहासंबंधानें समजावा.कारण साईनाथ अजरामर असून ते सांप्रत कायम आहेत व हमेशाही आहेत असें माझें मन सांगतें. व वारंवार दर्शन देऊन या देहाकडून कार्य करून घेतात.तेव्हां हें माझें म्हणणें खोटें होणें शक्य नाहीं. आम्ही सर्व मंडळी साईनाथांचे सन्निध असून सायंकाळची शेजारती केली. दुसरे दिवशीं महाराजांचे दर्शनास गेलों असतां ते म्हणाले " काल मी फिरावयास गेलों होतों." हें आम्हांस खरें वाटेना पण थोडके वेळानें एका गांवच्या मनुष्यानें सांगितलें ( हा गांव शिर्डीचे दक्षिणेस जवळच आहे ) कीं ' काल सायंकाळचें वेळेस महाराज आमचे गांवीं होते' हें समजल्यावर महाराजांचे म्हणण्याचा अर्थ बरोबर लागला. एक देह राहून दुसरा देह धारण करण्याची शक्ति अतींद्रियता प्राप्त करून घेतल्याशिवाय येत नाहीं.

एके दिवशीं बळवंतराव खापर्डे व त्यांचे घरची सर्व मंडळी निद्रिस्त झाल्यावर साईमहाराज बळवंतरावचे स्वप्नांत येऊन त्याचे घरीं भोजन केलें व झोंपाळ्यावर बसून विडा घेतला आणि निघून गेले. इतक्यांत बळवंतराव जागे झाले व प्रातःकाळीं मला तें स्वप्न सांगितलें, तेव्हां मी त्यांना म्हणालों तुम्ही हें स्वप्न कोणाजवळ न सांगता साईमहाराजाजवळ जा. जर हें स्वप्न महाराजांनीं दिलें असेल तर महाराज कांहीं ना कांहीं तरी बोलतील, व एरव्हीप्रमाणें हें स्वप्न असेल तर कांहींच बोलणार नाहीत. असें त्यांनी सांगितल्यावर ते साईमहाराजांकडे गेले. चमत्कार हा झाला कीं, तेथें जाण्याबरोबर' काल आम्हांस जेऊं घातलें पण दक्षिणा नाहीं दिली' असें ते बळवंतरावाला म्हणाले. हे शब्द ऐकून बळवंतराव सर्द झाले व दक्षिणा किती द्यावी असा उलट महाराजांस प्रश्न केला, तेव्हां २५ पंचवीस रुपये दक्षिणा आण असें ते म्हणाले. हें सर्व अतींद्रिय शक्तीचे खेळ आहेत. कांहीं मंडळीस ह्या गोष्टी खोट्या वाटतात

पण श्रीमंत यशवंत व्यंकटेश कोल्हटकर बी. ए. एल् एल्. बी हे आपल्या श्रीमद्भागवतार्थ दर्शन नामक पुस्तकांत आत्मा अमर असून त्याला अनेक चमत्कार करिता येतात, हें सप्रमाण सांगतात. मग महाराजांचे जागृतावस्थेंत व स्वप्नावस्थेंत देह धारण करून दर्शन देणें कोणतें अशक्य आहे! ' जागतरामा सोवत रामा सपनोमे देखो रामही रामा ' या एकनाथ स्वामीच्या म्हणण्याप्रमाणें साईनाथ वाटेल तेव्हां दर्शन देतात, याला प्रमाण ' अथ एष संप्रसादोऽस्माच्छरीरात्समुत्थाय परंज्योतिरूपसंपद्य स्वेन रूपेणाभिनिष्पद्यत ' ( छांदोग्योपनिषत् अष्टमोध्याये खंड ३ मंत्र ४) ( आत्मवेत्त्याचा ) हा प्रसन्न रूप आत्मा ( केव्हांही ) या शरीराच्या बाहेर येऊन अत्यंत श्रेष्ठ अशा ज्योतीला प्राप्त होत्साता स्वतःच्या रूपाशीं युक्त होतो ( तरी केव्हां केव्हां त्याला पूर्वीचें शरीर अचेतन पाडण्याची अवश्यकता वाटत नाहीं. ) महाराज कामक्रोधादिक वृत्तीला वश न होतां स्वस्वरूपीं रममाण होऊन सदा शांत वृत्तीनें रहात.

शयनागारांतून मशीदींत येतेवेळीं हातीं दंडा घेऊन लाखो शिव्या देत असत अशा वेळीं त्यांचे समोर जाण्याची छाती होत नसे. पण चमत्कार हा कीं, मोठ्यानें शिव्या देण्याचे आवेशांतच प्रतिक्षणीं ' अल्ला तेरा अच्छा करेगा' ही अत्यंत व हळू पण स्पष्ट वाणी ऐकूं येत असे. कोणता सामान्य पुरुष रागाच्या तडाक्यांत शांत वृत्तीनें आशिर्वाद देता ? म्हणून मी म्हणतों कीं महाराजांचें रागावणें हा निवळ देखावा होता पण अंतःकरण अत्यंत दयार्द्र व शांत होतें.

" भक्तांची सांकडी स्वयें सोसी देव । त्यां पाशीं केशव सर्वकाळ ॥ ( गाथा तुकाराम ४२७४ ).एके दिवशीं आम्हीं सर्व मंडळी महाराजांपाशीं बसलों व आरतीची वेळ झाली. त्यावेळेस मामूलीप्रमाणें *बापूसाहेबांनीं आरती लाविली पण काय झालें नकळे महाराजांचे शरीरांत एकदम नरसिंहावताराचा संचार झाला. आरती व आलेले नैवेद्य सर्व फेकून दिले. दंडा मारून सर्वांस मशीदींतून काढून दिलें. व आसन सोडून खालचे पडवींत येऊन बसले. अशा वेळेस आरतीबीरती सर्व कांहीं राहिले. तीन वाजले भक्तजन भुकेनें व्याकूळ होऊं लागले. कोणी नुसत्या सिंहा-

*बापूसाहेब जोग.

सनासच आरती करा असें म्हणूं लागलें. पण दादासाहेब खापर्ड्यांनीं तसें करूं नये आरती महाराजांसच करावी. पण ती बापूसाहेबानीं न करितां या वाघ्याचे हातानें करावी, ( तेथें एक म्हणाला वाघ्या होता ) असें सांगितलें. तेव्हां त्याचे हातीं आरती दिली. पण तितक्यांतच महाराज आपण होऊन सिंहासनावर बसले व मग रीतीप्रमाणें आरती झाली. पण महाराजांचे संतापाचें कारण समजेना.

दुसरे दिवशीं कोपरगांवांवरून एक वकील आले ते म्हणाले "महाराजांचे भक्तावर एक फौजदारी मुकदमा होता. कोर्टानें त्याला शिक्षा दिली. तितक्यांत मी तेथें गेलों. केस पाहून मुकदमा घेतला व अपील दाखल केलें. चमत्कार हा झाला कीं, कोर्टानें आरोपीची चालचलण मला विचारली व मी प्रतीवादी निर्दोष आहे अशी खात्री दिली. त्याबरोबर आरोपीस सोडून दिलें. हें असें अकस्मात कसें झालें याचें आश्चर्य वाटून महाराजांचे दर्शनाकरितां आलों. कारण त्या भक्तानें मला महाराजांची कीर्ति सांगितली. व "महाराजांचेंच कृपेनें मी दोषमुक्त झालों असें तो म्हणाला होता."

" प्रगट गुह्य बोले ॥ विश्व ब्रह्मचि ठेलें " ॥ असें ज्ञानेश्वर महाराजांचे आरतींत आहे. असेंच वर्तन महाराजांचें होतें.

महाराजांचे नित्य बैठकीस एक फाटकें तरट होतें. पण त्यावर महाराजांची अतिप्रीति. एक दिवस महाराज दिशेला गेले असतां ती तरटी फेकून देऊन त्या जागीं रेशमी गादी एका भक्तानें घातली. महाराज प्रातर्विधी आटोपून आसनावर येण्याबरोबर त्यांनां फाटकी तरटी न दिसतां नवी गादी दिसली. त्याबरोबर जो त्यांनीं संताप केला त्यासरसी धुनी व गादी फेकफाक करून शिव्यांचा वर्षाव सुरू केला. पण ती फाटकी तरटी देण्याबरोबर ते शांत झाले. एके दिवशीं मला लोकांनीं ती तरटी फेकून दुसरी एक टाकण्यास सांगितलें पण मी तसें न करितां आरतीची वेळ झाल्यावर सर्व उभे राहिले त्या वेळेस तरटी काढण्याविषयीं खुणेनें महाराजांस प्रश्न केला व महाराजांनीं खुणेनेंच संमति दिली. ती पडते फळाची आज्ञा मिळाल्याबरोबर दादासाहेबांस सांगितलें, त्यांनीं लागलेंच

एक पोतें विकत घेतलें तें मी महाराजांचे बसण्याचें जागीं घालून फाटकी तरटी फेंकून दिली. आरती झाल्यावर महाराज शांततेनें बसले. भक्तजन सेवा करून राहिले. इतक्यांत त्यांनीं आपली चिलीम मला दिली व पांच लाडू मागितले व ते देण्याचे मी कबूल केलें. नंतर सर्वांबरोबर मी घरीं गेलों. पण लाडवांची मला चिंता लागली कीं, मी ह्या परस्थळीं लाडू कसे करणार? केले तरी दुसऱ्याचे मदतीनें. ते महाराज ओळखतील. शिवाय पांचच लाडू कां मागितलें? नुसते लाडूच कां मागितले नाहीं? असा मनाशीं विचार करीत दिवस घालविला. रात्रीं त्याच चिंतनांत झोंप लागली. पण लवकरच ती उघडली व एक श्लोक करण्याची स्फूर्ति झाली. व लागलाच श्लोक तयार झाला. सकाळीं त्याचे पुढचा श्लोक करीत बसलों. तों, रा. दीक्षीत[1] हे महाराजांकडे जात होते त्यांनीं माझी कविता पाहिली व दर्शनास गेले. कांहीं वेळांनीं स्नान करून मीही दर्शनास गेलों. पण जाण्याबरोबर महाराजांनीं लाडू मागितले. मीं कांहीं बोललों नाहीं. तरी दीक्षीत म्हणाले लाडू तयार होऊन राहिले. असें म्हटल्याबरोबर महाराज स्वस्थ बसलें. दुसरे दिवशीं पांच श्लोक तयार करून कागद महाराजांचे स्वाधीन केला. ( पांचाचे वर श्लोक करण्यास डोकें बरेंच चालविलें पण कांहीं सुचेना तेव्हा पांचच श्लोक कायम केले ). त्यांनीं तो पाहून मला वाचावयास आज्ञा केली. ते श्लोक वाचीत असतां महाराजांनीं मस्तकावर हात ठेविला. त्या वेळेस जी मनाची स्थिति झाली ती अवर्णनीय होती. त्यानंतर प्रत्येक कविता तयार करावी व त्यांना दाखवावी व त्यांचे आज्ञेनें वाचून दाखवावी असा क्रम सुरू ठेवून ' साईनाथ सगुणोपासना, ' नावाचें पुस्तक करून त्यांचे चरणीं अर्पण केलें व त्या पुस्तकाचें उत्पन्न गोरक्षणास[2] दिलें. तीं पुस्तकें तेथें असतीलच.

' धिरो न शोचति ' (कठोपनिषत्) आत्मज्ञानी धैर्यवान हे कधीं शोक करीत नाहींत आणि कदाचित् त्यांची वृत्ति शोकपर झाली तर सद्वृत्तीवर आणण्यास दुसऱ्याचे उपदेशाची अवश्यकता नाहीं; ते स्वतःच शोकवृत्तीचा त्याग करितात.

---

1. रा. रा. हरी सिताराम. 2. शिर्डीस

मेघा गुजराथी महाराजांचा प्रेमळ शिष्य होता. त्यानें महाराजांची अत्यंत कष्टानें सेवा केली. ( आपले मालकाचे आज्ञेनें ) पण सेवा करीत असतां त्याला दुर्बुद्धी झाली कीं, या मुसलमानाला मी स्नानास पाणी कां घालावें ? असा विचार करून तो सेवा टाकून देशांत गेला तेथें विमार पडला. विमारींतून दुरुस्त होऊन शंकराचे दर्शनास गेला तों त्याला शंकराचे जागीं शंकराची पिंडी न दिसतां साईमहाराज दिसले. तेव्हां तो पुन: शिर्डीस आला. त्याच्या देहांतील किल्मिश नाहींसें व्हावें म्हणून त्याला गायत्री पुरश्चरण करण्यास सांगितलें. तें त्यानें केलें व त्याची सांगता महाराजांनीं चांगली केली. तो शिष्य मरण पावला तेव्हां महाराज स्वत: आले व त्याचे सर्वांगावरून हात फिरविला आणि पांच मिनिटें पुष्कळ रडले. पण 'लगेच आतां किती रडसील' असा आपणच आपल्यास उपदेश करून अर्थात 'धीरो न शोचति' या कठोपनिषदाचे तत्वाप्रमाणें शांत वृत्ती ठेवून त्याची सत्क्रिया करण्यास आज्ञा दिली.

'यमात्मानमन्विष्य सर्वांश्च लोकानाप्नोति' छां. उ. अ. ८ खं० ७ मं.२

ज्या आत्म्याचा शोध केला असतां त्रैलोक्य प्राप्त होतें ( अर्थात त्रैलोक्याचें ज्ञान होतें त्या आत्म्याला जाणावें ). साई महाराजांनीं या श्रुतिवचनाप्रमाणें आत्म्याचें पूर्ण ज्ञान करून घेतलें होतें. म्हणून त्यांना भूत भविष्य वर्तमान सर्वकाळाचें ज्ञान होतें. सारांश ते सर्वज्ञ होते

साईमहाराजांस लिहितां वाचतां येत नव्हतें अशी सर्वांची आहे, व ती खरी असली तरी- वरील श्रुतिवाक्याप्रमाणें ते सर्वज्ञ अ... त्यामुळें लेखन वाचन जाणणाऱ्यांचें कार्य ते करीत असत.

रा. दीक्षित यांची मुलगी मरण पावली तेव्हां त्यांना अत्यंत शोक झाला याच सुमारास त्यांनीं बोलाविलेल्या भावार्थ रामायणाची व्ही.पी. येऊन पोचली. ती घेतल्यावर रामायण वाचावयाचें पण गुरूचे आज्ञेशिवाय वाचावयाचें नाहीं असा त्यांचा क्रम असे त्याप्रमाणें महाराजांना तो ग्रंथ त्यांनीं दाखविला. महाराजांनीं पुस्तक उघडून तें उलटें धरिलें व त्याची वरीच पानें चाळलीं. शेवटीं किष्किंधा कांडांतील वालीचा वध झाल्यानंतर तारा शोक करीत असतां रामानें उपदेश केला. तें प्रकरण

काढून दीक्षितांना दिलें व हें वाच म्हणून सांगितलें. शोकाचा परिहार होण्याला तो उपदेश उत्तम आहे पण ज्याला वाचतां येत नाहीं तो नेमकें तेंच प्रकरण कसें काढील ? ह्यावरून ज्याला आत्मज्ञान होतें त्याला सर्व समजतें हें श्रुतीचें वाक्य खरें आहे. व त्याप्रमाणें त्यांचें ज्ञान होतें.

साईदासानुदास.

कृष्ण जागेश्वर भीष्म.

## रा. रा. हरी सिताराम दीक्षित यांनीं लिहून ठेवलेले अनुभवः—

(१)

महाराज निरनिराळ्या रूपानें आपल्या भक्तांकडे जात. व नंतर त्याची खूणही देत असत. एकदा नानासाहेब चांदोरकरांनीं महाराजां-साठीं नैवेद्याचें ताट आणलें व महाराजांना पुरणाच्या पोळ्या आवडतात असा त्यांचा समज असल्यामुळें मुद्दाम पुरणाच्या पोळ्या तयार करवून नैवेद्यांत नेल्या होत्या. नानासाहेब ताट घेऊन गेले तेव्हां महाराज नुक-तेच जेऊन बसले होते. नाना साहेबांनीं महाराजांना जेवण्याबद्दल प्रार्थना केली तेव्हां ते म्हणाले मी आतांच जेवलों. तूं ताट ठेऊन आपल्या बिऱ्हाडीं जेवावयाला जा. आज्ञा झाल्यामुळें नानासाहेब गेले पण जातांना माधव-राव देशपांड्यांना सांगून गेले "तुम्ही येथेंच थांबा आणि महाराजांनीं या ताटांतलें कांहीं खाल्लें कीं मला येऊन सांगा म्हणजे मी जेवायला बसेन." त्याप्रमाणें माधवराव महाराजांचे जवळ बसले आणि नानासाहेब घरीं त्यांची वाट पहात बसले. थोडा वेळ गेल्यावर महाराजांनीं माधव-रावांना विचारलें "नाना जेवला का". ते म्हणाले "नाहीं. आपण या ताटांतलें कांहीं खाल्लें म्हणजे ते जेवायला बसणार आहेत". त्यावर महा-राज हांसून म्हणाले, "अरे तें ताट वाड्यांत असतांनांच माशीच्या रूपानें जाऊन त्याचा नैवेद्य खाल्ला" त्याला म्हणावें तूं आतां जेवायला बैस. अर्थात् हें नानासाहेबांना माधवरावांकडून कळल्याबरोबर ते आनंदानें जेवायला बसले.

तसेंच एकदा नानासाहेबानां महाराजानीं सांगितलें " अरे कोणी आपल्या दारीं मागावयाला आलें तर त्याला आपल्या शक्तिप्रमाणें द्यावें. आपल्याजवळ द्यावयाला नसलें तर निदान त्याच्याशीं गोड शब्द तरी बोलावें " हा बोध झाल्यानंतर लवकरच नानासाहेब आपल्या गांवीं गेले. दोन चार दिवस झाल्यानंतर एक म्हातारी भिक्षा मागावयास त्यांच्या दारीं आली तिला "भिक्षा नाहीं" असें नोकरानें सांगितलें. ती जरा लोचटपणा करूं लागली. त्याबरोबर स्वतः नानासाहेबांनीं तिला दरडावली. त्यानंतर नानासाहेब जेव्हां पुनः महाराजांकडे आले तेव्हां महाराजांनीं विचारलें "नाना मी तुला मागच्या खेपेस सांगितलें कीं कोणी आपल्याकडे मागावयला आलें तर त्याच्याशीं गोड बोलावें तें विसरलास ना ? मी म्हातारीच्या रूपानें तुझ्याकडे आलो होतों तर मला शिव्याच मिळाल्या" नानासाहेब अर्थात् खजील झाले.

एकदां म्हाळसापतीकडे एक कुत्री गेली. ती ओंगळ दिसत असून तिच्या मुखांतून लाळ गळत होती. म्हालसापतीनें तिला एक टोला मारला व ती ओरडत ओरडत निघून गेली. पुढें म्हाळसापती दर्शनास गेले तेव्हां महाराज म्हणाले "आम्ही मोठ्या आशेनें भक्ताकडे ( म्हाळसापतीला बहुतेक लोक " भक्त " म्हणतात ) गेलों तों आम्हाला टोलेच खावे लागले."

या व अशा लीलांचा हेतु भक्तांना शिक्षण देण्याचाच असतो. महाराज केव्हां केव्हां म्हणत " अरे कोणालाही हाड हाड झिड झिड करूं नये. आपल्याकडे कुत्रा, मांजर कोणीही येतें तें कांहीं तरी संबंधामुळेंच येतें. आपण कोणाचाही कंटाळा करूं नये." महाराज नुसता तोंडानेंच बोध करून राहात नसत. तो बोध निरनिराळे प्रकारानीं ठसवीत असत. एकदा महाराजांनी असा बोध केला आणि दोन तासांनीं आम्ही मंडळी वाड्यांत जेवायला बसलों असतां पायऱ्यांपाशीं एक कुत्रें आलें. आम्ही त्याला हाकलें तेव्हां तें कुत्रें समोरच्या बिऱ्हाडकऱ्यांच्या पायऱ्यांपाशीं गेलें. तेथें त्याला मार बसला व तें मोठ्यानें ओरडत बाहेर गेलें. त्याचें ओरडणें ऐकल्याबरोबर महाराजांस सकाळच्या शब्दांची आठवण आली आणि असें वाटलें कीं, आपण कुत्र्याला हाकलले तसें न करितां भाकरीचा तुकडा

घेऊन लांब फेकला असता ह्मणजे कुत्रें गेलें असतें आणि त्याला मार बसला नसता. त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं दास गणूचें कीर्तन झालें व त्यांत श्रीविठोबांनीं कुत्र्याचें रूप घेऊन नामदेवाकडे जाऊन भाकर नेली असतां नामदेव तुपाची वाटी घेऊन "देवा कोरडी भाकर खाऊं नका हें तिच्या बरोबर तूप घ्या" असें ह्मणत ह्मणत धांवले तो कथाभाग कीर्तनांत निघाला आणि त्याच दिवशीं संध्याकाळीं मारुतीचे देवळांत रा. माधवराव आडकर भक्तिलीलामृत वाचित असत त्यांतही तोच भाग निघाला. अशा तऱ्हेनें महाराजांनीं सकाळीं केलेला बोध त्यांनींच दृढ करून दिला.

कित्येक वेळीं भक्तांचें कोड पुरविण्यासाठीं व त्यांना समाधान देण्यासाठीं त्यांचेकडे निरनिराळें रूपानें महाराज जात.

(२)

मला महाराजांचें प्रथम दर्शन घडलें तेव्हां माझे मित्र रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोळकर यानांही दर्शन घडावें अशी मला इच्छा झाली म्हणून मी त्यांना शिर्डीहून पत्र लिहिलें व महाराजांचें दर्शन त्यांनीं अवश्य घ्यावें असा त्यांना आग्रह केला. त्यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांची माझी भेट झाली. तेव्हां ते म्हणाले "मी दर्शनास अवश्य जाईन, पण गुरूचा उपयोग काय तें कांहीं मला कळत नाहीं. मला वाटतें सगळें आपलें आपल्यालाच केलें पाहिजे." त्यानंतर ईस्टरचे सुटींत त्यांनीं दर्शनास जाण्याचा विचार केला. ते ज्या दिवशीं निघणार होते त्याच दिवशीं त्यांना खबर लागली कीं, त्यांच्या एका स्नेह्याचा एकुलता एक मुलगा वारला व त्यावेळेस त्या स्नेह्याचे गुरु तेथेंच होते. हें ऐकल्याबरोबर दाभोळकरांनीं शिर्डीचा बेत रहित केला. तितक्यांतच दुसऱ्या एका स्नेह्याची गांठ पडून शिर्डीस जा[illegible]ायम झाला व ते त्याप्रमाणें निघाले. ही मेल दादरास उभी राहत असा त्यांचा समज असल्यामुळें ते दादरास जाण्यासाठीं निघाले तोंच वांद्याचे स्टेशनावर त्यांना एक मुसलमान गृहस्थ भेटला व त्यानें मेल दादरास उभी राहत नाहीं, तुम्ही बोरीबंदरास जा असें सांगितलें. त्याप्रमाणें ते बोरीबंदरास गेले व दुसरे दिवशीं

सकाळीं शिर्डीस येऊन पोहोचले.महाराजांचे दर्शनास जावयास अवकाश होता म्हणून ते एका गृहस्थाबरोबर बोलत राहिले. त्यावेळेस ' गुरूचा उपयोग काय' याच विषयावर बोलणें चाललें होतें.पुढें आम्ही सर्व मंडळी महाराजांकडे गेलों. तेथें बसल्याबरोबर महाराजांनीं दाभोळकराकडे तोंड करून मला विचारलें 'हा हेमाडपंत काय म्हणत होता?' मी म्हटलें "बाबा आपल्याला सर्व ठाऊकच आहे" पुढें दुसरे दिवशीं मला जाण्याची परवानगी मागावयाची होती म्हणून मी म्हटलें "बाबा आज निघावयाचें का?" महाराज म्हणाले "होय" त्यावर एकानें विचारलें "बाबा कोठें जावयाचें?" महाराज म्हणाले "असे वरती".तेव्हां त्यानें फिरून विचारलें "बाबा, वाट कशी आहे?" त्यावर महाराज म्हणाले " वाटा पुष्कळ आहेत.ठिकठिकाणांहून जातात. आपल्या येथून ही एक वाट जाते. वाट तर बिकट आहे. वाटेंत वाघ आहेत, रीस आहेत" तेव्हां मी विचारलें "पण बाबा वाटाड्या बरोबर असला तर?" त्यावर महाराज म्हणाले "वाटाड्याबरोबर असला म्हणजे कांहीं पंचाइत नाहीं. मग वाघ बाजूला होऊन जातात, रीस बाजूला होऊन जातात. नाहीं तर एक मोठी खाई आहे-तींत पडण्याची भीति असते" अर्थात् हें संभाषण झालें याचा परिणाम दाभोळकरांचे मनावर बराच झाला व आपल्या प्रश्नाचें उत्तर मिळालें असें त्यांना वाटूं लागलें. त्यानंतर महाराजांनीं त्यांना वेळोवेळीं निरनिराळे अनुभव दिले व आतां ते महाराजांचे पूर्ण भक्त बनले आहेत.

(२)

एकदां महाराजांचें जेवण चाललें असतां एक कुत्रें येऊन त्यानें ताकाचे टमरेलांत तोंड घातलें. त्याबरोबर फकिरबाबा जे तेथें जवळच बसले होते त्यांनी तें ताक फेकून देण्याविषयीं एका मुलाला सांगितलें व तो तें फेकणार इतक्यांत महाराजांनीं " काय आहे?" म्हणून विचारलें तेव्हां फकीरबाबांनीं हकीगत सांगितली. त्यावर महाराज म्हणाले " बापू तें ताक तर चांगलें आहे. तें घरीं घेऊन जा व तिसरे प्रहरीं त्याची कढी करून आणा; ती आपण खाऊं" अर्थात फकीरबाबांनीं तें घरीं नेलें व कढी करून आणिली व ती महाराजांनीं खाल्ली.

(४)

बापूजीशास्त्री गुळवी १९१८ चे फेब्रुवारी महिन्यांत महाराजांचे दर्शनास आले होते. त्यांनीं गंगा आणिली होती तिचा अभिषेक महाराजांना यथाविधी करण्यांत आला. त्यानंतर शास्त्रीबुवांनीं श्रीरामदासनवमीसाठीं सज्जनगडास जाण्याची परवानगी मागितली. महाराजांनीं परवानगी दिली व म्हणाले "तेथेंही आपणच आहोंत व येथेंही आपणच आहोंत." शास्त्रीबुवा सज्जनगडास गेले तेथें दासनवमीचे दिवशीं पाहाटेस पांच वाजतां महाराजांनीं शास्त्रीबुवांस प्रत्यक्ष दर्शन दिलें इतकेंच नव्हे तर शास्त्रीबुवांनीं महाराजांचे थोडा वेळ पाय चुरले व मग महाराज अदृश्य झाले.

(५)

रावबहाद्दुर साठयांचा वाडा बांधावयाची सुरवात केली तेव्हां निंबाचें झाड पुढें बांधकामाला नडेल असें समजून मंडळीनीं महाराजांस तें झाड तोडण्याविषयीं परवानगी मागितली. महाराज म्हणाले 'आपण कशाला झाड तोडावें'.पुढें काम बरेंच झाल्यानंतर त्या झाडाचा थोडासा भाग नडूं लागला तेव्हां महाराजांना फिरून विचारलें. तेव्हां महाराज म्हणाले ' आडवें आलें कीं कापून काढलें पाहिजे. जेवढा भाग नडत असेल तेवढा कापून टाका. '

(६)

महाराजांचे एका भक्ताला कर्ज बरेंच झालें होतें. एका सावकारानें त्याचेवर हुकुमनामा मिळविला. त्याचे जवळ त्यावेळेला पैशाची सोय नव्हती तरी पण मिळकत होती. सावकार कांहीं केल्या थांबेना. इतक्यांत सर्व भक्त मंडळीच्या मनांत त्या भक्ताचे येथें असलेल्या महाराजांचे तसबिरी पुढें नाम सप्ताह करण्याचे आलें.त्या भक्तानेंही तें मोठ्या आनंदानें कबूल केलें. सावकाराला वाटलें ही संधी बरी आहे. त्यानें तातडीतोब जप्तीचें वारंट काढवून तो बेलिफला घेऊन त्यांचे घरीं गेला. नाम सप्ताह सुरु होता. कर्जदार भक्त सावकाराजवळ गेले व म्हणाले "बरें आहे. आपल्याला वाटेल तें सामान घेऊन जा. आम्हाला प्रयोजनाला महाराजांनीं

आमची जागा मोकळी करून दिली असें समजून जें होतें तें त्यांच्याच इच्छेनें होतें" इतकें म्हटल्यावर सावकाराला महाराजांनी इतकी उपरती करून दिली कीं त्यानें तावडतोब जप्तीचे वारंट रद्द करवून घेतलें व पुन्हां कधीं काढलें नाहीं.

(७)

हरिद्वारचे बुवा रोज सकाळचे बैठकीचे वेळेस महाराजांचे समोर खांबाजवळ बसत असत. एकदा त्यांना येण्याला उशीर झाला व एक मुलगी त्यांच्या नेहमीच्या जाग्यावर जाऊन बसली. ते आले तऱ्हांही ती उठली नाहीं. मग त्यांनीं तिला उठावयास सांगितलें व ती उठली व ते तेथें बसले. महाराजांनीं त्यांना पांच मिनिटें बसूं दिले व म्हणाले खालीं सभामंडपांत जाऊन बसा. त्या प्रमाणें ते गेले. कांहीं वेळानें ते पुनः वर आले व आपल्या जागेवर बसूं लागले. महाराजांनीं त्यांना पुनःखाली जाण्यास सांगितलें तेव्हां अर्थात त्यांना पटलें कीं मुलीला उठविल्याबद्दल हा आपल्याला धडा मिळत आहे.

(८)

मी एकदां नवरात्राच्या आरंभीं नागपुराहून निघून शिर्डीस गेलों. दसरा तेथेंच झाला. मंडळींनीं आपापल्यापरी महाराजांना फळफळावळ, मेवा मिठाई वगैरे दिली. माझ्याजवळ फळें नव्हतीं. माझी पूजा नेहमी-प्रमाणें साधी होती. कांहीं फळें असतीं तर बरें झालें असतें असें वाटलें. थोडया वेळानें महाराजांनीं द्राक्षें वाटलीं. मलाही कांहीं दिलीं. महाराजांनी सगळीं वाटून टाकिलीं.आपल्यासाठीं एकही ठेवलें नाहीं. हें पाहून आप-ल्याला दिलेल्या द्राक्षांपैकीं कांहीं आपण महाराजांना द्यावीं असें माझ्या मनांत आलें व त्याप्रमाणें मीं केलेंही. महाराजांनीं मी दिलेली द्राक्षें घेतलीं व खाल्लीं. अर्थात् माझ्या दसऱ्याच्या पूजेबद्दलची माझी खिन्नता जाऊन मला आनंद झाला.

(९)

माझे एक मित्र एके दिवशीं बाबांस महाराजांचे तसबिरीची पूजा करीत होते. महाराजांना वाहण्यासाठीं फुलें ठेविलीं होतीं त्यांत एक मोठें

ब्रह्मीगन्ध्याचें अति उत्तम फूल होतें. तें महाराजांना वाहावें असें त्यांचे मनांत आलें पण फूल मोठें असल्यामुळें गंधानें चिकटविण्यासारखें नव्हतें. मग त्यांना आठवण झाली कीं महाराज फूल नेहमीं नाकाला लावतात. त्याप्रमाणें त्यांनीं फूल तसविरीत नाकाजवळ नेलें. अर्थात् नाकाजवळ नेऊन लगेच खालीं ठेऊन द्यावयाचें असा त्यांचा विचार होता पण तें फूल नाकाला लावतांच तें चिकटलें. त्यांनीं तें तसेंच तेथें राहूं दिलें व तें संध्याकाळपर्यंत तसेंच राहिलें.

(१०)

शिर्डीस बाबु खिर्वंडीकर नांवाचा ब्राह्मण होता. त्याची मुलगी शांति नांवाची तीन वर्षाचे वयाची असतां साठ्यांच्या वाड्यांच्या पिछाडीस असलेल्या विहिरींत पडली व कांहीं वेळ तेथें राहिली. मग तिला काढली व पाहिलें तों तिला कांहींहीं लागलें नव्हते. ती म्हणूं लागली मला सांई-बाबांनीं वरचे वर झेलून ठेविली होती. ती स्वतःला बाबांची बहिण म्हणविते व महाराजांचे तिच्यावर प्रेम असे.

(११)

रा. रा. चिदंबर केशव गाडगीळ या नांवाचे महाराजांचे एक भक्त होते. ते सरकारी नोकरीवर होते. कांहीं दिवस नगरास कलेक्टराचे चिट-णीस होते. पुढें शिवरांस मामलेदार होते. त्यांना वेळोवेळीं दर्शनाचा लाभ घडत असे. शिवराहून त्यांची बदली कोठें लांब झाली व तावडतोब जाऊन रुजु होण्याचा हुकूम मिळाला. महाराजांचे दर्शनास जाण्याचा अवकाश राहिला नाहीं. ते कोपरगांवाकडूनच आगगाडीनें गेले पण दर्शनास जातां येत नाहीं याबद्दल त्यांना फार हुर हुर लागली. पुढें गाडी चालली असतां एकाएकीं खिडकीवाटें एक कागदाची पुडी त्यांचे अंगावर येऊन पडली. उघडून पाहतात तो त्यांत उदीसारखी पूड दिसली. त्यांनीं ती जतन करून ठेविली. पुन्हा दर्शनास जाण्याचा योग आला तेव्हां महाराज त्यांना आपण होऊन म्हणाले " तूं आला नाहींस म्हणून मी तुला उदी पाठविली ती पोहोचलीना ? " गाडगीळांना हे शब्द ऐकून गहिंवर आला. पुढें तीउदी त्यांनीं एका ताइतांत घालून ठेविली. व ती शेवट पर्यंत त्यांचे जवळ होती.

(१२)

मला कांहीं कामा करितां इंदुरला जावयाचें होतें. अर्थात मनमाड वरून जावयाचें असल्या कारणानें श्री सद्गुरु साईबाबांचें दर्शन घेऊन पुढें जाण्याचा माझा विचार ठरला. माझ्या स्नेही मंडळींनीं मला शिर्डीस जाऊं नका असें बजावलें. ते म्हणाले बाबा तुम्हाला वेळेवर जाण्याची परवानगी देणार नाहींत. मी त्यांना म्हटलें इंदुरास जाण्याला अद्यापी दोन दिवसांची अवधी आहे व तितक्यांत शिर्डीस महाराजांचे दर्शन घेऊन पुढें जावें असें माझ्या मनानें घेतलें आहे. माझा संकल्प ठरल्या-प्रमाणें मी शिर्डीस गेलों. श्री सद्गुरु साईबाबांचे दर्शनासाठीं मशिदींत गेल्याबरोबर तूं केव्हां जाणार म्हणून मला विचारलें. आपण आज जाण्याची आज्ञा द्याल तर मी आज जातों असें मी समर्थांना म्हटलें. परंतु मला दोन दिवस रहाण्याला सवड आहे; असें ही मी श्री सद्गुरु साईबाबांना सांगितलें. हें सांगितल्यावर बाबांनीं "दोन दिवस राहून जा" असें म्हटलें. श्रींच्या आज्ञेप्रमाणें मी दोन दिवस राहून पुढें इंदुरास गेलों. अर्थात् माझ्या मित्रांची भीती निरर्थक ठरली.

(१३)

सखाराम हरी उर्फ बापुसाहेब यांच्या मातुश्री वारल्या तेव्हां त्याचें उत्तर कार्यासाठीं नाशकास जाण्याचें त्यांनीं ठरविलें व जाण्याची परवा-नगी महाराजांजवळ मागितली. महाराजांनीं परवानगी देण्याचें एकेक दिवस लांबणीवर टाकलें. बापुसाहेबांनीं महाराजांस सांगितलें माझ्या शाखेचा ब्राह्मण येथें नाहीं व मला आज नाशकास गेलेंच पाहिजे. महा-राज म्हणाले दोन प्रहरीं पाहूं. हें बोलणें झाल्यावर एक घटका गेली नाहीं तोंच एक चांगला विद्वान वैदिक ब्राह्मण जोगांच्या शाखेचाच येथें आला. अर्थात मग नाशकास जाण्याचें कारण उरलें नाहीं व सर्व उत्तरकार्य येथेंच झालें. शेवटच्या दिवशीं जोगांनीं परवानगी मागितली त्यावेळीं मी जवळ होतों व मी म्हटलें " बाबा, चला आपण बापुसाहेब व मी असे' अवघे निघूं, वाटेंत बापुसाहेबांना नाशकास सोडूं व मग मुंबईस जाऊं त्यावर महाराज म्हणाले "मी कधीं कुणाला सोडणारा माणूस नाहीं."

# आतांपर्यन्त छापून आलेल्या महाराजांच्या लीला.

एका मुलीला अर्धांगवायूचा झटका आला होता, तोही उदीनेंच बरा झाला. शेंकडोंशें लोकांचे निरनिराळे रोग नुसत्या महाराजांच्या उदीनें बरें झाल्याचीं उदाहरणें आहेत. तीं सर्व येथें देणें शक्य नाहीं; पण माझ्या एका बंगाली मित्राकडून आलेल्या पत्रांतील लहानसा उतारा देऊन हें प्रकरण पुरें करितो:—

" I am glad to inform you, that, the **Vibhuti** you so kindly gave me, while I was in Bombay, has worked wonders. I have tried it in cases of Rheumatism, Dropsy, Diabetes and Angina Pectoris. In one and all cases it has given immediate relief. If you can kindly spare some more quantity of it, I shall be very much obliged. I have a large number of coolies and staff at my disposal and I wish to use it in difficult cases.

भाषांतरः—"मी मुंबईस असतांना आपण मला जी विभूती दिली तिनें चमत्कार केले आहेत, हे कळविण्यास मला आनंद वाटतो. ती मीं संधिवात, जलोदर, मधुमेह व हृदयाचा विकार असलेल्या माणसांस देऊन पाहिली, आणि एकूणएक विकारांत तिच्यापासून ताबडतोब आराम वाटला. आपण आणखी थोडी पाठवूं शकाल, तर मजवर फार उपकार होतील. माझ्या कामावर मजूर आणि कारकून वगैरे मिळून फार मंडळी आहेत, आणि कठीण दुखण्यामध्यें तिचा उपयोग करावा, अशीं इच्छा आहे."

महाराजांकडे तऱ्हेतऱ्हेचे लोक तऱ्हेतऱ्हेचीं गाऱ्हाणीं आणि तऱ्हेतऱ्हेच्या मागण्या घेऊन जातात, आणि महाराजांनीं आशिर्वाद दिला म्हणजे त्यांचीं गाऱ्हाणीं दूर होतात, आणि इतर कामना असतील त्या

सफल होतात. रोग तर बरे होतातच, पण भूतबाधेच्या संबंधानेंही लोकांनां हटकून अनुभव येतात.

मोगलाईंत परभणी येथें एक गृहस्थ आहेत. त्यांच्या येथें बरेच चमत्कारिक प्रकार होत असत. नवा कपडा आणून खुंटीवर ठेवला, कीं, आपोआप जळावयाला लागावयाचा. मुलांसाठी अन्न झांकून ठेविलेलें असेल तें नाहींसें व्हावयाचें, किंवा कधींकधीं त्यांत किडे पडावयाचे त्या गृहस्थानें बिऱ्हाड बदललें तरी तोच प्रकार चालू होता. मग त्यानें दुसऱ्या गांवीं बदली करून घेतली, तरी कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें तो गृहस्थ महाराजांच्या दर्शनास आला. महाराजांनीं त्याला आशिर्वाद दिला, आणि त्या दिवसापासून सर्व प्रकार बंद झाला, असें मग त्यानेंच लिहून पाठविलें.

एका पारशी व्यापाऱ्याचा मुलगा एकाएकीं नाहींसा झाला. बापानें पुष्कळ शोध केला, व त्या कामांत चारपांच हजार रुपयेही खर्च केले. शेवटीं मी शिर्डीस असतां महाराजांच्या चरणीं हकीगत निवेदन करून ते उत्तर देतील तें कळवावें, अशा अर्थाचें त्यानें मला पत्र लिहिलें.

महाराजांनां हकीगत सांगतांच "मुलगा दक्षिणेकडे गेला आहे, खुशाल आहे. आणि आपण होऊन येईल," असें म्हणाले. त्याप्रमाणे तो मुलगा लवकरच परत आला, आणि मीं महाराजांनां विचारलें त्या वेळेस तो मद्रासेस होता,व खुशाल होता, असें त्या पारशी गृहस्थानें मला सांगितलें.

एका पारशी गृहस्थाचा मुलगा वेडा झाल्यामुळें पुण्याच्या इस्पितळांत ठेविला होता. त्या मुलाची स्थिति बापाला पाहवेना, इतकी वाईट होती व तिच्यांतून मुक्त होण्याची कांहीं आशा दिसेना. मुलाचा बाप महाराजांच्या दर्शनास गेला आणि महाराजांनीं तुझा मुलगा बरा होईल असा आशीर्वाद त्यास दिला, व मुलाला घरीं घेऊन येण्याविषयीं सांगितलें. इस्पितळांतली मंडळी त्याला सोडतील कीं नाहीं, ही त्या गृहस्थाच्या मनांत शंका उत्पन्न झाली; पण घरीं घेऊन पहातो तों त्यांच्याकडून पत्र आलें, कीं, मुलगा येथें खातपीत नाहीं. त्याचें वजन कम

होत चाललें आहे, तर तुम्हीं त्याला दुसरीकडे ठेवण्याची व्यवस्था करावी. अर्थातच तो गृहस्थ मुलाला घरीं घेऊन आला. आठ दिवसांत मुलगा इतका सुधारला कीं, मेंदूच्या किंचित् अशक्तपणाशिवाय कांहींहि विकार राहिला नाहीं. पुढें तो अशक्तपणाहि कमी झाला आणि तो मुलगा आपल्या वडिलांबरोबर पूर्वीप्रमाणें धंदा करूं लागला आहे.

मुंबईचे एक प्रभु गृहस्थ हायकोर्टांत वकील आहेत. त्यांचा भाऊ वेडा झाला होता आणि त्याला ठाण्याच्या वेडयांच्या इस्पितळांत ठेविला होता. वकीलसाहेब शिर्डीस गेले आणि भावासंबंधानें त्यांनीं गाऱ्हाणें घातलें. महाराजांनीं आशीर्वाद दिला. पुढें त्या भावाची रजा संपत होती ती तीन महिने आणखी वाढवावी असें वाटल्यावरून त्यांनीं ठाण्याच्या सिव्हिल सर्जनजवळ सर्टिफिकेट मागितलें.त्यांनीं तें देण्याचें नाकारिलें. ते म्हणाले तुमचा भाऊ बरा होणें शक्य नाहीं, तेव्हां तो तीन महिन्यांनीं बरा होईल असें खोटें सर्टिफिकेट मी कसें देऊं ? असें जरी सिविल सर्जनचें ठाम मत पडलें, तरी महाराजांचा शब्द खाली गेला नाहीं. तीन महिन्यांच्या आंत वकीलाचा भाऊ चांगला झाला, आणि आपल्या कामावर रुजू होऊन तो हल्लीं पूर्वीप्रमाणें चाकरी करीत आहे.

एकंदरींत,महाराजांच्या आशीर्वादानें आधिव्याधी दूर झाल्याचीं हजारों किंबहुना लाखों उदाहरणें सांपडतील. शरणागतांच्या आधिव्याधी दूर करावयाच्या हें संतांचें ब्रीदच आहे. मात्र ते खरेखरे 'शरणागत' असें पाहिजेत. व्यवहारांत काय किंवा परमार्थांत काय,निष्ठेशिवाय फलप्राप्ति नाहीं.

ज्याची निष्ठा शाबूत त्याला देव पावेलच. महाराज निष्ठेवर नित्य आपल्या संभाषणांत जोर देत असतात. त्या निष्ठेचेंच एक अंग—पण अतिप्रधान अंग-सबुरी किंवा धीर धरणे, हें आहे. ही सबुरीसुद्धां प्रपंच आणि परमार्थ या दोन्हींमध्यें अत्यावश्यक आहे, आणि या सबुरीसंबंधानेंही महाराज पुष्कळदां उपदेश करीत असतात.

महाराजांचा सर्वसाधारण उपदेश थोडया शब्दांत सांगतां येण्यासारखा आहे, तो असा:—

" परमेश्वर आहे व त्याच्यापेक्षां कोणी मोठा नाहीं. तो सर्व चराचरांमध्यें भरून उरला आहे. त्याची लीला अगाध आहे. उत्पन्नहि तोच करितो, राखितोहि तोच वाढवितोही तोच आणि मारितोहि तोच तो ठेविल तसें रहावें. त्याच्या मर्जीत आपण राजी रहावें, तळमळ करू नये. त्याच्या इच्छेशिवाय झाडाचें पान हालत नाहीं. प्रत्येकानें नेकीनें वागावें. सदसद्विचारशक्ति जागृत ठेवावी. आपलें कर्तव्य आपण करावें पण कर्तेपणाचा अभिमान आपल्याकडे न घेतां कर्तृत्व परमेश्वराला द्यावें, आणि फलहि त्यासच समर्पण करावें, म्हणजे आपण अलिप्त राहून कर्म आपल्याला बाधक होणार नाहीं. सर्व भूतमात्रांशीं प्रेमानें वागावें. वादावादी करूं नये. कोणी कांहीं बोललें तरी ऐकून घ्यावें कोणाच्या बोलण्यानें आपल्या आंगाला भोकें पडत नाहींत. कोणाची बरोबरी करूं नये. कोणाची निंदा करूं नये. कोणी कांहीं केलें तरीं तिकडे आपण लक्ष्य देऊं नये. ज्याचें त्याच्या संगें, आपलें आपल्या संगें. कष्ट करीत असावें, रिकामें राहूं नये. देवाचें नांव घ्यावें, पोथीपुराण वाचावें, आहारविहार त्यजूं नयेत, पण नियमित असावें." वगैरे.

महाराज उपदेश करितात तो बहुतेक गोष्टीरूपानें असतो. त्या गोष्टींचा अर्थ जो तो आपापल्या अधिकाराप्रमाणें करतो; पण प्रत्येकाला कांहीं तरी त्यापासून बोध मिळतो. महाराजांच्या गोष्टी व त्यापासून निघणारा बोध यांचा जर कोणीं संग्रह केला, तर तो महाराजांच्या भक्तासच नव्हे, पण बहुजनसमाजालाही अत्यंत हितकारक होईल, यांत मला अगदीं शंका नाहीं. हा उद्योग करण्याविषयीं महाराजांनी आपल्या एका अधिकारी शिष्याला प्रेरणा करावी, अशी महाराजांची प्रार्थना करून ही प्रस्तावना संपवितों.

बाबांचें एक लेंकरूं.

## स्फुट विषय.

रा. रा. निळकंठ रामचंद्र सहस्रबुध्दे गव्हर्नमेंट पेन्शनर व प्रस्तुत सावंतवाडी संस्थानचे हिज हायनेस दि महाराजा सरदेसाई राजाबहादुर यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी यांनीं रचिलेलें.

### (नित्यपाठ) अष्टक.

श्रीसाईनाथ

नमो साईनाथा नमो दीनबंधो । यशैश्वर्य वैराग्य श्रीधर्मसिंधो ॥
नमो ज्ञानमूर्ते नमो ब्रम्हरुपा । नमोसद्गुरो शांतमूर्ते अरुपा ॥ १ ॥
नमो निष्क्रिया निर्गुणा निर्विकारा।किती पाहसी माझिया दुर्विकारा॥
मला तूं न होसी सख्या साह्यदाता ।अशा पामरा कोण तारील ताता?
तुला भेटण्या लाविला काळ फार । नको ह्यापुढें घोर संसार भार ॥
किती दीन होउं किती क्लेश साहूं। कधीं सौख्य देसी किती वाट पाहूं॥
लखोबा* निमीत्तें तुझा दास दीन। कृपापात्र हा जाहला तेवि लीन।
तुझ्या पादयुग्मीं तरी स्वीकृतातें। त्वरेनें सख्या धाडिहो सत्पदातें॥
पदा सोडण्या काय मी हो न लाजे। सुखें आड येवो सदा कर्म माझें॥
मला व्यर्थ चिंता तयाची किमर्थ । तयाला निवारावया तूं समर्थ ॥
'समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे' ॥
समर्थोक्तिही काय मिथ्या म्हणावी।तुझी योग्यता अल्प कोणीं गणावी॥
मला मुक्तीचें भाग्य देतां तुला रे । किती कायसे कष्ट होणार बा रे ॥
तुला योग्य वाटे तसें दास्य घेई। स्वधामा मला शीघ्र धाडूनि देई ॥
तुझ्या पादयुग्माविणें अन्य थारा । असेना मला काय सांगूं उदारा ॥
जसा होतसे जीवनावीण मीन। निळोबा तसा त्वत्प्रसादार्थ दीन ॥

---

* ह्या मासिकाच्या तिसऱ्या अंकांतील प्रथम लेखांत ह्याचा खुलासा आहे; तो लखोबा म्हणजे तात्यासाहेब नूलकर असा होय.

# नित्यारती

दयाळा साईनाथा, पुर्ण करी मनोरथा,
तवपदीं भक्ती भावें, आलों,शरण मीआतां ॥ दयाळा ॥१॥
संसारीं गुंतलासे, दास तुझा हा पतीत–
पावना त्याजला तूं नको करुं हतचित्त ॥ दयाळा ॥२॥
संसार हा यथासांग, ह्याच जन्मीं सरो बावा,
त्यापुढें मज देईं, ज्ञानवैराग्य ठेवा ॥ दयाळा ॥ ३ ॥
अखंड सत्संगाचें, जन्मांतर मज द्यावें, मज करवी गुरुराया,
संतपरित्राण व्हावें ॥ दयाळा ॥ ४ ॥
खलसंहारक मजला ॥करुनिया धर्मरक्षी, कृपामेघबिंदु हाच,
मागेकीं हा चातक पक्षी ॥ दयाळा ॥ ५ ॥
ऐशापरी प्रपंचातें, सारुनिया लीन व्हावें, सच्चिदानंदरुपीं,
हेंचिदान मजद्यावें ॥ दयाळा ॥ ६ ॥
आत्मज्ञचि तूं वा सत्य, परमेश ब्रह्मरूपीं ॥ सद्गुरो तारी मज
अंती नेइ स्वस्वरूपीं ॥ दयाळा ॥ ७ ॥
हीच एक भिक्षामुष्टि, मागें होऊनिया कष्टी,
याचक नीलकंठ, देइ त्याजला तुष्टि ॥ दयाळा ॥ ८ ॥

वे० शा० सं० कृ० जा० भीष्म यांनीं केलेलें

## (१) श्रीशंकराचार्यविरचितपरापूजेचें भाषांतरः—

पद

रिक्त न कोठेंही मग तुजला आवाहन कैचें ॥ सर्वांचा आधार तूं तुला आसन तरी कैचें ॥ ध्रु० ॥ स्वतः सिद्ध जो शुद्ध असे तत्पदीं अर्घ्य कैचें ॥ पवित्र जो का सदा तयाला आचमनचीं कैचें ॥ अत्यंतचि जो निर्मल त्याला स्नानार्चन कैचें ॥ विश्व झांकिलें उदरीं जयानें वस्त्र तया कैचें ॥ १ ॥ लेप नसे कसलाही ज्यासी त्यासि गंध कैचें ॥ निरालंब जें ब्रह्म तयासीं उपवित मगकैचें ॥वासनाच ज्या न सुगंधित पुष्प तया कैचें॥ सुरम्यासिया आभरणाचें महत्व तरि कैचें ॥ २ ॥ नित्यतृप्त जो नैवेद्याचें अर्पण त्या कैचें ॥ तसें त्रयोदशगुणयुत तांबूल भक्षण त्या कैचें ॥ अंत न ज्या तत्सभोंवती मग परिभ्रमण कैचें ॥ द्वंद्वरहित जी एक वस्तु त्या नमन तरी कैचें ॥ ३ ॥ स्तवन करीतां सरले सारे शब्दहि वेदा ॥ ऐशा वस्तूचें गायाचें स्तोत्र तरी कैचें ॥ स्वयंप्रकाशक विभो तूं तुला नीरांजन कैचें ॥ अंतर्बाहिर्व्यापक तूं तुज उद्वासन कैचें ॥ ४ ॥ सर्वावस्थीं असें परी पूजन तव नितवाचें ॥ करिती देवा एकबुद्धिनें ब्रह्मनिष्ठ साचें ॥ परिनसुनि हा ब्रह्मनिष्ठनाशुद्ध चित्त याचें ॥ जाणें सद्गुरु सगुण रूप सच्चिदानंदसाचें ॥ भावें करितो कृष्णानाथा पुजन पायाचें ॥ ५ ॥

### २ "तथानुक्रम मानसपूजा ॥

भुजंगप्रयात

मनीं आणुनी ध्यान हें सद्गुरूचें ॥
दिलें स्थान त्या चित्त सिंहासनाचें ॥
पदीं अर्घ्य हें प्रेमवारीमनानें ॥
दिलें कल्पुनी घेतलें सद्गुरूनें ॥ १ ॥
दिलें चूळ टाकावया वारि हस्तीं ॥
पुढें बैसवीली गुरुज्ञान मूर्ती ॥

तनू मर्दिली सर्व पंचामृतानें ॥
पुढें घातलें स्नान शुद्धोदकानें ॥ २ ॥

मालिनी

उदरिं जगजयाचे वस्त्र त्या नेसवीलें ॥
विमल गुरुकपालीं गंध हें लावियेलें ॥
उपवित गुरुकंठीं घालुनीया विधीनें ॥
परिमळयुत पुष्पें अर्पिलीं आदरानें ॥ ३ ॥

इंद्रवज्रा

नाना परीचे वसनादिकांनीं ॥
आच्छादुनी आणिक भूषणांनीं ॥
शृंगारुनी श्रीगुरुदेवमूर्ती ॥
आपादती देखिलि कामपूर्ती ॥ ४ ॥

तेव्हां पुढें पाकरसामृताला ॥
ठेवोनिया सद्गुरु जेववीला ॥
केलें सुखें भोजन सद्गुरूनें ॥
पाणी दिलें आचमना मनानें ॥ ५ ॥

आर्या

द्विधा त्रयोदशगुणीं तांबुल मग प्रेमयुक्त गुरुपाणीं ॥-
देतां वरदकरें गुरुचढवी शिष्यास भक्तियुतपाणी ॥ ६ ॥

झाला कृतार्थ गुरुचे वरद करें शिष्य तोषुनि स्तवन ॥
थकला वेद तयाचें यालत्वें करि करोनिया नमन ॥ ७ ॥

भुजंगप्रयात

प्रभूसी मुखें वर्णितां वर्णवेना ॥
मतीमंद मी बुद्धिसी आकळेना ॥
परी बोबडे लोक बोले तयासी ॥
पिता घेउनी लावितो त्या उरासी ॥ ८ ॥

नसें योग्यता बोल हे आदरायो ॥
तरी बोलतो काय हा उद्धराया ॥
तुवां निर्मिले गोल विश्वोदरींया ॥
किती मापना शक्ति मातें कराया ॥ ९ ॥
तया गोलका निर्मुनिया जिवासी ॥
सुखी ठेविशी वारूनी दुःखराशी ॥
नलागे कधीं मोलद्यावे जिवाला ॥
अशी निर्मिली पंचभूतें सुखाला ॥ १० ॥
तुझ्यासारिखा दीन दाता न कोठें ॥
कृपा केली तूं भाग्य माझेंच मोठें ॥
जिवा नीचय नी पुनर्जन्मभीती ॥
गुरूचे कृपें लोपली सर्वही ती ॥ ११ ॥
जरी मुक्ति ना लाधली याच देहीं ॥
तरी सद्गुरुप्रेम लाधो पुढेंही ॥
अशारीतीनें जाहला गर्भवास ॥
तरी दुःख ना सद्गुरो मन्मनास ॥ १२ ॥
करूनी गुरु प्रार्थना त्याचकालां ॥
परिभ्रामही घातलें सद्गुरूला ॥
नमूनी गुरुज्ञानदीपें पहातां ॥
खरी शांतिही लाधली आज चित्ता ॥ १३ ॥
असें चित्त राहो सदा स्थीर पायीं ॥
ढळो ना गुरो अन्य नाना उपायीं ॥
करूनि अशी प्रार्थना सद्गुरूला ॥
दिलें पूर्ववत्स्थान राहवयाला ॥ १४ ॥

शार्दुलविक्रीडित.

ऐशी नित्य करोनि मानस पुजा सद्भावना ठेवुनी ।
त्याला दर्शन देति सद्गुरु तमा ज्ञानानलें नाशुनी ॥
जावोनी मग पुण्य पाप सगळें कर्तव्य राहे तया ।
होतो तो क्षणि मुक्त सद्गुरु कृपें देहांच राहोनिया ॥ १५ ॥

## श्रीसाइनाथ

### अभंग

आहों तैसे राहूं आम्हीं सर्व काळीं ॥ तो साई सांभाळी आम्हांप्रती ॥१॥
नाहीं दुसऱ्याचें आम्हां कांहीं काम ॥ साईनें निष्काम केलें आम्हां ॥२॥
निष्काम होऊनि साधूं आत्मतुष्टि ॥ भुक्ति मुक्ति मुष्टीं आम्हां मग ॥ ३ ॥
आमुची मुमुक्षा पूर्ण करी साई ॥ इतर तो देई काय आम्हां ॥ ४ ॥
राजे आणि रंक आम्हां सर्व सम ॥ लौकिकी तो काम नाहीं आम्हां ॥५॥
लौकिकी संपदा ख्याती सर्व जन ॥ त्यां तृणासमान मानूं आम्हीं ॥ ६ ॥
प्रारब्धें हा देह तो कैसाही राहो ॥ त्याकडे न पाहों आम्हीं आतां ॥७॥
आमुचें तें काम एका साईपाशीं ॥ आम्हीं इतरांसी नव्हों लीन ॥ ८ ॥
साईच्या आधारें मत्त झालों आम्हीं ॥ विषयांची ऊर्मी मावळली ॥ ९ ॥
परोपकाराचा काम तोहि क्षीण ॥ साई इच्छेवीण घडेना तो ॥ १० ॥
त्यामाजीं अहंता ती आम्हांसि नाहीं ॥ घडवितो साई तेंचि घडे ॥ ११ ॥
माझीं सहस्रधीं तिला परकर्मी ॥ अथवा अकर्मी योजी साई ॥ १२ ॥
स्थूल सूक्ष्म देहें जीं जीं होतीं कर्मे ॥ तीं सारीं अकर्मे साईकरी ॥ १३ ॥
आम्हांस तो एका साइपायीं आस ॥ तेथें सदा वास आम्हीं करूं ॥१४॥
सर्वेश्वर गुरु हा मनीं निर्धार ॥ आम्हां सर्वाधार साईनाथ ॥ १५ ॥
एका साईवरी टाकूं आम्हीं भार ॥ स्वसुखदातार तोचि आम्हां ॥ १६ ॥
साई कृपा करी नीलकंठावरी ॥ तो निज अंतरीं शांत झाला ॥ १७ ॥

एकदा माझे एक स्नेही महाराजांचे दर्शनास आले व तेथे बसल्यावर महाराजांचे पाय दाबूं लागले. पाय दाबतां दाबतां महाराज एकदम त्यांना म्हणाले "पाय दाबूं नकोस सरकून बैस." त्याप्रमाणे ते गृहस्थ मागें सरकले. थोड्या वेळानें त्यांचे डोळे भरून आलेले दिसले. त्यावर थोडा वेळ गेला व मग ते पुन: पाय दाबूं लागले. त्या वेळी महाराज कांहीं बोलले नाहीत. नंतर ते स्नेही वाड्यांत आले तेव्हां सांगूं लागले की पहिल्यांदा पाय दाबीत असतां एक अमंगळ विचार माझ्या मनांत आला व तत्क्षणीच महाराजांनी मला सरकून बसायाला सांगितले. मग मला त्याबद्दल पश्चात्ताप झाला व मनातल्या मनांत महाराजांची क्षमा मागितली व त्यानंतर पुन्हा पाय दाबूं लागलो तो महाराजांनी कांहीं मनाई केली नाहीं. अशाच तऱ्हेचे अनुभव महाराजांचे भक्तांना नित्य येत. अर्थात् महाराजांची शिक्षण पद्धति अवर्णनीय होती.

(१२)

॥ श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न ॥

एकदां मी सकाळीं नित्याप्रमाणे महाराजांचे दर्शनास गेलों. तेव्हां महाराज धुनीपाशीं उभे होते. मी जाऊन पायां पडतां क्षणीच महाराज म्हणाले "अरे काळजी तुला कसली? सगळी काळजी मला आहे." मी पुन्हां नमस्कार करून म्हटलें "खरंच सगळी काळजी आपल्यालाच आहे." महाराजांना आमच्याबद्दल आमच्यापेक्षां कितीतरी पटीनें जास्त काळजी आहे याचे नित्य अनुभव येत असल्यामुळे महाराजांचें बोलणें अक्षरशः पटलें. तरीपण हे शब्द आज महाराजांनीं कां उच्चारिले याबद्दल खुलासा होईना. तो खुलासा मी मुंबईस गेल्यावर झाला. ज्या दिवशीं महाराजांनीं हे शब्द उच्चारिले त्याच दिवशीं माझी मुलगी [illegible] माझ्या घरीं दिवाणखान्यांत खेळत असतां कोपऱ्यांत असलेल्या कपाटावर चढूं लागली. तोंच ते कपाट तिच्या अंगावर आलें. ती खालीं पडली व कपाट तिच्यावर पडलें. कपाटावर काचेची व धातूची खेळणीं होतीं पण

सर्वस्वी काळजी वाहणाऱ्या मालकाची अशी कांहीं कृपा कीं, तीं सर्व खे
जणूंकाय उचलून बाजूला ठेविल्यासारखीं आणि मुलीला यत्किंचि
इजा झाली नाहीं. नाहीं म्हणावयाला तिची एक बांगडी पिचली व
हात त्यामुळें थोडासा खरचटला.

असेंच एकदां तीच मुलगी रात्रीं शौचकूपांत गेली तों तेथें एक
सर्प होता, मुलीचें वय तेव्हां पांच वर्षांचें होतें. साप तिनें पहाए
पूर्वी तिच्या बरोबरच्या गड्यानें पाहिला व त्यानें तिला ताबडतोब
ओढून बाहेर नेली.

(१६)

डहाणूचे उद्धवेशबुवा कांहीं मंडळी घेऊन एकदां द्वारकेस या
गेले होते. मुंबईहूनच आगबोटीनें गेले. सर्व मंडळीची टिकीटें बु
जवळ होतीं. टिकिटांचे दोन भाग असतात, एक बोटीच्या टिकिटा
दुसरा मचव्याचे टिकिटाचा. बुवांनीं मचव्याचीं टिकिटें वेगळीं फाडून
खिशांत ठेविलीं व बोटीचीं टिकीटें आपल्या पैशांच्या पाकिटांत ठे
आगबोटीवर असतांना तें पैशांचे पाकिट त्यांना कांहीं कारणास्तव
काढावें लागलें. त्यावेळीं ते कठड्यापाशीं उभे होते. पाकीट काढतां क
तें समुद्रांत जाऊन पडलें अर्थात बोटीची सर्व टिकिटें व बुवांचे पैसे
समुद्रांस्तृप्यंतु झाले. बोटींतून उतरतांना टिकिटें द्यावीं लागतात बु
टिकिट कलेक्टरांस वरील मजकूर सांगितला व टिकिटें घेतली होतीं
गोष्टीचे प्रत्ययासाठीं मचव्याचीं टिकिटें दाखविलीं; तितक्यानें टि
कलेक्टराची समजूत झाली व त्यानें कोणत्याही तऱ्हेनें अडविलें न
द्वारकेस उतरल्यावर गोमती स्नानाला, देवाच्या चरण स्पर्शाला, गू
कर द्यावा लागतो. बुवांजवळ अर्थात पैसे उरले नव्हते व महारा
अढळ श्रद्धा असल्यामुळें " तुजवांचुनि इतरांते दिन मुख पसरोनि
मागावें" या पंतोक्तिप्रमाणें कोणाजवळ न मागतां शिर्डीस महाराजां
लिहिलें ज्या दिवशीं द्वारकेस बुवांनीं पत्र लिहून टाकिलें त्याच
महाराज डहाणूच्या एका धनिक भक्ताच्या स्वप्नांत गेले व त्याला प
समुद्रांत पडल्याची हकीगत सांगून बुवांस ताबडतोब पैसे पाठविण

आज्ञा केली. त्या भक्तानें दुसरेच दिवशीं इन्सुअर करून पन्नास रुपये बुवांस पाठविले व स्वप्नाचा मजकूर लिहिला.

( १७ )

शंकरराव क्षीरसागर मामलतदार हे एकदां महाराजांचे दर्शनास आले असतां महाराजांनीं दक्षिणा मागितली. त्यांनी खिशांत असलेले सर्व पैसे महाराजांचे हातांत दिले. वाडयांत आल्यावर त्यांना कोणी विचारिलें कीं 'तुम्हांला परत जाण्यास पैसे कोठें आहेत, शंकरराव म्हणाले बाबा देतील. त्याच दिवशीं संध्याकाळीं राहत्याचे पोष्टमास्तर आपल्या एका पाहुण्याला घेऊन तेथें आले. त्या पाहुण्याला शंकररावांनीं वीस रुपये कांहीं वर्षांपूर्वी उसनें दिले होते, तें त्यानें त्या दिवशीं न मागतां शंकररावांना परत दिले. अर्थात शंकररावांची सर्व बेगमी तेवढयानें झाली.

( १८ )

महाराजांनीं देह मंगळवार ता. १५ अक्टोबर १९१८ रोजीं तिसरे प्रहरीं ठेविला. त्याच दिवशीं रात्रीं ते येथील लक्ष्मण भटाच्या स्वप्नांत गेले आणि म्हणाले बापुसाहेब जोग माझी काकडआरती करावयाला येणार नाहीं, कारण त्याला वाटतें कीं मी मेलों. मी जिवंतच आहें. तूं येऊन माझी काकडआरती कर. स्वप्नांत आज्ञा झाल्याप्रमाणें पहांटेस लक्ष्मणभट मशिदींत गेले कारण बाबांचा देह ते दिवशीं मशिदींतच ठेविलेला होता व त्यानें जाऊन तेथें आरती केली. त्यावेळीं बाबांचा हात हालत होता असा कित्येकांना भास झाला. दोनप्रहरीं आरती नित्याप्रमाणें मशिदींत झाली व संध्याकाळीं म्हणजे ता. १६ रोजीं बाबांचा देह बापूसाहेब बुट्टींचे वाडयांत आणून ठेविला आणि तेथें त्या रात्रीं शेजारती झाली आणि तेथें नित्याप्रमाणें काकडआरती, दोन प्रहरची आरती, संध्याकाळची आरती व शेजारती हा क्रम सुरु झाला तो अद्याप चालला आहे.

( १९ )

महाराज समाधिस्त झाल्यावर दोन तीन दिवसांनीं सांटाक्रूझच्या मोरेश्वरराव प्रधानांच्या मेहुणीचे स्वप्नांत गेले व म्हणाले, तुझ्या ट्रंकांमध्यें पिवळा

पितांबर आहे तो माझ्या समाधीवर घालण्यासाठीं पाठवून दे. त्या बाईनें तो पितांबर पुष्कळ वर्षांपूर्वी बाजूस ठेवून दिला होता व तिला त्याचें स्मरणही नव्हतें. सकाळीं उठल्यावर बाईनें आपलें स्वप्न मोरेश्वररावास सांगितलें व तावडतोब ट्रंकामधून पितांबर काढून शिर्डीस पाठविण्यासाठीं त्यांचें स्वाधीन केला. तो हल्लीं येथें आहे व मधून मधून महाराजांचें समाधीवर घातला जातो.

(२०)

एके दिवशीं पहाटेस लक्ष्मणराव उर्फ काका महाजनी यांचे स्वप्नांत महाराज गेले व म्हणाले " निजलास काय. उठ माझा आज तिसावा दिवस आहे तो कर " महाजनी जागे झाले व त्यांना वाटलें कीं, तिसावा दिवस तर केव्हांच होऊन गेला असेल, तरीं पण त्यांनीं दिवस मोजले व त्यांना असें आढळून आलें कीं तोच तिसावा दिवस आहे. त्यांनीं ब्राह्मणाला बोलावून महाराजांच्या पादुकांना अभिषेक करविला आणि कांहीं भक्तमंडळीस जेवावयास बोलावून महाराजांची प्रथम मासिक पुण्यतिथि साजरी केली. त्यानंतर प्रत्येक मासिक पुण्यतिथि मुंबईस साजरी करण्यांत आली.

(२१)

## श्रीसाईबाबांच्या कांहीं लीलाबद्दल

**रा. रा. गणेश गोविंद नरके यांचे रा. रा. हरी सीताराम दिक्षित यांस आलेल्या ता० ४।३।१९१८ चे पत्रांतील उतारा:—**

परवाचे दिवशीं (ता. २ मार्च १९१८) नाथषष्ठी (श्री एकनाथ महाराजांची पुण्यतिथी) झाली. दुपारीं बहुतेक मंडळींना बाबांनीं आजीबाईच्या पुराणास पाठविलें, तेथें बाईनीं रसाळ वाणीनें नाथांचे चरित्र सांगितलें तिकडे न्याहारीनंतर बाबांनीं कांहीं गोष्टी सांगितल्या त्यांत नामदेव व कबीर यांचा उल्लेख होता सायंकाळीं भाकरीचे वेळीं बाबा तात्याशीं भांडले; भाकरीचें ताट फेंकून दिलें व सावण्या भरविणें, फळें कापणें वगैरे होण्यापूर्वीच समर्थांनीं नारसिंव्हाचा अवतार घेतला. बाइयां-

तून फकीरबाबा, डॉक्टर वगैरे मंडळी स्वरूप पहावयास देवळांत गेली होती; दादाला-म्हणाले " ह्याला ( तात्याला ) हाकून दे नाहीतर मीच खालीं जातों " आवेशांतच चौरंगाजवळ जाऊन तात्याला मारावयाला दोन धोंडे घेतले व बरेच संतापले तात्या खालीं आला; परंतु त्यानें "फळें खाऊं घातल्याशिवाय चावडींत जाऊं देणार नाहीं. " असा हट्ट घेतला. संध्याकाळीं ८-४५ ला घंटा झाली व सर्व मंडळी जमली, भजन सुरू झालें पण तात्या रुसला. बाबांनीं दादाकडून तात्याला बोलावूं पाठविलें. पण तात्या हट्ट सोडीना व बाबा फळें खाण्याचें कबूल करीनात. ९-३० झाले, १०-३० झाले, मंडप स्त्री पुरुषांनीं गच्च भरला, पालखी तयार करून ठेवली. घोडा फाटकाजवळ उभा राहिला व भजनाचा कडाका उडून राहिला. बाबा गादीजवळून उठून चौरंगाजवळ आले व नंतर खांबाजवळ जाऊन बसले. बाबा शांत होते व कांहींच बोलत नव्हते. जिल्हे पैठणांत पालखी निघेपर्यंत बाबा उशीर करणार असें जो तो बोलूं लागला व जणूं काय पैठणांतच आहोत असें समजून मंडळी कडाक्यानेंच नाचून भजन करूं लागली. ११ वाजले व दादांनीं घरीं जाण्याची परवानगी मागितली. बाबा म्हणाले "कुठे जातोस बैस" ह्यानंतर बाबा, बिमारींत एकदा दरबार केला होता तसाच करितात कीं, काय असें वाटूं लागलें. फरक हा कीं, त्या दिवशीं अतिशय शांतता होती व ह्या दिवशीं मंडपांत भजनाचा कडाका उडून जिकडे तिकडे आनंदी आनंद होऊन राहिला होता. दोन्हीही चावडीचे दिवस होते. शेवटीं तात्यानीं आपला हट्ट सोडला. तात्यानीं हट्ट सोडल्यावर बाबा हट्ट धरून बसले " नाहीं जायचं " असें म्हणत, दादाला म्हणाले " बरं बा फार रात्र झाली जा आतां" भजनाला व भटे लोकांनां शिव्या देऊन भजन बंद करविलें. म्हाळसापतीला म्हणाले "चल आपण तक्यांत जाऊं " तात्या वर गेला त्याला सर्व मंडळीस हांकून देण्यास सांगितलें. कांहीं वेळानें तात्यालाही जावयास सांगितलें. सर्व मंडळी घरोघर गेली. बापूसाहेबही गेले, समर्थ ( आम्ही नी, खडके वगैरे शिर्डीतच होतों ) गादीवर बसून पुन्हां संतापले, व शिव्या देऊं लागले कितेकांचा उच्चार झाला त्यांत आपलेंही नांव होतें. शेवटीं दोन प्रहर रात्रीस ( बाराचे सुमारास ) " चला " असें म्हणाले गार्डवाईनें घंटा पुन्हां

वाजविली. तात्या व बापूसाहेब आले व वहिवाटीप्रमाणें चावडी फार आनंदानें झाली. नाथ षष्ठीचीच ही लीला होय, असें सर्वांनां वाटत होतें. दुसरे दिवशीं सकाळीं बैठकीचे वेळीं ह्याच्याच गोष्टी होत्या. त्या वेळीं गोष्टी बऱ्याच लांबल्या. उठावयास १०-३० वाजले. भिंतीजवळ तात्या होता; तात्या म्हणाला " काय बाबा आम्हाला नीट सांगितलं असतं की दोन प्रहर रात्रींपर्यंत भजन करा म्हणजे जाऊं, तर कां आम्हीं ऐकलं नसतं. " " लई खेलाडू. " बाबा म्हणाले " तुम्हीच. तुम्ही अन् बापुसाहेब हरदम खेले आहांत " लेंडीवरून परत जातांनां लोकांनां बाबा विचारीत होते " काल कां उशीर झाला होता ? " असो इथें फार आनंद झाला.

( २२ )

रा. रा. मोरेश्वरराव प्रधानांचा मोठा मुलगा एकदां बराच आजारी होता. त्या वेळीं त्यांच्या एथें एक तेलंगी शास्त्रीबुवा राहत असत. ते शास्त्रीबुवा श्री दत्तउपासक होते. त्यांना मोरेश्वरराव श्री सांई महाराजांचे भजनीं लागले हें पसंत नव्हतें. ते म्हणाले तुम्ही बाबानां सोडा व श्री दत्ताला शरण जा म्हणजे तुमचा मुलगा बरा होईल. प्रधान म्हणाले बाबा हे दत्तच आहेत. शास्त्रीबुवा म्हणाले जर हा मुलगा पांच मिनिटांत दूध पिऊं लागेल तर बाबा दत्त आहेत असें मी मानीन. व उद्यां पासून मुलाला आराम वाटू लागून लौकरच बरा होईल तर मी बाबांचे दर्शनास जाईन व सवाशें रुपये दक्षिणा देईन त्या मप्राणें पांच मिनिटांतच मुलगा दूध पिऊं लागला व दुसरे दिवसापासून त्याला आराम पडूं लागला. मुलगा साफ बरा झाल्यावर शास्त्रीबुवा शिर्डीस महाराजांचे दर्शनास गेले सवाशें रुपये दक्षिणा दिली. नंतर तिसरे प्रहरीं महाराजांनीं पांच रुपये दक्षिणा मागितली. तेव्हां माधवराव देशपांडे महाराजांस म्हणाले "सकाळीं यांनीं सवाशें रुपये दिले आतां आणखी पांच रुपये कशाला ?" महाराज म्हणाले "सवाशें रुपये दिले ते त्यानें आपल्या दत्ताला दिले. ते मला कोठें दिले !" शास्त्रीबुवांनीं मागितल्याप्रमाणें पांच रुपये दिले.

मनास आल्यास श्रीसाईबाबा आपल्या सभोंवार बसलेल्या भक्तवृन्दास मोठ्या आनंदानें अनेक गोष्टी सांगत त्यांतील कांहीं खालीं दिल्या आहेत.

त्या येणेंप्रमाणें.

(२३)

एका माळ्याकुणब्याचा मुलगा होता. तो वाड्यांत आला. तेथेंच तो वाढला. बारा वर्षे राहिल्यानंतर रडूं लागला. घरीं आईबापाकडे जाण्यासाठीं रडूं लागला. त्याला बादशहानें सांगितलें. आपल्या आवारांत पुष्कळ वाडे आहेत. त्यांतल्याच एखाद्या वाड्यांत रहा असें त्याला सांगितलें. वाडा त्याला दिला. तो पुनः रडूं लागला. मग बादशहानें आपल्या मुलीशीं त्याचें लग्न लावून दिलें या मुलीला पोर झालें नाहीं, म्हणून त्यानें माळ्याकुणब्याची मुलगी तिच्याशींही लग्न लावलें. तरी फिरून रडूं लागला. बादशहानें पुष्कळ समजाविलें तरी तो गेला. मग बादशहानें त्याला कांहीं द्रव्य दिलें कारण बादशाह मोठाच माणूस होता. त्याचें नांव राहिलें आहे.

तात्पर्य–बादशहा इतका जीव देत होता. वाडा दिला. आपली मुलगी दिली तरी आईबापाकडे जाण्याची म्हणजे संसारांत पडण्याची ओढ गेली नाहीं. बादशाहा मोठा माणूस होता म्हणून त्याला कांहीं द्रव्य दिलें. पण जर बादशहाचें ऐकलें असतें आणि राहिला असता तर राज्य मिळालें असतें.

(२४)

–चार भाऊ होते. त्यापैकीं दोघे एका गांवाला गेले. ते माळी कुणबी होते तेथें एक जाणती मुलगी होती. ती कबिराची होती. तेथें त्यांनीं कांहीं सगणें घेतलीं. नंतर त्या मुलीला खुणावलें. ती गेली. तिला घेऊन ते आपल्या गांवीं गेले. मी लहान होतों. मीबी संगें गेलों. गांवीं गेल्यावर लोकांनीं चौकशी केली व भय वाटलें. मग ते दोघे त्या मुलीला घेऊन एका डोंगरांत गेले. मीही मागोमाग गेलों. त्या मुलीला दोन बच्चे झाले पुढें तिच्या आईबापाला शोध लागला. कांहीं मंडळी म्हणाली पोरीला

घेऊन चला व या लोकांना मारून टाका. आईबाप म्हणाले पोरीला बच्चे झालें आहेत. आतां राहूं द्या.

( २५ )

एक वाणी होता. त्यानें तुपाचीं तीन भांडीं भरलीं. माझा म्हतारा जवळ होता तो म्हणाला माझ्यापुढें भांडी ठेवशील तर मी सगळें तूप एकटा खाईन. तितक्यांत वाण्याचा भाऊ त्याला ~~जेवावयास बोलावयाला~~ आला वाण्यानें तुपाची भांडी आंत दुकानांत ठेऊन कुलुप लावलें. माझ्या म्हाताऱ्याला वाणी म्हणाला मी जेऊन आलों म्हणजे तुम्हाला फुटाणे देईन. मी म्हाताऱ्याजवळच होतों. दुसरी दोन पोरें होतीं त्यांनी मागची भित पडकी होती. तिला एक लाथ मारली तों भित पडली व सगळें मोकाट झालें. मग त्या दोन पोरांनीं दोन भांडयांतलें तूप पार केलें म्हाताऱ्यानें मला इशारा केला मग मी तिसऱ्या भांडयांतलें तूप पार केलें. दुकानदार परत आला त्याला मी तुपाचें सांगितलें. दुकानदार पाहतो तों कांही सोनें वगैरेही नाहीसें झालें. मग आम्हाला सगळ्यांना चावडीवर नेलें. खरा चोर सांपडला आम्हाला सोडून दिलें: मग आम्हांला हगवण लागली तों सगळें तूपच हगूं लागलों मग माझ्या म्हाताऱ्यानें मला नीट केलें. त्या वाण्यानें पुढें मला दोन वर्षें जेऊं घातलें.

## श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न.

शके १८४५ व इसवी सन १९२३ च्या रामनवमीच्या उत्सवा- द्दल दास गणू महाराज यांनीं श्री चरणीं सादर केलेलें पत्रः—

श्री सच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचुडामणी भक्तकाम कल्पद्रुम श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांच्या पवित्र चरणारविंदीं श्रीराम नव- मीच्या जमाखर्चाची व उत्सवाची हकीगत सादर करितों तीः—

(१) या उत्सवास अष्टमीपासून आरंभ होऊन द्वादशीस काला केला. उत्सवाची समाप्ती झाली. कांहीं पुर्तता होणें राहिली होती ती पोर्णिमेस केली. असा एकंदर ६ दिवस उत्सव झाला.

(२) या उत्सवास पाहुणे मंडळी आली तीः—

श्रीमंत आण्णासाहेब बोराळकर, रावसाहेब माझोडकर, श्रीमंत आप्पासाहेब नार्नाळकर, जनार्दन अण्णा, गोविंद व्यंकटी महाजन, बाबा रामचंद्र पत्तेवार व त्यांचे गुमास्ते मंडळी, नागोबा, पापा लाला, नारायण, व्यंकोबा, बाबा श्रीमंत सरकार बुळे साहेब मंडळीसह व राणी साहेबांसह, नानासाहेब पाडकीकर, जिवन लाल गंगाराम शेटजी, भगवा- नराव मानरमकर, रामचंद्रराव वकील-वरुडकर, दादासाहेब वरुडकर, अशी मंडळी समक्ष हजर राहिली.

(३) अडचणीमुळें समक्ष न येतां आश्यामुळें ज्यांनीं उत्सवांत भाग घेतला ती मंडळी-धोंडोपंत वकील, बळवंतराव खेडकर, शंकरराव- मुळावेकर,

(४) आतां उत्सवास मुंबईकडील मंडळी आली तीः—

रावसाहेब दाभोळकर, काकासाहेब दीक्षित, रावसाहेब तर्खड, पुर्णचंद्रभय्या, बुटी, आपल्या मंडळीसह पुरंदरे, पुण्याचे दुकानदार रा. शिंदे, माळी, आंधेरीकर वैंडर, मास्तर, सुंदरराव नवलकर—

(५) आतां उत्सवास सहानुभूती दर्शविलेली मंडळी. बाळासाहेब रेगे, नारायण जनार्दन तेंडुलकर, काकासाहेब महाजनी, जनाबाई

कोठारी, मनमोहन रंगनाथ जयकर, वसंतराव, काका पाटील, श्रीकृष्ण पुरषोत्तम. भवानराव बनसोडे.

(६) आतां ह्या उत्सवास खर्च झाला त्याचा तपशील:—

| जमा | | रु. | खर्च रु. |
|---|---|---|---|
| ७२-०-० | आपला चरणरज दासगण् २५ रु. रोख जरीचा रुमाल २७ रु. ४ उपरणीं २० रु. | २१० | रामचंद्र आनंदरुप मारवाडी साखर कणिक रवा तांदुळ डाळ वगैरे सामान पावती बरहु० |
| | | ४०-०-० | पंढरपुरकर आचारी |
| ७५-०-० | राजेसाहेब माझोडकर | ११५-०-० | दारुवाला शेखअहमद |
| ५०-०-० | गोविंद व्यंकटी महाजन. आकोलकर | | पावती बरहु० |
| ५०-०-० | बाझा रामचंद्र पत्तेबार | २२-०-० | कासम फकिर बाजेवाला |
| १५-०-० | धोंडोपंत वकील. | ११-०-० | विठोबा सुतार सर्पणा व० |
| १-०-० | शंकरराव मुळावेकर. | ५-४-६ | तेली तुकाराम |
| १-०-० | बळवंतराव खेडकर- | १०-०-० | यमाजी जगताप दूधाबद्दल |
| ५-०-० | आंबेरीकर वैंडर. | ६-०-० | भाजी |
| ५-०-० | आंबेरीकर मास्तर. | १०-०-० | रामनवमीच्या अभिषेकाची दक्षिणा |
| १०-०-० | बापुभय्या कोठारी. | | |
| ५१-०- | बुळेसाहेब | ५-०-० | आंधळे आणि पांगळे यांचीदक्षिणा. |
| ५-०-० | सुंदरराव नवलकर | | |
| ५-०-० | काकासाहेब दिक्षितांची बहीण | २७-१४-० | श्रीचा समाधी खर्च पावती बरहु० |
| १५-०-० | चौबळ | ५-०-० | भोजन दक्षिणा खर्च |
| ५-०-० | सीताबाई रामचंद्र सामंत. | १-८-० | म्हाळसाकांताचा फराळ |
| १-०-० | यशवंतराव अर्नाळेकर | ५-०-० | नाना चोपदार उपरणे पान |
| १०-०-० | बाबा सामंत. | ११-०-० | बाळा शिंपी ,, ,, [ १ रु.५ |
| ५-०-० | चिंतू शेट | ७-०-० | लक्ष्मण भट उपरणें पान १ रु. ७ |
| १००-०० | पापालाल. | २७-०-० | बाबा धर्माधिकारी रामा- |

३०-०-० नागोबा वंजारी                    यणाचे पारायणाची

१ तुपाचा डबा रु.३० पा.द.रु.१० जरीचा रुमाल रु. २७

३०-०-० त्र्यंबकोबा वंजारी   तुपाचा डबा.

४०-०-० लक्ष्मीबाई जोगळेकर   २-०-० आच्याऱ्याला बैलगाडी भाडे

तांदुळाचें पोतें   २-०-० विडयांची पानें.

~~२-०-० दादा साहेब बरूडकर.~~   ८-८-० वासलेट डबे २

उपरणे जोडी १ची किंमत. २-१२-० चिमण्या. ४

९-०-० रामराव बरूडकर ,,   १-८-० घरे सारविण्यास

५-०-० गांधी १ गुळाची ढेप   मोलकरीण व गडी यांची मजुरी.

८-०-० नारायण वंजारी उपरणे जोडी १

४-८-० बाबा रंगारी पत्रावळी

१॥ हजार द. ३ रु. प्रमाणें   १-०-० भांडी घासणारीण कोळीण

५-०-० पापालालची सासू.   २-०-० कुंभार आनाजी घागरी

४-४-० दत्तोपंत इंगोलीकर.   रांजण माखे परळ मिळून

५०-०-० हनुमंत जयंतीप्रीत्यर्थ.   ६-०-० नानु चहावाले संगमनेर-

उपरणे जोडया ५ एकंदर किं ५०   कर उपरण्याचे पान १

६-०-० सुरुदिन धोडेवाला

६७५-१२-० एकूण जमा.   उपरण्याचे पान १

९७-१०-० खूट आली ती   ६-०-० अबदुल उपरण्याचें

भरण्याकरितां   पान १

७७३-६-०

५-०-० मार्तंड भगत ,,

४-८-० रंग्यागुरव ,,

४-८-० मुरल्या ,,

६-०-० बाळा गुरव ,,

४-०-० महादु फसले ,,

४-८-० सुरदास ,,

४-८-० रगतपीते ३ ,, पाने ३

१-८-० आनंदामास्तर ,, पान १

१०९-८-० बुंदी प्रयोजन खर्च.

१-०-० हनुमंत जयंति प्रीत्यर्थ
अभिषेक खर्च.
१५-०-० आच्यान्याला जरीचा
रुमाल बांधला.
१-०-० हरभरे वगैरे यांची डाळ
नारळ शेंदूर
५०-०-० महार मांग भिल्ल चांभार
यांना भोजन

७७३-६-० एकूण खर्च.

एणेंप्रमाणें खर्च झाला आहे. यांत पेटीची जमा हगाम्याचा खर्च व तमाशाचा खर्च दाखविला नाहीं. तो तात्या पाटलास माहित आहे

(७) आतां आपल्या या उत्सवांत ज्यांनीं यथाशक्ति मदत केली त्यांना आपल्या कडोन इहपर लोकाचा उत्तम आशीर्वाद असावा; त्यांचे आपण रक्षण करावें. मोगलाईत नांदेड, मुखेड, उमरी, कुंठूर, कळ बाजुरी, बोपाळे, रामेश्वर, सांगवी, सातेगांव, नायगांव, कोकलेगांव नार्नाळी, अशा गांवीं तुमची मंडळीं आहेत. त्यांचे आपण रक्षण करावें. आपलीं आम्ही पिलें आहोंत. आपल्या सुखदपंखांखालीं आम्हां सर्वदा रक्षण व्हावें. झालेला खर्च चरणीं सादर केला आहे. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना: न्यूनाधिकाची क्षमा करावी.

आपला चरणरज,

दासगणू

ह. भ. परायण दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवन मंजिरी

श्रीगणेशायनमः । हे सर्वाधारामयूरेश्वरा । सर्वसाक्षी गौरी कुमरा ॥
हे अचिंत्या लंबोदरा । पाहिमां श्री गणपते ॥ १ ॥
तूं सकल गणांचा आदि ईश । म्हणून म्हणती गणेश ॥
तूं संमत सर्व शास्त्रांस । मंगलरूपा भालचंद्रा ॥ २ ॥
हे शारदे वाग्विलासिनी । तूं शब्द सृष्टी स्वामिनी ॥
तुझें अस्तित्व म्हणूनी । व्यवहार चालती जगताचे ॥ ३ ॥
तूं ग्रंथकाराची देवता । तूं भूषण देशाचें सर्वथा ॥
तुझी अवघ्यांत अगाध सत्ता । नमो तुजसीं जगदंबे ॥ ४ ॥
हे पूर्णब्रह्मा संतप्रिया । हे सगुणरूपा पंढरीराया ॥
कृपार्णवा परम सदया । पांडुरंगा नरहरे ॥ ५ ॥
तूं अवघ्यांचा सूत्रधार । तुझी व्याप्ती जगभर ॥
अवघीं शास्त्रें विचार । करिती तुझ्या स्वरूपाचा ॥ ६ ॥
पुस्तकज्ञानी जे जे कोणी । त्यां तूं न गवससी चक्रपाणी ॥
त्या अवघ्या मूर्खांनीं । शब्दवाद करावा ॥ ७ ॥
तुला जाणती एक संत । बाकीचे होती कुंठित ॥
तुला माझा दंडवत । आदरें हा अष्टांगीं ॥ ८ ॥
हे पंचवक्त्रा शंकरा । हे नरमुंड मालाधरा ॥
हे नीलकंठा दिगंबरा । ॐमकाररूपा पशुपते ॥ ९ ॥
तें नाम ज्याचे ओठीं । त्याचें दैन्य जाय उठाउठी ॥
ऐसा आहे धूर्जटी । महिमा तुझ्या नांवाचा ॥ १० ॥
तुझ्या चरणा वंदून । मी हें स्तोत्र करितों लेखन ॥
त्यास करावें साद्य पूर्ण । तूं सर्वदा नीलकंठा ॥ ११ ॥

आतां वंदूं अत्रीसुता ॥ इंदिराकुलदैवता ॥
श्री तुकारामादि सकल संतां । तेवीं अवघ्या भाविकांसीं ॥ १२ ॥
जयजयाजी साईनाथा । पतीत पावना कृपावंता ॥
तुझ्या पदीं ठेवितों माथा । आतां अभय असूं दे ॥ १३ ॥
तूं पूर्ण ब्रह्म सौख्य धामा । तूंच विष्णू नरोत्तमा ॥
अर्धांगी ती ज्याची उमा । तो कामारी तूंच कीं ॥ १४ ॥
तूं नरदेह धारी परमेश्वर । तूं ज्ञान नभींचा दिनकर ॥
तूं दयेचा सागर । भवरोगां तूं औषधी ॥ १५ ॥
तूं हीनदीनां चिंतामणी । तूं तव भक्तां स्वर्धुनी ॥
तूं बुडतियांनां भव्य तरणी । तूं भीतासी आश्रय ॥ १६ ॥
जगाचें आद्य कारण । जें कां विमल चैतन्य ॥
ते तुम्हींच अहा दयाघन । विश्व हा विलास तुमचाची ॥ १७ ॥
आपण जन्मरहीत । मृत्युही ना आपणाप्रत ॥
तेच अखेर कळून येत । पूर्ण विचारें शोधितां ॥ १८ ॥
जन्म आणि मरण । हीं दोन्हीही अज्ञानजन्य ॥
आपण दोहींपासून । अलिप्त मुळींच महाराजा ॥ १९ ॥
पाणी झऱ्यांत प्रगटलें । म्हणून कां तेथ उपजलें ॥
तें पूर्वींच होतें पूर्ण भरलें । आलें मात्र आंतुनी ॥ २० ।
त्याचेंत आलें जीवन । म्हणून लाधलें अभिधान ॥
झरा ऐसें तिज लागून । जलाभावीं त्याचची ॥ २१ ॥
लागला आणि आटला । हें मुळीं न ठावें जला ॥
कांकीं जल त्याचेला । देत नव्हतें महत्व मुळीं ॥ २२ ॥
त्यांचेसीं मात्र अभिमान । जीवनाचा परिपूर्ण ॥
म्हणून तें आटतां दारुण । दैन्यावस्था ये तिसीं ॥ २३ ॥

रदेहही खांच खरी । शुद्ध चैतन्य विमलवारी ॥
वांचा अनंत होती जरी । परी न पालट तोयाचा ॥ २४ ॥
म्हणून अजन्मा आपणां । मी म्हणतसें दयाघना ॥
अज्ञान नगाच्या कंदना करण्या व्हावें वज्र तुम्ही ॥ २५ ॥
ऐशा खांचा आजवर बहूत झाल्या भूमीवर ॥
ल्ली असुन होणार । पुढेंही कालावस्थेनें ॥ २६ ॥
या प्रत्येक खांचेमत । निराळें नांवरूप मिळत ॥
णें करून जगतांत । ओळख त्यांची पटतसे ॥ २७ ॥
तां चैतान्यमत । मी तूं म्हणणें हें ना उचित ॥
कीं न जेथें संभवे द्वैत । तेंच चैतन्य निश्चयें ॥ २८ ॥
णि व्याप्ती चैतन्याची । अवघ्या जगाठाईं साची ॥
ग मी तूं या भावनेची । संगत कैशी लागते ॥ २९ ॥
ल मेघगर्भींचें । एकपणें एकसाचें ॥
वतरणें भूवरी होतां त्याचें । भेद होती अनेक ॥ ३० ॥
गोदेच्या पात्रांत । तें गोदा म्हणून वाहिलें जात ॥
पडे कूपांत । तैसी न त्याची योग्यता ॥ ३१ ॥
त रूप गोदावरी । तेथील तुम्हीं अहा वारी ॥
आम्हीं थिल्लर कूप सरोवरीं । म्हणून भेद तुम्हां आम्हां ॥ ३२ ॥
आम्हां व्हावया कृतार्थ । आलें पाहिजे तुम्हांमत ॥
ण सर्वदा जोडून हात । कां कीं पवित्रता तुम्हां ठाईं ॥ ३३ ॥
त्यामुळें पवित्रता । आली गोदा जलासी सर्वथा ॥
त्या जलांत पाहतां । तें एकपणें एकची ॥ ३४ ॥
ण गोदावरीचें । जे कां ठरलें पवित्र साचें ॥
अरण्यातद भूमीचे । गुणदोष झाले साह्य पहा ॥ ३५ ॥

मेघगर्भींच्या उदकाला । जो भूमी भाग न बदलवी भला ॥
त्याच भूमीच्या भागाला । गोदा म्हणाले शास्त्रवेत्ते ॥ ३६ ॥
इतरत्र जें जल पडलें । त्यानें पात्रगुणा स्वीकारलें ॥
रोगी कडूखारट झालें । मूळचें गोड असूनी ॥ ३७ ॥
तैसें गुरुवरा आहे येथ । षड्रिपूची न धाण जेथ ॥
त्या पवित्र पिंडाप्रत । संत अभिधान शोभतसे ॥ ३८ ॥
म्हणून संत ती गोदावरी । मी म्हणतों साजिरी ॥
अवघ्या जीवात आहे खरी । आपुली श्रेष्ठ योग्यता ॥ ३९ ॥
जगदारंभापासून । गोदा आहेच निर्माण ॥
तोयही भरलें परिपूर्ण । तुटी न झाली आजवरी ॥ ४० ॥
पहा जेव्हां रावणारी । येता झाला गोदातिरीं ॥
त्या वेळचें तेथील वारी । टिके कोठून आजवरी ॥ ४१ ॥
पात्रमात्र तेंच उरलें । जल सागर मिळाले ॥
पावित्र्य कायम राहिले । जल पात्राचें आजवरी ॥ ४२ ॥
प्रत्येक संवत्सरीं । जुनें जाऊनी नवें वारी ॥
येत पात्राभीतरी । तोच न्याय तुम्हां ठाया ॥ ४३ ॥
शतक तेंच संवत्सर ॥ त्या शतकांतील साधूवर ॥
हेंच जल साचार ॥ नाना विभूती ह्या लाटा ॥ ४४ ॥
या संतरूप गोदेसीं । प्रथम संवत्सरासीं ॥
पूर आला निश्चयेसीं । सनत्सनक सनंदनाचा ॥ ४५ ॥
मागून नारद तुंबर । ध्रुव प्रल्हाद बलि नृपवर ॥
शबरी अंगद वायूकुमर । विदूर गोपगोपिका ॥ ४६ ॥
ऐसे बहुत आजवरी । प्रत्येक शतकामाझारीं ॥
पूर आले संख्यावरी । ते वर्णाया अशक्य की ॥ ४७ ॥

जागतच्या ज्ञतकांत । संतरूप गोदेप्रत
पण पूर आलांत । साइनाथा निश्चयें ४८ ॥
न तुमच्या दिव्य चरणा । मी करितों वंदना ॥
राज माझ्या दुर्गुणा । पाहूं नका किमपीही ॥ ४९॥
हीन दीन अज्ञानी । पातक्यांचा शिखामणी ॥
अवघ्या कुलक्षणांनीं । परि अव्हेर करूं नका ॥ ५० ॥
अंगींचें दोष । मना न आणी परीस॥
च्या लेंड्या ओहोळास । गोदा न लावी परतवूनि ॥ ५१ ॥
मधील अवघी घाण । आपल्या कृपाकटाक्षें करून ॥
करा वेगें हरण । हीच विनंती दासाची ॥ ५२ ॥
परिसाचा संग होऊन । लोहाचें ते लोहपण ॥
न होय गुरुवरा हरण । तरी हीनत्व परिसाशीं ॥ ५३ ॥
पापी ठेवूं नका । आपणा हीनत्व घेऊं नका ॥
आपण परीस मी लोह देखा । माझी चाड आपणांते ॥ ५४ ॥
बालक अपराध सदैव करितें । परी न माता रागावते॥
आणून ध्यानातें कृपा प्रसाद करावा ॥ ५२ ॥
साइनाथा सद्गुरु । तूंच माझा कल्पतरू ॥
पाधीचे भव्य तारूं । तूंच असमी निश्चयें ॥ ५६ ॥
तूं कामधेनू चिंतामणी । तूं ज्ञान नभींचा वासरमणी ॥
तूं सद्गुणाची भव्य खाणी । अथवा सोपान स्वर्गींचा ॥ ५७ ॥
हे पुण्यवंता परम पावना । हे शांत मूर्ते आनंदघना ॥
हे चित्स्वरूपा परिपूर्णा । हे भेदरहित ज्ञान सिंधो ॥ ५८ ॥
हे विज्ञान मूर्ति नरोत्तमा । हे क्षमाशांतीच्या निवासधामा ॥
हे भक्तजनाच्या विश्रामा । प्रसीद प्रसीद मजप्रती ॥ ५९ ॥

तूंच सद्गुरु मच्छिंदर । तूंच महात्मा जालंदर ॥
तूं निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर । कबीर शेखोनाथ तू ॥ ६० ॥
तूंच बोधला सांवता । तूं रामदास तत्वता ॥
तूंच तुकाराम साइनाथा । तूंच सखा माणिक प्रभू ॥ ६१ ॥
या अपुल्या अवतारची ॥ परी आहे अगम्य साची ॥
ओळख आपुल्या जातीची ॥ होऊं न देतां कवणातें ॥ ६२ ॥
कोणी आपणा म्हणती यवन । कोणी म्हणती ब्राह्मण ॥
ऐसी कृष्णासमान । लीला आपण मांडिली ॥ ६३ ॥
श्री कृष्णास पाहून । नाना प्रकारें वदले जन ॥
कोणी म्हणाले यदुभूषण । कोणी म्हणाले गुराखी ॥ ६४ ॥
यशोदा म्हणे सुकुमार बाळ । कंस म्हणे हा महाकाळ ॥
उद्धव म्हणे प्रेमळ । अर्जुन म्हणे ज्ञानजेठी ॥ ६५ ॥
तसे गुरुवरा आपणासी । जें ज्याच्या मानसीं ॥
योग्य वाटेल निश्चयेसी । तें तें तुम्हां तो म्हणतसे ॥ ६६ ॥
मशीद आपलें वसतिस्थान । विंधावाचून आहेत कर्ण ॥
फाल्याच्या तऱ्हा पाहून । यवन म्हणणें भाग तुम्हां ॥ ६७ ॥
तैसी अग्नीची उपासना । पाहुनि आपुली दयाघना ॥
निश्चय होत आमच्या मना । कीं आपण हिंदु म्हणूनी ॥ ६८ ॥
परी हे भेद व्यवहारीक । यांतें चाहतील तार्किक ॥
परी जिज्ञासू भाविक । त्यां न वाटे महत्व यांचें ॥ ६९ ॥
आपुली आहे ब्रह्मस्थिती । जात गोत ना आपणाप्रती ॥
आपण अवघ्यांचे गुरुमूर्ती । अहां आद्यकारण ॥ ७० ॥
यवन हिंदूचे विपट आले । म्हणून तदैक्य करण्या भले ॥
मशीदअग्नीला स्वीकारिलें । लीला भक्तांस दावावया ॥ ७१ ॥

आपण जातगोतातीत । सद्वस्तू जी का सत ॥
तीच तुम्ही साक्षात । तर्कातीत सांचकीं ॥ ७२ ॥
तर्क वितर्कांचें घोडें । चालेल किती आपणांपुढें ॥
तेथें माझें बापुडें । शब्द टिकतील कोठुनी ॥ ७३ ॥
परी पाहुनी तुम्हाला । मौन नये धरितां मला ॥
कां कीं शब्द हेंच स्तुतीला । साहित्य आहेत व्यवहारीं ॥ ७४
म्हणून शब्दें करून । जें जें होईल वर्णन ॥
तें तें सर्वदा करीन । आपुल्या-कृपाप्रसादें ॥ ७५ ॥
संताची योग्यता भली ॥ देवाहून आगळी ॥
अजादुजास नाहीं मुळीं । स्थान जवळ साधुंच्या ॥ ७६ ॥
हिरण्यकश्यपू रावणाला । देवद्वेषें मृत्यु आला ॥
तैसा एकही नाहीं घडला । प्रकार संत हस्तानें ॥ ७७ ॥
गोपीचंदें उकीरडयासी । गाढिलें जालंदरासी ॥
परी त्या महात्म्यासी । नाहीं वाटला विषाद ॥ ७८ ॥
उलट राजाचा उद्धार केला । चिरंजीव करूनी सोडिला ॥
ऐशा संतांच्या योग्यतेला । वर्णन करावें कोठवरीं ॥ ७९ ॥
संत सूर्य नारायण । कृपा त्यांची प्रकाशपूर्ण
संत सुखद रोहिणी रमण । कौमुदी ती तत्कृपा ॥ ८० ॥
संत कस्तुरी सोज्वळ । कृपा त्यांची परिमळ ॥
संत इक्षू रसाळ । रस नव्हाळी तत्कृपा ॥ ८१ ॥
संत सुष्टदुष्टांप्रती। समसमान निश्चिती ॥
उलट पाण्यावरी प्रीती । अलोट त्यांची वसतसे ॥ ८२ ॥
गोदावरी जलांत । मळकट तेंच धुवाया येत ॥
निर्मळ तें संदुकींत । राहे लांव गोदे पूनी ॥ ८३ ॥

त्यांनीं शिर्डीस जाण्याची इच्छा प्रदर्शित केल्याबरोबर त्यांच्या मेहुण्यांनीं त्यांना टांग्याची व्यवस्था करून दिली. व ते शिर्डीस आले. त्यावेळीं मीही शिर्डीतच होतों. त्यांची माझी मशीदींतच गांठ पडली. मी त्यांना "आल्या सारखे एक दिवस रहा" म्हटलें परंतु टांगा लवकरच परत जावयाचा असल्याकारणानें त्यांना राहतां येईना; त्यांनीं परत जाण्याची इतकी उत्कट इच्छा दर्शविल्यावर आम्हीं बाबांच्याकडे गेलों व बाबांनीं त्यांनां जाण्याला परवानगी दिली व अगदीं लवकर जा असें सांगितलें. ते एक मैल गेले नाहींत तोंच पाऊस सपाटून आला, परंतु चमत्कार हा कीं, ते मुळींच भिजले नाहींत व त्यांच्या अंगांत जरी एक सदरा व पांढरा आंगरखा इतकेंच होतें तरी थंडी वाऱ्यापासून सुद्धां बिलकूल त्रास झाला नाहीं.

( ३५ )

मी एकदां शिरडीस असतांना श्रीसद्गुरु साईबाबांनीं दोन प्रहरीं "प्रधान आले का" म्हणून विचारलें, मी 'आले नाहींत' म्हणून उत्तर दिलें, व त्यांना बोलवावयाचें काय म्हणून विचारलें. त्यावर बाबा "बरें" इतकेंच बोलले. ज्या दिवशीं बाबांनीं वरील प्रश्न विचारून प्रधानांचें स्मरण केलें त्या दिवशीं रा. रा. प्रधान मुंबईस हायकोर्टांत वकील लोकांच्या बसावयाच्या खोलीमध्यें एकाएकीं घेरी येऊन निचेष्ट पडले. निचेष्ट पडला असतां त्यांना बाबांचें स्मरण झालें. त्यांना असे निचेष्ट पडलेले पाहतांच इतर वकील मंडळी धांवत आली व त्यांनीं सावध करण्याचा प्रयत्न चालविला. परंतु ते आपोआप सावध झाले. थोड्या वेळानें त्यांना मोटारनें घरीं पोंचवितों असें मंडळी म्हणूं लागली. परंतु तसें करण्याचें कारण नाहीं, मी आतां बरा आहे असें त्यांनींच मित्र मंडळीला आश्वासन दिलें व त्यांचे मित्र रामदास विठोबा शेजाई व रामकृष्ण श्रीकृष्ण नवटकेर यांनीं त्यांस गोरेगांवास घरीं नेलें. दुसरे दिवशीं बाळा शिंपी नांवाचा एक शिर्डीत असणारा भक्त श्रीसद्गुरु साईबाबांची उदी घेऊन गेला व मालेगी
त्यांना बाबांनी आपली आमंत्रण पाठली होती असा मजकुराचें पत्र आलें. गुरु माउली भक्तांच्या संकट निवारणार्थ कशी धांव घेते, याचें हें एक उदाहरण आहे.

मोरेश्वर विश्वनाथ प्रधान.

## रा. रा. वि. सी. सुर्हेरकर यांचें पत्र.

सन्मान्य रा. रा. अण्णा साहेब दाभोळकर यांचे सेवेसी-विनायक सिताराम सुर्हेरकर याच्या अनेकवेळां कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. आपले कडील "श्री साईलीला" मासिक पुस्तकाचे अंक १ ते ४ बुक पोष्टानें आलें त्यांचा अंतःकरणपूर्वक स्वीकार करून श्री बाबांचें चरणीं शिरसाष्टांग नमस्कार घातला. पुस्तकांकडे अवलोकन करितां प्रत्येक अंकीं श्री सद्गुरु साईबाबांची मुर्ति अधिष्ठित झालेली पाहून अत्यंत परमानंद झाला व प्रत्यक्ष बाबा मज गरीबास दर्शन देण्यास अतिशय कृपालेश धरून माझें घरीं चालून आले अशी ह्या देहाची कायमची भावना झाली आहे. मला ते अंक घेऊन केव्हां वाचीन अशी उत्कंठा झाली व त्या प्रमाणें एकदां सर्व अंक घाईघाईनें वाचले तरी ते पुन्हां किती वेळा वाचावे लागतील वाचले जातील तरी मनाची तृप्ती होणार नाही असें झालें. मला श्रीसद्गुरू साईबाबा यांचा अनुभव आला व प्रथमारंभी काय घडलें ती हकीगत सादर करीत आहें; तिचा सानंद स्वीकार व्हावा व तींत योग्य ती आपले कडून दुरुस्ती होऊन महाराजांचे लीलेखालीं तिची मासिकाचे एकाद्या अंकांत प्रसिद्धि व्हावी.

सन १९१० मध्यें मी वांद्रें येथें एका ठाणे फारेष्ट डिव्हीजनचा हेडक्लार्क होतों. तेव्हां मी लोअर परेलहून वांद्रे येथें डेली प्यासेंजर ऑफीसला जाण्याकरितां येत असें. अशा वेळीं वांद्रे येथील माझी वरील स्नेही मंडळीं श्री बाबांचे दर्शनास शिर्डीस जात व ते परत येत, तेव्हां बाबांची प्रासादिक उदी व दुसरे कांहीं जिन्नस आणीत व केव्हां केव्हां मला उदी व प्रसाद देत व कांहीं स्नेही मंडळी माझे कपाळींच उदी लावीत. मी जरी तिचा स्वीकार करीं तथापि माझे अज्ञानामुळें व अल्प समजुतीमुळें मी त्यांस म्हणत असें कीं, माझा ह्या गोष्टीवर कांहीं भरंवसा नाही. आणखी म्हणत असें कीं, बाबांनी माझे मनांत प्रेरणा केल्याशिवाय मी त्यांचे दर्शनास जाणार नाहीं. अशा स्थितीमध्यें माझे बरेच दिवस लोटले व पुष्कळ

भक्त मंडळी जाऊन बाबांच्या अतर्क्य लीलांचे वर्णन करूं लागून त्यामुळें मुंबई, वांद्रे, वसई, विरार, आगाशी, डहाणू, उंबरगाव इकडून बरीच मंडळी शिर्डीस दर्शनार्थ जाऊं लागली तथापि माझें मत जें ठाम होतें कीं, श्री बाबांनीं प्रेरणा केल्याशिवाय जावयाचें नाही तें कायमच होतें. परंतु कांही दिवसांनीं असा योग आला कीं, मला गुरुवारी उपोषण असतें अशा एका दिवशीं रात्रीं मी माझा नित्यक्रम आटोपून झोपी गेलों. सकाळी उठतांच अशी एकदम भावना उत्पन्न झाली कीं आज बाबांकडे जावयाचें. अगोदर पहाटेच्या प्रहरीं उपोषणामुळें कांहीं साक्षात्कार झाला तो कोणते स्वरूपांत झाला तो मात्र मला व्यक्त करतां येत नाहीं. सकाळीं उठून लागलाच चहा घेऊन तसाच सकाळचे आठ वाजतां वांद्रे येथें ऑफीसांत येऊन कांही महत्वाचें व जरूरीचे कागदांवर साहेबांच्या सह्या घेऊन ठेविल्या. त्यांस रजेचे विचारतांच "खरें आहे तुम्हांस ३।४ दिवसांची रजा दिली आहे, तावडतोब जाऊन या, चांगली गोष्ट आहे," असें ते म्हणाले इतकेंच नव्हें तर "मलाही नाशिकला एका नातेवाईकास भेटण्यास जावयाचें आहे तेव्हां मीही तुझे बरोबर येऊन आपण एकाच गाडीनें जाऊं" असें ते म्हणाले. घरी परत ११ वाजतां आलों कुटुंबास कळविलें कीं, "आज बाबांची प्रेरणा एकदम झाली आहे, मी दोनप्रहरचे गाडीला जाणार" तेव्हां जा म्हणून तावडतोब सांगितलें. तथापि लांबीचा पल्ला, तो प्रांत कधीं पाहिला नाहीं, सोबत कोणी नाही, ओळख नाही, थंडीचे दिवस इतक्या गोष्टी जरी कुटुंबाच्या म्हणण्या प्रमाणें खऱ्या होत्या तरी मनांत जी प्रेरणा झाली त्यामुळें असल्या गोष्टीकडे लक्ष न देतां एकदम गुरुवारचें पारणें सोडून निघालों. गाडींत बसलों व सकाळीं कोपरगावचे स्टेशनवर उतरलों. शीर्डीस जाण्याचा रस्ता तांगा वगैरे बद्दलची चौकशी करतो तों त्याच गाडींत माझे मित्र डॉक्टर मिस्तर आर. आर. चौबळ हे उतरले. दोघांची भेट होताच दोघांना श्री साईबाबांकडे जावयाचे असल्या कारणानें [illegible] आनंद झाला. श्री गोदावरीचे तीरावर [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] मित्र रा. [illegible] कर्णेकर हे येथें त्या [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] आणि श्री [illegible] [illegible] आपल्या

आहे व त्यांतील पाहुणे मंडळी आपल्याकडे घेऊन ये. लागलाच तांगा त्यांचे बंगल्यावर आला व त्यांनीं आम्हांस पाहातांच त्यांस फारच आनंद झाला व "गंगा आली आळशावरी ॥ आळशी पळे दुरी दुरी" असें म्हणून लागलीच सामानसुमान उतरवून घेऊन येथेंच रहावें असा अत्याग्रह करूं लागले. अखेर चहा पाणी थोडा अल्प आहार करून त्यांस मोठ्या मिनतवारीनें कळविले कीं, "आम्हीं श्री साईबाबांचे दर्शनाकरितां आलों आहोंत, आम्हाला फार लवकर गेलेंच पाहीजे, व आरतीचे वेळीं महाराजांचे दर्शन व्हावे अशी पूर्ण आशा धरून आम्ही आलों आहोंत तेव्हां आम्हांस रहातां येत नाहीं." नंतर त्यांचा निरोप घेऊन जों निघालों तों आरतीचे पूर्वीं अर्धा पाऊण तास आधीं येऊन पोहोंचलों व श्रीमंत काका साहेब दीक्षित ह्यांचे वाड्यांत उतरलों तेथें. त्यांचे दर्शनाचा लाभ झाला व सर्व व्यवस्था आमची त्यांनीच केली व लागलेंच आरतीस हजर झालो. श्रीचे दर्शन होतांच इतका आनंद झाला कीं तसा पूर्वीं कधींच झाला नव्हता. इतकेंच नव्हे तर बाबांचे पायावर डोकें ठेवतांच त्यांचे तोंडून निघालेले उद्गार ऐकून तर फारच आश्चर्यचकीत झालों. "तुला इकडे येण्यास माझी प्रेरणा तुझे मनांत व्हावयास पाहिजे होती नाहींरे" ह्या वरून माझें मनांत जी गोष्ट घोळत होती ती दर्शन होतांच सांगितली. या वरून बाबा पूर्ण अंतर्साक्षी आहेत अशी खात्री पटून मी पुन्हां साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां मजकडे कृपादृष्टीनें अवलोकन करून माझें अंगावरून हात फिरवून साईबाबा मला ऊठ म्हणून म्हणाले. त्याच वेळीं डाक्टर चौबळ ह्यांनीही दर्शन घेतलें. ते व मी आरती नंतर आम्हांस पुण्यास जावयाचें होतें म्हणून आज्ञा घेण्यास गेलों होतों. त्या वेळीं श्री बाबांनी डाक्टरांस विचारलें कीं, "आमचा बांद्रें येथें भक्त आहे तो आपलें औषध घेत आहे त्याचा ताप कसा आहे तो बरा आहेना?" असा प्रश्न केला. चौबळ हे डाक्टर आहेत व ते बांद्रे येथें आहेत हें माहित नसतां त्याजपाशी आपले शिष्याची हकीगत बाबा विचारतात हें पाहून डॉक्टर ह्यांस फारच आश्चर्य वाटलें. तेव्हां श्री बाबा हे पूर्णावतारी आहेत अशी आमची त्यांनी खात्री करून दिली. ह्या प्रमाणें

प्रथम दर्शनाच्या लाभाचा अनुभव आला. ह्या वरून ते भक्तांचे पूर्ण कनवाळू होते व त्यांस प्रत्येकाचें मनोगत कळत असून त्याचा अनुभव बोलण्यांत दाखवीत. मी शिर्डीस जावयास निघते वेळीं माझ्या कुटुंबानी ज्या हरकती दाखविल्या होत्या त्या खऱ्या असें जरी मला प्रथमारंभीं वाटलें तरी कोणतीही अडचण न येतां दर्शनाचा लाभ झाला.

दुसरा अनुभव:— माझें कुटुंब नेहमी म्हणे कीं तुम्ही बरेच वेळ शिर्डीस जाऊन आलात एकदा मला घेऊन चला. म्हणून एकदां कुटुंब व दोन तीन मुलें घेऊन श्री बाबांचे दर्शनास गेलों. तेव्हां माझें कुटुंब दर्शनास गेल्यावेळीं जिकडे बऱ्याच स्त्रिया बसल्या होत्या त्यांत जाऊन बसल्या. बसतांच बाबांनी त्या सर्व स्त्रियांना एकाचे संसाराची दिनचर्या सांगितली ती माझे कुटुंबास इतकी पटली कीं,ती आणि आमच्या दिनचर्यैत अणू एवढा फरक नव्हता त्यामुळें माझे 'कुटुंबास इतका आनंद झाला कीं, तो वर्णन करितां येणें शक्य नाहीं. व पुढें कसें वागावें ह्याचाही त्यांना पूर्ण उपदेश मिळाला. त्यांची बाबांवर भक्तिहि दृढ झाली; कांही झालें तरी बाबांना विचारा व ते सांगतील त्या प्रमाणें करा असें म्हणें, म्हणून एकदां एका मुलीचे लग्नाचे बाबतीत बाबांस विचारतां त्यांनीं सांगितलें कीं, "जी योजना करतां तीच उत्तम आहे व तेंच कायम होईल व ती मुलगी सुखानें नांदेल. त्याप्रमाणें मुली त्याच मुलास देण्याचें ठरवून ती आपले संसारी सुखानें नांदत असून उत्तम प्रकारचे सुखांत आज मितीस आहे. त्यावेळीं श्री बाबांनी तिचे मस्तकावर हस्त ठेवून तिला आशिर्वाद दिला होता त्याची मला आज पूर्ण आठवण आहे.

तिसरा अनुभव-एकदा मी शिर्डीस गेलों तो पंढरपुरचे रस्त्यानें जाऊन श्रीपांडुरंगाचे दर्शन घेऊन गेलों. त्यावेळीं तेथें पंढरपुराचे महाद्वाराजवळ एक पेढे मिठाई वगैरेचें दुकान होतें. मी त्या दुकानीं पेढे घेतांना दुकानदारास म्हटलें होतें कीं, "मला शिर्डी येथें श्रीसाईबाबांचें दर्शनास जावयाचें आहे तेव्हां त्यांचे पुढें ठेवण्याकरितां तुमच्याकडे जे अति उत्तम पेढे असतील त्यांतून मला शेर पेढे दे. त्यानें खरोखर उत्तम

आहेत व साईबाबांचे पक्के भक्त आहेत. ते इतर यात्रेकरू प्रमाणें नाहींत, पुढें श्रीमंत कै. नानासाहेब व मी टांग्यांत बसलों व आरतीचे वेळेस शिर्डीस जाऊन पोहचलों. आरती झाल्यानंतर बाबांचे पायीं डोकें ठेवतांच बाबा मजकडे पाहून ह्मणाले " कांयरे नाना माझा पक्का भक्त आहे आणि तूं काय कच्चा आहेस ?" हें ऐकून मी मोठा चकित झालों कीं, मी जे श्री गोदावरीचें पात्रांत यात्रेकऱ्यांजवळ म्हटलें होते कीं, " नानासाहेब हे साईबाबांचे पक्के भक्त आहेत" त्याची चटकन् आठवण झाली. ह्यावरुन श्रीबाबा अंतर्साक्षित्वाचा अनुभव पावलोपावलीं कसा दाखवित असत हें स्पष्टच होत आहे. शिवाय अनुभवामृत पाजून आपल्या भक्तांस अहंकार उत्पन्न होऊं देत नसत. अहंकाराचा वारा न लागो राजसा ॥ माझ्या विष्णुदासा भाविकांसी ॥ ह्या श्री संत नामदेवाच्या वाणी प्रमाणें श्रीसाईबाबा भक्तांस गोष्टीचे रूपानें तऱ्हतऱ्हेचा प्रेमाचा उपदेश करीत असत.

ह्याप्रमाणें अनुभव येत येत आज पर्यंत श्रीबाबांच्या कृपेनें ह्या संसार सागरांत दिवस जात आहेत. संत चरण लागतां सहज ॥ वासनेचें बीज जळोनजाय ॥ ह्या श्री तुकारामांचे उक्ती प्रमाणें हें होत आहे.

आह्मी मात्र श्री संतांचें चरणीं श्री तुकोबाचे खालील अभंगाप्रमाणें अंतःकरण पूर्वक आपला विश्वास ठेविला पाहीजे.

चंदनाचे हात पायही चंदन ॥ परिसा नाहीं हीन कोण अंग ॥
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधःकार ॥ सर्वांगे साखर अवघी गोड ॥
तुका म्हणे तैसा सज्जनापासून ॥ पहातां अवगुण मिळेचिना ॥

असो पत्र विस्ताराची माफी असावी, वेडें वाकडें लिहून पाठवीत आहें त्यास आपल्या मासिकांत स्थळ मिळावे. कृपालोभ असावा हें विज्ञापना.

आपला.

विनायक सिताराम मुल्हेरकर.

दिले. शिर्डीस दुसरे दिवशीं श्री बाबांचे दर्शनास गेलों तेंव्हां पेढयाचा पुडा पुढें ठेवतांच बाबांनीं विचारलें. "हे पंढरपुरचे पेढे आहेतना? माझे करितां आणिलें आहेस नां?" मी प्रत्युत्तर केलें "होय आपले करतांच आणिले आहेत त्याचा आपण स्वीकार केलात तर उपयोग. 'होय माझे करतांच आणिलेस' असें म्हणून लागलीच एकदोन पेढे स्वीकारून बाकीचे पेढे " श्रीपांडुरंगाचा प्रसाद " म्हणून मला दिले तेंव्हां पंढरपुरचेच पेढे कशावरून म्हटले ~~श्री वरून ते पूर्ण अंत~~र्ज्ञानी होते व भक्तांची इच्छा पूर्ण करीत असत यांत कोणत्याही प्रकारचा संशय नाहीं. व ही दयाघन मूर्ती मनांत येऊन तिज बद्दल दिवसें दिवस प्रेम वृद्धिगत होत गेले.

ज्या ज्या वेळीं शिर्डीस श्री बाबांचे दर्शनास यावें त्या त्या वेळीं नवाच चमत्कार व्हावा. दोन महिन्यानीं चार महिन्यानीं मी शिर्डीस जाण्याचा क्रम ठेविला होता, परंतु कधींही मला एक दिवस जाण्यास हरकत आली नाहीं.

चवथा अनुभव:—एकदां मी व श्रीमंत कै. वा. नानासाहेब चांदोरकर असे शिर्डीस जाण्याकरितां निघालों. कोपरगांवास उतरून श्री गोदावरीचे तीरीं स्नान करून, गोदावरीचे पात्रांत त्यांचे ब्राह्मणानें चहा केला होता तो, आम्ही दोघांनीं घेतला. त्या वेळीं नानासाहेबानीं ५ शेर दूध घेतलें होतें व तिथें आमचे बरोबर बरीच ब्राह्मण व इतर ~~मंडळी मुंबई~~हून आलेली होती ती पण आमचे बरोबरच गोदावरीचीं स्नानें करून आपल्या बायका मुलांस चहा व दूध पाण्याची व्यवस्था करीत होती. नानासाहेबांनी जें दूध घेतलें होतें ते त्या मुलांकरितां वाटण्याची सुरवात केली तेंव्हां स्त्रिया व मुलें ह्यांनी "आम्हाला दूध आम्हाला दूध" असें गडबड करून त्यांनां इत्यादी भांडून एकच गडबड केली. श्री नाना साहेबांच्या मोजारीच त्यांची तयार असलेल्या [illegible] करितां [illegible] दोघीं [illegible] आम्हां दोघांस एक [illegible] श्री [illegible] [illegible] [illegible] शिर्डीस [illegible]

Extract from letter dated 27th June 1921 from Profesor G. G. Narke M. A. to Mr. Kaka Sahib ( H. S. Dikshit B. A. LL. B. )

"Yesterday in the evening I had been to the Mali Maharaj as suggested in Mr. Khaparde's letter. I am very glad went there. We had a talk about Shree also. —

श्री साईमहाराज फार मोठे साधू होते असे ते म्हणाले. ते आणखी म्हणाले 'माझ्याकडे एक बामण आला होता तो महाराजांची निंदा करीत होता.' मी विचारले 'अरे झाले तरी काय?' तो म्हणाला ''साधु कोठे [illegible] शिव्या देत असतात? शिरडीत मी मशिदीचे पायरीवर बसलो होतो. तेव्हा महाराजांनी फाटकाजवळ त्यांचेकडे दर्शनास दुरून आलेल्या एका महाराच्या बाईस आचकट विचकट शिव्या दिल्या.' माळी महाराज म्हणाले 'अरे बाबा तुला साधूच्या क्रिया समजत नाहीत. तुला चमत्कार पहावयाचा आहे काय? त्या शिवीत तर महाराजांनी त्या बाईला पाहिजे होती ती देणगी दिली. जा ती बाई * * * * * गांवी आहे. ती मूल मागण्याकरिता बाबांकडे गेली होती व तिला महाराजांचे कृपेने मूल झाले आहे जा पाहून ये.''

श्री शिर्डी संस्थानचा [illegible]

| जमा | रुपये | आणे | पै |
|---|---|---|---|
| गेल्या वर्षाची शिलक [illegible] | [illegible]८८ | [illegible] | [illegible] |
| कोठी खाते जमा | १२८६ | [illegible] | [illegible] |
| मासिक वर्गणी खाते जमा | [illegible]८८३ | [illegible] | [illegible] |
| वार्षिक वर्गणी खाते जमा | [illegible] | [illegible] | [illegible] |
| पेटी खाते जमा | [illegible] | [illegible] | [illegible] |
| कायम फंड खाते जमा | [illegible] | [illegible] | [illegible] |
| एकंदर रुपये | ८९५३ | १० | ० |

मी वरील जमाखर्चाचा आढावा तपासला आहे, तो बरोबर आहे.

J. K. Parulkar

सर्टिफाइड ऑडिटर

मुंबई ता. २६ ऑगस्ट १९२१

१८४४ चा जमाखर्चाचा आढावा.

| नावें | रुपये | आणे | पै |
|---|---|---|---|
| दक्षिणा खातें नावें | ३१३ | ० | ८ |
| कोठी खातें नावें | १२२८ | ० | ६ |
| पूजा खर्च खातें नावें | ११३ | १५ | ३ |
| भोजन खर्च खातें नावें | ३३३ | ६ | ९ |
| तसलमात खातें नावें | ५२ | ३ | ९ |
| घोडा खातें नावें | १६७ | ९ | ० |
| धुणी सर्पण खातें नावें | ६६ | १४ | ३ |
| नंदादीप खातें नावें | १९१ | ० | ० |
| मशीद रखवालदार खातें नावें | ११२ | ८ | ६ |
| रोषनाई खर्च खातें नावें | २८३ | ४ | ९ |
| वाजंत्री खातें नावें | २४० | ० | ० |
| मशीद देव्हारा खातें नावें | ५० | ४ | ६ |
| शिर्डी किरकोळ खातें नावें | १४६ | २ | ६ |
| पगार खातें नावें | १२९ | १२ | ० |
| स्कीमसंबंधीं खातें नावें | १६४ | २ | ६ |
| मुंबई ऑफिस खातें नावें | ७१ | ३ | ० |
| अमानत खातें नावें | १२६ | ० | ० |
| इंपीरीयल बँक खातें नावें | ३७२ | १५ | ० |
| स्थावर दुरुस्ती खातें नावें | २६ | ० | ० |
| स्थावर मिळकत खातें नावें | ५ | ० | ० |
| संस्थान भांडीं खातें नावें | १५० | ६ | ६ |
| दामोदर घनःशाम बाबरे इस्टेट खातें नावें | ३०७ | ० | ० |
| शामराव रामचंद्रराव जयकर खातें नावें | २० | ० | ० |
| कायम फंडासाठीं रु. २५०० व रु. १००० चे बाँड घेतले त्याचे दिले त्या नावें | ३५५४ | १ | ० |
| शिलक वर्ष अखेर | ७२८ | १२ | ३ |
| एकंदर रुपये | ८९५३ | १० | ० |

हरि सीताराम दीक्षित, चिटणीस

G. R. Dabholker खजिनदार

## श्रीसद्गुरू साईनाथ प्रसन्न.

# श्री शिर्डीसंस्थानचा पहिला वार्षिक रिपोर्ट.

श्री शिर्डीसंस्थानाच्या व्यवस्थे संबंधीं योजना अहमदनगर डिस्ट्रिक्ट कोर्टाकडून ता. १३।२।२२ रोजीं मंजूर झाली. त्यानंतर लवकरच डिस्ट्रिक्ट कोर्टाचे नाझर रा. रा. पारखे यांनीं शिर्डीस येऊन सर्व सामानासह इस्टेटीचा कबजा रा. रा. तात्या गणपतराव पाटील कोते यांस त्यांच्या व इतर ट्रस्टींच्या तर्फे दिला. श्री शिर्डी संस्थान कमिटीची व ट्रस्टींची नेमणूक वरील योजनेमध्येंच झाली होती. संस्थान कमिटीची पहिली सभा रामनवमीचे दिवशीं म्हणजे तारीख ६-४-२२ रोजीं झाली. त्यावेळीं श्री समर्थांच्या भक्तांना भक्त मंडळाचे सभासद होण्यासाठीं विनंतिपत्रें छापून पाठवावीं असें ठरलें, व त्या पत्राचे मसूदे कमिटीनें त्या सभेंत मंजूर केले. तसेंच कायम फंड व मासिक वर्गणी गोळा होण्यासाठीं भक्तांना छापील पत्रें पाठवावीं असेंही ठरून त्या पत्राचाही मसूदा मंजूर करण्यांत आला. त्या ठरावाप्रमाणें कमिटीला माहित असलेल्या महाराजांचे भक्तांना छापील पत्रें पाठविण्यांत आलीं. त्याचा परिणाम आजपर्यंत झाला आहे, तो खालीं लिहिलेल्या आंकड्यावरून व्यक्त होईल.

भक्त मंडळाच्या सभासदांची संख्या २३२. त्यांनीं कबूल केलेल्या वर्गणीची वार्षिक रक्कम रु.४०२० [ त्यापैकीं आतांपर्यंत वसूल झालेली रक्कम रु. २२३८॥=॥ ].कायम फंडांत देऊं केलेली रक्कम रु. २१९७९ ( त्यापैकीं आतांपर्यंत वसूल झालेली रक्कम ३७०९।-॥।- )

वरील योजना जरी सन १९२२ मध्यें झाली, तरी संस्थानच्या कोर्टीची स्थापना कांहीं वर्षें अगोदर, म्हणजे सन १९१८ मध्यें झाली होती. आणि वेळोवेळीं मंडळींकडून वर्गणी येत असे आणि ती संस्थानच्या कामाकडे उपयोगांत आणली जात असे. त्यावेळच्या हिशोबाच्या वह्या आहेत. पण खर्चाच्या पूर्णपणें न झाल्यामुळे आढावा काढला

गेला नाहीं. त्या खतावण्या तयार करण्यासाठीं व आढावा काढण्यासाठीं एक सबकमिटी नेमण्यांत आली होती. व या कामासाठीं ७५ रुपये पर्यंत खर्चण्याची त्यांना मंजूरी देण्यांत आली होती. त्याप्रमाणें त्या सब कमिटीनें तें काम रा. रा. बापाजी बळवंत देशपांडे यांजकडे सोंपवलें आहे आणि तें लवकरच पुरें होईल असें वाटतें.

२. रामनवमीचे दिवशीं महाराजांची मोठी तसबीर मशिदींत ठेवण्यांत आली. आणि ती नीट सुरक्षित रहावी अशा हेतूनें योग्य ती व्यवस्था करण्याचा अधिकार कमिटीनें चिटणीसांस दिला. व खर्चासाठीं १०० रुपयांची मंजूरी दिली. विचारांती असें ठरलें कीं, एक लाकडी देव्हारा करवून त्यांत ती तसबीर बसवावी. त्याप्रमाणें देव्हारा करविला, आणि तसबीर त्यांत बसविली आहे. या कामीं खर्च रुपये झाला तो रु. ९३-१४-६.

३. त्याचप्रमाणें श्रीसमर्थांच्या जिनसांची योग्य व्यवस्था व विल्हेवाट करण्यासाठीं एक सब कमिटी नेमण्यांत आली होती, त्या सब कमिटीनें सर्वानुमतें असें ठरविलें कीं, श्रीसमर्थांची पायघड्यांची बनात आणि दुसऱ्या कांहीं जिनसा ज्यांना कसर लागत चालली होती, त्या विकून टाकाव्या. त्याप्रमाणें त्या विकल्या गेल्या, आणि त्या विक्रीपासून रुपये ५९-०४= उत्पन्न झालें, ती रक्कम कायम फंडांत जमा केली. या वस्तू विकण्याचें मुख्य कारण असें कीं, त्या विकल्या नसत्या तर कसर लागून लवकरच त्या नामशेष झाल्या असत्या. त्यांत विशेष महत्त्वाची वस्तु म्हणजे महाराजांच्या पायघड्यांची बनात. तिच्यासंबंधानें असें ठरवलें होतें कीं, महाराजांच्या भक्तांकडून जितक्या मागण्या येतील (प्रत्येक मागणीबरोबर दोन रुपये दिले पाहिजेत अशी अट घातली होती) तितके तिचे भाग करून प्रत्येक मागणीदाराला त्यानें केलेल्या मागणीप्रमाणें भाग मिळावा. असें केल्यानें प्रत्येकानें आपआपला भाग, महाराजांचे पवित्र चरण लागल्यामुळें फार सांभाळून ठेवला आहे.

४ महाराजांच्या इतर वस्तू म्हणजे कपडयाच्या घडया, चिलिमी, जोडा या मशिदींतच ठेविल्या आहेत. गाद्या, तांब्या, पितळेचीं भांडी, चांदीचीं भांडी उंची कपडे हें सर्व सामान मंदिरांत म्हणजे जेथें महाराजांची समाधि आहे त्या इमारतींत ठेविलें आहे. किरकोळ सामान चावडीत ठेविलें आहे.

५. महाराज लेंडीवर जात असत ती लेंडीची जागा रा. रा. मोरेश्वरराव प्रधान यांनीं रा. रा. तात्या गणपती पाटील यांच्या नांवानें घेऊन संस्थानाला बक्षिस दिली आहे, व त्या संबंधीं बक्षिसपत्र लवकरच होईल. तसेंच गांवठाणाचे हद्दींत असलेली जागा रा. रा. हरि सिताराम दीक्षित यांची व त्यावर श्री. गोपाळ मुकुंद बुटी यांनीं बांधलेले इमले सदर दीक्षित आणि सदर श्री. बापूसाहेब बुटी यांचे चिरंजीवांनीं संस्थानाला बक्षीस दिले आहेत. तें बक्षिसपत्रही लवकरच होईल.

६ श्री समर्थांच्या समाधीचें काम संगमरवरी दगडाचें करण्याचें व सभामंडपांत फरशी करण्याचें श्री. बापूसाहेब बुटी यांच्या चिरंजीवांनीं ठरविलें आहे, व त्याप्रमाणें काम लवकरच सुरू करण्यांत येईल.

७ श्री साईनाथ सगुणोपासनेचीं पुस्तकें आजपर्यंत नामदार गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे छापवीत असत. त्या पुस्तकांच्या प्रती संपल्यामुळें त्यांची व मुळ प्रसिद्धकर्ते कृष्णशास्त्री भीष्म यांची संमती घेउन त्या पुस्तकाची नवी आवृत्ती काढावयाची कमिटीनें ठरविलें व त्याप्रमाणें तीं पुस्तकें छापवून तयार आहेत. पहिल्या आवृत्तीपेक्षां दुसऱ्या आवृत्तींत कांहीं पद्यें जास्त घातलीं आहेत.

८ कमिटीनें चावडीची जागा आणि राधाकृष्णा आई राहत होत्या तें घर आणि महाराजांचा घोडा बांधला जातो तें घर, दुरुस्त करण्याला मंजुरी दिली होती. पैकीं राधाकृष्णा आईचें घर दुरुस्त झालें व दुसऱ्या घरांची दुरुस्ती लवकरच हातीं धरण्यांत येईल.

कमिटीनें खर्चाचें बजेट मंजूर केलेलें होतें तें खालीं लिहिल्या प्रमाणें

| | रुपये. | | रुपये. |
|---|---|---|---|
| पूजाखर्च | १५० | मशीद रखवालदार | १५० |
| भोजनखर्च | ३६० | श्रीची दक्षिणा | ३६५ |
| घोडाखर्च | २०० | दुरुस्ती खर्च | ६४० |
| नंदादीप | २५० | क्रिडकोळ | १५० |
| रोषणाई | २२५ | तसलमात | १८० |
| धुणीसर्पण | १०० | मुंबई ऑफिसखर्च | ४० |
| पगारखर्च | १५० | | |
| वाजंत्री | २४० | एकूण रुपये. | ३२०० |

तीन हजार दोनशें

संस्थानचा जमाखर्चाचा आढावा जो रा. रा. जिवाजी कृष्ण परुळकर सर्टीफाईड ऑडिटर यांनीं तपासून पास केला आहे, तो या सोबत जोडला आहे. त्यावरून असें दिसून येईल कीं, फक्त २ बाबीमध्यें बजेटापेक्षां झालेला खर्च ज्यास्ती आहे. त्या दोन बाबी येणें प्रमाणें:

रोषणाई खर्च बजेट रु. २२५-झालेला खर्च रु. २८३।-॥-

मुंबई ऑफिसखर्च बजेट रु. ४०-झालेला खर्च रु. ७१८=.

कांहीं इतर खर्चांत बजेटपेक्षां खर्च कमी झाल्यामुळें शिल्लक राहिली, त्यांतून वर लिहिलेला ज्यास्त झालेला खर्च भागवावा म्हणजे रीअप्रोप्रियेशन करावें असें कमिटीनें तारिख २८-३-२३ च्या सभेमध्यें ठरवलें आहे. तसेंच त्या सभेंत शके १८४५ चें बजेट पास करतांना रोषनाई खर्चाची रक्कम रु. ३०० आणि मुंबई ऑफिसच्या खर्चाची रक्कम

२०७ ठरवली आहे. शके १८४४ च्या बजेटमध्यें महाराजांच्या भक्तांना वर कलम १ मध्यें लिहिलेलीं छापिल पत्रें पाठवण्यासंबंधाच्या खर्चाची बेगमी केली नव्हती. पण या कामाला कमिटीची मंजूरी असल्यामुळें योग्य तो खर्च करण्यांत आला आणि त्या खर्चाचा आंकडा रुपये १६४८=॥ आहे. आढाव्यामध्यें कोठी खात्यांत नावेच्या बाजूला रुपये १२२८००॥ खर्च दाखविला आहे. वास्तवीक इतका खर्च झालेला नाहीं. कोठी खात्यांतल्या खर्चाच्या रकमांचा तपशील पाहिला तर असें आढळून येईल कीं फक्त १९२।=॥ रुपये कोठी खात्यांतून खर्च झाले. ती रकम कायम फंडांत भरण्यासाठीं संस्थान कमिटीनें ता. ८-७-२२ रोजीं मंजुरी दिल्याचें वर नमूद झालेंच आहे. याशिवाय बाकीच्या खर्चाच्या रकमा म्हणजे कायम फंड थोड्या दिवसा साठीं उसने दिलेले रुपये ५८४८- आणि इतर कांहीं खात्यांत खर्ची पडावयाच्या रकमा कोठीखात्यांत खर्ची पडल्या होत्या त्या कोठीखात्यांत जमा करून निरनिराळ्या खात्यांत खर्ची घातल्या आहेत. तसेंच संस्थानासाठीं ३ कढया घेण्याची व त्यासाठीं १५० रुपये खर्चण्याची कमिटीनें ता॥ १-१०-२२ रोजीं मंजूरी दिली. त्याप्रमाणें ती रक्कम खर्ची पडली आहे, पण वास्तवीक शके १८४४ मध्यें एकच कढई तयार होऊन हातीं आली आहे आणि बाकीच्या दोन कढया तयार होऊन शके १८४५ मध्यें आल्या आहेत. एकंदर तीन कढयांची किंमत रेल्वे व इतर खर्चासह रुपये १८७।-॥ झाली. अर्थात मंजूर झालेल्या रकमेपेक्षां जो ज्यास्त खर्च झाला आहे त्याबद्दल कमिटीची मंजूरी घेण्यांत आली.

१० महाराजांचे एक भक्त दामो~~दर घनशाम बाबरे यांनी~~ मृत्यूपत्र करून आपले इस्टेटीचा कांहीं भाग शिर्डी संस्थानला दिला आहे. त्या मृत्यूपत्राचे एक्झीक्युटर रा. रा. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान, गोविंद रघुनाथ दाभोळकर, लक्ष्मण गणेश महाजनी, हरी सिताराम दीक्षित आणि ड्हाणूचे वकील रा.रा. अच्युत नारायण खरे हे आहेत त्या मृत्यूपत्रासंबंधानें प्रोबेट ड्यूटी भरण्यासाठीं संस्थानाच्या शिलकेंतून रुपये २०७ दिले आहेत. अर्थात ईस्टेट एक्झीक्यूटरांच्या हातांत आली म्हणजे त्या इस्टेटीतून ही रक्कम वसूल होईल. ही रक्कम आढाव्यामध्यें नमूद केली आहे.

११ वरील आढाव्यांमध्यें संस्थानच्या मुख्य चार उत्सवांचा जमाखर्च आलेला नाहीं. या उत्सवांची व्यवस्था खाली लिहिलेल्या मंडळीकडे असते, आणि तूट आल्यास तेच भरून काढतात. खर्च जाऊन शिल्लक राहिल्यास त्या त्या उत्सवाचे खातीं जमा होते.

१ रामनवमी:—ह. भ. प. दासगणू महाराज व तात्या पाटील.
२ गुरुपौर्णिमा:—श्री. बुटी.
३ गोकुळ अष्टमी:—रा. रा. तात्या पाटील.
४ पुण्यतीथि:—मुंबईकर मंडळी.

---

आजपर्यंत पुण्यतिथी शिवाय करून बाकीचे उत्सवांत तूटच पडत गेली. पुण्यतिथी उत्सवासंबंधानें मात्र दरवर्षी खर्चापेक्षां वर्गणी जास्त येत गेली. शके १८४४ च्या आरंभीं पुण्यतिथी फंडाची शिल्लक रुपये ९३८।–॥ होती व त्यांतून रुपये ५०० कायम फंडांत भरावें असें ठरल्यावरून ती रक्कम कायम फंडांत भरली गेली. शिवाय कायम फंडातून २५०० रुपयांचा सरकारी नोटा घेण्यासाठीं कोठी फंडातून कायम फंडांत १९२।=॥ घालवें असें कमिटीनें ठरविल्यावरून ती रक्कमही कायम फंडांत भरली गेली. त्यानंतर अमळनेरचे श्री. प्रतापशेट यांजकडून रुपये १००० ची देणगी आल्यामुळें आणखी रुपये १०००ची सरकारी नोट घेण्यात आली. एकूण कायम फंडाच्या रुपये ३५०० च्या नोटा आहेत. आतां कायम फंड यापेक्षां पुष्कळच जास्ती म्हणजे सुमारें एक लक्ष रुपये झाला पाहिजे त्यासाठीं महाराजांच्या भक्तांनी मनोभावानें प्रयत्न केल्यास तें काम सहज होईल आणि असें ते करतील अशी दृढ आशा प्रदर्शित करून हा पहिल्या वर्षाचा म्हणजे शके १८४४ चा रिपोर्ट पुरा करतों.

दासगणू अध्यक्ष.

हरि सखाराम दीक्षित, चिटणीस

# शिर्डी येथील श्री गोकुळअष्टमीचा उत्सव.

महाराज समाधिस्थ झाल्यावर शिर्डी येथील वार्षिक उत्सवाची जी व्यवस्था करण्यांत आली, त्यांत गोकुळअष्टमीचा उत्सव रा. तात्या गणपतराव पाटील कोते यांचेकडे सोंपविण्यांत आला. त्याप्रमाणें प्रतिवर्षी रा. तात्या व त्यांची शिर्डीकर मंडळी तो उत्सव थाटानें करीत आली व यंदाचा उत्सव तर त्यांनीं फारच थाटानें साजरा केला. महाराज समाधिस्थ होण्यापूर्वी थोडीं वर्षेच या उत्सवास सुरवात झाली होती. जन्मकाल रात्रीं असल्यामुळें, गोकुळ अष्टमीची रात्र जर महाराजांच्या चावडीच्या दिवशीं आली तरच कृष्णजन्म त्यांचे समोर चावडींत केला जात असे. महाराजज्या रात्रीं मशिदींत असत त्या रात्रीं कांहीं ठराविक मंडळीशिवाय इतरांचा जाण्याचा परिपाठ नसल्यामुळें व त्यारात्रीं मशिदींत वाद्यें वगैरे वाजविण्याचा रिवाज नसल्यामुळें, तेथें कृष्ण जन्मोत्सव साजरा करणें शक्य नव्हतें.

विशेषें करून या उत्सवात, पूर्वीपासूनच सप्ताह, भजनी दिंड्या व मोठा भंडारा इकडेंच ज्यास्ती लक्ष दिलें जात असे. त्या प्रमाणें यंदाचें सालींही ठिकठिकाणच्या भजनी दिंड्यांना निमंत्रणें पाठवून दिंड्या बोलावल्या होत्या. व खालीलप्रमाणें निरनिराळ्या गांवच्या दिंड्या समारंभास आल्या होत्या. नाऊर, नांदुर, सावखेडें, गोंडगांव, वीरगांव, पढेगांव, लाडगांव, पुरणगाव, अंदरसोल, कोकमठाण, धोतरें, लाख, मातुळठाण, पुणतांबे, नारायणपुर, पिंपळवाडी, शिंगवें, भेरडापुर, खुरसानगांव, पाथरें, मांजरी, राहातें, व चिंचपुरी ही सर्व गांवे शिर्डीच्या आसपासचीं आहेत. या लहानशा गांवातून गांवकरी लोकांची भजनी मंडळीची दिंडी असून उत्सवाचे प्रसंगीं आजूबाजूचें गावांतून निमंत्रण आल्यास तेथें जाऊन उल्हासानें उत्सवांत भाग घेऊन तो ते साजरा करितात. याची शहरवासी लोकांना फारच थोडी कल्पना असेल. बहुतेक ठिकाणीं दिंडी बरोबर वारकरी संप्रदायाचें कीर्तन करणारे हरिदास असतात व त्यांची कीर्तनेंही फार चांगलीं होतात. या कीर्तनकारांचें तुकाराम महाराजांचे अभंग, ज्ञानेश्वरी एकनाथी भागवत या ग्रंथांचें पाठांतर वाखाणण्यासारखें असतें, व अभंगाच्या अनुरोधानें भक्ति

मार्गांचा प्रसार करण्याकडे यांचा सर्व भर असतो. यंदाचे उत्सवास ह. भ.प. मारुतिबुवा राहतेकर, बाबुराव बुवा औरंगाबादकर, व्यंकट स्वामी पुणेकर, आप्पाजी बुवा मातुळठाणकर, गंगाराम बुवा, नानासाहेब कोकमठाणचे महाजन बुवा, पिंपळवाडीचे भिमाजी बुवा सुतार व भिकचंद बुवा यानीं हजर राहून आठही दिवस सकाळ संध्याकाळ कीर्तनें करून उत्सवाला फार शोभा आणली होती. उत्सवास खालील प्रमाणें प्रमुख मंडळी मुद्दाम आली होती. आण्णाजी पाटील, नारायण पुरकर, नारायण पाटील मातुळठाणकर, बाळाजी पाटील, गोंडेगावकर, त्रिंबक पाटील लोणीकर, रावसाहेब कृष्णराव शिंदे वारीकर, गंगागीर महाराजांचे शिष्य एकनाथबुवा वांजरगांवकर, चांगदेव महाराजांचे वंशज यमाजी पाटील शिंगवेकर.

सप्त्याची सुरुवात मंगळवार श्रावण वद्य द्वितीयेपासून करण्याचें ठरलें होतें. सोमवार रात्रींपर्यंत ज्या दिंडया येऊन पोंहोंचल्या होत्या त्यांचा अदमास पाहून सप्त्याची वाटणी खालील प्रमाणें केली होती:—

| दिवसाचा व रात्रीचा प्रहर | दिंडया. |
| --- | --- |
| १ ला प्रहर | नाऊर, नांदुर, सावखेडें |
| २ रा प्रहर | गोंडेगांव, वीरगांव, पढेगांव, लाडगांव. |
| ३ रा प्रहर | धोतरे, लाख. |
| ४ था प्रहर | मातुळठाण, पुणतांबे, नारायणपुर, पुरणगांव, अंदरसोल, कोकमठाण. |

ज्या मंडळींकडे दिवसाचा जो प्रहर होता त्यांचेकडे रात्रीचा तोच प्रहर दिला होता. मंडळीचा जमाव बराच मोठा असल्यामुळें समाधी पुढील सभामंडप अपुरा होता म्हणून सप्ताह मशिदीपुढील सभामंडपांत उभा केला होता. सप्त्याची सुरुवात मंगळवारीं सकाळीं सूर्योदयाबरोबर झाली. व तेव्हांपासून समाप्तीपर्यंत आठी प्रहर सारखा निदान २५ तरी टाळ पडत असे. या प्रमाणें सारखा नामाचा व भजनाचा गजर ७ दिवस

अखंड चालू होता. कित्येक वेळां तर येवढा मोठा जमाव जमत असे की भजनाचा गजर रात्रीचे शांत वेळीं अर्ध्या मैलावर ऐकूं येत असे. वरील सात दिवसांत शिर्डी माझें पंढरपूर । साई बाबा रमावर ॥ या दासगणु महाराजकृत अभंगाची साक्ष सर्वास तंतोतंत पटली. आषाढी कार्तिकीला पंढरपूर जसें गर्जत असतें त्याच प्रमाणें भजनाचा गजर शिरडीस चालू होता. पंढरपुरास चंद्रभागेचें वाळवंटांत जशी वारकरी संप्रदायी लोकांची कीर्तनें होतात तशींच शिरडीस समाधिगृहा पुढील पटांगणांत सकाळ संध्याकाळ कीर्तनें चालू होतीं व श्रोतृवृंदांचीं अंतःकरणें भक्तिरसानें उचंबळत होतीं.

सोमवारीं अष्टमीचें रात्रीं जन्माचें कीर्तन समाधी पुढें करणें अवश्य असल्यामुळें त्याप्रमाणें तें समाधी पुढील सभामंडपांत ह. भ. प. आप्पाजी बुवा मातुळठणकर यांनीं केलें व कृष्णनामाचे घोषांत कृष्णजन्म केला. अर्थात् सभामंडपांत फारच थोडया मंडळीचा समावेश होणें शक्य होतें म्हणून समाधिमंदिरा पुढील पटांगणांत दुसरें कीर्तन उभें करण्याचें ठरलें व तेथें ह. भ. प. मारुतीबुवा यांचें तीन तास सुश्राव्य कीर्तन झालें.

दुसरें दिवशीं म्हणजे मंगळवारीं नवमीचे सकाळीं सूर्योदयाला सप्ताची समाप्ती झाली व त्याच संध्याकाळीं गोपाळकाला झाला. रात्रीं रथाची मिरवणूक निघाली ती सावकाश मिरवित मिरवित पहाटे चार वाजतां परत आली.

उत्सवा प्रीत्यर्थ आलेल्या सर्व मंडळींचा रोजचा भोजन खर्च गांवकरी मंडळींनीं आपआपसांत वांटून घेतला होता. सोमवार श्रावण वद्य १ च्या संध्याकाळ पासून निमंत्रित मंडळी येऊं लागली. सोमवार रात्रीचा खर्च तात्या पाटलांनीं संभाळला. मंगळवारचा सर्व खर्च बाळा बापु जगताप यांनीं संभाळला. बुधवारचा खर्च रा. बळवंतराव पुणेकर यांनीं घेतला होता. गुरुवारचा सर्व खर्च सखाराम महादु कोते यांनीं संभाळला. शुक्रवारचा मगनीराम नंदराम मारवाडी यांनीं संभाळला. शनिवारचा नारायण गणपत शेळके यांनीं संभाळला. रविवारचा राहत्याचे धनराज व

दीपचंद मारवाडी यांनी सांभाळला. सोमवारच्या खर्चासाठीं रा. बापुराव पुणेकर यांनी एक उक्ती रकम दिली आणि त्याशिवाय लागणारा खर्च तात्या पाटलानीं केला.

मंगळवारीं सार्वजनिक भंडारा झाला. उत्सवाचें सुरुवातीपासून प्रति दिवशी मंडळींचा जमाव वाढतच गेला. पहिल्या दिवशीं सुमारें २५० पान जेवून उठलें. दुसरे दिवशीं ३५०, तिसरे दिवशी ६००, चौथे दिवशीं ९००, पांचवे दिवशीं १२००, सहावे व सातवे दिवशी ३००० या प्रमाणें रोज पानें वाढत जाऊन अन्न संतर्पण चालू होतें. शेवटच्या दिवशीं भंडाऱ्याला तर सुमारें १२००० पान जेवून उठलें. भंडाऱ्याचा प्रसाद घेण्याचें मुक्तद्वार ठेवलें होतें व जात गोताचा कांहीं विचार न ठेवतां जो येईल त्याला जेवण घालण्यांत आलें. भंडाऱ्याकरितां निरनिराळ्या भक्तांकडून द्रव्याच्या किंवा धान्याच्या रूपानें मदत आली त्याचा सविस्तर उल्लेख हिशोबांत येईल व तो योग्य वेळीं छापला जाईल. सारांश महाराजांचे कृपेनें उत्सव करणाऱ्या मंडळीनें स्वतः पुष्कळ झीज सोसून व अंगमेहनत करून हा उत्सव मोठ्या थाटानें साजरा केला हें लिहिण्यास आम्हांस फार आनंद होतो.

## श्री साईनाथ पद्यावळीः—

(सौ० रंगूबाई विरचित पद नं० १)

साईनाथ मना स्मर दिन रजनी ॥ धृ० ॥

वास जयांचा शिरडी ग्रामीं ॥ परंतु असती स्थिरचर व्यापुनी ॥ अनुभव घ्यावा अपुलाले मनीं ॥ जय जय जय साईनाथ मना स्मर दिन रजनी ॥ १ ॥ रूप तयांचें येतां ध्यानीं ॥ मन हें येई कितितरी दाटुनी ॥ चरण धरावे धांवत जाउनी ॥ जय जय जय० ॥२॥ पातक नाशक नाम जयाचें ॥ ध्यातां गातां आवडी साचें ॥ चुकतील फेरे चौऱ्यायशींचे ॥ जय जय जय० ॥३॥

(सौ० कृष्णाबाई हिनें रचिलेलें पद नं० २)

साई नमितें तव पायां ॥ येऊंद्या आमुची दया ॥धृ०॥ करुनी कृपेची छाया ॥ आम्हां तारी तारी प्रभुराया ॥ चाल ॥ सुखकर तव पदरजसेवाया पदरीं झडकरि घ्या दीना या ॥ नच अव्हेर करी गुरुराया ॥ स्तवितें स्तवितें तव पायां ॥ येऊंद्या आमुची दया ॥१॥ अनंत नामें तव गाया ॥ मति दे मला प्रभुराया ॥ चाल॥ जगदोद्धारक साई गुरुराया ॥ अगम्य महिमा तव ऐकुनिया ॥ हृदय हें गेलें ओथंबुनिया ॥ नेई नेई तव पाया ॥ येऊंद्या आमुची दया ॥२॥

(दास गणु छात्र दामूअण्णा यानीं रचिलेलें पद नं० ३)

जगीं नाहीं तुजविण कोणी जगपाला साईरे ॥ मत्तापा वारीरे ॥ भवभय पाशा तोडीरे ॥ जगीं नाहीं० ॥१॥ भव सागरीं मी ही नौका नावाडी तूंचि रे ॥ काळजी वाहीरे मम नौकाही तारीरे ॥ गणु छात्राचा रुसवारे ॥ धरिसी मनीं तूं जरी थोडारे ॥ जबरी करुनि तव धरिन चरण ममहरण करिन दुरिता सारे ॥ जगीं० ॥२॥

(२६)

यांच्यास आदम नांवाचा गृहस्थ घरांच्या दलालीचें काम करीत असतो. एका कामांत त्याचेंवर व दुसरे दोघांवर फौजदारी खटला झाला. व खटला सेशनकमीट होणार असा रंग दिसूं लागला. आदम अतिशय घाबरला व गोंधळून गेला. ज्या दिवशीं म्याजिस्ट्रेटपुढें निकाल व्हावयाचा होता त्या दिवशीं सकाळीं तो तेंडूलकरांचेकडे गेला व महाराजांचे तसबिरीसमोर जाऊन म्हणाला "बाबा तुम्ही माझ्याकडे पाहून हसत आहात. मी चारसहा महिने तुरूंगांत गेलों तरी तुम्हांला सोडणार नाहीं. मी जाणार असें मला खास दिसतें पण मी खरोखर निरपराधी आहे हें तुम्हाला ठाऊक आहे. तुम्ही मला सोडविलें पाहिजे." तो तेंडूलकरांचे व सौ. सावित्रीबाईंचे पायां पडला व बराच रडला. नंतर थोड्याच वेळानें सावित्रीबाईंची व आदमची गांठ रस्त्यांत पडली. तेथें त्यानें बाईचे पाय धरिलें व म्हणूं लागला "बाबा मला सोडवतीलच असें तुम्ही म्हणा." व कांहीं केल्या पाय सोडीना. शेवटीं बाई म्हणाल्या "होय बाबा तुला सोडवतील." पुढें तो कोर्टांत गेला. महाराजांनीं त्याची लाज राखली. बाकींच्या आरोपीना माजिस्ट्रेटनीं अपराधी ठरविलें व आदमला सोडून दिलें. अर्थात् त्याला अति आनंद झाला. पुन्हां तसबिरीकडे गेला व तसबिरीचे व सर्वांचे पायां पडला. संध्याकाळीं त्याचे घरीं एक म्हातारा अनोळखी फकीर आला. तो त्याला म्हणाला "चला आपण दुकानांत चहा पिऊं." फकीर 'बरें' म्हणाला व आदमनें जरा मागें पाहिलें व पुनः पहातो तों फकीर कोठें दिसेना. पुष्कळ शोधलें पण फकीराचा पत्ता लागला नाहीं. दुसरे दिवशीं तो शिर्डीस महाराजांचे दर्शनास निघून गेला.

(२७)

[illegible] नांवाचें एक पारशी गृहस्थ आहेत. ते एकदां महाराजांचे [illegible] गेले व नोकरी नाहीं, पैशाची अडचण आहे असें महाराजांजवळ [illegible] केलें. महाराज म्हणाले 'अल्ला अच्छा करदेगा.' ते परत आले [illegible] चांगली नोकरी मिळाली व [illegible]

स्थावर मिळकतीला फार चांगली किंमत आली व ती विकल्यामुळें त्यांना फार फायदा झाला.

( ३८ )

माझे एक मित्र गेल्या गुरुपौर्णिमेसाठीं शिर्डीस आले होते. त्यांनां महाराज देहधारी असतानां प्रत्यक्ष दर्शन घडलें नव्हतें. महाराजांची कीर्ति त्यांनीं ऐकिली होती. आणि महाराजांचे दर्शन घेण्याची त्यांची इच्छाही होती. पण दर्शनाचा योग जुळून आला नाहीं. पण गेल्या पुण्य तिथीचे सुमारास शिर्डीस येऊन महाराजांच्या समाधीचें दर्शन घेण्याची त्यांच्या मनाला अत्यंत ओढ लागली आणि त्याप्रमाणें ते तेथें आले. महाराजांचे कृपेनें ते महराजांच्या चरणीं चांगले रंगले आणि शक्य तितका काळ महाराजांचे उपासनेंत घालवूं लागले. त्यांची आनंदाची स्थिति वारं-वार बाहेर प्रगट हाते, फुटून निघते म्हटलें तरी चालेल. दोन महिन्यापूर्वी त्यांच्या मुलाकडून (हा मुलगा दूर प्रदेशीं नोकर आहे) आग्रहाचें बोलावणें आल्यावरून ते स्वतःची खुषी नसतानां तिकडे जावयाला निघाले. सुमारे पाउण हिस्सा प्रवास झाल्यानंतर ते एके ठिकाणीं मुक्कामास राहिले. तेथें महाराजांनीं असा दृष्टांत दिला कीं, सरकार स्वारी मोठ्या थाटानें निघाली आहे व त्या स्वारींत सामील होण्यासाठीं त्यांना एक स्वार बोल-वावयास आला. आणि ते त्याचेबरोबर गेले. असें स्वप्न पडल्यावर [illegible]ी पुढें जाण्याचा बेत रहित करून आपले घरीं परत फिरले व तेथून [illegible]रुपौर्णिमेच्या उत्सवासाठीं येथें आले आणि येथील महाराजांच्या रथाचे मिरवणुकींत सामील झाले. कांहीं दिवस येथें राहून ते कांहीं मंडळी बरोबर निरनिराळ्या क्षेत्रांचे दर्शन घेऊन आपल्या घरीं गेले ते आपल्या गांवीं पहाटे ४ वाजतां पोहचले. त्यांचें घर एका आवारांत आहे. त्या आवाराला एक गेट असून त्या गेटाला आंतून कडी होती. माझे [illegible] पहाटे सुमारे ४। वाजतां त्या गेटाजवळ पोहचले आणि [illegible] मारिल्या व गेटचे दारही ठोकलें पण त्यांची हांक किंवा [illegible] कोणालाहि ऐकूं गेलें नाहीं. इतक्यांत त्यांच्या घरांतील एका स्वप्नांत महाराज गेले आणि म्हणाले "निजलीस काय उठ ते

चटकन ती मुलगी जागी झाली आणि गेटावर जाऊन दार उघडून पहावे तों ते गृहस्थ महाराजांनीं स्वप्नांत सांगितल्याप्रमाणें खरोखरीच गेटा-पाशीं उभे होते.

( ३९ )

एकदां मी शिर्डीस जातेवेळीं मोरेश्वरराव प्रधान मला बोरीबंदरावर भेटावयास आले व सांताक्रुझला आपल्या घरीं गणपती बसवायचा काय हें महाराजांस विचारण्यास सांगितलें. मी त्याप्रमाणें शिर्डीस गेल्यावर महाराजांस विचारलें. महाराजांनीं "होय" म्हणून आज्ञा केली. मी आज्ञा कळविण्यासाठीं मोरेश्वररावास पत्र लिहिलें व महाराजांना विचारून तें त्याच दिवशीं पोष्टांत टाकलें. त्याच रात्रीं पहाटेच्या सुमारास सांताक्रुझ येथें मोरेश्वररावांची मेहुणी तातीबाई इला स्वप्न पडलें व त्यांत एका ... ांत अतिसुंदर गणपतीची मूर्ति बसलेली तिला दिसली. तिनें तें स्व... काळीं उठल्यावर घरांत सांगितलें व दुसरे दिवशीं महा-राजांच्या ... ं पत्र येऊन पोहोंचलें. अर्थात् स्वप्नद्वारा महाराजांनीं अगाऊच स... दिली.

( ४० )

महार... भक्त मेघा नांवाचा होता तो रोज दुपारची आरती करीत असे. ... र्व देवांच्या पूजा करून मग महाराजांकडे जात असे. एक दिवस ... वाची पूजा करीत असतांना त्याला दरवाजा उघडेना. मग उशीर ... ता म्हणून ती पूजा तशीच टाकून तो महाराजांकडे गेला. महा... ाले "अजून सगळ्या देवांची पूजा झाली नाहीं. एकाची राहि... . ती करून मग येथें ये." तो म्हणाला "दार बंद होतें म्हणून ... ालों." महाराज म्हणाले "जा दार उघडें आहे" मग त्या प्रमाणें त... ी दार उघडें होतें. मग त्यानें यथासांग पूजा केली व मग महारा... ला. महाराजांनीं मग त्याला पूजा करूं दिली.

( ४१ )

माझे ए... क दिवस माझे ऑफिसांत आले व म्हणूं लागले "आज आठ ... ा झोंप येत नाहीं. डाक्तराचें औषध घेत असतों

पण कांहीं उपयोग होत नाही" मी त्यांना महाराजांची उदी दिली व ती तीन दिवस घेण्यास सांगितली. दुसरे दिवशी ते माझे आफिसांत आले व म्हणूं लागले "काल रात्रीं मी उदी घेतली व मला रात्रभर फार उत्तम झोंप लागली."

तसेंच वांद्रें येथें राहण्याऱ्या माझ्या एका स्नेह्याच्या मुलाला दोन महिने झोंप येत नव्हती. त्याला त्याच्या बापानें शिर्डीस महाराजांचे दर्शनास नेलें. त्याच रात्रीं त्याला झोंप आली. तेव्हां पासून रोज रात्रीं झोंप येऊं लागली.

(४२)

गेल्या गुरुपौर्णिमेला मी महाराजांची पूजा केली. त्यांत एक व्यंग राहिलें होतें तें माझ्या लक्षांत आलें नाहीं. अशा प्रसंगाची पूजा यथासांग झाली पाहिजे. दक्षिणा दिली पण विडा देण्याचा राहि[illegible] विडा देण्याची माझी वहिवाट नसल्यामुळें माझ्या लक्षांत आ[illegible]हीं. तिस[illegible] प्रहरीं महाराजांनी मला बोलाविलें व दोन चार विडे क आणावयास सांगितलें. मी त्याप्रमाणें विडे करून नेले व महाराजां[illegible]ले. महाराजांनी तावडतोब एक विडा तसाच न कुटतां खाल्ला. [illegible] तऱ्हेनें महाराजांनी माझी पूजा सांग करून घेतली.

(४३)

एकदां शिर्डीस असतांना रात्री जेऊं नये असें [illegible] येऊं लागलें.
त्याप्रमाणें घरांत मी सांगितलें कीं उद्यापासून रा[illegible] [illegible]चें नाहीं.
दुसरे दिवशीं दुपारीं महाराजाजवळ वसलों असत[illegible] [illegible]ज म्हणाले
"आज रात्रीं जेवायला काय करावयाचें ?" मी म्ह[illegible] [illegible]पण म्हणाल
तें." महाराज म्हणाले "नेहमी प्रमाणेंच भात पो[illegible] [illegible]." मी विचा-
रलें आपल्याला नैवेद्य आणू का ?" महाराज म्हणा[illegible] तेथेंच करून
खा.' रात्रीं जेवतांना घरांतल्या मंडळींनीं आदल[illegible] [illegible]च्या ठरावाची
आठवण दिली. तेव्हां मी म्हटलें "उद्यांपासून रात्र[illegible] [illegible] नाहीं." दुसरे
दिवशीं पुन्हा महाराजांनी रात्रीच्या जेवणाबद्दल [illegible] तेव्हां मनाची

[illegible] इ. स. १९१८ च्या.

खात्री झाली की रात्रीचें जेवण बंद न करण्याविषयी ही आज्ञा आहे व त्या प्रमाणें तें चालू ठेवलें. मग महाराजांनी पुन्हा विचारलें नाहीं.

( ४४ )

मुंबईचे एक गृहस्थ श्रीसद्गुरु साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डीस गेले होते. परंतु बाबांनी त्यांचेपाशी दक्षणा वगैरे कांहीं न मागतां त्यांना जाण्याची परवानगी दिली, वाड्यांत आल्यावर त्या गृहस्थाचे मनांत बाबांनी आपणापाशी दक्षणा मागितली नाही अशी कल्पना उभी राहून त्यांना थोडेंसें वाईट वाटलें. लगेच थोडे वेळानें बाबांनी अमुक अमुक मनुष्याला बोलावून आण अशी जवळच्या एका मनुष्याला आज्ञा केली. त्याप्रमाणें ते गृहस्थ पुन: मशीदींत गेले व बाबांनी त्यांचे कडून दक्षणा मागून घेतली. अर्थात् त्यामुळें त्यांचे मनाची हुरहुर निघून गेली.

( ४५ )

अंजनळचे मथुरादास महाराजांचे दर्शनास वारंवार येत. ते सगुण नांवाच खाणावळवाला आहे, त्याचेकडे उतरत. एकदां ते व सगुण बोलत बसले असतां कांही लोकांच्या उखाळ्या पाखाळ्या निघाल्या. त्यानंतर मथुरादास महाराजांकडे गेले. ते बसल्यानंतर लगेच महाराजांनी विचारिलें. "सगुण काय म्हणत होता ?" अर्थात् मथुरादास लाजले व मनांत समजले कीं सगुणकडे चाललें होतें तें महाराजांस पसंत नाहीं. कोणाच्या उखाळ्या पाखाळ्या काढणें किंवा त्या ऐकणें चांगलें नव्हे, हा धडा मथुरादासांनी घेतला.

( ४६ )

बाबासाहेब तर्खड एखदां शिर्डीस गेलें, असतां दोन प्रहरीं श्रीसद्-गुरू साईबाबांनी बाबासाहेबांना वाड्यांत पोथी ऐकावयाला जाण्याची आज्ञा केली. ते दिवशीं पोथीचा विषय ध्रुवाख्यान हा होता; व त्या मध्यें परमेश्वराच्या निर्गुण व निराकार स्वरूपाचें वर्णन होतें. बाबासाहेब पोथी आटोपल्यावर बाबांच्याकडे गेले, व म्हणाले " बाबा, मला दीड वर्षांनी आणलेंत, मला आपल्या चरणापाशीच ठेवा." तेव्हां "मी तुझ्यापाशीच आहे असें बाबा म्हणाले."

## आळंदीचे पद्मनाभेंद्रस्वामी यांचे पत्रांतील उतारा.

चिरायु श्रीमंत रा. रा. नामदार हरि सिताराम दीक्षित मुक्काम मुंबई यांसी शुभचिंतक श्रीपद्मनाभेंद्र स्वामी संस्थान मठ आळंदी आशिर्वाद उपरी विशेष श्री कृपें आनंदी आनंद आहे. आपला निरोप घेऊन शिरडीहून ता. २९. जानेवारी गुरुवारीं निघालों ते आळंदीस आलों. ता. २ फेब्रुवारी श्री गुरु महाराजांची पुण्य तिथि करून दुसरे दिवशीं मंगळवारीं मुंबईस गेलों. तेथें डाक्तर अंडरवुड यांस कानाचे मागचे बाजूची सूज दाखविली. ऑपरेशनची जरूरी नाहीं असें त्यांनीं सांगितलें व एक प्रकारच्या सिरमची पिचकारी त्यांनीं घातली व एवढयानें सर्व काम भागेल असें सांगितलें. श्री साई महाराजांच्या तेजाचा व वाणीचा इतका विलक्षण प्रभाव आहे कीं तो मनाला सुद्धां कल्पना करितां येत नाहीं. मी केवळ श्रीच्या दर्शनाला आलों होतों. दर्शन घेऊन फार अत्यंत समाधान झालें. मला तेथें पुष्कळ मंडळी सांगत होती कीं श्रीच्या कानावर आपल्या अजारीपणाची हकीगत घाला. परंतु मला अंतःकरणापासून तसें करावेंसें वाटत नव्हतें. कारण "प्रारब्ध कर्मणां भोगादेव क्षयः" अशी श्रुती आहे. परंतु अखेर बापू माधवराव देशपांडे यांस श्रीच्या कानावर गोष्ट घालण्यास सांगितली याप्रमाणें त्यांनीं गोष्ट काढतांच "अल्ला सब अच्छा करेगा." असे श्रीचे मुखांतून पूर्ण प्रेमोद्गार निघाले त्या क्षणापासून माझी कपाळाची व्यथा दूर झाली. नागपूरच्या डाक्तरांनीं व आळंदीच्या डाक्तरांनीं ऑपरेशन करून घेतलें पाहिजे असें सांगितलें होतें. परंतु मुंबईच्या डाक्तरानें ऑपरेशन न करितां सिरमचें इंजेक्शन घातलें त्या बरोबर पुढें सूज उतरून सर्व दुखणें गेलें. सर्व झालेल्या गोष्टीचें स्मरण होऊन पुन्हा पुन्हा आश्चर्य वाटतें. पहिल्या दिवशींच्या गांठींत त्यांनीं माझे जवळ पैसे मागितले. मी म्हटलें महाराज मी संन्यासी माझे जवळ पैसे कोठून असणार ? मी दर्शन घेऊन आल्यानंतर देशपांडे यांचेजवळ म्हणत होते कीं स्वामी मला कांहीं देतात का पाहिलें. परंतु ते कांहीं देणार नाहींत. ते माझेकडे आले आहेत तेव्हां

मलाच त्यांना दिलें पाहिजे. त्या प्रमाणें श्रीमुखांतून उद्गार निघताच क्लेशापासून मुक्त झालो. काय असल्या सिद्ध पुरुषांची महती वर्णन करावी ? ते मनुष्यरूपी श्रीनारायण आहेत.

रा. रा. मंगेश शिवाजी सावंत राहणार बाग तळवाडे ता. देवगड जि. रत्नागिरी यांचे पत्र गो. र. दाभोळकर यांस ता. १।१०।२२ चें आलें त्यांतील उतारा:—"सुमारें चार वर्षांत मी श्रीसमर्थ साईबाबांच्या फोटोची पूजा करीत आहें. मीं सन १९१६ सालपासून अजारी असून डॉक्टर व वैद्य यांनां हजारों रुपये खर्च केले. मला गूण वाटला नाहीं. नंतर सन १९१९ सालांत समर्थांचा फोटो आणून पूजा करण्यास सुरवात केली. त्या नंतर मला आजपावेतों साधारण बरें वाटलें आहे, म्हणजे हिंडून फिरुन घरचा व्यवहार पाहण्याची ताकत आहे. आतां म[illegible] समार्थ, दर्शनास येण्याची फार इच्छा आहे. तरी महाराज यांचे अ[illegible] लकरच नेतील अशी त्यांच्या चरणीं आशा करितों.

[illegible]ाला त[illegible]

[illegible]ा पूजा करण्यास लागल्यावर माझा सर्वसाधारण असा [illegible]णताही व्यापार धंदा अथवा महत्वाचें काम करणें [illegible]ईसाचीं [illegible]ना चिठया घालून त्यांच्या आज्ञेप्रमाणें करावयाचें. [illegible]ालें [illegible] आहे. गेल्या वर्षी धंद्याच्या हंगामी सुरुवातीस सम[illegible]या कीं ज्या व्यापाऱ्यांसीं मी आज पर्यंत धंदा करीत [illegible] करूं काय ? मला बाबांच्या कडून आज्ञा झाली कीं तूं [illegible] नको. परंतु फार दिवस त्या व्यापाऱ्यांशीं माझा [illegible] याच्या अतोनात आग्रहामुळें धंदा त्या व्यापाऱ्याशीं [illegible] नंतर केला धंद्यांत मला अतिशय अडचणी आल्या. [illegible] झाला. अखेर हिशोबाच्या वेळीं त्या व्यापाऱ्या[illegible] [illegible]ारांशें रुपये बाकी राहिली आहे. ही बाकी [illegible]ीं त्यानें ( त्या व्यापाऱ्यानें ) देण्याचें कबूल [illegible]ड्डु तारखेस रक्कम कोर्टांत भरावयाची होती, [illegible]तु रक्[illegible] हातीं आली नाहीं. ती वेळवर

अगदीं अडचणीचीच आली होती म्हणजे कोर्टांत रक्कम भरणें त्या ठिकाणी कांहीं सवन्न चालण्या सारखी नव्हती. अशा वेळीं मी महाराजांचा धांवा केला कीं, वेळ कठीण आहे तरी रक्कम हातीं आल्यावर मी आपली अवज्ञा करून वंदा केला त्याजबद्दल माफी करा. मी दंड रुपये ५ सांच शिर्डी संस्थेकडे पाठवीन. त्याप्रमाणें रक्कम हातीं आली नाहीं परंतु कोर्टानें मला रक्कम भरण्या करितां आणखी ६ महिन्याची मुदत दिली आहे.

माझ्या वरचा भयंकर प्रसंग टळला आतां त्या व्यापाऱ्याकडून रक्कम आली पाहिजे ती त्यांच्याच (बाबांच्या) कृपेनें येईल कारण त्यांनीं ज्या अर्थी मोठ्या प्रसंगातून बाहेर काढलें आहे त्या अर्थी सर्व कांहीं त्यांच्या कृपेनें चांगलें होईल. तशांत आपल्या सारख्या भक्त मंडळीचा आशिर्वाद पाहिजे. सध्यां मला शत्रू बरेच झाले असून माझ्या [illegible] धोका करूं पाहात आहेत. परंतु समर्थांच्या कृपेनें हा [illegible] वेळा टळत गेल्या आणखी पुढील प्रसंग टाळणारे तेच स[illegible]

माझ्या अंगीं थोडे अवगुण शेष राहिले आहेत [illegible] पूर्ण सद्बुद्धि आंगीं वसेल आणि समर्थांची प्रेरणा होऊ[illegible] र्थांच्या समाधीचें व आपणासारख्या सर्व भक्त मंडळ[illegible] अशी बाबांच्या व भक्त मंडळीच्या चरणीं प्रार्थना करितों. कृपा लोभ असावा.

ताजा कलम:—पत्रांत दर्शविल्याप्रमाणें दंडा[illegible] नावें मनीआर्डर करून पाठविले आहेत ते समर्थांचे उत्तरीं कळविणें:—"

महाराजांची ही बोधपद्धती इतकी मोहक असे की तिचा प्रत्यक्ष
ाभ घडण्यास पुरेसें भाग्यच पाहिजे. हा भाग्योदय होतांच अंतःकरणांत
काश पडलाच समजावें.

यासंबंधें एक लहान पण मौजेची कथा आहे ती वाचकांस सादर
रितों. या मासिक पुस्तकाच्या ८ व्या अंकांत 'महाराजांचे अनुभव' या
थळ्याखालीं ६४ वे पृष्ठावर नंबर ३४ खालीं प्रसिद्ध कीर्तनकार हरि-
क्त परायण माधवबुवा बडोदकर यांचा एक अनुभव प्रसिद्ध झाला
ाहे. त्यावेळीं त्यांनां जो दर्शनाचा योग आला त्याबद्दल आणखी असी
कीकत आहे कीं माधवबुवांचा संकल्प ही संताची भेट रा. रा. भाऊ-
हेब दीक्षित यांच्या समागमें व्हावी असा होता. पण संगमनेराहून
वतांना शिर्डीत भाऊसाहेब नसावेत असी त्यांची खात्री होती म्हणून
जे टांग्यांतून उतरले ते एकटेच दर्शनार्थ मशीदींत गेले. पण तेथें
ा व्याधींच भाऊसाहेब बाबांचेपाशीं बसलेले पाहून त्यास जो आनंद
स्थ साचें शब्दांनीं वर्णन करतां येणें अशक्य आहे.
वशीं
सस्वानसो पुढें माधवबुवा बाबांचे पायां पडून जवळ बसल्यावर परम-
वा भलक्षणें कायसीं बाबा आपल्यास सांगतील काय असें त्यांचे मनांत
त्पन्नमात्र तों "वाड्यांत जा व पोथीविथी वाच" म्हणून भाऊसाहेबांस
बांची आज्ञा झाली. भाऊसाहेब नमस्कार करून उठले त्यासरसे माधव-
ही आज्ञा घेऊन उठले. वाड्यांत जाऊन भाऊसाहेबांनीं पोथी (एक-
थी भागवत) वाचनास सुरवात केली इतर श्रोतेमंडळीबरोबर माधव-
ाही ऐकावयास बसले सांगावयाची गोष्ट ती इतकीच की भाऊसाहे-
चा पूर्वीचा कोणताही संकल्प नसतां अगर माधवबुवांनी बाबांस मनांतले
ांत केलेली प्रार्थना भाऊसाहेबांस आधीं कळविली नसूनही नित्य-
ानुसार आदले दिवशीं ज्या जागीं पोथीचा विषय संपविला होता.
ून पुढें वाचनास आरंभ जो झाला तोच अध्याय १८ मधील २७ वे
ोकापासून झाला आणि या भागवताच्या एकादशस्कंदाच्या या
यायाच्या २७ व्या पासून ३७ व्या श्लोकापर्यंतच्या एकनाथ महा-

राजांच्या टीकेंत हंस व परमहंसाचीं लक्षणें व धर्म यांचेंच सुश्राव्य विवेचन माधवबुवांस ऐकावयास मिळालें. तें ऐकून त्यांना बाबांबद्दल केवढें प्रेम उत्पन्न झालें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. साईबाबा स्वमुखानें प्रत्यक्ष उपदेश फारच क्वचित करीत. पण कोणत्याही सदिच्छेनें आलेल्या भक्ताची इच्छा अशा तऱ्हेचे योग आणून पुरविण्याचे कामीं त्यांचा हातखंडा होता. अशीं उदाहरणें व असे अनुभव पुष्कळांस आलेले आहेत.

सदर्हू माधवबुवा यांचा आणखी असा अनुभव आहे कीं यांस कोपरगांवास लवकर जाण्याची आज्ञा असून टांग्यातून निघावयास थोडा अवकाश लागला. आणि टांगा शिर्डी सोडून सुमारें एक मैल गेला असेल. माधवबुवा टांग्यांत मागले बाजूला बसले होते आणि एकाएकीं पाऊस धूमधार सुरू झाला. बुवांचे अंगांतले कपडे बहुतेक भिजले व आतां अजून १० मैल रस्ता छाटावयाचा तो सुखानें कसा छाटला जातो मोठी काळजी उत्पन्न झाली. तेव्हां "बाबा आतां मला जसें सुखानें दर्शनास आणलेंत तसेंच मला सुखरूपपणें घरीं नेऊन घाला" व मोठ्या आनंदानें व भक्तिभावानें बुवांनी प्रार्थना केली. आणि व सर्व प्रवासांत पाऊस तर पडतच होता पण नवल हें कीं बुवांचे वस्त्रांवर किंवा अंगावर ते स्टेशनवर पोंहचून आगगाडींत बसेपर्यंत पाण्याचा एक थेंबही पडला नाहीं! असी बाबांची लीला अगाध आहे.

## पुण्यतिथी उत्सव.

दरसाल प्रमाणें यंदाही गेल्या विजया दशमीचे दिवशीं महाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव श्री क्षेत्र शीरडी येथें थाटानें झाला. उत्सवाकरितां रा. भाऊसाहेब दीक्षित, अण्णासाहेब दाभोळकर, ज्योतींद्र रामचंद्र तर्खड, (सहकुटुंब) रघुवीर भास्कर पुरंदरे, लक्ष्मण गणेश महाजनी, हरिराम बुवा, बाबुलजी शा. वैद्य, दादाजी जीवन पाटील (सहकुटुंब) पुण्याचे अप्पासाहेब गाडगीळ ब्यारीस्टर (सहकुटुंब) व खांडव्याचे पुरुषोत्तम राय इतकीच भक्त मंडळी आली होती.--

महाराजांचें भक्तमंडळ सहस्त्रसंख्येनें मोजण्यासारखें आहे असें असून, पुण्यतिथीसारख्या महोत्सवाचे समारंभास १०।१५ मंडळी जमावी ही स्थिती फार निराशाजनक आहे. सत्पुरुषांनीं समाधि घेतल्यावर त्यांचा खरा उत्सव व स्मृतिदिन म्हणजे पुण्यतिथी. पूर्वकालीन कोणत्याही समाधिस्थ सत्पुरुषाची पुण्यतिथी पाहिली तर त्यांचे बहुतेक शिष्य व भक्त त्या दिवशीं समाधिस्थानीं हजर राहून तो उत्सव साजरा करतात. श्री रामदासस्वामींचा काल होऊन आज कांहीं शतकें झालीं त्यांचे वेळचे शिष्य किंवा भक्त सध्यां हयात नसून त्यांची परंपरा चालवणारे हजारो रामदासी अद्यापही सज्जनगडावर जमून पुण्यतिथीचा उत्सव करतात. आपल्या श्री साईनाथ महाराजांचा काल होऊन फक्त काय तीं पांचच वर्षें झालीं. इतक्या थोड्या अवधींत त्यांच्या भक्त मंडळांत अशा तऱ्हेची शिथिलता उत्पन्न व्हावी ही स्थिति फारच शोचनीय आहे. ज्या विभूतीनें आपल्या भक्तांकरिता, आपल्या भक्तांचे कल्याण करण्यांत आपला देह कष्टविला, त्या विभूतीच्या स्मरणार्थ वर्षांतून एक दिवस त्यांच्या पुण्यतिथीचे दिवशीं थोडीशी गैरसोय सोसून, भक्त मंडळींनीं शीरडीस येऊं नये ही गोष्ट त्यांचे भक्त म्हणविणाऱ्यांला फार कमीपणा आणणारी नव्हे काय? पुण्यतिथीला हजर राहणें यांत महत्पुण्य आहे. पूर्व परंपरा पाहिल्यास गुरू ब्रह्मीभूत झाल्यावर त्यांची सेवा करण्याचा हा एकच मार्ग आहे. वर्षभर बरोबर प्रत्येकजण आपआपली आराधना करतोच आहे परंतु त्याची पूर्तता

करण्याकरितां व सद्गुरूंचा आशीर्वाद गृहण करण्याकरितां पुण्यतिथीला त्यांचे समाधिस्थानींच आलें पाहिजे. पुण्यतिथीचे दिवशीं होणाऱ्या आराधन विधींत तीर्थ राजाची पूजा होते त्यांतील तीर्थाचें सेवन करणें हें पुण्यतिथीला हजर राहिलें तरच साध्य आहे. तीर्थ महिमा काय आहे हें निदान हिंदु समाजाला तरी फोडून सांगण्याची अवश्यकता नाहीं.

पुण्यतिथीप्रीत्यर्थ शक्त्यनुसार दक्षिणा पाठविणें व प्रसाद मागवून तो ग्रहण करणें येवढेंच केलें म्हणजे आपण आपल्या गुरुऋणांतून मुक्त झालों इतकी मनाची आकुंचित भावना ठेवणें परमार्थदृष्ट्या बिलकुल श्रेयस्कर नाहीं. हा मार्ग पर्यायरूपी अपरिहार्य अडचणीचे वेळचा आहे.

आतां ही गोष्ट खरी कीं शिर्डीस महाराजांचें वेळचे दुसरे उत्सव अद्याप चालू आहेत व त्यामुळें कोणत्यांना कोणत्या तरी एका उत्सवाला कित्येक भक्त मंडळी सवडीप्रमाणें जाऊन समाधीचें दर्शन घेतात. परंतु गुरूची पुण्यतिथी हा उत्सव सर्वांत प्रमुख मानलेला आहे. सवड असेल त्यांनीं इतर उत्सवाला तर हजर राहवेंच; परंतु तितक्यामुळें आपण आपल्या मुख्य कर्तव्यांतून पार पडलों असें खोटें समाधान मानून पुण्यतिथीसारखा महत्वाचा दिवस टाळूं नये.

महाराजांनीं समाधि विजयादशमीसारख्या साडेतीन शुभ मुहुर्तांतील एका मुहुर्तावर घेतली. हा विजया दशमीचा दिवस कित्येकांच्या आड येत असेल ही गोष्ट आम्हाला माहीत आहे. बहुतेकांच्या घरांत नवरात्र असतें व तो कुळाचारही पाळला पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. पण इतर व्यावहारिक कार्याचे वेळीं जर आपण नवरात्र धाकट्या भावावर किंवा मुलावर सोंपवितों तर आपल्या गुरुकरितां तें तसें दर वर्षी सोंपविण्यांत कोणताही प्रत्यवाय नाहीं. दुसरा हा सार्वजनिक सुट्टीचा दिवस आहे त्यामुळें रजेची अडचणही नौकरवर्गाला नाहीं. दसऱ्यासारख्या सणाला आपण घरीं असावें अशी साहजिक इच्छा प्रत्येकाला असणार, कारण त्या दिवशीं सीमोल्लंघन करावयाचें आप्ते-

नां सोनें वाटावयाचे वगैरे विधि असतात. परंतु हे विधि आतां औपचारिक राहिले आहेत. त्यांना इतकें महत्व नाहीं. ते गौण आहेत. काप जाऊन भोकाची नुसती भोकें उरलीं आहेत. दसऱ्यासारख्या शुभ मुहुर्तावर सीमोल्लंघन करून मुलुखगिरीवर जाण्याचे दिवस कधींच नष्ट झाले. सावें सीमोल्लंघन करावयाचें तें शीर्डीस करतां येतें. सारांश, महाराजांच्या सर्व भक्तांनां आमची हात जोडून कळकळीची विनंती आहे कीं, सर्व भक्तवृंदांनीं आपल्या अडचणी बाजूला सारून पुण्यतिथीच्या उत्सवाला शिर्डीस येऊन गुरुसेवेचें पुण्य पदरीं जोडीत जावें; असो.

यंदाच्या उत्सवाच्या कार्यक्रमाप्रमाणें विजयादशमीला सकाळीं सूर्योदयानंतर रा. ल. ग. महाजनी यांचें हस्तें समाधीवर रुद्राभिषेकाला सुरुवात झाली. लघुरुद्र सुमारें १०॥ वाजतां संपला नंतर सर्व भक्त मंडळींनी वाद्यांच्या गजरांत समाधीला अत्तर, सुगंधी तेलें वगैरे लाऊन नंतर गंगोदकयुक्त अभ्यंग स्नान घातलें. समाधि कोरडी करून सर्वांनी पूजा केली नंतर महापूजा होऊन महावस्त्रें ( गलेफ ) चढविण्यांत आले. १२ वाजतां समाधीपुढें ह. भ. प. मारुतिबुवा यांचे २ वाजेपर्यंत कीर्तन झालें, व नंतर दोन प्रहरची आरती झाली. महाराजांनीं दोनप्रहरीं सुमारें २ वाजून ३५ मिनिटांनीं देह ठेविला त्यामुळें तीच वेळ इष्ट काळ धरून त्यांच्या पुण्यतिथीचे दिवशीं आरंभीं होणारा आराधनविधि त्याचवेळीं सुरू करण्यांत आला. हा विधी कै. रा. रा. बळवंत सखाराम उर्फ बाळासाहेब भाटे यांचें हातानें होत असे, पण १९२१ मध्यें ते आजारी असल्यामुळें तो रा. भाऊसाहेब दीक्षीत यांनीं केला. गतवर्षीही दीक्षितांचे हातूनच झाला. यंदा रा. ल. ग. महाजनी यांचें हस्तें तो करण्यांत आला. हा आराधन विधि 'नागर खंडा' मध्यें सांगितला आहे.

या विधीप्रमाणें रोजचा नित्य नियम संपल्यावर चार ब्राम्हणांना क्षण देण्यांत आला. या चार ब्राह्मणांची योजना ( १ ) गुरु ( श्रीसाईनाथ महाराज ) स्थानीं ( २ ) परम गुरु ( महाराजांचे गुरु ) स्थानीं ( ३ ) परमेष्ठी गुरु ( ब्रह्मदेव ) स्थानीं व ( ४ ) परात्पर गुरु ( परमे-

श्वर) स्थानीं अशी विधीपूर्वक केली. या विधींत गुरूनां ब्रह्मीभूत न ह्मणतां "विश्वरूपधर असा जो आचार्य त्यांस" असा संकल्प करण्यांत आला. वरील ब्राम्हणांना स्थानापन्न केल्यानंतर त्यांचें पाद प्रक्षालन करून त्यांजकडून आचमन करवून पुरुष सूक्तानें त्यांचें पूजन केलें व

श्लोक

आनंदमानंदकरं प्रसन्नं ज्ञानस्वरूपं निजबोधरूपं ।
योगींद्रवंद्यं भवरोगवैद्यं श्रीमद्गुरुं नित्यमहं नमामि ॥ १ ॥

या श्लोकानें त्यांची प्रार्थना करण्यांत आली. नंतर मंडलें करून त्यांवर त्यांची पात्रें मांडून त्यांना पंचपक्वान्नाचें भोजन दिलें. विधींत सांगितल्याप्रमाणें त्यांचें भोजन चालू असतां रा. अण्णासाहेब दाभोळकरांनीं कठोपनिषदांतील पहिली, दुसरी व तिसरी वल्ली ह्मटली व रा. रा. कृ. ज्ञा० भीष्म यांचेकडून आलेलीं खालील २ पद्यें सुरावर गाइलीं.

गजल ताल.

साईनाथा तुझे पायीं ठेवितों दीन मी माथा ॥ ध्रु० ॥

गुणातीता निराकारा प्रभो देवा निर्विकारा ॥
नसुनि तुजला काज धरिसी मनुजरूपा दीनानाथा ॥ १ ॥

कर्म करणें अवश्यकता नसे तुजला गुरूराया ॥
जगदोद्धार तरी करिसी सुलभ सांगूनिया गाथा ॥ २ ॥

चतुर्विध हेतु धरूनीयां भक्त तुजला शरण येती ॥
सकल इच्छा पूर्ण करिसी वरद कर ठेवुनी माथा ॥ ३ ॥

सगुणरूपा धरूनि लीला किति करिसी नसे पार ॥
कृष्ण तव हा दास देवा कसा वर्णील तो आतां ॥ ४ ॥

## साईनाथांची साक्षरता

### पद.

वंजाराचे चालीवर.

तुज शांति हवी जरि कांहीं ॥ धरि साईनाथ पद हृदयीं ॥ ध्रु० ॥

तूं मानव जन्मा येसी ॥ नित पशु सम कर्म करिसी ॥ रे ॥
या देह सुखाचे विषयीं ॥ या देह० ॥ धरीसा० ॥ १ ॥

संसारीं सुख अति थोडें ॥ दुःखाचे डोंगर गाढे ॥ रे ॥
मरसी त्या डोंगर-पायीं ॥ मर० ॥ धरि० ॥ २ ॥

सद्भक्त हरी घाबरला ॥ दुःखान्वा पडतां घालारे ॥
तो शरण रिघाला साई ॥ तो श० ॥ धरि० ॥ ३ ॥

श्रीरामायण भावार्थ ॥ धरूनिया नाथ भक्तार्थ ॥ रे ॥
तूंवाच म्हणें हे कांहीं ॥ तूं वा० ॥ धरि० ॥ ४ ॥

पति करितां दुःखित तारा ॥ समजावी रघुकुल तारा ॥ रे ॥
हा बोध म्हणें तूं पाही ॥ हा बोध० ॥ धरि० ॥ ५ ॥

ऐसा हा सद्गुरू राणा ॥ नच स्वकिय भक्त करि दैना ॥ रे ॥
अनुभव हा कृष्णही पाही ॥ अनु० ॥ धरि० ॥ ६ ॥

ब्राह्मणांचें भोजन झाल्यावर त्यांना तांबूल दक्षिणा व वस्त्रें दिलीं. नंतर तीर्थराजाच्या पूजेस सुरवात झाली. सांगितलेल्या विधिप्रमाणें गोमयानें सारविलेल्या जमिनीवर चौरंग मांडून सभोंवतीं रांगोळ्या काढून चौरंगावर ठेवलेल्या धान्यावर पाण्यानें भरलेला कलश ठेवला. व तेथें गंगोदकाची भावना धरून तीर्थराजाची स्थापना केली, व पुरुषसूक्त मंत्रपूर्वक पूजा केली. त्यानंतर विधि करणारानें तो कलश मस्तकावर धारण करून ब्राह्मणांचा वेदसूक्तांतील मंत्रघोष चालू असतां अंगावर कलशांतील पाणी सांडेल अशा बेतानें नृत्य करावयाचें असतें, त्याप्रमाणें केलें व पुनः कलश पूर्वोक्त ठिकाणीं ठेविला. पुनः कलशाची पूजा व आरती करून ब्राह्मणांना प्रदक्षिणा घालून कलशामधील तीर्थ प्रथम ब्राह्मणांना दिलें व नंतर.

श्लोक.

अविद्यामूल शमनं सर्वपापप्रणाशनम् ॥
गुरु पादोदकं तीर्थं संसारद्रुमनाशनम् ॥ १ ॥

हा श्लोक म्हणून सर्व भक्तवृन्दांनी तीर्थ प्राशन केलें. शेवटीं सर्व कर्म ब्रह्मार्पण करून हा 'आराधन विधि' संपला व नंतर सर्व मंडळींनीं भोजन केलें. संध्याकाळीं पुराण झालें. रात्रीं रथाची मिरवणूक निघाली व ती परत आल्यावर शेजारती होऊन पहिल्या दिवसाचा कार्यक्रम संपला.

दुसरें दिवशीं दोनप्रहरीं ह. भ. प. जगन्नाथ बुवा यांचें निवृत्तीपर कीर्तन झालें. हे गृहस्थ महाराजांचे हयातींत कांहीं काळपर्यंत शिर्डीस राहिले होते व त्यांचेकडे मुख्य काम महाराजांच्या घोडयाचें असें. महाराजांचे पश्चात यांनीं शिरडी सोडली. व नंतर साधारण अज्ञातवासांतच राहून स्वतःची बरीच उन्नती करून घेतली आहे. याच दिवशीं भंडारा झाला सुमारे १५०० शें पात्र जेऊन उठलें. रात्रीं पालखीची मिरवणूक काढून ती मशिदींत नेली व तेथें ह. भ. प. पिंपळवाडीकर बुवांचें कीर्तन झालें व. नंतर महाराज निजत असत त्या ठिकाणीं चावडींत पालखी नेली व तेथें शेजारती झाली. तिसरे दिवशीं सकाळीं गोपाळकाला होऊन दहीहंडी फुटली व उत्सवाची समाप्ति झाली. हें काल्याचें कीर्तन ह० भ० परायण मारुतीबुवा यांनीं केलें व त्यांत श्रीकृष्णाच्या बाललीलांचे वर्णन, गोपाळांसमवेत टिपऱ्यांचे तऱ्हेतऱ्हेचे खेळ, फुगडया, रणघोडा वगैरे नाचांचें नाटय फार मोहक झालें. कीर्तन अगदीं प्रसंगास साजेसें व अति बोधप्रद आणि सुश्राव्य असें होऊन कथा चालत असल्यावेळीं श्रोतृवृंद आपले नित्यव्यवसाय विसरून जणु काय गोकुळांतील प्रेमरसांत व गोपगोपाळांचे समागमांत तल्लीन झाला होता असें दिसलें.

### इतर ठिकाणीं झालेले दुसरे पुण्यतिथी उत्सव.

मुंबई येथें चिखलवाडींत जावजी बिल्डिंगमध्यें श्री रा. दाजी विठ्ठल सांवारे वगैरे महाराजांची कांहीं भक्तमंडळी राहतात. ती पुण्यतिथीचे आदले दिवशीं

या मंडळींचें मनांत यंदा प्रथमच हा उत्सव सार्वजनिक स्वरूपाचा करण्याचें आलें. पूर्वतयारी कांहीं केली नव्हती तरी उत्सव थाटानें पार पडला. पुण्यतिथीचे दिवशीं सकाळीं ६ ते १० पर्यंत श्री साई महाराजांचें तसबिरीसमोर रा. विठ्ठल बाळकृष्ण कल्याणपुरकर यांचें भक्तिरसपरिप्लुत असें भजन झालें. यांची भजन करण्याची पद्धति फार प्रेमळ असल्यामुळें श्रोते मंडळी भजनांत प्रेमानें रंगून जातात. रात्रौ ९ वाजतां श्रीमती बनुबाई विठ्ठल मालवणकर या बाईचें सुश्राव्य कीर्तन झालें. कीर्तनाचीं आमंत्रणें पाठविलीं नसूनही कीर्तनास अतिशय गर्दी झाली होती. जागेच्या अभावीं कित्येकांना परत जावें लागलें. बाईंचा उत्तम अवाज व प्रासादिक वाणी यामुळें कीर्तनास विशेष रंग आला होता. त्यांत शेवटीं जेव्हां बाईनीं पायांत चाळ बांधून ॥ साईनाथ गुरु माझे आई। मजला ठाव द्यावा पायीं ॥ असें म्हणत नृत्य करून अर्धा तास भजन केलें, तेव्हां बाईतर देहभान विसरल्याच होत्या परंतु श्रोते मंडळीही पूर्ण तल्लीन होऊन गेली होती. श्रीमति बनुबाई या ब्रह्मीभूत बाळकृष्ण महाराज यांच्या शिष्या होत. बाळकृष्ण महाराज पूर्वाश्रमीं रॅली ब्रदर्समध्यें हेडक्लार्क होते. पुढें त्यांना उपरति होऊन ते निवृत्तिमार्गाकडे वळले. ते शिरडीस साईमहाराजांचे दर्शनास गेले होते. आपल्या गुरूंच्या आज्ञेप्रमाणें श्रीमति बनुबाई आज सुमारें एक वर्षभर कीर्तनें करीत असतात. महालक्ष्मीचें केशवानंद सरस्वती महाराज यांनीं या बाईंना कीर्तनाचें वेळीं घालण्यास एक कफनी दिली आहे व त्यांचाही त्यांना पूर्ण अशिर्वाद आहे.

दुसरा सर्वजनिक स्वरूपाचा उत्सव प्रिन्सेस स्ट्रीटवर कै रा. अमीदास मेहता यांच्या अनुयायी मंडळींनीं केला. रा. अमीदास मेहता यांची श्री साईनाथ महाराजांवर फार श्रद्धा असे. ते आपल्या हयातींत स्वतः जरी शिरडीस उत्सवाला जात असत तरी शिरडीस न जाऊं शकणाऱ्या आपल्या स्नेही मंडळीकरितां मुंबईत आपल्या जागेंत उत्सव करवीत असत. रा. अमीदासानी "सत्संग" या नांवाची एक संस्था स्थापून तिचे मार्फत गुजराथी भाषेंत महाराजांचें एक लहानसें चरित्र

प्रसिद्ध केलें होतें. यांची प्रकृति बरीच बिघडली तेव्हां अंतकाळ गुरुचरणाजवळ व्हावा म्हणून हे शिरडीस राहण्यास गेले व शेवटी त्यांनीं आपला देह गतवर्षी तेथेंच ठेविला. त्यांचे दहन केलेल्या जागेवर त्यांची अनुयायी मंडळी त्यांचे लहानसें स्मारक करणार आहेत.

वांद्रे येथील शिर्डीस न येणाऱ्या भक्तमंडळीनीं रा. रा. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचे बंगल्यांत विजयादशमीचे दिवशीं श्रीसाईबाबांचे पुण्यतिथी निमित्त उत्सव केला. ह्या दिवशीं सकाळीं १० ते २ वाजेपर्यंत महापूजा आरती महानैवद्य व भोजन वगैरे झाल्यानंतर दुपारी ३ ते ४ श्रीएकनाथी भागवताचें वाचन झालें व रात्रौ ९ ते १ वाजेपर्यंत ह.भ.प. वे.शा.सं. विष्णुबुवा निजामपुरकर यांचें सुश्राव्य कीर्तन झालें. कीर्तनास स्त्रीपुरुष मंडळी मिळून अदमासें १२५ हजर होती. कीर्तनाचा प्रतिपाद्य विषय पुण्यतिथीस साजेल असाच होता. त्यांतल्या त्यांत पूर्वनिरूपणांत खालील विषयांवर फारच मुद्देसूद व प्रमाणासह बुवांचे नेहमीचे हा[illegible] प्रमाणें विवेचन झालें:—

( १ ) श्रीसद्गुरूची जरूरी

( २ ) श्रीसद्गुरूची लक्षणें

( ३ ) सच्छिष्यांची सद्गुरूवर निष्ठा कशी असावी व

( ४ ) सच्छिष्याची लक्षणें.

पूर्वनिरूपणाचा विषय साधारण बहुजन समाजास [illegible]री शुष्क वाटतो [illegible]री बुवांचे मार्मिक, रसाळ व खुबीदार विवेचना[illegible]मुळें श्रोत्यांचें एवढें लक्ष लागून राहिलें होतें कीं पूर्वनिरूपणांत त[illegible]न तास केव्हां गेले हें समजलेंच नाहीं. कीर्तन आटपल्यावर प्रसाद[illegible] व काफी होऊन उत्सव समाप्त झाला.

इंदुरशहरीं रा. बाळासाहेब रेगे यांचे स[illegible] घरीं इंदुरांतील भक्त मंडळीनं पुण्यतिथीचा उत्सव केला. सात दिवस [illegible]जनी सप्ताह झाला व पुण्यतिथीचें दिवशीं महापूजा होऊन ब्राह्मणभ[illegible]जन झालें.

## आख्यान--रत्न--माला.

**अभिप्राय**—आख्यान रत्नमालेचे संग्राहक व प्रकाशक रा. रा. गणेश अनंत सराफ, नांदेड (निजाम स्टेट) यांनीं मालेचें पहिलें पुस्तक अभिप्रायाकरितां आमचेकडे पाठविलें आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

या पहिल्या पुस्तकाला दोन प्रस्तावना जोडल्या आहेत. एक स्वतः प्रकाशकांची "नारदाची गादी" व दुसरी उमरावतीच्या 'उदय' पत्राचे संपादक कविभूषण रा. रा. बळवंत गणेश खापर्डे यांची. पहिल्या प्रस्तावनेंत प्रकाशकांनीं आपलें हृद्गत वाचकांपुढें मोकळें केलें आहे. कीर्तन परंपरेला 'इतिहासाचें पाठबळ' आहे कीं नाहीं याबद्दल प्रस्तावनेंत प्रकाशकांनीं बऱ्याच मार्मिक रितीनें ऊहापोह केला आहे. परंतु आमच्या मतें ही परंपरा इतकी स्वयंसिद्ध आहे कीं तिला प्रोत्साहन देण्याकरितां इतिहासाचें पाठबळ असलें किंवा नसलें तरी दोन्हीं सारखीच आहेत. "हें असलें वाङ्मय भाषेच्या दृष्टीनें अशुद्ध असेल, त्याचें स्वरूप ऐतिहासिक नसेल तर त्याला जागच्याजागीं 'राम' ह्मणूं देणेंच इष्ट आहे" अशी अनुदारपणाची कल्पना बाळगणाऱ्या सद्गृहस्थांकडे पूर्ण दुर्लक्ष करणें हेंच त्यांना योग्य पारितोषिक होईल.

आपली कीर्तनसंस्था फार जुनी आहे. पूर्वकालीं ज्या वेळीं वाङ्मयाचा हल्लींसारखा प्रचार झालेला नव्हता, त्याकालीं आपल्या धर्माची ज्योत सदैव जागृत ठेवल्याचें बरेंचसें श्रेय आपले कीर्तनकार हरिदास व पुराणिक यांचे कडेच आहे. भारत, भागवत व रामायणासारखे ग्रंथ छापून निघाले नव्हते त्यावेळीं त्यांतील स्वारस्य सर्वसाधारण जन समाजाला कळण्याचा मार्ग आपले कीर्तनकार हा एकच होता. खुद्द शिवाजी महाराजांना कीर्तन पुराण श्रवणाचा फार नाद असे व त्यांच्या हातून पुढें जे महत्कार्य झालें त्याला त्यांचा हा नाद बऱ्याच अंशीं कारणीभूत झाला हें इतिहास प्रसिद्ध आहे. अशा उपयुक्त संस्थेच्या उत्कर्षाकरितां जे जे प्रयत्न होतील ते आपल्या उन्नति करितां हवेच आहेत.

कीर्तन संस्था हल्लीं खालावली आहे ही गोष्ट निर्विवाद आहे व त्याला कारण जसें बहुजन समाजाचें औदासिन्य आहे तसेंच चांगल्या हरिदासांची वाण हेंही पण आहे. कदाचित् चांगल्या हरिदासांची वाण पडण्यास कारणही बहुजन समाजाचें औदासिन्यच असेल. हरिदासांनां उत्तेजन नाही व त्या मुळें चांगले हरिदास निपजत नाहींत हीं गोष्ट जरी खरी असली तरी हरिदासांनी आपल्या परंपरेचा अभिमान बाळगून समाजाचा ओघ आपल्याकडे आकर्षून घेण्याची जबाबदारी आपलेवर आहे ही गोष्ट विसरतां कामा नये. कीर्तनाचें निमंत्रण आल्यास कीर्तनाकरितां नव्हे परंतु निमंत्रण देणाऱ्या आपल्या स्नेह्याला बरें वाटावें म्हणून कीर्तनाला केव्हां तरी जाऊन हजिरी देऊन पानसुपारी घेऊन परत यावें ही घातुक वहिवाट अलीकडे समाजांत रूढ होत चालली आहे तिला हरिदासांनींच आळा घातला पाहिजे.

चांगल्या हरिदासांच्या कीर्तनाला लोकांच्या उडया पडतात. नुकतेंच मुंबईस दोन प्रसिद्ध कीर्तनकार येऊन गेले. पैकीं एक ह. भ. प. दासगणु महाराज हे श्री साईलीलेच्या वाचकांच्या पूर्ण परिचयाचे आहेत. यांच्या कीर्तनाला केवढीही मोठी जागा असो, ती अपुरीच पडते व जागेच्या अभावीं पुष्कळ मंडळी तीन तीन तास ताटकळत उभे राहून प्रेमानें सर्व कीर्तन ऐकतात. दुसरे कीर्तनकार ह. भ. प. डॅा. पटवर्धन. यांचीं कीर्तनेंही बरींच लोकप्रिय आहेत. दोघांचीही कीर्तनद्वारा शिक्षण देऊन समाजाला विशिष्ट वळण लावण्याची पद्धति फारच चांगली आहे. ह. भ. प. दासगणु महाराजांचीं कीर्तनें भक्तिरसानें ओथंबलेलीं असतात व त्यांच्या कीर्तनानें नास्तिक मनुष्याच्या मनांतहि भक्तीचा प्रादुर्भाव झाल्याचीं कांहीं उदाहरणें आम्हांस माहीत आहेत. सारांश, रा. रा. खापर्डे यांनीं आपल्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें, बहुजन समाजांत उपदेश करण्याचें, कीर्तनाप्रमाणें, निदान हिंदुस्थानांत तरी, दुसरें उत्कृष्ट साधन नाहीं व म्हणून आपण ही संस्था कधींहि बुडूं देतां कामा नये.

हा उद्दिष्ट हेतू साध्य होण्याकरितां सर्व बाजूनें प्रयत्न झाले पाहिजेत. मुंबईंत एक संस्था कांहीं वर्षांपूर्वी याच उद्देशानें निघाली होती व

कीर्तन मासिक पुस्तक याच संस्थेच्या नेतृत्याखालीं सुरू झालें होतें. परंतु संस्था चिरस्थायी होण्याची खबरदारी तिच्या उत्पादकांनीं न घेतल्या मुळें त्यांच्या अकाली मृत्यूनें संस्था व मासिक दोन्हींहि त्यांचेच बरोबर लयास गेलीं. रा. रा. गणेश अनंत सराफ यांचा प्रस्तुतचा प्रयत्न प्रशंसनीय आहे व त्यांनीं हें काम हातीं घेतल्याबद्दल आम्हीं त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों. मालेचा उद्देश कीर्तनोपयोगी कविता प्रसिद्ध करून विद्यमान कवी व कवयित्रींची मनें कीर्तन संस्थेकडे वळवून त्यांना प्रोत्साहन द्यावयाचें एवढाच ठेवला तर तिला कवि व कवियित्री यांची संख्या मर्यादित असल्यामुळें त्यांचा आश्रयही मर्यादितच मिळेल. परंतु आमच्या मतें हें ध्येय कायम ठेवून पुस्तकांत मनोरंजकपणा ज्यास्ती आणल्यास बहुजन समाजाकडून आश्रय भरपूर मिळेल. मालेंत येणारे विषय मनोरंजक असणारच. परंतु त्यांची मांडणी बहुजन समूहाचें चित्ताकर्षण करील अशा रीतीनें केल्यास दुधांत साखर घातल्यासारखें होईल. प्रस्तुत पुस्तकांत तीन आख्यानें दिलीं आहेत. तीं तीन्हीं मनोरंजक आहेत परंतु त्यांची मांडणी तितकी मनोरंजक झाली नाहीं. गद्य थोडें व कवितांचा सुकाळ झाला आहे. हेंच कवितांच्या आधारानें गद्य वाढवून आख्यान दिलें तर तें खात्रीनें ज्यास्ती मनोरंजक होईल. आख्यान वाचीत असतांना आपण नुसत्या हरिदासाच्या "नोटस्" वाचतों आहोंत असें न वाटतां कीर्तन ऐकतांना जसें मनोरंजन होईल तसेंच तें वाचतांना झालें पाहिजे. आतां ही गोष्ट खरी कीं कवी हरिदासानीं लिहून ठेवलेलीं आख्यानें मुळांतच अशीं अपुरीं असणार परंतु त्यांतील हा अपुरेपणाचा दोष काढून टाकतां येण्यासारखा आहे. कवी विद्यमान असल्यास किंवा त्याची परंपरा पुढें चालविणारे त्याचे वंशज अथवा शिष्य असल्यास त्यांच्याकडून गद्यभाग पुरा करून घेतां येईल व हे दोन्ही नसल्यास प्रकाशकानां स्वतः तें कार्य करण्यास कोणताही प्रत्यवाय नाहीं.

आतां आपण प्रसिद्ध झालेल्या आख्यानाकडे वळूं. पहिलें आख्यान चूडामणिसुत विरचित "वत्सला हरण" दुसरें संतकवि दासगणु विरचित "श्री अहल्याबाई होळकर" व तिसरें रुक्मांगद सुत विरचित "श्री

जयदेव चरित्र" अशीं हीं तीन आख्यानें आहेत. यापैकीं पहिलें व तिसरें ही साधारण एकाच धर्तीचीं, जुन्या पद्धतीचीं आहेत. दोघांची कविता बऱ्यापैकीं व भारदस्त अशी आहे. दोहोंत, वत्सलाहरणांतील कविता सरल आहे. पृष्ठ ४ वरील श्रीकृष्णाचा भांडा फार प्रेमळ आहे. परंतु या दोन्हीं कवींच्या पद्यांत अपरिचित शब्दांचा भरणा फार असल्यामुळें व आख्यानांत गद्य भाग अपुरा असल्यामुळें तीं वाचीत असतां बराच रसभंग होतो. दोन्हीं आख्यानांचे विषय मनोरंजक आहेत व जर यांत गद्यभाग पुरा असतां तर तीं वाचतांना मनाचें रंजन चांगलेंच झालें असतें. "श्रीअहल्याबाई होळकर" हें आख्यान वरील दोहोंपेक्षां निराळ्या पद्धतीचें आहे. यांतील कविता- फार रसाळ आहेत, त्यांत अपरिचित अथवा कठीण शब्द फारसे नाहींत. दिलेलें गद्यहि साधारण बरें आहे त्यामुळें हें आख्यान वांचतानां दुसऱ्या दोन्हींपेक्षां ज्यास्ती मनोरंजक वाटलें. तथापि यांतील गद्य जर वाढविलें व तें दासगणु महाराजांच्या संमतीनें सहज करतां येईल, तर हें आख्यान आहे त्यांपेक्षां चित्ताकर्षक होईल. गद्य अपुरें असल्यामुळें कित्येक ठिकाणीं तर या आख्यानांत गद्यपद्याची खिचडी झाली आहे. उदाहरणार्थ पृष्ठ १२ मध्यें " पुढें थोड्याच दिवसांत त्यांचे मनोरथ पूर्ण होऊन योग्य काळीं " या अपुऱ्या गद्य वाक्याची पूर्ती त्या पुढील आर्येतून " हरिप्रिय कमळ्-शिशा पोटीं निजांशें जन्मा येई " हा चरण घेऊन करावी लागते. पुढें त्याच पृष्ठावर शेवटीं " वाचावयाला शिकवित असे, त्या " हें गद्य वाक्य पुढील ओवींतील " पंतोजीचें तया अहल्येवरी भारी प्रेम जडलेलें" हा चरण घेऊन पूर्ण करावें लागतें. तसेंच पृष्ठ १५ वरील ( २० ) ओवीपासून पुढील काव्यरूपीं संवाद वाचून आम्हीं लहानपणीं पाहिलेल्या उर्दु इंद्रसभा नाटकाची आठवण होते. त्या नाटकांत इंद्राचें पद झालें की उर्वशीचें नंतर दुसऱ्या कोणाचें असें सर्व नाटक नुसत्या पद्यांतच होत असे.

या आख्यानांत श्री अहल्यादेवीचें साधुत्वाचें महिमान वर्णन करतांना जो कथाभाग दिला आहे त्यांत भागिरथीमध्यें नौकेला छिद्र

पडल्यामुळें त्या नौकेंतील काशीस जाणाऱ्या मंडळींनीं श्री अहल्या देवीचें स्तवन केलें व त्या मुळें नौका पैलतीरास सुरक्षित पोहोंचली असें वर्णन दिलें आहे. श्री अहल्या या महान साध्वी होत्या व त्यांच्या कृपेनें असा चमत्कार होणें अगदीं शक्य होतें परंतु काशीला जाणाऱ्या महाराष्ट्रीय मंडळींनीं ( इंदूर किंवा महेश्वरची नव्हेत ) संकटसमयीं त्याचे निवारणार्थ, भागिरथी माता सोडून किंवा समोर दिसणाऱ्या श्रीकाशी विश्वेश्वराला विसरून, अहल्या देवीनां आळवावें हें चमत्कारिक व विसंगत दिसलें. दासगणु महाराजांचें कीर्तन आम्ही ऐकलेलें आहे पण त्यावेळीं हा विसंगतपणा दिसला नाहीं. कदाचित आख्यानांत पूर्ण गद्य न दिल्याचा हा परिणाम असेल. सारांश आमची रा. रा. गणेश अनंत सराफ यांना आग्रहाची विनंती आहे कीं त्यांनीं आख्यानें नुसत्या हरिदासांच्या "नोटस्" या स्वरूपांत न देतां तीं पूर्ण स्वरूपांत द्यावीं म्हणजे त्यांचा अंतिम हेतु साध्य होऊन शिवाय इतरेजनाचें पण त्या पासून मनरंजन होऊन या वाङ्मयाची त्यांना गोडी लागेल.

मालेच्या फुटकळ पुस्तकाची किंमत ८ आणे ही जरा ज्यास्ती आहे, परंतु एकदम ३ रु. भरणारास वर्षांतून निघणारी ६ पुस्तकें त्या किंमतींत मिळण्याची सवलत ठेवली आहे, तेव्हां या सवलतीचा फायदा घेणें अधिक श्रेयस्कर आहे. कीर्तन वाङ्मयाचें संरक्षण करणें हें नुसतें अवश्यक आहे इतकेंच नव्हे तर प्रत्येक हिंदुधर्माभिन्यानें तें एक आपलें पवित्र कर्तव्य आहे असें समजून या सत्कृत्यास हातभार लावला पाहिजे. वार्षिक ३. रु. म्हणजे फार नाहींत.तेव्हां सर्व श्रीसाई लीलेच्या वाचकांनीं या मालेला आश्रय देऊन स्वार्थ व परमार्थ हीं दोन्हीं साधावीं अशी आमची त्यांना आग्रहाची विनंती आहे.

(४७)

ठाणें जिल्ह्यांत वेलापुराजवळ तुमेगांवीं शांताबाई या नांवाची बाई रहात असे. तिच्या डाव्या हाताच्या आंगठयास हाडयाव्रण झाला होता; तो सात वर्षे होता. मग एके रात्रीं महाराजांनीं तिला स्वप्नांत जाऊन सांगितलें 'तूं डिकेमाली लाव.' बाई जागी झाली, तों तिला मोठा आनंद वाटूं लागला व तिनें व्रणाला डिकेमाली लावली व तिचा व्रण बरा झाला. तिनें मग या सर्व मजकुराचें कार्ड महाराजांस लिहून कळविलें. त्या कार्डावर तारीख १ सप्टेंबर १९१८ ही आहे.

(४८)

शिर्डीस रामलाल नांवाचा पंजाबी ब्राह्मण असे. तो मुंबईस असतांना त्याच्या स्वप्नांत महाराज आले व म्हणाले 'माझ्याकडे ये.' त्याला महाराजांचें दर्शन कधींही घडलें नव्हतें व त्यानें फोटोही पाहिला नव्हता. तेव्हां हे स्वप्नांत आलेले महाराज कोण हे त्याला ओळखतां येईना. दुसरे दिवशीं रस्त्यानें जातांना त्याला एका दुकानांत महाराजांचा फोटो दिसला. त्यानें दुकानदाराला विचारलें हा फोटो कोणाचा आहे व महाराज कोठें असतात. दुकानदारानें सर्व हकीगत सांगितली व रामलाल शिर्डीस गेला व तेव्हांपासून तो महाराजांचे देहावसनापर्यंत तेथें राहिला.

(४९)

नारायण गोपिनाथ दिवे या नांवाचे गृहस्थ मुंबईस राहत असत. त्यांचे पोटांत एक गांठ उत्पन्न झाली. ती फार कठीण होती व तिच्यापासून त्यांना फार त्रास होऊं लागला. मुंबईस एक दोन प्रसिद्ध डाक्टरांना दाखविली पण कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें त्यांना महाराजांकडे जाण्याविषयीं एका गृहस्थानें सुचविलें. अर्थात तशा स्थितींत जाणें शक्य नव्हतें. ते म्हणाले महाराजांचे आशिर्वादानें ही गांठ फुटून आंतला रोग मळाच्या द्वारानें जाईल तर मला कांहीं बरें वाटेल व मी महाराजांकडे जाऊं शकेन. त्यावर त्या गृहस्थानें त्यांना महाराजांची उदी दिली व तिचें त्यानें सेवन केलें व दुसरे दिवशीं सकाळीं गांठ फुटून आंतला पू

शौचाच्या द्वारानें जाऊं लागला व दोन चार दिवसांत त्यांना बरें वाटूं लागलें. मग लौकरच ते महाराजांचे दर्शनास गेले.

( ५० )

एकदां मी सकाळीं कांही वाचित असतां एका प्रश्नासंबंधानें बराच घोटाळा वाटला त्याबद्दल कांहीं उलगडा होईना. शेवटीं तें प्रकरण तसेंच टाकून मी जेवायाला बसलों व जेऊन ऑफीसांत जाण्यासाठीं निघालों. आगगाडींत बांद्र्याचें स्टेशनावर मला माझ्या एका मित्रानें पाहिलें म्हणून ते मित्र माझ्याच डब्यांत येऊन बसले. पुढें माहीमच्या स्टेशनवर त्या मित्राच्या ओळखीचे एक गृहस्थ त्याच डब्यांत आले. बांद्र्याच्या स्नेह्यानीं त्या गृहस्थाची व माझी ओळख करून दिली. व त्या दिवशीं माझ्या घरीं होणाऱ्या कीर्तनाचें मी त्यांना आमंत्रण दिलें. बांद्रेकर दादरास उतरून गेले व माहीमकर डब्यांतच होते. ते मजबरोबर कांहीं बोलले नाहींत परंतु ते कांहीं लिहित आहेत असें मला दिसलें. ग्रांटरोड स्टेशनावर ते उतरले व उतरतांना त्यांनीं लिहिलेला कागद माझ्या हातांत दिला. त्यांत एक अभंग होता व त्या अभंगानें माझ्या मनांत उद्भवलेल्या घोटाळ्याच्या प्रश्नाचा उलगडा झाला. अशा तऱ्हेनें पुष्कळ वेळां घोटाळे अचानक घडून येणाऱ्या गोष्टीनें दूर झाले असे अनुभव आले आहेत.

( ५१ )

शिर्डीस एकदां एक कर्णपिशाच्च साध्य करून घेतलेले ज्योतिषीबुवा गेले होते. ते महाराजांच्या दर्शनास गेले पण त्यांचे लक्ष पैशाकडे बरेंच होतें; तेथें त्यांना पैसा मिळण्याचा फारसा संभव वाटला नाही म्हणून ते दर्शन घेऊन लवकरच रहाण्यास गेले. तेथें रात्रीं त्यांना विंचू चावला. फार वेदना होऊं लागल्या तेव्हां त्यांनीं महाराजांनीं दिलेली उदी लाविली व एकसारखे महाराजांचे नामस्मरण चालू केलें, त्यामुळें वेदना थांबल्या व त्यांची महाराजांवर श्रद्धा बसली व दुसरे दिवशीं जोशीबुवा सकाळींच पुन्हा शिर्डीस गेले तेथें. त्यांचे १५|२० दिवस रहाणें झालें व महाराजांच्या कृपेनें त्यांना तेथें अजमासे ३०० रुपये मिळाले.

# श्रीसाईनाथ सगुणलीला.

## स्वानुभव.

लेखकः—के. जे. भीष्म.

श्रीसद्गुरूनें दिलेला उपदेश त्यांनीं दाखविलेलें स्वरूप व दिलेला अनुभव हा कोणास सांगूं नये अशी सर्वत्र समज आहे; व याबद्दल " गुरुकृपेका अंजन पाया मेरा मैं जानूं ॥ आपस्वरूप नयनोमें छाया मेरा मैं जानूं " या देवनाथांच्या पदाचा आधार देऊन हरिदास मंडळी या मताचें दृढीकरण करितात. परंतु त्यांच्या उलट स्वतः संतशिरोमणी तुकाराम महाराज आपल्या अभंगांत स्वानुभव लिहितात.

### अभंग.

सद्गुरुरायें कृपा मज केली ॥ नाहीं घडली सेवा कांहीं॥१॥ सांपडविलें वाटें जातां गंगास्नाना ॥ मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥ २ ॥ भोजनामागती तूप पावशेर ॥ पडिला विसर स्वप्नामाजी ॥३॥ कांहीं काळें उपजला अंतराय ॥ म्हणोनीया काय त्वरा जाली ॥ ४ ॥ राघव चैतन्य केशव चैतन्य ॥ सांगितली खूण मालिकेची॥५॥ बाबाजी आपले सांगितलें नाम ॥ मंत्र दिला रामकृष्ण हरी ॥ ६ ॥ माघ शुद्ध दशमी पाहूनी गुरुवार ॥ केला अंगिकार तुका म्हणे ॥ ७ ॥

हा त्यांनीं स्वप्नांत झालेला दृष्टांत व दिलेला मंत्र त्यांनीं लिहून ठेविला. ह्यावरून स्वानुभव कोणास सांगूं नये असें सिद्ध होत नाहीं. मग वरील ' मेरा मैं जानूं ' ह्या उपदेशाचा विचार पडला. संपूर्ण पद माझ्या हातीं आलें तें असें.

## पद देवनाथांचें

गुरुकृपेका अंजन पाया मेरा मै जानूं ॥ आपरूप नयनोंमे छाया मेरा मैं जानूं ॥ ध्रु० ॥ उलट मार्गकी रहा बतायी मेरा मै जानूं ॥ बुरे करमकी रेख मिटाई मेरा मैं जानूं ॥ १ ॥ चांदसुरजबिन परा उजाला मेरा मै जानूं। पिलाया अजरामरका प्याला मेरा मै जानूं ॥ २ ॥ जहांतहां मै आप अकेला मेरा मै जानूं ॥ आपहि गुरू और आपहि चेला मेरा मै जानूं ॥ ३ ॥ गोविंनाथनें यहि बतलाया मेरा मै जानूं ॥ देवनाथ अपनेमे मिलाया मेरा मै जानूं ॥ ४ ॥

हें संपूर्ण पद पाहिल्यावर हरदासी शिक्षणानें झालेल्या वृत्तींत बदल झाला. वरील पदांत देवनाथानीं आपला संपूर्ण अनुभव सांगितला आहे. प्रत्येक कडव्यांत अनुभव सांगून पुन: 'मेरा मै जानूं' हें ध्रुवपद कायम ठेविलें. त्याचा अर्थ इतकाच कीं सद्‌गुरूनें जो जो उपदेश केला, जें जें स्वरूप दाखविलें, जो जो मार्ग सांगितला, व गुरूच्या कृपेनें काय फलप्राप्ति होते हें सांगितलें, पण त्या फलप्रातीपासून जो आनंद होतो त्याची परिमिति किती आहे हें सांगतां येत नाहीं. जसें साखर गोड असते हे गुरूनें सांगितल्यावर ती शिष्यानें खाल्ली असतां गोड लागली इतकेंच सांगेल, पण गोड कशी लागली हें त्याला सांग म्हटलें तर तो सांगू शकत नाहीं. त्यानें तत्सदृश पदार्थाचें नांव सांगितलें तरी त्या पदार्थाविषयीं पुन्हां वरील प्रश्न उद्भवतो म्हणून त्या स्थितीला मात्र 'मेरा मै जानूं' इतकेंच सांगतां येते.म्हणून याच धोरणानें पुढील अनुभव लिहिला आहे.

स्वतांचा अनुभव लिहिणें म्हणजे स्वतःची योग्यता प्रगट करणें नव्हे तर सद्‌गुरूचें महिमान वर्णन करणें आहे, म्हणून आतां स्वानुभव लिहिण्याला आरंभ केला.

नागपूर जिल्ह्यांतील बोरी ह्या गांवीं वास्तव्य करीत असतां कुटुंब निवर्तल्यावर पुन्हा संसारांत पडावें कीं नाहीं या विचारांत बराच काळ गेला. पुष्कळ इष्टमित्रांनीं पुनः संसार थाटण्याचा उपदेश केला, पण संसार करावा असें मनच होईना. शेतीवाडी करून निर्वाह चालविला व मित्रमंडळीनेंहीं साह्य केलें परंतु मनाचा अस्थिरपणा जाईना. अशा रीतीनें कांहीं काळ निघून गेल्यावर शके १८३० श्रावण महिन्याच्या पौर्णिमेस रात्रौ मला एक स्वप्न पडलें. त्यांत एक काळ्या वर्णाचा पुरुष ज्याच्या अंगास केशरी रंगाची उटी लागली आहे, कपाळास त्रिपुंड्र आहे, व पादुकांचीही गंधपुष्पानें पूजा झाली आहे, असा स्वप्नांत येऊन त्यानें माझे हातीं एक वर्तमानपत्र दिलें. मी त्यांना विचारलें आपण कोण व आपलें नांव काय तेव्हां त्यांनीं माझ्याशीं संभाषण न करितां त्या वर्तमानपत्रांकडे बोट दाखविलें. मीं त्याकडे पाहिलें तों त्यावर " सच्चिदानंद " हीं ठळक अक्षरें दिसलीं. तितक्यांत त्या पुरुषानें 'वाच' अशी आज्ञा दिली. तेव्हां पुनः त्या पत्राकडे पाहूं लागलों तों एकेजागीं 'मंत्र व शिकावा' असें लिहिलें होतें. हें काय, याचा अर्थ काय वगैरे प्रश्न करण्याचा जों विचार करितों तों तो पुरुष नाहीं व वर्तमानपत्रही नाहीं. तेव्हां मी विस्मित झालों, इतक्यांत माझ्या मित्रानें दार ठोठावलें त्याबरोबर माझी झोंप गेली; व ताबडतोब हें स्वप्न डायरीवर लिहून ठेवलें. पण या स्वप्नाचें कोडें कांहीं उमजेना. कांहीं दिवसांनीं तेथें एक गाणपत्य साधु आले त्यांना हें स्वप्न सांगितल्यावर ते म्हणाले सच्चिदानंद स्वामी तुमचे गुरू आहेत व त्यांनीं 'वशीकावा' हा मंत्र दिला. हें समजल्यावर आनंद झाला.

---

कांहीं दिवसांनीं उमरावतीस जाणें झालें तेव्हां दादासाहेब खापर्डे म्हणाले शिर्डीस चलता काय ? मी होय म्हटलें व त्यांचे समागमें शिर्डीस गेलों. शिर्डीस जाण्याबरोबर साईबाबाचें दर्शन घेतलें व आम्ही सर्वांनीं नमस्कार केला. मी नमस्कार करण्याबरोबर बाबांनीं हात जोडले व ' जय सच्चिदानंद ' असें तोंडानें म्हणाले. तेव्हां मी जास्त घोटाळ्यांत पडलों. स्वप्नांत दिसलेले सच्चिदानंद व हे एक कीं दोन ? एक म्हणावें तर ते वैष्णव होते व हे यवन आहेत. दोन म्हणावें तर यांनीं मला पहाण्याबरोबर

सच्चिदानंदाचें नांव कां घेतलें? अशा विचारांत पडलों. तेथें सर्व हिंदु ब्राह्मणासुद्धां बाबांचें चरणोदक घेत असत, पण मी मात्र तें घेत नसें. बाबा तंबाखूची चिलीम पीत असत व आपली चिलीम दुसऱ्यास देत असत. मी बाबांचे अगदीं जवळ बसत असें, पण मला त्यांनीं चिलीम कधीं दिली नाहीं. पण एक दिवसाचा प्रसंग असा आला कीं, आम्ही सर्व मंडळी दर्शन घेऊन बाबाजवळ बसलों. बाबांच्या चमत्कारिक गोष्टी चालल्या आहेत, इतक्यांत एकानें चिलीम भरली व बाबांचे हातीं दिली.बाबांनीं ती नुसती तोंडास लावली व माझ्या हातीं दिली व 'पी' म्हणाले. तेव्हां त्यांचे आज्ञेप्रमाणें चिलीम प्यालों व ती बाबांचे हातीं दिली ती त्यांनीं घेतली व तोंडानें 'आपण सगळीकडे फिरतों गड्या; मुंबई, पुणें, सातारा, नागपूर हीं सगळीं शहरें रामानें भरलीं आहेत.' असें बोलून मला एकदम म्हणाले 'तूं लाडू एकटा एकटाच खातोस आम्हास एकही देत नाहीस. आतांतरी तूं मला पांच लाडू दे' बाबा प्रत्येकास दक्षिणा मागत असत व त्याचा विनियोग ते परोपकाराकडे करीत असत हें इतरत्र आलेलेंच आहे.

'आम्हीं सगळीकडे फिरतों व पांच लाडू दे' या बाबांच्या वाक्यानें माझें मनावर निराळाच परिणाम झाला. स्वप्नांत दिसलेले सच्चिदानंद वेगळे व साईनाथ वेगळे ही भावना तत्काल नाहींशी झाली व तीर्थ वाटणाराकडून बुध्या तीर्थ मागून घेतलें व बाबांच्या पायावर डोकें ठेवलें. त्यावेळेस बाबांनीं आपला वरदहस्त मस्तकावर दोन मिनिटें ठेविला. तेव्हां मनाची स्थिति काय झाली हें मात्र 'मेरा मै जानूं' इतकेंच म्हणतां येतें.

( अपूर्ण )

## श्रीसमर्थांची बोधपद्धति

वेदांत ग्रंथांतून प्रपंचाविषयीं बोलतांना निरनिराळे दृष्टांत देण्यांत येतात. उदाहरणार्थ रज्जुसर्प, मृगजळ, हेम व अलंकार, माती व घट वगैरे. हे सर्व दृष्टांत एकाच तऱ्हेचे नाहींत. रज्जुसर्प म्हणजे दोरी असून तेथें दोरीच्या ठिकाणीं सर्प भासतो. मृगजळ म्हणजे नुसत्या उखर जमिनीवर सूर्यकिरण पडलेलें असून तेथें जळ भासतें. या दोन्ही दृष्टांतांत असलेली वस्तु न भासतां तेथें मुळींच नसलेली वस्तु भासते. बाकीच्या दोन दृष्टांतांचा प्रकार निराळा आहे. हेम म्हणजे सोनें, आणि अलंकार म्हणजे दागिने. यांत, असलेल्या वस्तूलाच निराळे आकार दिलेले असतात, आणि ती वस्तु त्या त्या आकारांत उघड दिसते. तसेंच माती व घट यांतही निरनिराळ्या आकारांत वस्तु उघड दिसते. पहिले दोन दृष्टांत एका तऱ्हेचे असून दुसरे दोन दृष्टांत निराळ्या तऱ्हेचे आहेत. या दोन तऱ्हांपैकीं कोणत्या तऱ्हेचे दृष्टांत प्रपंचाला खरे लागू आहेत, या संबंधानें मला मुळींच उलगडा होईना व हा उलगडा व्हावा अशी एक दिवस मनामध्यें अत्यंत आतुरता उत्पन्न झाली. अशी आतुरता उत्पन्न झाल्यावर दहा पांच मिनिटांनींच महाराजांकडून एका गृहस्थाबरोबर निरोप आला. तो गृहस्थ म्हणाला "महाराजांनीं आपल्याजवळ शंभर रुपये मागितले आहेत." मजजवळ त्या वेळेला फक्त एकच रुपया होता आणि तोही मुकत्याच होऊन गेलेल्या एका गुरुपौर्णिमेला महाराजांनीं आपल्या खिशांतून काढून दिलेला तोच. अर्थात् तो रुपया ते परत मागण्याचा संभव नव्हता. आलेल्या गृहस्थाला मी वस्तुस्थिति सांगितली आणि महाराजांस माझा शिरसाष्टांग प्रणिपात निवेदन करावयाची विनंति केली. तो गृहस्थ गेल्यावर माझ्या मनानें घेतलें कीं महाराजांनीं उच्चारलेल्या वाक्यांत मी शोधीत असलेला उलगडा असला पाहिजे. कोणा जवळ खरोखर कोणत्या वेळीं किती शिल्लक आहे हें महाराजाना अंतर्ज्ञानानें कळतें असा आमचा सर्वांचा नित्याचा अनुभव असल्यामुळें महाराजांचा हेतु खरोखरीच शंभर रूपये मागावयाचा नसून मला बोध करावयाचा व माझ्या मनांतला घोटाळा काढून टाकावयाचा हाच असला पाहिजे, असें

माझ्या मनांत पक्कें बिंबलें आणि तेथें असलेल्या महाराजांच्या तसबिरी-पुढें साष्टांग नमस्कार करून "शंभर रुपयांचा" अर्थ मला कळावा अशी प्रार्थना केली. या नंतर दोन चार मिनिटांतच महाराजांच्या कृपेनें "शंभर रुपयांचा" अर्थ स्फुरला व त्यानें माझ्या मनांतील घोटाळा साफ नाहींसा होऊन पूर्ण समाधान वाटलें. तो अर्थ असा: हे दोन्ही तऱ्हेचे दृष्टांत प्रपंचाला लागू आहेत पण ते निरनिराळ्या अंगाचे द्योतक आहेत. प्रपंच हा शंभरासारखा आहे. शंभर म्हणजे एक आणि त्यावर दोन शून्यें; तसा प्रपंच म्हणजे सत् असें जें ब्रह्म, त्यावर भासणारें मिथ्या नाम-रूपात्मक जग. सत् म्हणजे एक आणि नाम व रूप हीं त्यावरील शून्यें. सत् म्हणजे अधिष्ठान याचे दर्शक दृष्टांत हेम व अलंकार आणि माती व घट हे होत. अलंकारांत जसें सोनें किंवा घटांत जशी माती तसें अधि-ष्ठानांत सत् आहे आणि तें नाशिवंत नाहीं किंवा भासमात्र नव्हे. म्हणजे तें शून्य नसून एक आहे आणि त्या एकाच्या आधारानेंच वर असणाऱ्या शून्यांना किंमत आहे. वरील शून्यें गेलीं तरी एक याला धक्का पोंहोचत नाहीं. रूप व नांव हीं मिथ्या असून केवळ भासतात, म्हणजे तीं शून्यें आहेत. त्यांचे दर्शक दृष्टांत म्हणजे मृगजळ, रज्जू सर्प, हीं होत. नामरूपासारखें जळ आणि सर्प मिथ्या असून नुसते भास-मान आहेत. अर्थात् तींही शून्यें आहेत. अशा तऱ्हेनें दोन्ही तऱ्हेच्या दृष्टांतांची समर्पकता माझ्या मनाला पटली आणि मला फार आनंद झाला.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| महाराजांचे अनुभव ... ... ... | ८६-९३ |
| महाराजांची बोधपद्धति ... ... ... | ७-८ |
| स्फुटविषय ... ... ... | ७५-८४ |
| श्री साईसच्चरित ... ... ... | २१७-२३६ |


## खुलासा.

श्री साईलीलेच्या पृष्ठावर जे अंक देण्यांत येतात त्यासंबंधीं कांहीं वाचकांचा गैरसमज होत आहे असें दिसतें. पृष्ठावरील अंक निरनिराळ्या विषयाला निरनिराळे दिले आहेत. हेतु हा कीं शेवटीं पुस्तकें बांधतांना विषयवारीप्रमाणें तीं बांधवितां यावीं. या व्यवस्थेमुळें पृष्ठावरील अंकांत विषमता दिसल्यास म्हणजे २६ पृष्ठापुढें ४२ वें पृष्ठ आल्यास मधलीं २७ ते ४१ पृष्ठें आपल्याला कमी आलीं किंवा पृष्ठांक चुकीचे पडले आहेत असा समज वाचकांनीं करून घेऊं नये.

---

## विनंति.

श्री साईलीलेचे अंक दर महिन्यास शुद्ध ११ पर्यंत सर्व पोष्टांत पडतात व ते ग्राहकांना दर महिन्यास पौर्णिमेपर्यंत बहुतेक पोहोंचले पाहिजेत. पोष्टांत क्वचित अंक गहाळ होत असतील, व त्यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पौर्णिमेपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल. कित्येक ग्राहकांची एखादा अंक न मिळाल्याची तक्रार २।३ महिन्यांनीं उशिरा येते. इतक्या उशिरां पुन्हां अंक पाठविणें अशक्य असल्यामुळें ही सूचना देणें भाग पडत आहे.

---

श्रीसाईलीला मासिकाची वार्षिक वर्गणी तीन रुपये. टपाल हांशीलसह तीन रुपये सहा आणे. व्ही पी. नें तीन रुपये आठ आणे. फुटकळ अंकास पांच आणे.

(५२)

एकदां बापुसाहेब जोगांना विंचू चावला त्या वेळेला सुमारें रात्री ८ वाजले होतें. ते तावडतोब महाराजांकडे गेले. पायरी चढत असतांनाच महाराज म्हणाले "बापूसाहेब काय आहे?" बापुसाहेब म्हणाले "बाबा मला विंचू चावला" महाराज म्हणाले "बरें होईल, जा." बापूसाहेब तसेच पायरीवरून परत फिरले; ते कंपौंडाचे बाहेर गेले नाहींत तोंच वेदना अजिबात बंद झाल्या.

(५३)

रा. रा. वासुदेव सिताराम रातांजनकर रा. हैदराबाद रेसिडेन्सी घर नं० १६२ यांचें रा. रा. हरी सिताराम दीक्षित यांना ता. १८।८।२१ रोजीं आलेल्या पत्रांतील उतारा:—प्रथमतः साई महाराजांचं नांव व महात्म्य माहित झालें तें कुशाभाऊ (वे. शा. सं कृष्णनाथ बुवा मिरजगांवकर जोशी) यांचेकडोन सन १९०८ चे सुमारास झालें. बऱ्याच ठिकाणीं लोक रा.कुशाभाऊंना पुजेकरितां घरीं बोलवीत व आदर व्यक्त करीत; ह्याप्रमाणें बरेच दिवस गांवांत क्रम चालला होता. त्यांची पूजा एक दिवस वे. शा. सं. सीतारामभटजी घटे यांचे येथें करविली होती. अर्थात ते मातुळ असल्यामुळें तेथें जाण्याचा व पूजा समारंभ पहाण्याचा योग आला. त्यांच्या तीर्थप्रसादानें कांहीं भक्तांस गुण आला अशी चर्चा चालत असे. व सहजी मनांत आले कीं, साईमहाराजांचे पाय आपले घरीं लागावे. (अर्थात त्यांचे शिष्याचे) पूजा करवावी, वगैरे विचार मनांत येतात तोंच महाराजांनीं (श्रीकृष्णनाथांनीं) हंसून स्फूर्तीनें सांगितलें कीं, "मला उद्यां तुझे घरीं येणें आहे." असें वाक्य निवतांच मनास समाधान वाटलें व दुसरे दिवशीं त्यांच्या पूजेची व्यवस्था कशा रीतीनें ठेवावी ह्या विचारांत तल्लीन होऊन घराकडे रवाना झालों; व सर्वांना घरीं ही हकीगत कळविली. समाधान वाटलें. दुसरे दिवशीं उजाडण्याचे सुमारास आमच्या मातुश्री गंगाबाई ह्यांना

स्वप्न पडलें व "एक भगवा वेषधारी कमंडलू वगैरे असलेला महात्मा आला तो थेट घरांत आला. त्यांना आसन देऊन बसविण्याकरितां मातोश्रीनें आसन पुढें केलें व त्यांवर ती मूर्ती पुढें उभी राहिली. मातोश्रीनें त्यांचे चरणावर डोकें ठेविलें, तोंच त्या एकदम जाग्या झाल्या. लगेंच तें स्वप्न त्यांनीं सर्वांना कळविलें, पण त्याकडे इतकें कोणाचें लक्ष वेधलें नाहीं. असो, त्याच दिवशीं पुन्हां पूजा पहाण्यास मातुलगृहीं गेलों. तेथील पूजा वगैरे संपतांच महाराजांनीं (श्रीकृष्णनाथांनीं) तीर्थ प्रसादाचे वेळीं सर्वांना तीर्थप्रसाद देतांना माझी पाळी आली; तेव्हां मी तीर्थप्रसाद घेऊन उठते वेळीं महाराजांनीं पूजेंतील साईमहाराजांचा फोटो एकदम उचलून घेऊन मशी हातीं दिला, व ह्याची रोज मनोभावें पूजा करीत चल, असें सांगून परवानगी दिली. तो फोटो घेऊन घरीं आलों. त्यानंतर सकाळीं पडलेल्या स्वप्नाचा मेळ घालून मंडळीस बरेंच समाधान वाटलें. पुढें पुन्हां रा. कुशाभाऊ (श्रीकृष्णनाथ महाराज) भोजनास घरीं बोलावून त्यांची पूजा करविली. अशा तऱ्हेनें साधारण: साईंचे नांवाची माहिती झाली. त्यानंतर बरेचसे लोक जाऊन येत व आपापला अनुभव चमत्कार दृष्टांत वगैरे निवेदन करीत तसें आपणही एकदां जाऊन समर्थांचे दर्शन घेऊन कृपा संपादन करून पुण्य जोडावें अशी भावना होऊं लागली. मला २।३ वर्षे तशा तऱ्हेचा योग जुळून आला नाहीं; पुढें १९१२ सालीं मुंबईस सम्राटागमनाचे प्रसंगीं शिर्डीस जाण्याचा योग एकाएकी जुळून आला. तो असा कीं, रा. शिवदास धाटे यानीं प्रातःकाळीं कोपरगांवचें एक तिकीट सहज (त्यांचे कोणी जाणाऱ्याचा बेत रहित झाला म्हणून) आणून दिलें. ती साई महाराजांची आमंत्रण पत्रिका समजून त्याच दिवशीं सायंकाळीं निघण्याचा बेत केला व निघालोंही, व मुंबईस सम्राटदर्शनास न जातां श्रीसाई महाराजांचे दर्शनास शिर्डीस गेलों तेथें बरेच अनुभव व दाखले आले त्यानंतर त्यांचेवर पद्यें करावीसें वाटल्यावरून एक पद्यमाला तयार केली. त्या नंतर एक मोठा चमत्कारिक प्रसंग व अनुभव आला तो खरोखरीच अपूर्व होता. त्याची सर्व हकीगत बरीच चमत्कृतिजन्य आहे तरी संक्षिप्तांत देत आहें; ती:—

कै. दामोदर रंगनाथ जोशी देगांवकर यांची कन्या कै. सौ० मालणबाई ( ही माझी मावस वहीण लागते ) ज्वरानें बरेच दिवस अजारी होती व त्यांतच ज्वर आंगांत मुरून क्षयावर चालविलें बरेच डाक्तर, वैद्य व इतर सटरफटर उपाय करूनही कांहीं गुण आला नाहीं. आतां अखेर उपाय म्हणून रोज बाबांची उदी देण्यास सुरवात केली व औषधही चालू होतें पुढें ती मुलगी औषधास कंटाळून अगदींच औषध घेईनाशी झाली व तिनें एकच हेका धरिला कीं, "मला साईबाबांचे दर्शनास घेउन चला त्याशिवाय मी बरी होणार नाहीं." प्रकृति फारच क्षीण. उठून बसवणें फारच हलाकीचें झालें होतें. अशा स्थितींत दूर प्रवासात नेणें फारच घातुक म्हणून नेण्यास कोणी धजेना. अखेर डाक्तरचे व वैद्याचे सल्ल्यानें मनोभावनेनें गुण आल्यास पहा; कदाचित् येईलही म्हणून त्यांनी परवानगी दिली, व असाध्य कोटींत गेलेला रोग; तेव्हां कांहीं झालें तरी केवळ तिची इच्छा म्हणून जाण्याचा बेत केला. दोघें तिथें मंडळीबरोबर घेऊन रवाना केलें. तेथें बाबांचें दर्शनास नेल्यानंतर शिव्या देण्याचा सपाटा बाबांनी सुरू केला व तिला घोंगडयावर टाक व मडक्यातलें पाणी पाजून पडूं दे म्हणून सांगितलें. ७।८ दिवस अन्न न खातां नुसत्या पाण्यावरच राहिली व तिची मात्र मी बरी होईन तर बाबांचें कृपेनेंच अशी पूर्ण श्रद्धा होती. ७।८ दिवसांनंतर पहाटच्या सुमारास तिचें देहावसान झालें व सर्वजण शोकग्रस्त झाले. त्याच सुमारास बाबांची उठण्याची वेळ झालीतरी बाबा उठत ना. काकड आरतीस गेलेली मंडळी सकाळीं ८ वाजेपर्यंत तेथेंच तटस्थ होती व आज हा काय प्रकार व बाबा कां उठत नाहींत याची चर्चा आपआपले परीनें मंडळी करूं लागली. इकडे मृत मुलीच्या पुढील व्यवस्थेकरतां कांहीं मंडळी गुंतून गेली होती व मुलीची आई व माझ्या मातोश्री ह्या शोक करीत तेथेंच बसून होत्या व साठे काका म्हणून एक साईभक्त त्यावेळीं तेथें होते त्यांनीही त्यांचें शांतवन करण्याचा बराच प्रयत्न केला. इतक्यांत एकाएकी मुलीची हालचाल दिसून, तिनें एकदम जांभई देत डोळे उघडले व घाबरलेसें करून चोहोंकडे पाहूं लागली. झालें सर्व आनंदमय झालें व तिनें पुढीलप्रमाणें हकीगत सांगण्यास सुरुवात

केली कीं, एक काळा माणूस मला घेऊन जात असतांना मी घाबरून बाबांना हाक मारली तोंच हातांत सोटा घेऊन बाबांनीं त्याला खूप मारला व त्यांचकडून मला सोडवून आपले चावडींत घेऊन गेले, तेथें असलेला प्रकार व आरास मुलीनें मुळींच पाहिला नसतानां यथातथ्य सांगितला. हा प्रकार इकडे चालू असतांना चावडींत बाबा अजून निजलेले कां आहेत, म्हणून चर्चा चालू होतीच. तों एकदम ते मोठ्यानें ओरडत व सोटा आपटीत जागे झाले व तेथून पळत मुलगी ज्या ठिकाणीं राहिली होती ( दीक्षीतांच्या बंगल्यांत ) तिकडे पळत आले, त्याबरोबर सर्व लोकांचा जमावही होताच तो इकडून ही हकिगत कळविण्याकरत बाहेर जाणार तोंच समोर बाबा येत होते. अशा तऱ्हेनें आनंदमय प्रभूनें सर्वस्वी आनंद करून त्या दिवशीं खरोखर मृत्युलोकांत अपूर्वता घडवून आणून भक्त कैवारी दुसऱ्याचें संकट कसें निवारण करतो ह्याची साक्ष पटविली, वगैरे वगैरे अनेक लहान मोठे चमत्कार बरेच आहेत. विस्तारास्तव पुरें करितों.

## रा. रा. कृष्णराव नारायण पळ्ळकर यांचे रा. रा. हरी सिताराम दीक्षित यांजला आलेलें पत्रः—

मुक्काम हर्दा, ता. १७ फेब्रुवारी १९१५.

रा. रा. काकासाहेब दीक्षीत मु॥ मुंबई स्वामीचे सेवेशीं शिरसाष्टांग नमस्कार वि. वि. आपलेकडून रा. रा. सदूभय्या सा॥ यांचेकडे पत्र आले, व त्यानंतर श्री समर्थ यांचा फोटो घेऊन श्री बाळक-रामजी व श्री मुक्तारामजी आले व त्यांचे आज्ञेप्रमाणें लघुरुद्र वगैरे होऊन समर्थांच्या फोटोची स्थापना रा. सदूभय्या साहेबांचे घरीं झाली. त्यानंतर बाबांचा प्रसाद होऊन उत्सव समाप्त झाला. ज्या दिवशीं स्थापना झाली, त्याच दिवशीं रात्रीं माझे कुटुंबास व माझे चुलत बंधु ती॥ नारायण दादा जिजगांववाले या दोघांस खालीं लिहिल्याप्रमाणें दृष्टांत झाले. ति॥ नारायणदादास दृष्टांत झाला तो असा कीं, ते शिरडीस समर्थांकडे उभे आहेत व समर्थ म्हणतात कीं, आम्ही हरद्यास जातों तुम्ही आम्हांबरोबर चला व उभयतां कोपरगांवांस गोदेच्या तटीं आले (म्हणजे शिरडीकडील बाजू) व काठांवर उभे राहीले. गोदेंत पाणी साधारणपेक्षां जास्त दिसूं लागलें. काठावर जेथें उभे राहिले तेथें दोन्हीकडे दोन गव्हांचीं पोतीं तोंडें उघडीं केलेलीं ठेवलीं आहेत. नंतर समर्थ ति. नारायणरावास ह्मणाले कीं, 'आतां कसे जाणार ?' इतकें म्हणतांच आसपास दहा नंदीबैल त्यावर सामान कसलेले उभे राहिलेले दिसले, व समोर पाण्यांतून पक्का रस्ता झालेला दिसला. नंतर हरद्यास माझे घराचे खुंटापासून रा. सदूभय्याचे घराचें खुंटापर्यंत जेथें निशाण लावलें आहे, तेथपर्यंत श्री समर्थ त्या सर्व नंदीबैलांसह गेले व पुढें नाहींसे झाले.

दुसरा.—माझे कुटुंबास असा दृष्टांत झाला कीं, रा. रा. माधवरावजी हातांत ताट घेऊन त्या ताटांत एक नारळ एक खण व कुंकवाची पुडी

असें घेऊन आले व कुटुंबास म्हणाले कीं, हो बाबानें तुम्हास ओटी पाठविली आहे. असे दोन्ही दृष्टांत झालेले आपणास कळविले आहेत. श्री बालक रामजी व श्री मुक्तारामजी येथेंच आहेत. येथें रोज पूजा आरती दोन्ही वेळ आनंद होत असतो. आपल्या कृपेनें समर्थांचें दर्शन व दृष्टांत व प्रसाद मिळाला. त्यावेळीं आपण याल अशी फार आशा होती. परंतु आपलें पत्र आल्यावरून आपलें न आल्याचें कारण समजलें. आतां कधींतरी समर्थ आपणास हरदयास पाठवितील अशी खास उमेद झाली आहे. समर्थांचीं आज्ञा झाल्यावरून रा. सदूभय्या शिरडीस गेले आहेत. आज त्यांना दहा दिवस झाले. इकडील सर्व मंडळी समर्थांच्या कृपेनें खुशाल आहेत. हमेशा पत्र पाठवून समाचार घेत जातील. कळावें लोभ असावा ही विनंती. सौ. भावीसाहेब यांजला माझा नमस्कार कळवितील.

आपला

कृष्णराव नारायण परुळकर.

## रा. रा. सदाशिव धुंडिराज उर्फ सदूभय्या नाईक राहणार हर्दा यांच्या ता० ६।३।१५ चे पत्राची नक्कल

श्री समर्थ नैवेद्य रविवारीं झाला व दुसरे दिवशीं म्हणजे सोमवारीं तारीख १५ फेब्रुआरी रोजीं श्रीमंत रा. रा. छोटूभैय्यासाहेब परुळकर यांचे घरीं उभयतां बंधूसह श्रीचा प्रसाद घेऊन नंतर श्री बालक रामजी रा. बधुभय्या सरमंडळ व रा. रा. शंकरभैया ( छोटूभैयांचे धाकटे बंधु ) सह नेमावर श्री नर्मदाकाठीं येथें जाण्यास रवाना झाले व श्री मुक्तारामजी माझे गांवीं ( बम्हनगांव ) रा. छोटूभय्या परुळकरासह रा. नारायणराव परुळकर सीजगांवकर यांचेसह रवाना झाले. माझे गांवीं श्री.

श्री मुक्तारामजी व मंडळीसह सुमारें दोन वाजतां दुपारीं जाऊन पोहों-चलों. श्री मुक्तारामजी गांवीं पोहोंचतांच दर्शनाकरतां बरीच मंडळी जमली. तीन साडेतीन वाजेपर्यंत मंडळी दर्शन घेऊन गेली. सरासरी चाराचा अंदाज असेल, मी व श्री मुक्तारामजी व रा. नारायणराव पळ-ळकर जीजगांवकर बोलत बसलों असतां एकाएकीं माझ्या हातीं श्रीचा दांत कोरण्याची काडी आली. ती पाहतांच सर्व गुरुबंधूंस दाखविली. श्रीचा खेळ, व चमत्कार पाहून मनास मोठा आनंद झाला व हा चम-त्कार आपले चरणीं सादर करावा. परंतु श्री मुक्तारामजी जास्त दिवस न राहतां लगेच दुसरे दिवशीं मंडळीसह म्हणजे मंगळवारीं सातचे सुमारास रा. परुळकरसाहेब यांचे बागांतून श्री समर्थ चरणाजवळ गेल्यानंतर कपडे काढून खालीं जातों तों वरांतील मंडळीनें कळविलें कीं, श्री क्षेत्र शिर्डीहून रा. माधवराव देशपांडे यांचें पत्र आज आलें. मी पत्र लगेच हातीं घेऊन श्रीचा प्रसाद देऊन माडीवर श्री चरणा-जवळ बसून पत्र वाचलें व श्री मुक्तारामजीस व सर्व मंडळीस वाचून दा-खविलें. पत्रांतील मजकूर माधवरावजींचे हातचा होता तो येणेंप्रमाणें " आपल्यास पत्र देखत साई महाराजांनीं बोलाविलें आहे, हें तारेप्रमाणें पत्र पाठविण्यास सांगितलें. तरी आर्जंट पत्र पहातांच एकटे निघून यावें. येथें येऊन काम असल्यास तावडतोब परत जावें, परंतु पत्र पहातांच यावें असे साईमहाराजांनीं सांगितलें आहे" वरील पत्र वाचतांच श्री समर्थ आरती फराळ वगैरे करून बारा वाजतां श्री मुक्तारामजीसह स्टेशनवर गेलों. श्री मुक्तारामजी मनमाडपर्यंत बरोबर आले. नंतर म्हणाले कीं, "मी हर्यांस परत जाईन पुढें चलण्याबद्दल श्री आज्ञा नाहीं" "तुम्ही एकटे जा." नंतर हर्यास रा. परुळकर यांस तार दिली व टिकीटांचे रुपये देऊन मी गाडींत बसलों व ३ चे सुमारास श्री क्षेत्र शिर्डीस पोहू-चलों. वाड्यांत सामान ठेविलें.

श्रीमंत बापुसाहेब बुटी तेव्हां झोंपले होते. तेथें श्रीचरणाजवळ ५ मीनिटें विसावा घेऊन माधवरावजी देशपांडे यांस भेटण्यास त्यांचे घरीं बरोबर फुलांचा हार घेऊन गेलों, तेव्हां प्रिय बंधु ( माधवरावजी ) विष्णु सहस्त्रनामाचा पाठ करीत बसले होते. त्याच क्षणीं मला बरोबर घेऊन ते श्रीदर्शनास मशीदींत गेले. मी श्रीचरणीं साष्टांग नमस्कार घातला व बरोबर आणिलेला हार श्रीच्या गळयांत घातला व चरणसेवा करित बसलों. पांच मिनिटांनीं मला अर्धा नारळ व एक पेढा देऊन खाण्यास सांगितलें नंतर मला वाडयांत घेऊन जाण्यास माधवरावजींस सांगितलें वाडयांत आल्यावर स्नान केलें व रा. काकाचे खानावळींत श्रीचा प्रसाद घेतला. भोजन झाल्यावर श्रीमंत रा. बापुसाहेबाबरोबर श्रीसमर्थ लीला बोलत बसलों. दुसरे दिवशीं बडे बाबा डाक्तर पिले वगैरे मंडळी श्रीसमर्थ लीला ऐकावी म्हणून म्हणाले.समी प्र हकिगत आपल्या पत्रापासून शिर्डीस दाखल होईपर्यंत विदित केली. पुढें ही लीला ऐकून श्रींनीं काय व कशी वृत्ती पालटली तें सर्व खुलासेवार रा. देशपांडे यांनीं लिहून कळविलेंच आहे.

---

मला श्रींनीं १० दिवस ठेवून घेतलें मग रजा दिली. इकडे श्रीच्या मठांत आज ८ दिवस झाले श्री मुक्तारामजी व बाळकराम उभयतां बंधू आहेत. नित्य श्रीची सकाळ संध्याकाळची आरती व काकडारती चालू आहे. आरतीस बरीच मंडळी गोळा होत असते. उभयतां बंधूंस माझेच घरीं राहण्याची श्री समर्थ आज्ञा झाली आहे, अशा रीतीनें हरदा श्री क्षेत्र शिर्डीच करून ठेविलें आहे.

( २ )

एकदां बाळासाहेब भाटे व मी आमच्या वाड्यांत श्रीएकनाथी भागवत वाचीत असतां श्री. बापुसाहेब बुटी महाराजांकडून निरोप घेऊन आले कीं, महाराजांनीं मजजवळून साडेसोळा रुपये मागितले आहेत. महाराजांनीं बापुसाहेबांना बजाविलें कीं साडे सोळा आण, नुस्ते सोळा आणूं नकोस महाराजांनीं असेंही सांगितलें कीं "काकाजवळ बैस आणि तो काय सांगतो तें ऐक." बापुसाहेबांनीं ही सगळी हकीगत आम्हाला सांगितली त्यावेळीं मजजवळ महाराजांनीं दिलेल्या एक रुपयाशिवाय कांहीं नव्हतें, तेव्हां हा मजकूर महाराजांचे चरणीं सप्रणाम निवेदन करा, असें मी बापुसाहेबांस विनविलें आणि त्यांना असें म्हटलें कीं, ज्याअर्थी आपणाला मजजवळ बसून ऐकण्याची आज्ञा झाली आहे, त्याअर्थी आपण मजजवळ बसा आणि मी भागवत वाचीत आहें तें ऐका. ते "बरें" म्हणाले आणि बसले. आम्ही भागवत पुढें वाचूं लागलों तोंच "कायेन वाचा×××" हा श्लोक निघाला. भागवत धर्माचा प्रश्न जनक राजानें विचारला असतां त्या धर्माचें विवेचन तेथें आलेल्या ब्रह्मनिष्ठ नऊ भावांपैकीं ज्येष्ठ जो कवि यानें केलें, त्या विवेचनाचें सोलीव सार या श्लोकांत आहे. हा श्लोक आपल्या सर्वांच्या नित्य पाठांतला आहे तो असा—

**"कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा । बुद्ध्यात्मना वाऽनुसृतस्वभावात् ॥**
**करोमि यद्यत् सकलं परस्मै । नारायणायेति समर्पयामि ॥"**

या श्लोकाची पदें खाली लिहिल्याप्रमाणें—

"कायेन, वाचा, मनसा, इंद्रियैः वा, बुद्ध्या, आत्मना, वा, अनुसृतस्वभावात्, करोमि, यत्, यत्, सकलं, परस्मै, नारायणाय इति, समर्पयामि"

याचा अर्थ असा—मी जें जें कांहीं कायेनें, वाचेनें, मनानें, इंद्रियांनीं, बुद्धीनें, अहंकारानें, अनुसृत म्हणजे प्रकृति स्वभावानें करितों तें सगळें पर म्हणजे श्रेष्ठ, सर्वांचे पलीकडील नारायणाला म्हणून अर्पण करितों.

या श्लोकावर एकनाथ महाराजांनीं बरीच विस्तृत आणि बोधपर टीका केली आहे. ती सबंध टीका आम्ही वाचून संपवितांक्षणींच बापुसाहेबांना महाराजांचें बोलावणें आलें आणि ते निघून गेले. अर्थात

महाराजांनीं हा श्लोक व यावरील टीका ऐकण्यासाठींच बापुसाहेबांना पाठविलें हें उघड झालें. साहजिकच या श्लोकाचा आणि महाराजांनीं सांगितलेल्या "साडे सोळा" रुपयांचा कांहीं तरी संबंध असला पाहिजे, असें मनाला वाटूं लागलें. आणि असा संबंध लागतो कीं काय, या दृष्टीनें श्लोक पाहूं लागलों तों त्यांत साडे पंधराची बेरीज जमली ती अशी

काया १, वाचा १, मन १, इंद्रियें १०, बुद्धि १, अहंकार १, प्रकृति $\frac{१}{२}$ = १५$\frac{१}{२}$

ही बेरीज साडे पंधरा होते. पण महाराजांनीं साडेसोळा हा आकडा उच्चारला होता. महाराजांकडून चूक होणें शक्य नाहीं हा विश्वास पूर्ण असल्यामुळें नाथ महाराजांची टीका पुन्हां पाहूं लागलों तों त्यांत वरील सर्वांवर ज्या तऱ्हेचें विस्तृत विवेचन होतें, त्याच तऱ्हेचें वरील श्लोकांत नसलेल्या "चित्त" यावरही होतें. अर्थात श्लोकाच्या शब्दावरून जरी बेरीज साडे पंधराचीच होत होती, तरी नाथ महाराजांच्या टीकेवरून ती बेरीज साडे सोळाची झाली, आणि महाराजांनीं उच्चारलेल्या संख्येची सार्थकता पटली. नंतर, महाराजांनीं उच्चारलेल्या "साडे सोळा आण, नुसते सोळा आणूं नको" या शब्दांचें स्मरण झालें व त्या अर्ध्या म्हणजे प्रकृतीवर महाराजांनीं इतका जोर कां दिला, याचा विचार करूं लागलों त्यावर लगेच असें उत्तर सुचलें कीं, बाकीचीं कर्में हेतुपूर्वक होतात आणि तीं कदाचित् अर्पण होतील; पण प्रकृतिस्वभावानें जीं कर्में होतात तीं अर्पण करणें अत्यंत दुरापास्त आहे. मनुष्य निष्काम झाला कीं, हेतुपूर्वक कर्में त्याची थांबतील पण स्वाभाविक कर्में थांबणार नाहींत. तीं होतच राहतील. म्हणून अर्पण करण्याची किल्ली नाथ महाराजांनीं सांगितली आहे ती अशी, मी हें कर्म केलें आणि तें भगवंताला अर्पण करितो असें नसून, भगवंतच त्याचा कर्ता आहे आणि मी केवळ निमित्तमात्र आहे. एखाद्या मुनीमानें कोट्यावधि रुपयांचा व्यापार केला तो त्याचा नसून मालकाचा आहे, तसें मजकडून जे व्यापार होतात ते माझे नसून मालकाचे म्हणजे भगवंताचे आहेत. म्हणजे निष्कामत्वाबरोबर निरहंकारत्वही आलें पाहिजे. असें झालें म्हणजे सर्व कर्में मग तीं सहेतुक असोत किंवा स्वाभाविक असोत भगवंताचींच होतील आणि माझा म्हणून कोणताही व्यापार भगवंताला अर्पण करण्याचा संकल्प करण्याचें कारणच उरणार नाहीं.

## पंढरपूर येथील श्री साईनाथ महाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव.

ह. भ. प. दासगणू महाराज यांचा मुक्काम प्रतिवर्षी विजयादशमीला श्री क्षेत्र पंढरपूर येथें असतो. कारण श्री रखुमाबाईचे मंदिरांत नवरात्रांतील दररोजच्या कीर्तनाचें काम त्यांचेकडे आहे. दास गणूमहाराजांनीं दरसालप्रमाणें यंदाही आपल्या घरीं पुण्यतिथीचा उत्सव साजरा केला. प्रथम पवमान व रुद्राभिषेक करून महापूजा केली. नंतर श्रीसाईनाथ महाराजांचे तसबिरीपुढें रा. रा. वे. शा. सं. काशीनाथ शास्त्री उंबरकर या तरुण पुराणिक बोवांचें पुराण झालें या बुवांचे पुराण आम्हीं ऐकिलें आहे. यांची पुराण सांगण्याची शैली वाखाणण्यासारखी आहे. अस्खलित व प्रेमळ वाणी, उत्कृष्ठ दृष्टांतांचा साठा, भक्तिरसाचा वाहता ओघ, व सुसंगत विषय प्रतिपादन हे गुण यांचे ठिकाणीं एकवटलेले आहेत. पुराणानंतर तीर्थप्रसाद व ब्राह्मण भोजन झालें. पुण्यतिथीनिमित्त मंत्रघोष करण्यांत आला. या मंत्रघोषास निरनिराळ्या शाखेचे ६० विद्वान् ब्राह्मण आले होते. मंत्र म्हणणें दुपारीं २ वाजल्यापासून संध्याकाळीं ६ वाजेपर्यंत चालू होतें. याशिवाय पुराण चक्री झाली. चक्रीचा नियम असा आहे कीं, प्रत्येक पुराणिकानें एकेक श्लोक सांगणें. ह्या चक्रीच्या समारंभास एकंदर ४० पुराणिक आले होते. व त्यांचो पुराणें संध्याकाळीं ६ वाजल्यापासून रात्रीं १० वाजेपर्यंत झाली. हें सर्व कार्यक्रम संपल्यावर उत्सवसमाप्ति झाली.

---

यंदा ज्या घरांत हा उत्सव झाला तत्संबंधींची हकीकत श्री साईभक्तांना मनोरंजक वाटण्यासारखी आहे. दर वर्षीं पंढरीस यावें लागते तेव्हां तेथें एखादें लहानसें आपलें घर असावें असा विचार दासगणू महाराजांचें मनांत बरेंच दिवस घोळत होता. शेवटीं दोन वर्षांवर श्रीसमर्थांनीं त्या विचाराला मूर्तस्वरूप आणलें व चंद्रभागेजवळ एक घर आपल्या बेतांस पडेल असें दासगणू महाराजांचे आढळण्यांत आलें व तें त्यांनीं घेण्याचें ठरविलें. या घराबर दुसऱ्या लोकांचा डोळा होता व तें दासगणू महाराजांना न मिळतां आपणास मिळावें म्हणून त्यांनीं अंतस्थ कारवाई पण केली होती. परंतु दासगणू महाराजांनीं हें घर पाहण्यापूर्वीच श्रीसाईनाथ

महाराजांनीं तें त्यांच्याकरतां पसंत करून, त्या घरांत आपल्या तसबिरीच्या रूपानें प्रवेश करून कबजा घेऊन ठेवला होता. तेव्हां तें घर त्यांच्या शिष्याशिवाय दुसऱ्याला कसें लाभणार? घर घेतल्यावर दासगणू महाराज पाहतात तों तेथें आपल्या गुरूंची एक मोठी तसबीर आधींच विराजमान होऊन बसलेली होती. तिच्यासंबंधीं तपास करतांना असें कळलें कीं ही तसबीर रावसाहेब म्हसकरांची आहे. रावसाहेब म्हसकर हे ठाणें जिल्ह्यांत एका मोठ्या सरकारी हुद्यावर होते. ते श्रीसाईनाथ महाराजांचे भक्त असल्यामुळें त्यांनीं ही तसबीर तिकडे असतांना आणविली होती. सदर रावसाहेब म्हसकर 'रिटायर' होऊन आपल्या गांवीं (अंधळगांवास) जाण्याकरितां सर्व सामानासह श्रीक्षेत्र पंढरपुरास आले. त्यांनीं आपलें सामान रा. रा. अण्णा साहेब गोगटे यांचेकडे ठेविलें त्यांत हीं तसबीर होती. अण्णासाहेब गोगटे या घराच्या अगदीं शेजारीं राहातात. त्यांनीं म्हसकरांचें सामान या घरांत ठेवलें होतें. पुढें रा. म्हसकर आपले सर्व सामान, तसबिरीशिवाय, अंधळगांवास घेऊन गेले, व तसबीर नंतर टांग्यांतून नेऊं असें म्हणाले, त्या प्रमाणें २।३ वेळां ती तसबीर नेण्याचा त्यांनीं पुढें प्रयत्नही केला. परंतु आयत्यावेळीं कांहीं तरी अडचण यावी व तसबीर नेणें होऊं नये असें प्रकार झाले. व शेवटीं तसबीर तेथेंच राहिली. पुढें रा. म्हसकरही कांहीं दिवसानीं वारले व तसबीर राहिली ती राहिलीच. अशा रीतीनें त्या तसबिरीच्या रूपानें श्रीसाईनाथ महाराजांनीं त्या घराचा कबजा, घरखरेदी घेण्याच्या आधींच दोन वर्षे आपल्या भक्ताकरितां घेऊन ठेवला होता. या तसबिरीची नित्य पुजा अर्चा चालविण्याची व्यवस्था दासगणू महाराजानीं करून ठेविली आहे.

## श्री संस्थान शिर्डी येथील शके १८४५ चे गुरुपौर्णिमेच्या उत्सवाचा हिशोबः—

**जमा**

| | |
|---|---|
| ५०० | श्रीमंत बुटीकडून जमा ठरावाप्रमाणें |
| १२४॥-। | श्रीची पेटी उघडली तींत आले ते |
| २६५८=। | वर्गणी |
| ८८९॥=॥ | |

**खर्च**

| | |
|---|---|
| ५ | शेल्याची किंमत |
| ८≡ | वटाव मोगलाई रुपयाबद्दल |
| १।= | लेबलची किंमत |
| -॥।= | प्रसादाच्या पिशव्या सोबतच्या लेबलांची छपाई |
| ८ | कोपरगांवास गाडीभाड्यासाठीं व चहासाठीं झालेला खर्च |
| १८ | उत्सवाच्या आमंत्रण चिठ्या छापल्या त्यांची छपाई |
| १९॥ | नागपुराहून हरेराम स्वयंपाकी पाठविला होता त्यांचे रेलवे भाडें |
| १२॥-॥ | गलेफाबद्दल |
| १८ | पोस्टेज<br>८॥≡ आमंत्रण चिठ्यांस<br>८।-॥- प्रसादाच्या पिशव्या पाठविण्यास<br>१८८॥. किरकोळ<br>१८ |
| ७॥ | गाडी भाडें. |
| २१॥= | श्री संस्थानचा पांच दिवसांचा खर्च |
| १॥ | प्रसादाच्या पिशव्यांची व निशाणांची शिलाई |
| ३४२।=॥. | भोजन खर्च |
| ४५६॥-।. | |
| ४३३८-।. | शिल्लक. |
| ८८९॥=॥ | |

**श्री० रा० रा० गणेश गोविंद नरके एम. ए. ( कलकत्ता ) यांनी दि आनरेबल मि० गणेश श्रीकृष्ण खापर्डे आडव्होकेट उमरावती यांजला पाठविलेलें पत्र**

शिरडी ता. ५ नोव्हेंबर १९१८

श्री० दादासाहेब यांस

कृ० अ० शि० सा० न. वि. वि. आपण नागपूरला चि. केशवरावला पाठविलेलें पत्र त्यांनी इथें ती. बापूसाहेबांकडे पाठविलें व तत्संबंधीं माहिती बापूसाहेबांचे सांगण्या वरून आपणास देत आहें.

सप्टेंबर अखेर माझी पुण्याचे नोकरीची टर्म संपल्यावर मी इथें ता. २ आक्टोबरला आलों. त्या वेळीं श्रीसमर्थ अजारीच होते. ता. २८ सप्टेंबरचे सुमारास श्रीना ताप आला, व त्यानंतर सतरावे दिवशीं श्रीनीं देह ठेविला. ज्वर २।३ दिवसच होता. परंतु त्यानंतर प्रायोपवेशन केल्याप्रमाणें श्रीनीं अन्न वर्ज केलें. त्यामुळें दिवसें दिवस शरीरांत शक्ती मुळींच राहिली नाहीं. समर्थांचे कांहीं कांहीं उद्गार निर्याणसूचक होते. परंतु ते कोणाच्याच लक्षांत आले नाहींत. बाहेरील मंडळीपैकीं ज्वर आला तेव्हां फक्त काकासाहेबच इथें होते. परंतु लवकरच त्यांना आपण होऊन मुंबईस पाठऊन दिलें. पुढें समर्थांचे प्रकृतीचें वर्तमान ऐकून ते पुन्हां निर्याणाचे पूर्वी ३।४ दिवस एथें आले. १॥–२ वर्षांपासून नानासाहेब निमोणकर श्रीसमर्थांचे निकट राहून रात्रंदिवस सेवा करीत असत, हें आपणांस माहिती असेलच. ह्याशिवाय, बुटी, जोग भाटे, माधवराव वगैरे मंडळी शिरडीस होती. श्रीसमर्थांचे दिवसांतून दोन वेळ लेंडीवर, गांवांत भिक्षेला जाणें वगैरे क्रम, शरीर अगदीं विकळ होईपर्यंत चालूच होतें. तसेंच चावडींत जाणें वगैरे कायमच होतें. श्रीसमर्थ फेरी वगैरेला पायांनीच जात. परंतु दोन्ही बाजूला धरणारांना ( बापूसाहेब बुटी व निमोणकर ) बहुतेक श्रींना उचलूनच न्यावें लागे. पुढें निर्याणाचे पूर्वी १।२ दिवस ह्या फेऱ्या व सकाळची भिक्षा वगैरे बंद झाली. श्री समर्थ " चिंता करूं नका " वगैरे म्हणून सर्वांना धीर देत असत. प्रयाणाचे वेळेचा पत्ता कोणालाच लागूं दिला नाहीं. श्रीसमर्थ अखंड सावधान होते व शेवटले सेकंडापर्यंत सावध होते व धीर देत

होते. मंगळवारी ता० १५ आक्टोबरला दुपारचे आरतीनंतर बापुसाहेब काकासाहेब वगैरे मंडळींना घरोघर जेवावयास पाठवून दिलें. ही सर्व मंडळी मशिदींत श्रीसमर्थाबरोबर रोज जेवीत असत. ह्या दिवशीं अशा रीतीनें त्यांना घरोघर पाठवून आपण तिकडे इहलोक सोडून प्रयाण केलें. त्यावेळीं जवळ लक्ष्मीबाई (पाटलीण) बयाजी, भागूजी, बाळा शिंप्याचा लक्ष्मण, नानासाहेब निमोणकर व आणखीं कांहीं मंडळी हजर होती. माधवराव देशपांडे खालीं पायरीवर बसले होते. लक्ष्मीबाई पाटलीणीला खिशांतून कांहीं रुपये (९ रुपये) काढून दिले व थोड्या वेळानें म्हणूं लागले "अरे आतां मला इथें बरें वाटत नाहीं, वाड्यांत (बापूसाहेब बुटीचे दगडी वाड्याचा उल्लेख श्री "दगडी वाडा" "वाडा" ह्या शब्दानें करीत) घेऊन चला म्हणजे बरें वाटेल. हीच शेवटची आज्ञा व पुढें ह्याचप्रमाणें झालें, बयाजीचे अंगावर प्राण सोडला. श्रीसमर्थ नेहमीं प्रमाणें बसलेलेच होते. सबंध दुखण्यांत श्रीसमर्थ बसूनच असत. सावडींत थोडा वेळच कायतो थोडे लांब होत असत. श्रीचा श्वास हलका होऊं लागला. भागूजीचें लक्ष गेलें व त्यांनीं नानासाहेब निमोणकर खालीं बसले होते त्यांना सांगितलें. नानासाहेब पाण्याची झारी घेऊन समर्थांना पाणी पाजूं लागले तों पाणी तोंडांतून बाहेर येऊं लागलें त्या सरशी त्यांनी "देवा" म्हणून मोठ्यानें किंकाळी मारिली. श्रीनी एकदां डोळे उघडून पाहिलें व हलकेच "आ" म्हणून होकार दिला व प्रयाण केलें. मंगळवारीं (ता. १५ ला) दुपारी २॥ चे सुमारास देह ठेविला.

श्रीचे वाड्यांत नेण्याचे उद्गार लक्ष्यांत घेऊन सर्वांनीं बापूसाहेब बुटीचे वाड्यांत श्रीचा देह ठेवण्याचा बेत केला व त्याप्रमाणें देवळाचे गाभाऱ्यांत श्रीना समाधी देण्याकरितां खोदकाम सुरू झालें.सायंकाळीं राहत्याहून फौजदार वगैरे आले व हाच निश्चय कायम झाला. जेथें श्रीगोपाळकृष्णाच्या मूर्ति स्थापण्याचा बेत होता तेथेंच श्रींची समाधी झाली. त्या मजबूत गाभाऱ्यांत खोदकाम रात्रभर चालू होतें. दुसरे दिवशीं थोडें विघ्न आलें. सकाळीं मुंबईहून अमीरभाई आले व कोपरगांवचे मामलेदारसाहेबही येऊन पोंचले. फूट झाली. कांहीं मंडळी श्रीना बाहेर शेतांत घेऊन जाण्याविषयीं आग्रह धरून बसली. मामलेदार साहेबांनीं मतें घेतलीं, तेव्हां दोन

विरुद्ध एकमतें श्री० बापूसाहेबांचे वाड्यांत श्रींना ठेवण्याविषयीं दिसून आलीं. मामलेदार साहेब नगरचे कलेक्टराकडे प्रकरण सोंपवूं लागले व त्याप्रमाणें काकासाहेब दीक्षित नगरला जावयास सिद्ध झाले. तेव्हां श्रींचे प्रेरणेनें विरुद्ध मंडळीनीं अनुकूल मतें देण्याचें ठरवून सर्वानुमतें बापूसाहेबांचे वाड्यांत समाधी करण्याचा बेत कायम झाला. बुधवारीं सायंकाळीं एकादशीचे दिवशीं श्रींचा देह मिरवत आणून वाड्यांत देऊळाचे गाभारांत ठेवण्यांत आला. त्या जागेला आलेली शोभा आतां प्रत्यक्ष येऊन पाहिल्याशिवाय कळायची नाहीं. देऊळाचे गाभाऱ्याची लांबीरुंदी सुद्धां असावी तेवढीच भरली. वाड्याचें काम हातीं घेतलें तेव्हां श्रीसमर्थ इतकी पुढें शोभा करतील अशी कल्पनाच नव्हती. कल्पना होणार कशी! श्री नेहमीं म्हणत कीं "आम्ही वाड्यांत जाऊन राहूं" परंतु श्री हयात असतांना कोणाला ही पुढची इच्छा व्हावी ? वाड्यांत समाधीजवळ मन फार आनंदांत असतें. शिरडींत मनाला पूर्ववतच आनंद होतो. श्री० बापूसाहेबांचे भाग्याची थोरवी कोणी वर्णन करावी. प्रत्यक्ष देव घरीं येऊन बसले; देऊळ बांधलें. त्याचें श्रींनी सार्थक करून दाखविलें. इथें आतां पूजा, अर्चा सर्व प्रकार हिंदू तऱ्हेनें पूर्णपणें चालू आहेत. कसलीही आडकाठी होण्याचा संभव नाहीं. "भेट लोकांची" बाजू देवानीं संभाळली व स्वतःचा देह त्यांचे हवालीं केला. निर्याणाचे पूर्वी ४।५ दिवस सोनीचे आईला बोलावून श्रींनी सांगितलें होतें "आतां मला मशिदीचा कंटाळा आला, चावडीचा कंटाळा आला, आतां मी वाड्यांत जाऊन बसेन तेथें भेट लोक माझा सांभाळ करतील." जोगांचे ताईला ४।५ वर्षांपूर्वीच हात धरून आणून सांगितलें होतें "ही हगदोडीची जागा माझी आहे. इथें दगडी इमारत होईल तेथें मी बसेन-वगैरे" श्री समर्थांचे संकल्प पूर्वीच ठरलेले होते असें दिसतें. परंतु श्रींनीं कशाचाच कधींही उघड पत्ता लागूं दिला नाहीं. आंतून प्रेरणा करून सर्व काम करून घ्यावयाचें. असो फार आनंद झाला. श्री० बापूसाहेबांवर आतां विशेष जबाबदारी पडली आहे. देऊळाचें काम पुरें करावयाचें आहे. श्रींचे पूजेअर्चेला कायमचें स्वरूप द्यावयाचें आहे. तें आतां समाधी सोडून जातील असें मला वाटत नाहीं.

श्रीनीं निर्माण केल्यावर ठिकठिकाणीं दृष्टांत दिले. सकाळीं लक्ष्मण भटाला दृष्टांतांत येऊन सांगितलें कीं, "तो बापूसाहेब निजला आहे चल ऊठ माझी काकडआरती कर" त्याप्रमाणें लक्ष्मण भटांनीं स्नान करून बुधवारीं सकाळीं मशिदींत जाऊन देहाची पूजा आरती केली. पंढरपूरला मंगळवारीं दासगणूंचे दृष्टांतांत जाऊन सांगितलें कीं, "मशीद पडली माझे अंगावर "बक्खळ"फुले घालावयास या." ता २७ आक्टोबरला श्रीचे तेरावे दिवशींचा मोठा उत्सव झाला. ठिकठिकाणाहून भक्त मंडळी आली होती. भंडाऱ्याकरितां लाडवाचें प्रयोजन केलें होतें. भांडाऱ्याची वर्गणी रु० २४०० पर्यंत जमली होती. नानासाहेब चांदोरकर वगैरे सर्व मंडळी एथें जमली होती. पूर्वी श्री० राधाकृष्णाबाई गेल्यापासून भक्तमंडळींनीं वर्गणी करून " कोठी " ही संस्था चालविली होती. श्रीसमर्थांचे पूजेअर्चेचा सर्व खर्च त्यांतूनच चालत असे. ती कोठी अजूनही पूर्ववतच चालू आहे. तूर्त मंडळींनीं एक पंधरा इसमांची कमिटी नेमिली आहे. श्री० बापूसाहेब बुटींना तिचे अध्यक्ष निवडले आहे. व ते व्यवस्था करतील ती प्रमाण अशी व्यवस्था ता. २४ डिसेंबरपर्यंत ठरली आहे. नाताळांत ता. २४।२५।२६ला सर्व भक्तमंडळी एथें शिरडीला येणार आहेत तेव्हां श्रीचे संस्थाना करितां नियम वगैरे होऊन संस्थेला मूर्त स्वरूप देण्यांत येईल. तेवेळीं आपण एथें जरूर येण्याचें करतील. पत्र सविस्तर घाईघाईनें लिहिलें आहे. लिहिण्यांतील चुका माफ करतील. मी दोन तीन दिवसांनीं नागपूरास जाणार आहे. तेथें भेटीअंती आणखी वर्तमान सांगेन. कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला नम्र

गणपती नरके

ता० क०:—श्रीचा देह ३४ तासाचे वर राहूननही stiff झाला नाहीं. दुसरे दिवशीं तोंडांतून थोडें रक्त येत होतें, हात पाय इकडून तिकडे मोकळे हलत असत. कफनी फाडून काढावी लागली नाहीं. शेवटची कफनी गाडयांतच आपले वरीं आहे.

# ह. भ. प. दासगणु महाराजकृत श्रीसाईबाबावरील एक पद. नं. ६

हे पूर्ण ब्रह्म सुखधाम ज्ञानसागरा । गुरुराया हो मजविषयीं रोष न धरा ॥ ध्रु० ॥ ना तुला कधीं स्पर्शला क्रोध आजवरी । तूं साईक्षमेची मूर्ति साच भूवरीं ॥ मागुति धरुनि अवतार जान्हवी तीरीं । केलीस कृपा त्या परिक्षितीच्यावरी ॥ रंभा ती नाचली पुढें थया थया जरी । नाविकल्प चढला चित्तावरी ॥ हें असे विदित सकलास कशाला जरा । बोलणें तोचि तूं शुकाचार्य नरवरा ॥ १ ॥ तो तूंच पुढें गंगेंत शिंपल्यामधें । अवतार घेतला कबीर म्हणती बुधे ॥ संतार्थ वधू ओपिली वाणिया मती । बसविला विणाया शालुजानकीपति ॥ चरचरा पुत्र कापिला आपुल्या हातीं । पाहता प्रबंधा संत तुझ्या डोलती ॥ ठेवितां देह तो कलह माजला जरा । तयिं तूंच दाविलीं फुलें करुनि धीवरा ॥ २ ॥ पुनरपि सुवाटे प्रति लावण्या जगा । आलास साई होऊनी फसविना उगा ॥ पाण्यांत लाविले दिवे तेलना मुळीं । टांगिली जुन्या चिंध्यानीं निजाया फळी ॥ पेटतां खळें भक्तांचे आग विझ-विली । वांझेस करूनिया कृपा संतति दिली ॥ किती अगाध या तव लीला वानूं गुरुवरा । मौनेच जोडुनी कर पदीं ठेविन शिरा ॥ ३ ॥ मी पापी पतित आगळा दोष सागरू । तुजवीण कुणाचें स्मरण समर्था करूं ॥ गौतमी ओघ तृषितास दूर का धरी । कां शशी रुसुन बैसेल चकोरावरी ॥ कां काय जमीन ओझ्यास बघुनि भय धरि । वा अग्नि बघुनि गवतास पळतसे दुरी ॥ हें तुम्हीं सकल जाणूनि मनीं गुरुवरा । या दासगणूच्या शिरीं अभय कर धरा ॥ ४ ॥

## हरिभक्तपरायण दास गणूकृत

पद. नं. ७

खेळूं पोरारे चाल पोरा । अपरोक्षज्ञान भोवरा ॥ ध्रु० ॥ झाला वैराग्याची अरी । जाळी भक्तीची सांजिरी ॥ भावें फेकूं हा गरगरा । खेळूं पोरारे ॥ १ ॥ या भवऱ्याचा रंग । आहे अक्षय अभंग । भवीं वुडविल तुज ना जरा । खेळूं पोरारे ॥ २ ॥ याला गुच्याची ना भीती । नादें कळेल आत्मज्योती । रंगण ब्रह्मांडाचें करा । खेळूं पोरारे ॥ ३ ॥ गणु म्हणे ऐसा भोंवरा । पाहिला मी साईकरा । पहा शिर्डींत जाऊन नरा । खेळूं पोरारे॥४॥

## ह. भ. प. दासगणूशिष्य दामूअण्णा विरचित.

पद. नं. ८

त्वरित पदरीं घे साई । ठायीं, करुकायी, मज नाहीं, भो तुजविणरे गुरु माई ॥ धृ० ॥ संकटनाशक नाम तुझें हें । ऐकुनिया बहु आनंदची मज होई ॥ १ ॥ चरणरजातें सेऊनियां ॥ त्वरित पदरीं घेई ॥ हा दास गणूचा छात्र लीन तव पायीं ॥२॥

पद नं. ९

सुजन विबुध नर साई । समयीं निजपदीं द्या ठावा ॥धृ०॥ अनंत मी अपराधी वुडतों सत्पथ मज दावा ॥ १ ॥ चाल ॥ तव साई, चरणाची, मज वरची द्या सेवा ॥ दास गणूचा दीन छात्र हा निजकर शिरीं ठेवा ॥ २ ॥

## सौ. कृष्णाबाई विरचित.

पद. नं. १०

सांईनाथपदीं लीन सदोदीत ॥ सांईनाथ पदीं लीन ॥ धन्य शिरडी परब्रम्ह वसे त्या ॥ गाऊं कशी मतिहीन सदोदीत ॥ सांईनाथ पदीं लीन ॥ १ ॥ साधु चरित्रें गातां थकले । संत सनकादिक सदोदीत ॥ सा. ना. पदीं लीन ॥ २ ॥ देवि सरस्वती वास जिव्हाग्रीं ॥ कविवरहि मती हीन सदोदीत ॥ सा. ना. पदीं लीन ॥ ३ ॥ कांहीं असो मी मम प्रभूतें ॥ हृदयीं धरूनी गाईन सदोदीत ॥ सांईनाथ पदीं लीन ॥ ४ ॥

## ह. भ. प. दासगणूशिष्य दामूअण्णा विरचित.

पद. नं. ११

मन हें मजसी आकळेना । पदरीं दीना घे सांई ॥ भवभय डोहीं किमपी दयाळा बुडों नेदी भो मज लागीं ॥ पापि अती मी नको दोष बघूं मम कांहीं ॥ पदरीं ॥ १ ॥ दीनानाथ तव ब्रीद गाजलें म्हणुनी धावलों तव पायीं ॥ धरिना अही या मनीं ब्रीद जतन करी कांहीं ॥ पदरीं ॥ २ ॥ झडप घालिती षड्रिपु गजअरि । जेवि भुजंग दर्दुर दडपी ॥ मज ना दकली किती माथूं तुजली गुरु माई ॥ पदरीं ॥ ३ ॥ दीन दयाळा ख्यात जगतीं हे पतितोध्दारा अवतरसी ॥ तारि सतत गणु छात्र लीन तव पायीं ॥ पदरीं ॥ ४ ॥

श्री साईनाथप्रसन्न.

(५४)

पार्ल्यास पंजाब्याच्या चाळींत खिमजी लालजी जोशी या नांवाचे गृहस्थ राहत होते. त्यांची मुलगी बरेच दिवस अजारी होती. एके दिवशीं ती अत्यावस्थ झाली, तेव्हां तिची आई आमच्या घरीं येऊन महाराजांची उदी घेऊन गेली. त्या उदीनें तिला तावडतोब थोडा गुण आला. पुढें खिमजी मुलीला व बायकोला घेऊन शिर्डीला गेले. मुलगी इतकी अशक्त होती कीं तिला चालवत नव्हतें. हातापायाच्या अगदीं काड्या झाल्या होत्या. तिला एका माणसानें उचलून महाराजांजवळ नेऊन बसविलें. महाराजांनी तिला उदी लाविली व आशिर्वाद दिला. दोन चार दिवसांत ती आपल्या पायानें चालूं लागली. मात्र उठतां बसतांना तिला त्रास होत असे. मग तिनें महाराजांकडे त्याबद्दल गाऱ्हाणें केलें व तेव्हांपासून उठण्याबसण्याची अडचणही दूर झाली.

(५५)

रा. शांताराम बळवंत नाचणे डहाणूकर यांचे अनुभवः—

इ. स. १९०९ सालीं मुंबईस माझ्या वडील बंधूच्या गळ्यावर 'आपरेशन,' करविलें होतें. ऑपरेशनचें ठिकाण अगदीं श्वास नाडीजवळ असल्यामुळें आम्हां सर्वांना फार काळजी वाटत होती. याप्रमाणें डहाणूस मी काळजी करीत बसलों असतां रा. हरीभाऊ मोरेश्वर फणसे मजकडे आले व मला आपण होऊनच म्हणाले कीं, श्रीसाईकृपेनें बेडापार आहे तुझ्या दादाचें ऑपरेशन चांगले झालें असें माझो मनोदेवता मला सांगत आहे. श्रीसाईबाबांची मला जी प्रथम माहिती झाली, ती याप्रमाणें व बंधूचें आपरेशन चांगलें झाल्यामुळें माझे मनांत त्यांचेविषयी बराच आदर उत्पन्न झाला. पुढें १९११ सालीं नोकरी निमित्तानें वांद्यास रा. [illegible] साहेब दाभोळकर यांचेकडे माझें जाणें झालें. त्यांचेयेथें श्रीसाई[illegible] तसबीर मी प्रथम पाहिली व त्या तसबिरीकडे माझें चित्त [illegible]त्रें [illegible]बर असलेल्या इसमास विचारल्यावरून ती तसबीर श्रीसाई

बाबांची आहे, असें समजलें. मीही साईबाबांचा एक फोटो मिळवून त्याची उदबत्ती ओवाळून उपासना चालविली. पुढें एक वर्षानें अनायासें योग येऊन श्रीसाईबाबांचे दर्शनही झालें. १९१२ साली रेव्हिन्यु सबॉर्डिनेट परिक्षेच्या वेळीं, मी रा. शंकर बाळकृष्ण वैद्य व रा. अच्युत दाते असे बरोबर ठाण्यास गेलों. परिक्षा आटोपल्यावर परभारें शिर्डीस गेलों. कोपरगाव स्टेशनवर उतरल्यावर तांग्यासंबंधीं स्टेशन मास्तरजवळ तपास करतां, मास्तरानीं आमचे प्रश्नाचा जबाब देण्याऐवजीं साईबाबांचीं निंदा चालविली. तिकडे लक्ष न देतां तांगा करून आम्हीं शिर्डीस तर गेलों. परंतु इतकें श्रद्धावान माझें मन पण तेंही पापग्रहानें डळमळलें. भलते भलते कुतर्क येऊं लागले. स्टेशन मास्तर म्हणाले तेंही खरें असेल का? आपण येवढें लांबून येथवर जे आलों ते अगदीं अंधश्रद्धेनेंच आलों. हे विचार माझ्या मनांत चालू असतांना श्रीसाईबाबांची स्वारी लेंडीहून परत आली. आम्हीं बाळाभाऊच्या घराचे मागें उभे होतों. तिकडे बाबांची दृष्टी वळतांच इतर लोकांप्रमाणें मीही त्यांनां नमस्कार घातला. मला पाहून बाबा म्हणाले अरे, मामलेदाराची रजा न घेतांच आलास काय? मी होय म्हणून उत्तर दिल्यावर ते म्हणाले असें करूं नये. ही ओळख दिल्यावर माझे मनांतील त्यांचेविषयींचा आदर वाढून श्रद्धा बसूं लागली. त्या वेळीं डहाणू येथें श्री. बी. व्ही. देव हे मामलेदार होते. मी ज्यास्त दिवस लाविल्याबद्दल त्यांनीं मला ताकीद दिली कीं, पुन्हां असें झाल्यास दंड होईल. तथापि वरील कारणामुळें दिवस मोडले हें मी त्यांनां कळविलें नाहीं.

आम्हीं शिर्डीस जाण्यापूर्वीं मुंबईस गेलों होतों. तेथें शेजारीं हरीभाऊ फणसे मोहन बिल्डिंगमध्यें चौबळ यांचे घरीं आले होते. त्यांना एका फौजदारी केसमध्यें सहा महिने सक्त मजूरीची शिक्षा झाली होती, व मुंबईस ते जामीनावर सुटून अपीलाकरितां आले होते. मी शिर्डीस जात आहें असें त्यांना कळविल्यावर ते मलाच नमस्कार करून म्हणाले कीं श्रीगुरु माउलीस माझी हकीगत कळीव. मी निरापराधी असून मला निष्कारण शिक्षा झाली आहे. हा निरोप सकाळीं मी कळविल्याचे

दिलें होतें. परंतु पहाटेची काकडआरती आटोपल्यावर बाबा अति रागांत असतानांच मला म्हणाले "त्याला म्हणावें तूं अपिलांत सुटशील. काळजी करूं नको." हा जबाब मी फणशांना कळविला तेव्हां त्यांच्या अपिलाचा निकाल होऊन ते सुटले होते.

आम्ही शिर्डीहून आल्यानंतर डहाणूस आमच्या समवयस्क मित्रांपैकीं गोपाळ केशव वैद्य हे शिर्डी येथें जाऊन आले व त्यांनीं आपले वडील बंधू आत्माराम केशव वैद्य यास शिर्डीस बाबांच्या दर्शनास आण्याविषयीं कळविलें. वैद्य ह्यांचे वय ते शिर्डीस गेले त्या वेळी ४२ वर्षांचें होतें व त्यांच्या कुटुंबाचें वय ३८ वर्षांचें होतें. कांहीं पिडेमुळें लग्न झाल्यापासून त्यांच्या कुटुंबानें आपल्या नवऱ्याचें तोंड पाहिलें नव्हतें. तिनें घरीं नांदावें म्हणून दोन्ही तर्फेच्या मंडळीनें शिकस्त केली परंतु तिनें आपलें माहेर सोडिलें नाहीं. परंतु शिर्डीचा प्रसादच तो त्या बाईस दिल्या बरोबर त्याच दिवशीं ती होऊन घरीं आली व धाकटे दीर (गोपाळराव) यांस म्हणाली आपलें जें घर तेंच खरें. माहेरीं कांहीं सुख नाहीं. तेव्हां त्यालाही आपल्या वहिनींच्या तोंडून वरील उद्गार ऐकून आश्चर्य वाटलें आतां हें दंपत्य सुखानें नांदत असून त्यांना मुलें झालीं आहेत.

सन १९१४ सालीं मी डहाणू येथें तिजोरी मास्तरचे काम करीत असतांना आम्ही मारुतिरायाच्या देवळाजवळ एका भाड्याच्या घरांत रहात होतों. तिथें एक रामकृष्ण बळवंत फणसे नांवाचा तलाठी रहात असे. त्याचे कांहीं कारणानें डोकें फिरलें होतें. हे गृहस्थ एक दिवस आमच्या स्वयंपाकखोलीच्या दरवाज्याजवळ येऊन उभे राहिले. मी त्याच खोलींत पूर्वाभिमुख घरच्या पंचायतनाची व श्रीसाईबाबांच्या फोटोची पूजा करीत होतों माझी त्याचेकडे नजर गेली तोंच त्यानें उडी मारून तो माझा गळा दाबूं लागला. व तोंड माझ्या कंठाजवळ आणून मी तुझ्या नरडीचा घोट घेतों असें म्हणून चावण्याचा प्रयत्न करीत होता. त्यावेळीं आत्मसंरक्षणास साधन संवेची पळी मिळाली, तिचा दांडा त्याच्या तोंडांत सारला परंतु त्याच्याबरोबर माझे उजवे हाताचा आंगठा

व त्याचे जवळील बोट असें त्या इसमाचे तोंडांत त्यापळी बरोबर गेलें. त्या बरोबर त्यानें तोंड बंद केलें व करकरून चावलें. त्यामुळे आंगठ्यास इजा झाली व गळा दाबण्याच्या प्रयत्नामुळें त्याचे बोटाचीं नखें लागून त्या ठिकाणीं रक्त आलें, मला बराच वेळ शुध्दी नव्हती. डाक्तरी उपायानें मी शुध्दीवर आलों व मला समजलें कीं, माझा धाकटा बंधु रघुनाथ हा घरांत आल्यावर त्यानें व अखंड सौ. मातोश्रीनें मला त्याचे हाताच्या गळ्यास बसलेल्या बिचीतून सोडविलें. नंतर पुनः जेव्हां मी शिर्डीस गेलों तेव्हां श्रीसाईबाबांनीं त्यासंबंधीं दुपारचे बैठकींत ओळख दिली. मी बसलों असतां अण्णा चिंचणीकरानां बाबा मजकडे पाहून म्हणाले कीं, अण्णा, माझी जर थोडी दिरंगाई झाली असती, तर हा गेलाच होता. वेड्यानें अगदीं नरडीसच हात घातला होता. परंतु त्याला सोडविला. काय करावें आपलीं पोटचीं लेंकरें त्यानां मी न वांचविलें तर दुसरें कोण वाचवील हे श्रीसमर्थांचे उद्‌गार ऐकून मी गहींवरून गेलों. शिर्डीस आमच्या शेजारचे चौबळांची आई के. आनंदराव क. चौबळ यांजबरोबर शिर्डीस गेल्या होत्या. सदहू बाई पूर्वीच्या काळच्या असोन अति हुषार आहेत. त्यांनी आनंदरावास म्हटलें कीं, एक रुपयाचे पैसे सुटे असल्यास द्या; एक आठ आणे बाबांचेपुढें ठेऊं. रुपयाचे सुटे पैशांत त्यांनां २ पावल्या व अधेली मिळाली. म्हातारीनें बाबांसमोर पावली ठेवून नमस्कार करून जाऊं लागली तों लगेच बाबांनीं तिला हाक मारून म्हटलें आणखी चार आणे दक्षिणा माझ्या गरीब ब्राह्मणाची कां बुडवितेस तेवढी देऊन टाकना तेव्हां ओशाळी पडून तिनें आणखी एक पावली बाबांस दिली.

आमच्या शंकररावाच्या मातुश्री पंढरपुरास जाण्यास निघाल्या होत्या. त्यांनीं ठरविलें कीं, शिर्डीवरून जाऊं. म्हणून त्या श्रीसाईदर्शनात गेल्या. तिथें गेल्यावर बाबा म्हणाले "घरींच परत जा" असें म्हणून त्यांना उदी घेण्यास सांगून घरीं जाण्याची परवानगी दिली. बाईनें पंढरपुराचा बेत रहीत करून उदी घेऊन शिरडीसच पंढरपूर केलें. गांवीं आल्यावर सामान ठेवून आम्हांस प्रसादाकरितां उदीची पुडी शोधूं लागल्या तों ती पुडी न सांपडतां बुक्क्याची पुडी पंढरपूरप्रमाणें

सुगंधी अशी मिळाली ती दाखवून म्हणाली अरे उदीची पुडी नाहीं, परंतु ह्यांत एक बुक्याची पुडी आहे, आम्ही म्हटलें तुम्ही खरेंच पंढरपूर केलेंत तुम्हांस बाबांनी योग्य तो प्रसाद दिला.

आम्ही पुन्हां १९१५ त शिर्डीस जाण्याचें ठरविलें. त्यावेळीं बरोबर कुटुंब व कुटुंबाच्या मातोश्री आणि शंकरराव असे होतो. वाटेत रेल्वेंत असतां रा.वासुदेव सीताराम सामंत व्हेटर्नरी व सॅनिटेशन खात्याचे इन्स्पेक्टर, हे वसई स्टेशनवर भेटले. त्यांनीं विचारल्यावरून त्यांस मी माझा मानस कळविला. त्यांनीं दोन आणे मजजवळ देऊन म्हटलें माझे तर्फेनें श्रीबाबांस एक नारळ चढवून राहील त्याची कापुर उदबत्ती करा. मी पैसे घेऊन ठीक आहे असें म्हणालों परंतु त्याचें मला विस्मरण पडलें निघण्यास रजा मागितली तेव्हां बाबा म्हणाले ठीक आहे जा परंतु चितळीवरून जा. पण गरीब ब्राम्हणास २ आण्यांनीं फसवूं नकोस. तेव्हां मला आठवण झाली व मी वरील गृहस्थांनी सुचविल्याप्रमाणें दीड आण्याचा नारळ एक पैशाचा कापूर व पैशाची उदबत्ती वाहिली. तेव्हां पुन्हा रजा विचारतां हांसून म्हणाले आतां जा. ज्याचीं कामें पत्करलीं त्याचीं चोख बजावित जा नाहींपेक्षां पतकरूं नकोस.

एके वेळीं मी शीर्डीस असतानां शंकरराव दर्शनास आले. बाबांनीं त्यांचे जवळ १५ रुपये मागितले. त्यांच्याजवळ रुपये नव्हते त्यामुळें हिरमुसलेंसें तोंड करून शंकरराव गेले. पुन्हां हिरमुसलेले शंकरराव आले तेव्हां बाबा त्यांचे जवळ ३२ रुपये मागूं लागले. पुन्हा शंकरराव तोंड हिरमुसलें करून परत फिरूं लागले, म्हणून मला हांसू आलें. मी त्यांस थांबण्याची खूण केली व त्यांनां म्हणालों तूं असें कां करितोस तूं सांग कीं माझेजवळ रक्कम नाहीं. उत्तर न देतां परत जातोस म्हणून बाबा पुन्हां पुन्हां मागतात. म्हणून आतां जबाब देण्याची हिंमत धरून शंकरराव आला तेव्हां बाबांनी ६४ रुपये मागितले. शंकर व मी म्हणालों "बाबा एवढी रक्कम आहे कुठें आमच्याजवळ" ? बाबा म्हणाले "तर मग मागा लोकांकडून व पाठवा म्हणजे झालें" पुढें कांहीं दिवसांनीं बाबा अजारी झाले म्हणून सताह सुरू केला भंडारा वगैरेकरितां मदत

म्हणून कोणास जें तुळशीपत्र देणें असेल तें देण्यांत. याचें असे डहाणूस वामन बाळकृष्ण यांस पत्र वांद्रे येथून रा. साईभक्त जी. आर. दाभोळकर ह्यांचें गेलें. वामनरावांनीं सदहू कामगिरी आपल्या धाकटया भावास (रा. शंकररावास) सोपविली व त्यांनीं मला कळविलें. गांवांत आपल्या साईभक्त मंडळींस पत्र दाखविलें व वर्गणी जमा करूं लागलों ती बरोबर ६४ रुपयेच जमली म्हणून वरील शिर्डीच्या खेपेबद्दल कौतुक वाटलें

सन १९१५ सालीं मी व शांताराम मोरेश्वर फणसे २१ मार्चच्या दिवशीं सरकारी कामास जाऊन, परत येत असतांना वाटेत भयंकर जंगलांतून रात्रीं बैलगाडीनें येत होतों. डाहाणू तालुक्यांतील रानशेतच्या खिंडींत आमची गाडी येतांच बैल मस्ती करूं लागले. गाडी मागें मागेंच लोटूं लागले. असें कां होत आहे म्हणून आम्ही तपासूं लागलों परंतु कांहींही कारण कळेना. एका बाजूस पहात असतां गाडीच्या पूर्व व दक्षिण बाजूस असलेल्या सडकेपलीकडे एक कडा तुटलेला असून जर कां गाडी तिकडे थोडी जरी झुकती, तरी गाडीबैलसकट आमचा कडेलोटच व्हावयाचा. इतक्यांत शांतारामानें मला समोर पहाण्यास बोट दाखविलें व माझेंही लक्ष समोर गेलें तों एक भयंकर वाघ दक्षिणेकडे तोंड व उत्तरेकडे शेपटी ठेवून गाडीकडे टवकारून बघत असलेला दिसला. इकडे मागील बाजूस उतरून गाडीच्या चाकास ठेप न दिल्यास थोडी जरी बैलांची धडपड झाली, तर गाडी कडयावरून खालीं पडणार व उतरलें तर पुढें हा क्रूर प्राणी आपसरून तयार. फणसे हे थोडे धीट स्वभावाचे होते. त्यांनीं मला बैलांच्या पागा धरण्यास सांगितलें. माझी पागा धरून बसण्याची हिंमत होईना व एक बैल तर अगदीं पुढले पाय मोडल्यासारखें करून बसूं लागला. काय करावें हें सुचेना माझा तर घसा अगदीं कोरडा ठणठणीत पडला. परंतु पूर्व सुकृतानें त्यावेळीं श्रीगुरु काय करतील तें खरें व साईच संकट निवारोत असा विचार येतांच त्या गाडींतून, श्रीबाबांस "जय श्रीसाईबाबा हे साई बाबा धांवा!" म्हणून ओरडलों तेव्हां पंचाननाची स्वारी उठून गाडीकडेच तोंड करून आमच्या उजव्या हाताच्या बाजूनें उडी मारून, त्यानें प्रयाण केलें.

माझें एक सारखें ओरडणें चालूच होतें वाघ उजव्या बाजूस येतां-क्षणीं बैल अति घाबरले होते, बैल खूप वेगानें पळुं लागून त्या संकटांतून त्यांनीं आपली व आम्हा सर्वांची सुटका केली. त्यांनीं असें म्हणण्यापेक्षां सद्गुरू नामस्मरणानेंच हें अरिष्ट टळलें.

डहाणूस प्लेग होता म्हणून आम्ही राई नांवच्या एका खेड्यांत राहात होतों. तिथें रा.रा. रावजी सखाराम वैद्य यांचा मोरू नांवाचा लहान मुलगा एकदम भयंकर आजारी झाला, म्हणून त्यांचा वडील मुलगा माझे वडील आहेत कीं कसें हें पहाण्याकरितां आला. माझे वडील वैद्यकी करतात. वडील घरीं नव्हते म्हणून त्यास डाक्तरचे तुह्मी औषध द्या असें म्हटलें परंतु माझेजवळ श्रीसाई प्रसाद उदी आहे ती लावून बघा म्हणून मी त्यास उदी दिली ती लाविल्यावर मुलगा औषधावांचून हुशार झाला.

डहाणूस परशराम आपाजी नाचणें नावांचे एक तलाटी आहेत. हे एकदां अजारी झालें. त्याचे पूर्वी ते शिर्डीस जाऊन आले होते. तें दुखणें सन्निपाताचें होतें व डाक्तरांनीं व वैद्यांनीं (आमच्या वडीलांनीं सुद्धां) आशा सोडली होती. परंतु परशरामानें एक सारखे बाबांचा फोटो जवळ ठेवून तुपाचा दिवा लावण्यास सांगावें व उदवत्ती लावून ठेवण्यास आईस सांगावें, आईनेंही दिवा लावून बाबांस कळवावें कीं, मुलगा बरा होऊंदे त्याला बरा झाल्याबरोबर तुमच्या दर्शनास पाठवीन. त्या नवसास साईनाथ पावले व परशुराम बरा झाला. आतां त्याला मुलें झालीं आहेत. पूर्वीपेक्षां जास्त सुखी आहे. रा. रा. गणेश दि. वैद्य ह्यांनीं एकदां साईलीलेच्या गोष्टी चालल्या असतां, मला आपला अनुभव कळविला कीं, एकदां त्यांच्या धाकट्या मुलीच्या लग्नाच्या वरशोधनाच्या वेळीं त्यांस सकाळीं उजाडतां उजाडतां स्वप्न पडलें. त्यांत श्रीबाबांनीं आपलेकडे बोट दाखवून म्हटलें काळजी कां करितोस केशव दीक्षीत ह्यांचा मुलगा आहे. त्याचे पूर्वी ह्या मुलास त्यांनीं मुळींच पाहिलें नव्हतें. परंतु जागे झाल्यावर ते तपास करूं लागले व स्वप्नांत ह्या मुलाबरोबर आणखी एक मुलगा पाहिला परंतु त्याचें नांव गांव कळलें नव्हतें. परंतु त्यानीं मुलांचे जवळ स्वप्नांत पाहिलेल्या मुलाचें वर्णन करून नांव दीक्षीत आहे व त्याच्या बापाचें नांव केशव आहे तर

असा मुलगा कोणी पाहिला आहे कीं काय? त्यांचा धाकटा मुलगा दत्तू यानें कळविलें कीं, आमच्या ऑफीसांत असा मुलगा आहे, परंतु नांवगांव वगैरेंची माहिती काढून कळवीन. त्यावेळीं स्वप्नाप्रमाणें सर्व बरोबर वस्तुस्थिति होती. हे केशवराव दीक्षित रा. रा. गोविंदराव दाभोळकरांचे साह्यानें नोकरीस लागून हल्लीं सरकारी पेन्शनर आहेत वैद्यांचा व गोविंदराव दाभोळकरांचाही चांगला घरोबा आहे तात्पर्य या वधूवरांचा योग श्रीच्या त्या स्वप्नाप्रमाणें जुळून त्यांचें लग्नही जमून तीं दोघें आज सुखांत नांदत आहेत.

---

( अंक १०. पा. ८५ वरून पुढें चालू. )

महाराजांनीं वरदहस्त ठेविल्यावर विन्हार्डी गेलों व श्लोक पुरे केले ते 'साईनाथसगुणोपासना' या पुस्तकांत दिले आहेत व त्या संबंधाची हकीकत श्रीसाईलीला अंक ५ मध्यें आलीच आहे.

## आत्मस्वरूप दर्शन.

आत्म्याचें स्वरूप कसें आहे, असें कोणास विचारलेंतर तें अमुक प्रकारचें आहे, असें कोणीही सांगू शकत नाहीं. कारण ती अनिर्वाच्य वस्तु आहे; पण 'स एवाधस्तात् उपरिष्टात् पश्चात् पुरस्तात् दक्षिणतः सउत्तरतः सएवेदं सर्वमिति' अर्थ 'आत्माच खाली आहे, वर आहे, पाठिमागें आहे पुढें आहे उजवीकडे, डावीकडे आत्माच आहे. हें सर्व आत्माच आहे.' असा श्रुतिमाउलीचा उपदेश आहे. ( छां. अ. ७ खं० २५ ) याप्रमाणें आत्म्याचें सर्वव्यापकत्व सांगून जरी त्याचें स्वरूप सांगण्यासारखें नाहीं तरी त्याच्या दृश्य रुपावरून मनुष्यानें त्याच्या स्वरूपाची कल्पना करावी, याकरितां 'नतत्र सूर्योभातिन चंद्र तारकं नेमाविद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः। तमेव भान्त मनुभाति सर्वं तस्यभासासर्वमिदं विभाति' अर्थ—ज्याच्याठिकाणीं सूर्य प्रकाशत नाहीं चंद्र आणि तारका प्रकाशत नाहींत, विजाप्रकाशत नाहींत. मग अग्नि कोठून? तो प्रकाशत आहे म्हणूनच त्याच्या मागून हें

सर्व प्रकाशत आहे. त्याच्याच प्रकाशानें हें सर्व प्रकाशतें. (श्वेताश्वरोपनि. अ. ६ मं. १४ काठकोपनिषद अ. २ वल्ली २ मं. १५ ) अशाप्रमाणें श्रुतीनें उपदेश केला. पण हेंही स्वरूप पहावयास न मिळाल्यामुळें त्याचें यथार्थत्व वाटलें नाहीं. पण ' आदित्य त्नस्यरे तसोज्योतिः पश्यंतिवारम्' अशी श्रुति वाचण्यांत आली, तिचा अर्थ ' जगाच्या पुरातन अशा बीजाची आदित्याप्रमाणें असलेली ब्रम्हरूपी ज्योती ब्रह्मज्ञानी प्रत्यक्ष पहातात.' (छां. अ. ३ खं १७ मं. ७ ) या वाक्यानें तिचें अयथार्थत्व नष्ट झालें. पण दुसरी एक चिंता उत्पन्न झाली कीं, आपण तर ब्रह्मनिष्ठ नाहीं मग हें स्वरूप कसलें दिसतें अशा चिंतेंत होतों. आत्म्याचीं प्रकाशमान किरणें शरीराच्या बाहेर प्रकाशित होतात. व तीं किरणें अत्यंत पुण्यवान पुरुषाच्या दृष्टीस पडतात अथवा सत्पुरुषाची कृपा झाली, तर दृष्टीस पडतात. पण तेवढी आपली योग्यता नसल्यामुळें त्या बाबासंबंधानें निराशाच करावी लागली. आतां राहिली ' सत्पुरुषाची कृपा , मग असे सत्पुरूष कोण भेटणार व त्यांची कृपा केव्हां होणार ही चिंता रात्रंदिवस लागली पण ' तुकाम्हणें नाहीं चालत तातडी ॥ प्राप्त काल घडी आल्याविण,' या संताच्या म्हणण्याचें स्मरण झाल्यावर मनाची थोडी स्थिरता झाली. पुढें श्रीसच्चिदानंदाचे कृपेनें शिर्डीस जाणें होऊन श्रीसाईबाबांचें दर्शन झाल्यावर त्या वेळेस हेच श्रीसच्चिदानंद होत अशी भावना झाली, तेव्हां पुनः त्या आत्मस्वरूप दर्शनाच्या जिज्ञासेनें उचल खाल्ली व याबद्दल बाबांना कांहीं प्रश्न करावे असें मनांत आलें. पण अनेक वेळां बाबा 'तेली लबाड, हें तेल नही खाना घी खाना' असें म्हणत असत. पण त्याचा अर्थ मला समजेना. पुढें कांहींदिवसांनी माझी तळमळ शांत झाली. तेव्हां समजलेंकीं तेलाप्रमाणें तरंग उठविणारें मन लबाड आहे शांतिरूपी घृत सेवन केल्यानें लाभ होतो. व तो खरोखर झाला. एके दिवशीं श्री० बळवंतराव खापर्डे व मी प्रातःकाळीं फिरावयास गेलों होतों. त्या दिवशीं धुकें फार पडलें होतें. नुकताच सूर्योदय झाला होता. जातां जातां पश्चिमेकडे माझी सहज नजर गेली तों मी अंगुष्ठापासून ब्रह्मांडपर्यंत सूर्य किरणाच्या निरनिराळ्या रंगीत

प्रकाशांनीं व्याप्त झालों असें दिसलें माझी पडछाया लांबच लांब जमिनीवर पडून तिच्या सभोंवती दीर्घ वर्तुलाकार अंडाकृति इंद्रधनुष्याचें वेष्टन पडलें. व ज्याप्रमाणें सूर्यग्रहणाचे वेळेस सूर्याचीं किरणें बाहेर-पडून प्रभाकिरीटि-मंडल उत्पन्न होतें त्याप्रमाणें त्या छायेच्या मस्तकासभोंवतीं प्रभाफाकली होतीं. चमत्कार पाहून त्यावेळेस तो किती आनंद झाला त्याचें वर्णन करणें मला अशक्य आहे. तो चमत्कार पहात मीं उभा राहिलों. इतक्यांत बळवंतराव म्हणाले कां हो उभे कां? मीं म्हणालों तुम्ही कां उभे? ( कारण तेही मजप्रमाणेंच चकित होऊन उभे होते ) तेव्हां त्यांनीं माझ्याप्रमाणेंच आपली हकीगत सांगितली. माझी छाया तुम्हास दिसते काय, असें मी त्यांना विचारलें तेव्हां नाहीं म्हणून त्यांनीं उत्तर दिलें. ( उन्हांत पडलेली पडछाया कोणाचीही कोणास दिसत असते. पण आम्हा उभयतांपैकीं कोणाचीही छाया व तो चमत्कार एकमेकास दिसत नव्हता. ) तेव्हां 'मेरा-मैजानु' या संत वचनाची आठवण झाली. मार्गानें जाणाऱ्या इतर मनुष्यास 'तुम्हास कांहीं दिसलें का' म्हणून विचारलें असतां, ते नकारार्थीच पाढा वाचीत. हा चमत्कार बराचवेळ पाहिल्यावर बिऱ्हाडीं आलों व दादासाहेबांना ही हकीगत सांगितली तेव्हां ते म्हणालें ही बाबांची कृपा. तुम्हास आत्मस्वरूप दाखविलें. त्यानंतर बाबाकडे गेल्यावर आमचेकडे पाहून बाबा हांसले; तेव्हां दादासाहेबांचें म्हणणें खरें वाटून ही बाबांचीच कृपा अशी खात्री झाली. तरी हा धुक्यांतील सृष्टिचमत्कार असावा अशी शंका घेऊन प्रत्येकवेळे धुक्यांत हा चमत्कार पहाण्याकरितां बळवंतरावाला सांगून मीही त्या प्रयत्नांत राहिलों. मला तर तो चमत्कार दिसलाच नाहीं, पण बळवंतराव यांना विचारलें असतां ते म्हणाले, मी पुष्कळवेळ धुक्यांत उभे राहून पाहिलें, पण शिर्डीप्रमाणें चमत्कार एकही वेळेस दिसला नाहीं. सारांश श्रीसच्चिदानंद साई-बाबांनीच हें आत्मस्वरूप दर्शन दिलें. असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं व 'सत्य संकल्पाचा दाता भगवान् सर्व करी पूर्ण मनोरथ' ही संतोक्ति असून बाबाच भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण करितात हें खास.

के. के. भोप्ये

## श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न.

पार्ले ता. ३१. ८. १८

एकदां मी शिर्डीस असताना मुंबईचें पत्र आलें त्यांत लिहिलें होतें कीं नानासाहेब करवेळकरांचे कुटुंब व त्यांचे बंधु बाळुकाका फार अजारी आहेत. पत्रांतील मजकूर महाराजांचे चरणीं निवेदन केला तेव्हां बाळूकाकांबद्दल महाराज म्हणाले तो चांगला होईल. नानासाहेबांचे बायकोबद्दल महाराजांनीं विचारलें ती आली आहे का? नाहीं असें उत्तर दिलें व तिला बोलवायची का? असें विचारलें. महाराज होय म्हणाले. पुढें कळलें कीं नानासाहेब यांचें कुटुंब वारलें व बाळुकाका बरे झाले.

पार्ले ता. १६. ९. १८

शिर्डीचे माधवराव देशपांडे यांना एकदा मूळव्याध झाली. त्यांनीं महाराजाना सांगितलें. महाराज म्हणाले आपण दुपारीं औषध करूं. त्याप्रमाणें दुपारीं महाराजांनी सोनामुखीचा काढा केला व त्यांतला थोडा माधवरावांना दिला. त्याबरोबर मूळव्याध एकदम बंद झाली. पुढें दोन वर्षांनीं त्यांना पुन्हा मूळव्याध झाली. महाराजांनीं पूर्वी काढा दिला होता म्हणून माधवरावांनीं आपल्याच विचारानें काढा घरीं तयार करून तो घेतला. त्यापासून बरें न वाटतां मूळव्याध जास्त भडकली. पुढें कांहीं दिवसांनीं महाराजांचे कृपेनें बंद झाली. सारांश गुण औषधांत नसून महाराजांच्या हातांत व आशीर्वादांत आहे.

श्रीसमर्थ ज्ञानेश्वर महाराजांचा अमृतानुभव हा ग्रंथ प्रसिद्धच आहे पण अति दुर्बोध असल्यामुळें फार थोडया लोकांच्या वाचनांत आहे. त्याजवर ओवीबद्ध विस्तृत टीका करून साधारण जनांना तो सुबोध करावा असें दास गणूंच्या मनांत आलें. हा आपला विचार त्यांनीं सातारचे प्रसिद्ध दादा महाराज म्हावी यांस कळविला. त्यावर दादा महाराजांनीं त्यांना मोडा घातला. ते म्हणाले टीका करण्यापूर्वी मूळ ग्रंथ तुम्हाला उत्तम तज्ञाकडून चांगला समजून घ्यावा लागेल. कांहीं महिने तुम्ही आमच्या जवळ राहून

ग्रंथ समजून घ्या आणि मग टीका करा " दादा महाराजांचे ज्ञानेश्वर महाराजांचें ग्रंथांचें परिशीलन उत्तम आहे अशी त्यांची आख्या आहे. दास गणू म्हणाले " मी टीका करावी अशी बाबांची इच्छा असली तर तेच मला बुद्धियोग देऊन ग्रंथ समजून देतील. मी दुसऱ्या कोणाजवळ शिकावयास जाणार नाहीं. " दादा महाराजांना हें दास गणूंचें म्हणणें पटलें नाहीं तरी पण त्यांनींही दास गणूंचा हेतु सिद्धीस नेण्याविषयीं बाबांची प्रार्थना केली व दास गणूंनीं स्वतः ग्रंथ वाचून टीका लिहिण्याची सुरुवात केली. दोन अध्यायावर टीका झाल्यानंतर दादा महाराज दास गणूस पुनः भेटले आणि ग्रंथाविषयी विचारपूस केली. दासगणूंनीं लिहिलेले अध्याय वाचून दाखविले. ते ऐकून दादा महाराज सद्गदित झाले व म्हणाले " बाबा खरे समर्थ आहेत व त्यांची तुमच्यावर कृपा आहे म्हणूनच अशी टीका तुमच्या हातून होत आहे. तुम्हाला दुसऱ्या कोणाची मदत घेण्याचें कारण नाहीं ".

पार्लें ता.२०. ९. १८

माझ्या एका स्नेह्याचे मुलीला गर्भार असतांना वेड लागलें होतें. एक सारखी रात्रंदिवस बडबड करीत असे. घरांतलें सामान इकडे तिकडे फेकीत असे. खिडकीवाटे बाहेरही टाकी. तिचे महिने भरले तेव्हां सगळ्यांना मोठी काळजी पडली. कारण डाक्टरांनीं सांगितलें होतें कीं तिचें बाळंतपण फार जड जाईल. डाक्टरांनीं एका हुशार सुईणीचीही व्यवस्था करून ठेविली होती. महाराजांनीं चांगला आशिर्वाद दिला होता व तो आशीर्वादच खरोखरी उपयोगी पडला. एके दिवशीं सकाळीं तिचें पोट दुखुं लागले व एक माणूस डाक्टराकडे व एक माणूस समोर तिची मोठी बहीण राहते तिला बोलावयला गेला. ती ताबडतोब आली व त्या मुलीजवळ बसली. बसल्याबरोबर मुलीचा गर्भ बाहेर पडला तो थोरल्या बहिणीच्या हातावरच पडला. कोणत्याही तऱ्हेचा त्रास झाला नाहीं. बाळंत झाल्यावर सुमारें अर्ध्या तासानें डाक्टर आले अर्थात् ते येण्याचे पूर्वीच त्यांना बाळंत झाल्याची खबर पोहोचली.

गुलबर्याहून रा. रा. जी. वी. मानकर यांचे कडून रा. रा. बाबा साहेब तर्खड यांना आलेल्या पत्रांतील उतारा:—

येथील २७५ हार्स पावरचें " डीझल एन्जिन " उभें करीत असतां व त्याची " फ्लाय पुली " जी सुमारें १२ टन वजनाची होती, ती " क्रेन " मार्फत उचलीत असतां " क्रेन " नाजूक असल्याकारणानें थांकली व कुर्र्र् असा आवाज झाला. त्यामुळें माझें काळीज चर्र्र् झालें व सर्वांगाला दरदरून घाम सुटला. " क्रेन " तुटली असती तर कित्येक माणसें दगावली असती. मी तात्काळ श्रीसाईबाबांस मोठ्यानें हांक मारली, व त्यांचा धावा करून 'बाबा आतां सर्वांना संभाळा' म्हणून ओरडलों. एक क्षण गेला नसेल तोंच धुपाचा व गुलाबांच्या फुलांचा सुगंध चोहींकडे पसरला व मजूर लोक एकमेकांना फुलें कोणी आणलीं व धूप कोण जाळीत आहे, वगैरे विचारूं लागले. ह्या बाबांच्या साक्षात्कारानें माझें अंतःकरण भडभडून आलें, डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागल्या व मी तात्काळ मोठ्यानें ओरडलों कीं " हा बेस " ( म्हणजे उचला ) माझे बाबा आले." मजूर वर्ग बारीतून पाहूं लागला. बाबा (म्हणजे माझे पिताश्री) कुठे आहेत ते. मी आनंदानें हांसलों. व म्हणालों बाबा म्हणजे श्री साईबाबा. गुलाबांच्या फुलांचा घमघमाट व धूप जळल्याचा सुगंध जो सुटला आहे, हा त्यांचा साक्षात चमत्कार.

श्रीसाईबाबांच्या कृपेनें ' फ्लाय पुली ' कांहीं अडचण न येतां उचलली गेली व श्री सद्गुरूनीं माझ्यावरील अपेश दूर केलें.

रा० रा० गणपतराव नरके एम. ए. यांचे रा० रा० काकासाहेब दीक्षित यांस पत्रः—

शिरडी. २ मार्च १९१८

ति.॥ काकासाहेब यांस साष्टांग नमस्कार. आपलें ता. १ चें कार्ड पावलें. आपला नमस्कार श्रींना ता. ३१ रोजी सायंकाळीं डॉ. पिल्ले मार्फत कळविला बाबा " बरें आहे " इतकेंच म्हणाले. नवल विशेष कांहीं नाहीं.

बाबांची प्रकृती चांगली आहे. काल व आज सकाळीं बाबांनी मुद्दाम बर्फी आणून वाटली. घरीं १० वाजतां परत आल्यावर वाड्यांत आम्हीं त्याची चर्चा करीत होतों तितक्यांत कोणाचे हातात ठोसरांची[1] निमंत्रण पत्रिका पडली. झालें. मंडळी म्हणूं लागली कीं बाबांची तिकडे ठोसरांकडे स्थापना[2] झाली त्याचाच हा प्रसाद वाटला. काल दुपारीं वझ्योचा सत्यनारायण झाला. बाबांनी ह्याकरितां वझ्यांना रु २५ स्वत:जवळचे दिले होते. दुपारीं सर्व मंडळींना बाबासमोर निमंत्रण करण्यांत आलें होतें. पूजा मर खांबाजवळ झाली. दीक्षित चौरंगाजवळ वर बसून पोथी वाचीत होते. बाबासमोर समई जळत होती.आजूबाजूस सर्व मंडळी पोथी ऐकावयाला म्हणून बसली होती. पण बाबांकडेच बघत होती. न्याहारीचे वेळेपर्यंत ५ वा अध्याय संपत आला. तितक्यांत न्याहारी आल्यावर बाबांनी पूजेचें व नैवेद्य सावकाश रीतीनें खालीं नेण्यास सांगितलें. नैवेद्य माझेकरितां ठेवा आणि सर्वांस वाटा असें म्हणाले. बाबांचे न्याहारीनंतर वझ्यांनी आरती केली. फार आनंद झाला. नंतर बाबांनींही स्वत: शेंगादाणे आणून वाटले व डाळ आणून ती भिजत ठेविली. रा. रा. खडक्यांना बाबा मशिदींत जेऊं घालीत असतात. कळावें लोभ असावा ही विज्ञापना. काकांना साष्टांग नमस्कार.

आपला नम्र

गणपती नरके

बर्फी चालू आहे. गंगाराम हलवायाचे मुळापासूनच घेतात.

रा. रा. दामोदर घन:श्याम उर्फ अण्णा चिंचणीकर हे श्रीसाईबाबांचे भक्त होते त्यांनी आपल्या इस्टेटीचें मृत्यूपत्र केलेलें होतें. त्या मृत्यूपत्राची नक्कल.

## श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न.

मी दामोदर घन:शाम बाबरे राहाणार चिंचणी तालुके डाहाणू जिल्हा ठाणे आज वस्ती विरले पारलें हें माझें अखेरचें मृत्युपत्र करून ठेवीत आहें.

---

१ रा. नारायण महादेव ठोसर रहाणार पार्ले, २ रा. ठोसर यांनी पार्ल्यास एक मारुतीचें देऊळ बांधलें असून तो सर्वां साई हनुमान नांवानें प्रसिद्ध आहे.

मी आजपर्यंत जीं मृत्युपत्रें केलीं असतील तीं या लेखानें रद्द करीत आहें व माझ्या पश्चात् माझे एकंदर इष्टेटीची व्यवस्था खालीं लिहिल्याप्रमाणें करीत आहें.

या मृत्युपत्राचे उर्फ व्यवस्थापत्राचे पंच म्हणजे एक्झीक्युटर श्री खालील गृहस्थांस नेमतो.

श्रीयुत हरि सीताराम दीक्षित सॉलीसीटर
,, गोविंद रघुनाथ दाभोळकर
,, अच्युत नारायण खरे वकील
,, मोरेश्वर विश्वनाथ प्रधान
,, लक्ष्मण गणेश महाजनी

माझी स्थावर मिळकत खरीफ वरकस बागायत जमिनी मौजे चिंचणी तालुके डाहाणु मौजे नेवाळें तालुके माहिम मौजे वेडे तालुके माहिम जिल्हा ठाणें येथें आहे. त्यापैकीं कांहीं मिळकत माझे कबज्यांत आहे व कांहींच्या संबंधानें कोर्टांत दावे चालू आहेत. ती सर्व मिळकत व माझी एकंदर जंगम मिळकत सुद्धां श्रीसद्गुरु सांईबाबा यांचेप्रीत्यर्थच उपयोगास यावी अशी कांहीं वर्षांपासून माझी उत्कट इच्छा आहे. त्यांच्याच कृपेनें मला व माझे स्त्रियेला त्यांचे चरणाजवळ कांहीं वर्षे वास करण्याचा सुयोग आला व आमची उभयतांची त्यांच्यावर पूर्ण श्रद्धा बसली. माझी स्त्री गेल्या फाल्गुन वद्य प्रतीपदेला वारली. मरण्याचे पूर्वी तिनें आग्रहपूर्वक विनंती केली कीं, श्रीसाई बाबा महाराजांचें मंदीर चिंचणीस बांधावें. त्याप्रमाणें मी मंदीर बांधण्याची सुरवात केली आहे, तें माझे हयातींत पुरें न झाल्यास वर लिहिलेल्या पंचांनीं पुरें करावें व तेथें श्रीसाईबाबा महाराजांच्या मूर्तीची स्थापना करावी व नित्याच्या पूजेअर्चेची व नैमित्तिक पूजेची व्यवस्था करावी व त्या खर्चासाठीं माझ्या इष्टेटीच्या उत्पन्नांतून सालीना रुपये तीनशें खर्च करावेत व बाकी जें उत्पन्न राहील त्यांतून सरकार देणें सावकाराचा म्हणजे

मनोरदास लालदास याचे कर्जाचा हप्ता चारशें रुपयांचा देऊन जें उत्पन्न राहील त्यांतून श्रीक्षेत्र शिरडी येथील श्री साईबाबा महाराजांच्या समाधीचे जे व्यवस्थापक असतील त्यांचे स्वाधीन करीत जावें. सावकाराचें देणें फिटल्यानंतर जें माझें निव्वळ उत्पन्न राहील त्यांतील-¼ हिस्सा पंचांनी चिंचणी येथील सदरहू मंदीराप्रीत्यर्थ खर्च करावा व बाकीचा-¾ हिस्सा शिरडी येथील ~~व्यवस्थापकांस पाठवून द्यावा~~. जंगम मिळकतीपैकीं चिंचणी येथील सदरहू मंदीरासाठीं जितकी रक्कम माझ्या पंचांना योग्य वाटेल तितकी त्यांनीं ठेवावी व बाकी राहीलीची व्यवस्था पंचांस योग्य वाटेल तशी करावी. पण तिचा उपयोग श्रीसाईबाबा महाराजांचेप्रीत्यर्थच झाला पाहिजे. त्यापैकीं शेतीसाठीं लागवडीस उपयोगाकरितां अवश्य लागेल ती ठेवावी.

चिंचणी येथें मंदिराचे जवळच श्री साईबाबा महाराजांचे भक्त मंडळांचे सोईसाठीं एक घर बांधण्याचा माझा विचार आहे. तें जर माझ्या हयातींत बांधलें गेलें नाहीं तर तें पंचांनीं माझे इष्टेटीचे उत्पन्नांतून खर्च करून बांधून उपयोगास आणणें त्याची सर्व व्यवस्था माझे पंचांनीं करावी. तें घर सदरील मंदीराचाच भाग समजला जाईल व तें घर व सदर मंदीर हीं दोन्ही खाजगत मिळकत समजलीं जातील व त्यासंबंधानें व्यवस्थेचे सर्व हक्क माझे पंचांस मी देतों. व त्यांना घराचे व मंदीराचे ट्रस्टीनेमितों त्या ट्रस्टीपैकीं कोणाची जागा रिकामी झाल्यास बाकीच्या ट्रस्टींनीं ती भरावी.

किरकोळ लोकांचें देणें आहे त्याची व्यवस्था पंचांनीं करावी.

हें मृत्युपत्र मी माझे राजीखुषीनें व अक्कल हुशारीनें लिहून ठेविलें आहे. तारिख १० जुलई सन १९१९

साक्ष — सही

१ माधव बळवंत देशपांडे — दामोदर घनःशाम बाबरे

मु॥ पारलें ता॥ खु॥ — दस्तूर खुद हस्तें खुद

Sadashiv Sitaram Dikshit, Parla

## सौ. रंगूबाई विरचित

पद नं. ११

साईनाथांसी पाहूं जाऊं चला शिरडी ॥ झडकरी जाऊं चला शिरडी ॥धृ०॥ ध्यास तयांचा लागला चित्ता ॥ नाहीं सुचत कांहीं ॥ झडकरी ॥ १ ॥ कोपर गांवीं तांगा करूनी ॥ न्हाऊं गोदातीरीं ॥ झड० ॥ २ ॥ आनंदानें दर्शन घेऊं ॥ लीन तत्पदीं होऊं ॥ झड० ॥ ३ ॥ हेतु मनींचे पुरवितील ते ॥ भाव ठेऊं पायीं ॥ झडकरी ॥ ४ ॥ मन हें धांवत स्वस्थ न राहत ॥ काय करूं पाहीं ॥ झडकरी ॥ ५ ॥

पद नं. १२

जाऊं चला आरतीला ॥ नमुया श्रीगुरु साईपदाला ॥ जाऊं ॥धृ०॥ जन हे येती पूजन करिती । सुमन हार ते गळां घालिती ॥ मस्तक साईपदीं नमवीती । करुनी प्रार्थनेला ॥ घेऊनी जाती प्रसादाला जाऊं॥१॥ हळू हळू बोलती भाषा घाटी । उकले ज्याची त्याला गांठी ॥ इतरां वाटती फोलची गोष्टी ॥ मम चित्तभ्रम हरला ॥ पाहुनी सांई सत्स्वरुपाला ॥ जा० च० आ० ॥२॥ आला मेघा करुयां आरती ॥ छत्र रुप्याचें धरुं सांईवरती ॥ उभे भालदार चवरी ढाळिती ॥ तास झणाणे ऐका । जय जय जयगुरु साईविलोका ॥ जा० च० आ० ॥ ३ ॥

## ह. भ. प. दासगणू यांचें शिष्य दामू अण्णा यांचें

पद नं. १३

अ॰अ ब्रम्हरुप साईनाथ माझा गुरुवर ॥ प्रति तुजा वाटे दैदीप्यमान दिनकर ॥ धृ ॥ गाणार वाजवीणार सांई प्रियकर ॥ तसा ऐकणार असे तोचि साच गुरुवर ॥ १ ॥ करिं धरुनि मदिय तंबुरा गाई सुस्वर ॥ परि मधें कसारे नाकळे होतो बद्‌सुर ॥ २ ॥ नको देऊं किमपि बद्‌सुरा ठाव गुरुमाई ॥ या सांई ॥ किती वानु तुजसि मी पापि अतिरे पामर ॥ गणुछात्र विनवि मम दुजा भाव करि दुर ॥ ३ ॥ असे० ॥

पद नं. १४

दर्शन दे साइबाबा ॥ सकल दुरित मम हरुनि त्वरित दर्शन ॥धृ॥ काम मोह मद लोभ थरथरा ॥ कांपति तुज पाहुनि नटवरा ॥ तुझिया चरणीं रिपु करिती नमन ॥ दर्शन ॥ १ ॥ त्वदिय समुहीं मी पापि म्हणून ॥ नाम तुजसि लाधलें पतित पावन ॥ मग अनंग चरणिं ध्याया करिना कसर ॥ २ ॥ अश्र तुझे लेंकरु ना कदा ॥ टाकी भवीं भो घेई तव पदा ॥ सतत तुजसीं गणू छात्र शरण ॥ दर्शन ॥ ३ ॥

### दासगणुकृत

( भूपाळी )

झाला बालभोग आतां उघडावें द्वार ।
गरुडपारीं आले देवा वैष्णव डिंगर ॥
गहिनीनाथाचा तो शिष्य निवृत्ति दातार ।
घाली दंडवता तुम्हां जोडुनियां कर ॥
तुझिया कृपें ज्यांनीं देवा रेडा बोलविला ।
प्रवरेच्या तटीं ग्रंथ ज्ञानेश्वरि केला ॥
ते हे वैष्णवांचे गुरु श्री ज्ञानेश्वरि ।
चांगा नामा जनी कान्हो नरहरि सोनार ॥
महाद्वारीं राहुन चोखा करीत जोहार ।
मंगळवेढयाहुनी आले तव ठाणेदार ॥
कुलाल बंका राका वंका मुक्ता सोपान ।
देवगिरीचे सुभे आले पंत जनार्दन ॥
पैठणींचे आले भक्ती भानुदास देवा ।
नामयाचा गुरू खेचर विसोबा बरवा ॥
ज्याचे सदनीं देवा तुम्हीं पाणक्या झालां ।
गोदावरींचा साधू तो हा एकनाथ आला ॥
डोईस गोफण हातांत खुरपें मणि तव कंठीचा ।
आला तो सांवता माळी अरणभेंडीचा ॥
भवाब्धीचें केवळ तारूं श्रीदेहूकर ।
तुकोबा ते आले आतां कांहो उशीर ॥
ज्याचे शेतीं आपण बसला राखण शेताला ।
धामणगांवींचा तो पाटिल बोधला आला ॥
आवड देवा तुम्हां बहू निंबराजाची ।
देव इच्छिताती लाही त्याच्या काल्याची ॥
संतचरित्रीं ज्याचा प्रेमा जडला अनिवार ।
तो हा महीपती आला साधू ताहाराबादकर ॥
मियां शेखमहंमद साधु उदार संतोषा ।
आधुनिक संतांसह आले शिर्डीचे बाबा ॥
या सकळांनी मेळवीं तुझें भजन मांडिलें ।
दासगणू म्हणे उघडा आतां द्वार विठ्ठले ॥ १० ॥